
# ना. सी. फडके

## गुणगौरव ग्रंथ

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७२५०



REFBK-0010872

अनुक्रम २६६१२
विभाग निबंध
क्रमांक १२५०
नों. दि. १८/१२/६०.

प्रा. ना. सी. फडके सत्कार समितीतर्फे

# प्रा. फडके गुणगौरव ग्रंथ

-: संपादक मंडळ :-

ह. रा. महाजनी

पां. तु. कांदळगांवकर

अ. सी. केळूसकर

वि. वा. पत्की

REFBK-0010872

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 10.662

मूल्य ४ रुपये

हिंदमाता प्रकाशन, मुंबई १२

: प्रकाशक :
**शां. का. टांककर,**
हिंदमाता प्रकाशन
२/६०, पटेल टेरेस, परेल,
**मुंबई १२.**

सर्व हक्क स्वाधीन
कार्यवाह, प्रा. ना. सी. फडके सत्कार समिती, मुंबई


: मुद्रक :
**शां. का. टांककर**
हिंदमाता प्रिंटिंग प्रेस,
जेरबाई वाडिया रोड,
परेल, **मुंबई १२**

# -: अनुक्रमणिका :-


| विषय | लेखक | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| प्रा. फडके गुणगौरव ग्रंथाची पार्श्वभूमि | संपादक मंडळ | १ |
| प्रा. फडक्यांचीं कोल्हापूरांतील पंचवीस वर्षें | वि. वा. पत्की, एम्. ए. | ५ |
| फडके आणि मी | गोपीनाथ तळवलकर | १५ |
| रसमेघ ! | कवि गिरीश | १७ |
| स्नेहाभिनंदन | शिल्पकार – फडके | १८ |
| ढग कसा निवळला ? | शं. वा. किर्लोस्कर | २० |
| ना. सी. फडके असं लिहितात ! असं वागतात! | म. अ. देशपांडे | २६ |
| प्रा. ना. सी. फडके यांची मुलाखत | | ३७ |
| कादंबरीकार फडके-एक चिंतन | प्रा. वसंत कानेटकर | ४८ |
| कादंबरीकार फडके | प्रा. पद्माकर पेशकार | ७१ |
| विजिगीषु शरद : शतम् ! | र. कृं. चिंचलीकर | ७६ |
| प्रा. ना. सी. फडके यांस- | अ. ना. देशपांडे | ७९ |


( मागें पहा )

| | | |
|---|---|---|
| दोन आठवणी | ना. गो. पंडितराव | ८० |
| प्रा. ना. सी. फडके : मराठी लघुनिबंधाचे जनक | प्रा. मधुकर त्रि. फाटक, एम. ए., एम. एड. धुळे | ८१ |
| प्रा. फडके यांच्या गुजगोष्टी | म. श्री. दीक्षित | |
| प्रा. फडके : व्यक्तिमत्व आणि शैली | प्रा. श्री. के. क्षीरसागर | १०१ |
| मराठी लघुकथेचे शिल्पकार | प्रा. म. ना. अदवंत | १११ |
| रेडियो वक्ते : प्रा. फडके | बा. भ. बोरकर | १२० |
| एक आगळें व्यक्तिमत्व | डॉ. माधव गो. देशमुख | १२४ |
| जातिवंत कवि : आप्पासाहेब फडके | डॉ. वि. भि. कोलते | १३० |
| नजराणा | प्रा. चंद्रकुमार डांगे | १३८ |
| जीवन–संगीत | सौ. कमला फडके, एम. ए. | १४६ |
| फडके–व्यक्तित्व व वक्तृत्व | वामन कृष्ण चोरघडे | १७७ |
| प्रा. फडके यांच्या साहित्यसेवेचें वैशिष्ट्य | ग. त्र्यं. माडखोलकर | १८६ |
| गृहस्थाश्रमी आप्पा | पां. तु. कांदळगांवकर एम. ए. | १९१ |



प्रा. ना. सी. फडके व सौ. कमला फडके


# प्रा. फडके यांचं हस्ताक्षर

Prof. N. S. PHADKE
Author & Journalist
Editor " ANJALI "

" Doubt "
42. Vijayanagar Colony,
POONA 2.

सृष्टीचं नवंच रूप तिला दिसू लागलं होतं. जिकडे तिकडे नारळी पोफळींच्या गर्द राई होत्या. झावळ्यांनी आच्छादिलेली छोटी छोटी घरं होती. जलाशय होते. देवळं होती. मधूनच एखादं चर्च दिसत होतं. छोट्या आकाराच्या माडोशी 'बस' गाड्या धावत होत्या. रस्ते लाल होते. मोठाल्या वयस्क बायकांनी देखील चिटाचे झगे परकर आणि तसलीच कुडती घातली होती. पुरुषांच्या अंगावर साहेबी पोशाख आणि साहेबी टोप्या होत्या, पण त्या जुन्या मळकट होत्या. बहुतेक साऱ्या पुरुषांच्या तोंडात चिरुटांची धुरी पेटलेली होती. नेसूच्या धडू कांचा मारलेल्या कामकरी बायादेखील विड्या ओढीत होत्या. धोतर, सदरा, टोपी अशा वेषातही काही पुरुष दिसत होते. साडीचोळी नेसून वावरणाऱ्या बायकांचे अंबाडे मोठाले होते, आणि त्यांवर त्यांनी शेंदरी रंगाची फुलं माळली होती. अबोलीच्या वेणीला मुंबईत चार आणे पडत होते. या बायकांनी तर आपले अंबाडे अबोलीच्या फुलांनी भरगच्च मढवून टाकले होते. फार श्रीमंत असल्या पाहिजेत या बायका!...

"हे आपलं घर बरं का अबू!" असं अबोलीच्या वडिलांनी तिला सांगितलं, तेव्हां तिनं नीट न्याहाळून पाहिलं होतं. केवढं प्रचंड आंगण. केवढी थोरली मोठी विहीर. विहिरीवर भलं मोठं लाकडी चक्र. त्या चक्राला लावलेले पोहरे!... अबोलीनं धावत जाऊन विहिरीच्या काठावर टेकून वाकून पाहिलं. काळं भोर स्वच्छ पाणी तिला दिसलं. पोहऱ्यांची माळ पाण्यात बुडलेली दिसली. एक दगड घेऊन तिनं टाकला तो डुबुक् दिशी वाजला. 'अय्या! किती मजा!' असं म्हणत नाचतांना ते मोठं आंगण तिला पुरलं नव्हतं... आज तोच उद्गार नंतरच्या आठ दिवसांत तिच्या तोंडून अंगणांत वेगळा बाहेर पडला होता...



सौ. कमल फडके, एम्. ए.



ग्रं. क्र. १०८७८

# प्रा. फडके गुणगौरव ग्रंथाची पार्श्वभूमि

सूर्याला, पणती दाखवून हा सूर्य आहे याची कल्पना कुणी करून द्यायला नको! प्रा. ना. सी. फडके ह्या भारतांतील ख्यातनाम ग्रंथकाराच्या बाबतींत पण असें आहे.

सुकुमार, लाघवी आणि अर्थवाही शैलीनें नटविलेली सुबोध भाषा, ग्रंथांची तंत्रशुद्ध रचना, प्रभावी आणि आल्हाद देणारें सौंदर्यपूर्ण रम्य वातावरण, कला आणि जीवनाचा अगम्य संगम, वास्तवता आणि विविधता या नवरंगांनीं वाङमयाची सारीं दालनें प्रा. फडक्यांनीं कुशलतेनें चितारून सुशोभित केलीं आहेत. कादंबरी, लघुकथांतून प्रणय भृंग गुंजारव करतांना टिकाकारांना दिसतो. मात्र त्यांत स्वातीच्या पावसाच्या धारापासून बनलेल्या टपोऱ्या मोत्यांप्रमाणें, बहरलेल्या पुरोगामी विचारसरणीच्या फुलांच्या सुगंधाचा आस्वाद त्यांना घेतां येत नाहीं! –लघुनिबंधांत ‘ साध्या विषयांत मोठा आशय ’ त्यांनीं आणला एवढेंच नव्हे तर मराठींतील लघुनिबंधांचे सम्राट म्हणून प्रा. फडके यांचा उल्लेख केला तर ती अतिशयोक्ति व्हायची नाहीं. नाटकाच्या क्षेत्रांत ते फारसे चमकले नाहींत कारण ‘माझं नाटक करा’ म्हणून त्यांनीं कधीं कुणाला गळ घातली नाहीं व तशी त्यांची प्रवृत्ती नाहीं! कविता त्यांनी फार थोड्या लिहिल्या. प्राजक्तांची फुलें ओंजळींत घेऊन हुंगण्याचा जो आनंद आहे तो त्यांच्या कवितांत आहे. मानसशास्त्र, तर्कशास्त्र, लैंगिकशास्त्र यासारख्या विषयांवर त्यांनीं अधिकार वाणीनें लिहिलेलें लिखाण वाचून पाश्चात्य शास्त्रज्ञांनीहि त्यांची पाठ थोपटली आहे. प्रा. फडके प्रभावी लेखक तसेच पट्टीचे वक्ते आहेत... ! सखल आणि सुपीक जमिनीवर संथपणें झुळझुळ वाहणाऱ्या निर्झराप्रमाणें त्यांच्या भाषणाचा ओघ ‘ मित्रहो ’ म्हणून वाहतो. विद्वत्ता, अनुभव व दाखले यांनीं ओतप्रोत भरलेलें त्यांचं सुबोध व रसाळ भाषण ऐकतांना रसिक तन्मय झाल्यास नवल काय!

विपुल पण सौष्ठवपूर्ण लिखाण प्रा. फडके गेली ४८ वर्षे करीत आले आहेत. त्यांच्या लघुकथांचे अनुवाद इंग्रजी, फ्रेंच, इटालियन, जर्मन भाषांत झाले आहेत. एका कादंबरीचें भाषांतर जपानी भाषेंत झाल आहे. प्रा. फडके अधूनमधून इंग्रजींतून कथाकादंबऱ्या लिहितात. प्रासंगिक लेख पण बहारदार असतात.

अशा या कलाप्रिय सौंदर्य उपासकाचा व जीवनाकडे आत्मियतेनें पहाणाऱ्या आणि दैनंदिन धकाधकीच्या जीवनानें निराश झालेल्या लोकांना आशा, महत्त्वाकांक्षांचें हिमालय नव्या जोमानें ओलांडण्यास प्रवृत्त करणाऱ्या आणि अकृत्रिम आनंद लुटू देणाऱ्या ग्रंथकाराचा, त्यांच्या ५० व्या कादंबरीच्या ( कुहू कुहू ) प्रसिद्ध करणाच्या निमित्तानें गौरव करावा असें त्यांच्या असंख्य स्नेह्यांना, चहात्यांना वाटल्यास नवल काय ?

'**प्रा. फडके चेअर**,' मुंबई, पुणें, नागपूर व मराठवाडा विश्वविद्यालयांनीं स्थापन करावी आणि मराठी भाषेची आणि भारतीय संस्कृतीची अमोल व सुरम्य रत्ने प्रकाशांत आणावीत असें त्यांचा सत्कार करणाऱ्या रसिकांस वाटणें साहजिक आहे ! महाराष्ट्र राज्य आणि मध्यवर्ती सरकार यांनीं त्यांचा गौरव करावा हें उचितच होय. पण त्या दिवसाची मंगलप्रभात निनादेल तेव्हां निनादेल; पण प्रा. फडक्यांचा मराठी भाषिकांनीं केलेला गौरव, साहित्तिकांच्या आजपर्यंत झालेल्या गौरवांत अविस्मरणीय राहील यांत शंका नाहीं.

प्रा. फडके यांच्या सत्कार प्रसंगीं गौरव ग्रंथाची योजना उशीरा जाहीर झाली. पण महाराष्ट्रांतील श्री. शं. वा. किर्लोस्कर, प्रा. वसंत कानिटकर, डॉ. वि. भा. कोलते, डॉ. माधवराव देशमुख, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. म. वि. फाटक, प्रा. वा. कृ. चोरघड, प्रा. चंद्रकुमार डांगे, श्री. म. श्री. दीक्षित, श्री. देशपांडे, श्री. वि. वा. पत्की, कवि वा. भ. बोरकर, कवि गिरीश, श्री. र. कृ. फडके, प्रा. प्रभाकर पेशकार, श्री. पां. तु. कांदळगांवकर व सौ. कमल फडके सारख्या कसलेल्या व अभ्यासु लेखकांनीं थोड्या अवधींत प्रा. फडके गुणगौरव ग्रंथासाठीं लिखाण पाठविल्यामुळें ता. ६ नव्हेंबर १९६० रोजीं प्रा. फडके यांच्या सत्कारप्रसंगीं हा गौरव ग्रंथ प्रसिद्ध होऊं शकला याबद्दल प्रा. फडके सत्कार

समिती त्यांची ऋणी आहे. वरील लेखकांशिवाय अनेक प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेखकांचे लिखाण, आठवणी व पत्रें आलीं पण विषयाची पुनरावृत्ति टाळण्यासाठीं व थोड्या अवधींत ग्रंथ प्रसिद्ध व्हावयाचा असल्यामुळें त्यांचें लिखाण या मर्यादित पृष्ठांच्या ग्रंथांत येऊं शकलें नाहीं याबद्दल संपादक मंडळ व सत्कार समिती दिलगिरी व्यक्त करतें. हातांशीं असलेल्या इतर लिखाणाला कांहीं वृत्तपत्रांत प्रसिद्धी देण्यांत आली आहे. या सर्व वृत्तपत्रकारांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. गौरव ग्रंथांत योग्य विषयवारी करण्यास व काळजीपूर्वक प्रुफें तपासण्यास सत्काराच्या धांदलींत कोणास सवड मिळाली नाहीं, ही गोष्ट प्रत्यक्ष प्रा. आप्पासाहेब पण क्षम्य मानणार नाहींत! तरी मराठी भाषेचे अभिमानी आणि चतुर वाचक यांनीं गुणगौरव ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वींच त्याचें केलेलें स्वागत लक्षांत घेऊनच तो वैशिष्ठपूर्ण लेखांनीं सजविला आहे त्याचा 'शबरीची बोरं' म्हणून प्रा. फडके यांनी स्वीकार करावा.

प्रा. फडके यांच्या सत्काराची व आज प्रसिद्ध होणाऱ्या गुण गौरवग्रंथाची पंडित जवाहरलाल नेहरूपासून तो महाराष्ट्रांतील ख्यातनाम साहित्यिकांनीं व गुणी रसिकांनी छत्रपती शहाजी महाराज कोल्हापूर, ग्वाल्हेर नरेश, सावंतवाडीचे महाराज यांनीं दिलेले उत्तेजनहि नमूद करणें जरूर आहे.

महाराष्ट्रांतील वृत्तपत्रकारांनीं, साहित्यिकांनीं व रसिकांनीं अपेक्षिल्या-प्रमाणेंच सदर गुण-गौरव ग्रंथ श्रेष्ठ साहित्याच्या कसोटीस उतरेल आणि मराठी भाषिक त्याचें हीरीरीनें स्वागत करतील याबद्दल आम्हांस पूर्ण भरंवसा वाटतो.

—या ग्रंथाची छपाई अवघ्या पंधरा दिवसांत करून दिल्याबद्दल व तो ग्रंथ आपल्या हिंदमाता प्रकाशनतर्फें प्रकाशित केल्याबद्दल श्री. शां. का. टांककर यांचे व हिंदमाता प्रिंटिंग प्रेसच्या 'गुणी कामगारांचे' तसेंच श्री. दौ. मु. साटम यांनीं थोड्या अवधींत सुबक मलपृष्ठ तयार करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. या ग्रंथ विक्रींतून जें उत्पन्न होईल व प्रा. फडके यांच्या सत्कार निधींतून खर्च वजा जातां जी रक्कम राहील ती बी.ए. च्या परिक्षेंत मराठी विषय घेऊन पहिला क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ति अगर सुवर्ण पदकाच्या

रूपानें देण्यासाठीं मुंबई विश्वविद्यालयाचे स्वाधीन करण्यांत येईल. शक्य झाल्यास पुणें, नागपूर व मराठवाड या महाराष्ट्रांतील इतर विश्वविद्यालयांकडे पण वरील योजनेप्रमाणें रक्कम पाठविण्यांत येईल.

—मराठी भाषिक या योजनेचा पुरस्कार करतील आणि उदार अंतःकरणानें आर्थिक साहाय्य करतील तर वरील योजना अंमलांत आणण्यास अवधी लागावयाचा नाहीं.

—भारतांतील प्रख्यात ग्रंथकार, —साहित्य सम्राट–प्रा. ना. सी. फडके एम्. ए. यांना हा ग्रंथ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री, प्रा. फडके यांचे एक काळचे विद्यार्थी, राजकारण धुरंधर व साहित्यक श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्तें प्रा. फडके यांच्या वाङ्मयाबद्दल असलेली आस्था व नितांत प्रेम याचें प्रतिक म्हणून अर्पण करण्यांत येत आहे.

ता. ६–११–१९६०

—संपादक मंडळ

# प्रा. फडक्यांचीं कोल्हापूरांतील पंचवीस वर्षे

लेखकः–वि. वा. पत्की, एम् ए.

प्रा. ना. सी. फडके १९२६ मध्यें कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत प्राध्यापक म्हणून आले आणि सेवानिवृत्तीनंतर दोन वर्षे कोल्हापूरांत राहून १९५१ मध्यें कायमपणें पुण्याला राहायला गेले. प्रा. फडके यांच्या जीवनांतील हा पंचवीस वर्षांचा काळ त्यांच्या जीवनांत अनेक दृष्टींनीं मोठा संस्मरणीय आहे.

या पंचवीस वर्षांच्या काळांतच त्यांची वाङ्मयसेवा बहरली, विस्तारली आणि या काळाला 'फडके–युग' म्हणून वाङ्मय-क्षेत्रांत संबोधितां यावें येवढ्या तेजानें चमकली. आजहि त्यांचें लेखन या पंचवीस वर्षांतील लेखनापेक्षांहि अधिक वेगानें होत असलें तरी त्यांना लेखक म्हणून प्रसिद्धि लाभली, वाङ्मय प्रांतातले लहान मोठे मान–सन्मान त्यांच्या वाट्याला आले. वाङमयीन युद्धें झालीं तीं सारीं या काळांतच! यापूर्वीच्या काळांत त्यांच्या मनाचा ओढा ललितवाङमयाकडे–निदान आजच्या इतका तरी–खास नव्हता. त्या काळांत समकालीन विद्वानांत ज्ञानेश्वरी आणि षड्दर्शनें यांचे सूक्ष्म अभ्यासू, चिकित्सक आणि मोठे व्युत्पन्न पंडित म्हणून ओळखले जाणारे त्यांचे वडील कै. सीतारामपंत फडके यांच्याकडून व्यासंगाचा जो वारसा न कळत त्यांच्याकडे चालत आला होता, त्याचा परिणाम त्यांच्या वृत्तीवर झाला होता आणि व्यासंगी वृत्तींतूनच मग 'दादाभाई नौरोजीं' चें चरित्र त्यांच्या लेखणींतून उतरलें तेव्हां त्याची मांडणी, त्यांतील प्रतिपादन, त्यांतील आवेश आणि देशप्रीति इतकी पारदर्शक ठरली कीं लोकमान्य टिळक आणि शिवरामपंत परांजपे यांनीहि शाबासकीची थाप त्यांच्या पाठीवर मारली.

पण यशाची वाटचाल अशा रीतीनें सुरू झाली न झाली तोंच महात्मा गांधींचें असहकारितेचें युग उगवलें आणि त्यांच्या अंतःकरणांतली देशभक्ति

उफाळत वर आली. न्यु पुना कॉलेज ( म्हणजे आतांचे सर परशुरामभाऊ कॉलेज ) मधील आपल्या जागेचा राजीनामा देऊन ते बाहेर पडले आणि चळवळींत सहर्ष सहभागी झाले, पण हें सारें अल्पकालच ! राजकारणांत पोटांत एक ओठांत दुसरें आणि ढोंग तर पांचवीला पुजलेलें ! हें सारें त्यांच्यासारख्याला मानवावें कसें ? स्वतःच्या अंतकरणांतल्या उसळीसरसे ते राजकारणांत घुसले खरे पण तेथील दांभिकता पाहून त्यांना वाटलें, आपला रस्ता चुकला !

शिक्षकाच्या आपल्या आवडत्या व्यवसायाकडे ते पुन्हां वळले, पण राजकारणांत–आणि तेंहि असहकारितेच्या चळवळींत-पडलेल्या फडक्यांना नोकरी देणार कोण ? मग दिल्ली, हैद्राबाद ( सिंध ) आणि नागपूर या ठिकाणीं ते गेले आणि या साऱ्या ठिकाणचे अनुभव गांठींशी बांधून ते १९२६ सालीं कोल्हापूरला येऊन स्थिर झाले. या साऱ्या धामधुमीच्या आणि भ्रमंतीच्या काळांतहि त्यांचे ग्रंथलेखन–सवड सांपडेल तसें–सुरूच होतें. टेरेन्स मॅक्स्विनी व डी. व्हॅलेरा यांचीं चरित्रें, Sex Problem in India हा प्रदीर्घ प्रबंध, ‘ कुलाब्याची दांडी ’ ही कादंबरी यांची निर्मिति या धांवपळीच्या अस्थिर जीवनांतच झाली, पण त्यांचा वाङ्मयवृक्ष रसयुक्त सुगंधी फळाफुलांनीं बहरला तो मात्र १९२६ नतरच्या कोल्हापूरच्या शांत, निवांत, उल्हासि आणि कलाप्रिय वातावरणांत !

फडके आपल्या पंचवीस वर्षांच्या जीवनांत कोल्हापूरांत वावरले ते मुख्यतः विद्यार्थी-प्रिय प्राध्यापक, कला आणि क्रीडा यांचे निःसीम भक्त आणि ललित लेखक या तीन भूमिकांत. तथापि फडक्यांच्याविषयीं तरुणवर्गाला खरे आकर्षण वाटे तें त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वामुळें. पौर्णिमेचा चंद्र उगवला कीं सारें आसमंत उजळावें किंवा हिरवा चाफा बहरला कीं त्याच्या सुगंधानें सारें परिसर दरवळावें तसें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें होतें. फडके कुठहि गेले कीं उल्हासाचीं, उत्साहाचीं, आशेचीं किरणें बरोबर घेऊन येत आणि निरुत्साही वातावरणांतहि नवा हुरुप आणि नवी आशा निर्माण करून परत जात, यामुळेंच त्यांचें साहचर्य, त्यांचें संभाषण आणि त्यांचें दर्शन यासाठीं तरुण वर्ग नेहमीं हपापलेला असे.

त्यामुळेंच त्यांचीं इंटरच्या वर्गांतलीं तर्कशास्त्रावरचीं आणि बी. ए. च्या

वर्गातली तत्वज्ञानावरची 'लेक्चर्स' हा विद्यार्थी-वर्गाचा हा एक अमोल ठेवा वाटे. आजच्याप्रमाणेंच पंचवीस-तीस वर्षांपूर्वीहि प्राध्यापकांच्या वर्गातील भाषणांकडे दुर्लक्ष करून इतर तारुण्यसुलभ चेष्टा करण्याकडे विद्यार्थी-वर्गाचा कल असेच्च, पण फडक्यांच्या वर्गातल्या वाक्प्रवाहांत विद्यार्थीवर्ग येवढा वाहवत जाई कीं आपल्या निसर्गसिद्ध प्रवृत्तीचाहि त्याला क्षणभर विसर पडे आणि त्यांच्या प्रतिपादनाकडे येवढ्या विलक्षण एकाग्रतेनें लक्ष देई कीं एरव्हीं अवखळ असणारीं हींच का तीं मुलें असा संभ्रम पडावा! विशेषतः तर्कशास्त्र हा विषय तर येवढया कौशल्यानें ते शिकवीत, कीं ज्यांना फडक्यांनीं हा विषय शिकवितांना पाहिलेलें नसे असे वरच्या वर्गातील विद्यार्थीहि आपले तास चुकवून त्यांच्या लेक्चर्सना येऊन बसत आणि क्वचित विज्ञानशाखेकडे गेलेले विद्यार्थीहि फडक्यांच्या रसवंतीच्या मोहानें त्यांच्या वर्गात गर्दी करीत! नेहमी-पेक्षां वर्गात अधिक खेंचाखच झालली दृष्टीस पडली कीं फडक्यांनाहि जणूं नवें अवसान चढे, गंमतीनें या अनाहूत पाहुण्यांना ते गोंजारीत आणि एखादे वेळेस एखाद्या विद्यार्थ्याला विचारीत देखील,

"Do you want to make your science more logical or my logic more scientific ?" त्यांच्या या नर्म विनोदानें मग सारा वर्ग मनमुराद हांसे आणि प्रफुल्ल कमळांनीं भरलेल्या शांत सरोवरांत हंसाची मनःपूर्त क्रीडा चालावी तशी त्यांची वाणी तर्कशास्त्रामधील प्रमेयातील कूटस्थलांवरून झेंपावत जाई आणि सारा विषय एवढा स्पष्ट होई कीं तर्कशास्त्र शिकवावें तर तें फडक्यांनीच अशी त्यांची कीर्ति कोल्हापूर-सांगलीतच नव्हे तर पुण्या-मुंबईकडेहि पसरली. विषय सोपा आणि सुबोध करून सांगण्याची त्यांची विशिष्ट पद्धति विद्यार्थ्यांच्या येवढी संवयीची होई कीं विषयाचा धागा न् धागा फडके उलगडून दाखवीत आहेत आणि सारा विषय बुद्धीला सहजगम्य होत आहे असें वाटे. तथापि एखादा विद्यार्थी मधेंच कांहीं समजलें नाहीं असें सांगण्यासाठीं उठलाच तर फडके हंसत आणि म्हणत, "My students have no difficulties!" तें खरेंच असे, कारण लक्षपूर्वक त्यांची 'लेक्चर्स' ऐकणाराला खरोखरच कांहीं अगम्य असें राहिलेलें नसे.

फडके राजकारणांतून बाहेर पडलेले, पण १९३०-३१ सालीं महात्मा गांधींनीं चळवळीची आग भडकाविली आणि परदेशी कापडाची होळी होऊं लागली तसे फडके नखशिखांत खादीच्या कपड्यांत दिसूं लागले आणि राजाराम कॉलेजच्या प्रवेशद्वारांतच एकदां विद्यार्थ्यांनी परदेशी कापडाची होळी पेटविली तेव्हां फडक्यांनीं आपली सुंदर फेल्ट हॅट आपल्या हातानींच अग्न्यर्पण केली. त्या दिवसापासून पुन्हां कधीं त्यांनीं आपल्या डोक्यावर हॅट ठेवल्याचें मी तरी पाहिलेलें नाहीं. त्यांच्या अंतःकरणांतला सदैव धगधगणारा देशप्रीतीचा वन्हि केव्हां कसा अचानक रीतीनें प्रगट होईल याचा कधीं नेम नसे. त्यांनीं लिहिलेल्या "आजचे तरुण स्त्री-पुरुष आणि त्यांजपुढील प्रश्न" या पुस्तकाची अर्पण-पत्रिका पाहिली की वाटे देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न त्यांच्या अंतःकरणांत कसा बोंचतो आहे ! कोल्हापूरांतच माधवराव बागलांनीं प्रजापरिषदेतर्फे मोर्चा आणला तेव्हां आपण कोल्हापूर संस्थानचे नोकर आहों याचा फडक्यांना विसर पडला आणि या मोर्च्याचें स्वागत करण्यासाठीं ते सामोरे गेले ! १९४२ च्या 'चले जाव' चळवळीचे पडसाद कोल्हापूरांत उमटून प्रक्षुब्ध विद्यार्थ्यांनी खासबागेंतील फडक्यांच्या घरासमोरच सभा भरविली आणि ती मोडण्यासाठीं पोलिसानीं घोडेस्वारांचा उपयोग केला तेव्हां पुढचा-मागचा कसलाहि विचार न करतां फडके विद्यार्थ्यांच्या मदतीला धावून गेले आणि शेवटीं पोलिसानीं त्यांनाच अटक केली तेव्हां घरांतलीं चार पुस्तकें हातांत घेऊन ते शांतपणें पोलिसांच्या गाडींत जाऊन बसले !

फडके कोल्हापूरांतील जीवनाशीं अल्पकालांत समरस झाले तरी त्यांचें कर्तृत्व केवळ साहित्यापुरतेंच मर्यादित नव्हतें. कोल्हापूरच्या सांस्कृतिक विकासांतील फडक्यांचा वांटाहि कांहीं लहान नाहीं. कोल्हापूर म्हटलें कीं कुस्तीच्या आखाड्याचें स्मरण व्हावें एवढें अभिन्नत्व या दोहोंत निर्माण झालें होतें, पण कोल्हापूर म्हणजे साहित्य आणि कला यांची गंगोत्री असा नवा संकेत रूढ होण्यासहि फडक्यांचें कर्तृत्व पुष्कळच कारणीभूत झालें आहे. साहित्य आणि कला यांच्या विकासाला पोषक अशा अनेक घडामोडींत फडक्यांनीं सुरुवातीपासूनच लक्ष घातलें आणि स्वतःबरोबर साहित्य–कलांच्याकडे अनेकांचें लक्ष वेधून

घेतलें. फडक्यांच्या अंगच्या संघटना चातुर्याचा पहिला प्रत्यय करवीरस्थांना आला तो १९३१ सालीं कोल्हापूरच्या नगर वाचन मंदिराचा हीरकमहोत्सव त्यांनीं मोठ्या प्रमाणावर घडवून आणला तेव्हां. न. चिं. केळकर, वामन मल्हार जोशी, लक्ष्मणराव पांगारकर आणि चिंतामणराव वैद्य यांची वाणी तरुण पिढीला ऐकायला मिळाली त्याचें श्रेय बहुतांशीं फडक्यांनाच द्यावें लागेल. या महोत्सवांत त्यांनीं स्वतः अंग मोडून काम केलेंच, पण टोपीहि न घालणारे फडके डोक्याला पांढरा शुभ्र जरीं–काठी रुमाल आणि खांद्यावर जरीं–काठी उपरणें घेऊन वावरले तेंहि याच निमित्तानें. केळकर तर कितीतरीं वर्षांनीं केसरी–कोल्हापूरकर छत्रपती यांचें दोन पिढ्यांचें वितुष्ट विसरून प्रथमच कोल्हापूरांत आलेले, तेव्हां त्यांच्या सत्कारांत कसलेंहि न्यून राहूं नये म्हणून सारी दक्षता घेतली ती फडक्यांनींच आणि तात्यासाहेबांच्याविषयीं फडक्यांच्या अंतःकरणांत केवढा गाढ आदर आहे हें लोकांना दिसून आलें तेंहि याच निमित्तानें. या महोत्सवांत केळकरांचें जें संस्मरणीय भाषण झालें त्या प्रसंगीं फडक्यांनीं केळकरांचें कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा आपल्या ललितमधुर शब्दांत जो परिचय करून दिला त्याचें विस्मरण आजहि लोकांना झालेलें नाहीं. केळकरांच्या अंगीं वक्त्याचे केवळ थोर गुण आहेत हें सांगताना "त्यांचें भाषण द्राक्षांसारखें अंतर्बाह्य रसपूर्ण असतें" असें त्यांनीं म्हटलें आणि त्याचा अनुभव श्रोतृवृंदाला अल्पावधींत आला. समयोचित बोलावें तें फडक्यांनीच असा लोकसमज यामुळेंच कोल्हापूरांत पुढें रूढ झाला.

पण आश्चर्य असें कीं साहित्यविषयक घडामोडींत येवढ्या आस्थेनें लक्ष घालणारे फडके साहित्य-संमेलन किंवा साहित्य परिषद यांच्या वाटेला कधीं चुकूनहि जात नसत. निरर्थक काथ्याकूट आणि निष्फळ चर्चा करीत बसणें कदाचित् त्यांना रुचत नसावें आणि म्हणूनच या संस्थांकडे ते उपेक्षेनें पाहात आले असावे. १९३२ सालीं कोल्हापूर येथें महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अधिवेशन येवढ्या राजशाही थाटामाटानें झालें, पण कोल्हापूरचा हा अग्रगण्य सरस्वतिभक्त साहित्य संमेलनाच्या मंडपाकडे फिरकलादेखील नाही किंवा माझ्यासारखे त्यांचें विद्यार्थी साहित्य संमेलनांतल्या गमती आणि घडामोडी त्यांच्या कानावर घालायला गेले तेव्हां

त्यांतहि त्यांनीं कधीं रस घेतला नाहीं. गंमत अशी कीं ज्या करवीर नगर वाचनमंदिराच्या हीरक-महोत्सवांत त्यानीं येवढ्या श्रद्धेनें भाग घेतला होता त्याच वाचनमंदिराच्या विद्यमानें भरलेल्या या साहित्य संमेलनाकडे त्यानीं अक्षरशः पाठ फिरविली आणि साहित्य संमेलनासारखी कांहीं घटना कोल्हापूरांत घडत आहे या गोष्टीकडे संपूर्ण दुर्लक्ष केलें. अनेकांना या गोष्टीचें आश्चर्य वाटलें, फडके अहंमन्य आहेत, तुसडेपणानें वागणारे आहेत असे प्रवाद उठले आणि कांहीं जणानीं तर 'फडके साहित्य संमेलनाला येतील ते अध्यक्ष म्हणूनच येतील' अशी कोपरखळी मारायलाहि कमी केलें नाहीं. खरोखरच पुढें तसें झालें. १९४० सालीं त रत्नागिरीच्या साहित्य संमेलनाला गेले ते अध्यक्षपद भूषविण्यासाठींच ! कोल्हापूरच्या साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद बडोद्याचे अधिपती श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याकडे होतें. कदाचित् साहित्याला उत्तेजन देण्यापलीकडे ज्यानीं कसलीहि साहित्यसेवा केलेली नाहीं अशा व्यक्तीकडे अध्यक्षपद जाणें त्यांना रुचलें नसावें. या संमेलनानंतर फडक्यानीं "वाङ्मय–विहार" नांवाची लेखमाला 'ज्ञानप्रकाश' मध्यें लिहिली. तिच्यांत या रुष्टतेचें अस्पष्ट कारण त्यांनीं जातां जातां नमूदहि केलें आहे. "संस्थानिक आपल्या सिंहासनावर सरस्वतीच्या उपासकाला कधीं बसवित नाहींत, मग साहित्यिकानीं तरी आपल्या सिंहासनावर संस्थानिकांना कां बसवावें ?" अशा अर्थाचे शब्द या लेखमालेच्या ओघांत येऊन गेले आहेत. त्यावरून त्यांच्या मनाचा कानोसा जाणत्या माणसांना त्या वेळींच घेतां आला. पण फडक्यांच्या या अनुपस्थितीमुळेंच त्यांचें स्मरण नकळत झालें. फडके संमेलनांत दिसले असते तर त्यांना जेवढें महत्व लोकांनीं दिलें नसतें तेवढें महत्त्व त्यांच्या अनुपस्थितीमुळें त्यांना आलें. 'फडके कोल्हापूरांत तरी आहेत काय ?' अशी पृच्छा अनेकांनीं केली आणि संमेलन आटोपतांच अनेकजण त्यांना आस्थेनें भेटलेहि.

कोल्हापूरांत येऊन स्थायिक होण्यापूर्वीहि एक प्रभावी वक्ते म्हणून त्यांनीं कीर्ति मिळविलेली होती, सभा गाजविलेल्या होत्या. तथापि कधींहि व्याख्यानाची तयारी केल्यावाचून ते सभास्थानीं गेल्याचे मला तरी माहीत नाहीं. परोपरीचीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दुर्मिळ — पुस्तक.

व्यावहारिक उदाहरणें देऊन आपला विषय श्रोत्यांच्या पुढें ते मांडीत, आर्जवी, मधुर भाषेनें त्यांना गोंजारीत तेव्हां सारी सभा कान टवकारून त्यांच्या मुखांतून बाहेर पडणारा शब्द झेलण्यासाठीं उत्सुक असे. सभा केवढीहि मोठी किंवा प्रक्षुब्ध झालेली असो, फडके बोलायला उभे राहिले कीं श्रोते सावध होत आणि आपली उत्सुकता परोपरीनें प्रगट करीत. आपण बोलणार त्या विषयाची भरपूर तयारी, शब्दोच्चारांतील चढउतार करण्याची लकब, भाषेतला असामान्य गोडवा या आयुधानीं कसलीहि सभा त्यांना जिंकतां येई.

फडके, खांडेकर, माधवराव पटवर्धन प्रभृति नामवंत साहित्यिकांच्या वास्तव्यामुळें अनेक लहान-मोठे लेखक, कवी कोल्हापूरांत येत आणि पंढरपूरला गेल्यावर विठ्ठलाच्या दर्शनाला जावें तसें या दक्षिण काशींतल्या पंडितांना भेटल्याशिवाय परत जात नसत. फडक्यांच्या निकट परिचयांतला एक विद्यार्थी या नात्यानें मग यांच्यापैकीं कांहीं जणांना फडक्यांच्याकडे घेऊन जाण्याची कामगिरी माझ्याकडे येई. फडके लेखनांत व्यग्र असतानांहि थोडा वेळ तरी मग त्यांच्याशीं बोलत, आलेल्या व्यक्तीच्या लेखन-वाचनाबद्दल चौकशी करीत, नवीन ग्रंथकारांचीं नांवें त्यांना सुचवीत आणि आलेली व्यक्ति त्यांच्या एखाद्या नव्या कादंबरीबद्दल बोलू लागली, त्यातलें अमूक अमूक पात्र मला फार आवडलें, आमच्या गांवातील अमक्या माणसासारखें अगदीं हुबेहुब तें आहे असें सांगून फडक्यांची स्तुति करू लागली कीं ते हंसत आणि म्हणत, " तें सारं पार विसरून गेलोंय मी. सध्यां माझ्या नव्या कादंबरीतल्या व्यक्ति माझ्या दृष्टीसमोर आहेत!" स्वतःच्या कलाकृतीविषयीं बोलायचें ते कटाक्षानें टाळतात हें मला अनुभवानें माहित झालें होतें, पण इतरांच्या कृतीविषयीं ते मनमोकळेपणानें बोलतात हेंहि माहित होतें. दररोज लेखनाला प्रारंभ करण्यापूर्वी कधीं कधीं पांच सात मिनिटें आमच्या गप्पा झाल्याच तर इतर लेखकांच्या वाङ्मयगुणांची ते तोंडभर स्तुति करीत म्हणायचे, " खांडेकरांची 'उल्का' वाचलीस कीं नाहीं, मोठी छान आहे कादंबरी!" अत्र्यांचें 'घराबाहेर' नाटक प्रसिद्ध झालें तेव्हां " यांतले कितीतरी नाट्यप्रसंग मोठे हृदयस्पर्शी आहेत," असें अगदीं सहजगत्या ते बोलून

गेले. वामनराव जोश्यांची 'इंदु काळे सरला भोळे' ही पत्ररूप कादंबरी 'प्रतिभा' पाक्षिकांत क्रमशः येई ती आम्हां विद्यार्थींइतक्याच आतुरतेने फडकेहि वाचीत.

सबंध आयुष्यभर त्यांनीं शिक्षकाचा व्यवसाय केला त्यामुळें तरुणांत मिसळण्याची, त्यांच्या बदलत्या इच्छा आकांक्षा ओळखण्याची, त्यांच्या आवडी निवडी समजून घेण्याची त्यांच्या मनाला संवयच जडली होती. त्यांचें विद्यार्थ्यांवर व विद्यार्थ्यांचें त्यांच्यावर जें विलक्षण प्रेम असे त्यामुळें त्यांच्याशीं ते चटकन समरस होत आणि वयानें वाढत गेले तरी मनानें आणि वृत्तीनें तरुणच वाटत. क्रिकेट आणि टेनीस यांचा विलक्षण षोक त्यांना होता-नव्हे अजूनहि आहे—त्यामुळें क्रिकेटच्या मैदानात जाऊन बोलिंग टाकण्यांत किंवा बॅटचे चार फटकारे मारण्यांत अगदीं प्रौढ वयांतहि त्यांना आनंद वाटे. या खेळांची आवड तरुण विद्यार्थ्यांच्या मनांत निर्माण व्हावी म्हणून निरनिराळीं आमिषें दाखवून, त्यांना कॉलेजकडून निरनिराळया सवलती मिळवून देऊन ते त्यांना खेळाच्या मैदानांत उतरायला लावीत, त्यांच्यांत खिलाडूवृत्ति यावी म्हणून अहर्निश झटत, पण तरुण पिढींत साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य या कलांविषयीं अभिरुचि निर्माण व्हावी म्हणून त्यांनीं जे डोळस प्रयत्न—लोकापवाद सोसूनहि—केले. याचा उल्लेख या ठिकाणीं अवश्य केला पाहिजे.

कॉलेज म्हटलें कीं त्या काळींहि वक्तृत्व सभा असत, मराठी वाङ्मय मंडळें असत, तत्त्वज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र, विज्ञान यांतील गूढें समजून घेणाऱ्या संस्था असत, पण संगीत, नृत्य, नाट्य, अभिनय यांच्याविषयीं गोडी निर्माण करणारी संस्था कॉलेजच्या परिसरांत सरस्वतीच्या मंदिरांत सुरू करायची म्हणजे काय ? शान्तम् पापम् ! अशी संस्था सुरू करण्याची कल्पना फडक्यांच्या मनांत आली. अशा या संस्थेला कितीजणांचा पाठिंबा मिळेल अशी जी सुरुवातीला आम्हांला विवंचना होती ती उघड्यावर ठेवलेल्या कापरासारखी केव्हांच नाहींशी झाली आणि नवी विवंचना सुरू झाली ती अशी, कीं अडीचशेंपेक्षां सभासद संख्या अधिक जाऊं द्यायची कीं नाहीं ?

आमच्या या नाट्य-संगीत मंडळातर्फे फडक्यांनीं हिराबाई बडोदेकर

यांच्या गायनाचा जलसा घडवून आणला आणि या मंडळाचं औपचारिक उद्‌घाटन केलं.

पुढल्या तीन-चार वर्षांत मग अब्दुल करीमखाँ, सवाई गंधर्व, मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, लक्ष्मीबाई बडोदेकर, जी. एन्. जोशी, विनायकबुवा पटवर्धन इत्यादि लोकप्रिय गवयांच्या मैफली कॉलेजच्या प्रशस्त हॉलमध्यें झाल्या, अझुरी नांवाच्या एका नर्तिकेचें नृत्यहि पाहाण्याची संधि विद्यार्थ्यांना मिळाली. विनायकबुवा पटवर्धनानीं तर विविध रागांची खुलावट, वर्ज्यावर्ज्य स्वर आणि रागांतील सूक्ष्म भेद दाखविणारें एक सप्रयोग व्याख्यानच दिलें आणि अझुरीनें नृत्यकलेचें शास्त्रशब्दांच्या आणि अभिनयाच्या भाषेंत समजावून सांगितलें. मंडळातर्फे एकदां झालेला गोविंदराव टेंब्यांच्या पेटी वादनाचा कार्यक्रम तर केवळ अविस्मरणीय आहे. नामवंत गवयांच्या कंठातले सारे स्वरमाधुर्य त्यांच्या बोटांतून प्रगट झालेलें श्रोत्यानीं पाहिलें. तेव्हां निर्जीव पेटींतून बेभान करणारे सुर निर्माण करणाऱ्या गोविंदरावांच्या कलाचातुरीचें परोपरीनें कौतुक करीतच संतुष्ट श्रोते त्या मध्यरात्रीं घरोघरीं परत गेले होते.

या मंडळातर्फे वर्षांतून एकदां मग एक नाटकहि नियमानें होऊं लागलें आणि नाटकांतली एखादी प्रमुख भूमिका फडक्यांनीं करायची हेंहि मग ठरूनच गेलें. सुरुवातीच्या वर्षांत 'मायेचा पूत' आणि 'खडाष्टक' हीं नाटकें फडक्यांनीं परिश्रमपूर्वक बसवून घेतलीं. एका वर्षी ना. धों. ताम्हनकरांनीं एक सुंदर नाटक लिहिल्याची बातमी फडक्यांना कळतांच त्या नाटकाच्या हस्तलिखित वह्याच मग ते घेऊन आले आणि ' उसना नवरा ' रंगभूमीच्या परिचयाचा झाला आणि अखेर एकदां चांगलेसे नाटक मिळेना तेव्हां फडक्यांनीं स्वतःच " तोतया नाटककार " नांवाचे नाटक लिहून त्याचा प्रयोग या मंडळातर्फे केला. या प्रत्येक नाटकांत त्यानीं स्वतः भूमिका केल्या आणि विद्यार्थी-वर्गास नाट्याविषयीं अभिरुचि निर्माण केली. या नाटकांत त्यांच्याबरोबरच नियमानें कामें करणारा एक विद्यार्थी तर पुढें चित्रपटसृष्टींत दिग्दर्शक म्हणून गाजला आणि दुसरा एक विद्यार्थी विलायतेला जाऊन बॅरिस्टर होऊन आला तरीहि अजून तोंडाला रंग फांसून रंगभूमीवर येण्यांत आनंद मानतो. फडक्यांचें हें ऋण मनानें

मानणारे त्यांचे विद्यार्थी साऱ्या भारतभर आज पसरले आहेत हीच त्यांना मिळालेली बिदागी !

साऱ्या हयातभर त्यांनीं संस्थानांत नोकरी केली, पण त्यांनीं कधीं कुणापुढें लांगूललाचन केलें नाहीं कीं कुणापुढें मान वांकविली नाहीं. फडके चालतांना छाती पुढें काढून आणि मान ताठ ठेवून चालतात. त्यांचें हें वागणें त्यांच्या मनःप्रवृत्तीचें द्योतक आहे याबद्दल माझ्या मनांत तरी शंका नाहीं. स्वतःच्या उद्योगांत सतत रमावें, लेखन-वाचनाचा आनंद स्वतः घ्यावा आणि इतरांना द्यावा या त्यांच्या जीवनक्रमांत गेल्या ४० वर्षांत कधीं खंड पडलेला नाहीं. त्यांना सवड असते ती कला आणि क्रीडा यांचा आस्वाद घेण्यापुरती, येरव्हीं सततोद्योग हाच त्यांचा धर्म झाला आहे. या उद्योगांतच ते कोल्हापूरांतील पंचवीस वर्षांच्या जीवनांत रमले आणि डोंगराएवढी ग्रंथसंपत्ति त्यांनीं निर्माण केली.

पण कॉलेजांतून ते सेवानिवृत्त झालें तसें त्यांना वाटूं लागलें कीं आपल्या व्यवसायाच्या दृष्टीनें कोल्हापूरपेक्षां पुणें अधिक चांगलें आहे, पण निर्णय लवकर होईना. दोन वर्षें या विचाराशीं ते खेळत होते. पंचवीस वर्षें ज्या ठिकाणीं आपण काढलीं, जीवनांतले हर्ष विषाद अनुभवले तें ठिकाण सोडतांना त्यांना कष्ट झाले. ते कोल्हापूर सोडून जाणार असें कळतांच अनेक निरोपाचे समारंभ लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें घडवून आणले, नगरपालिकेनेंहि त्यांना निरोप दिला, पण कोल्हापूर सोडण्याच्या आदल्याच दिवशीं ज्या राजाराम कॉलेजांत त्यांनीं तेवीस वर्षें काढलीं होतीं त्या कॉलेजच्या प्रशस्त हॉलमध्यें त्यांच्या विद्यार्थ्यांनीं, चहात्यांनीं व साहित्यप्रेमी रसिकांनीं कै. गोविंदराव टेंब्यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांना निरोप दिला तेव्हां ते गहिंवरले, सभा गाजविणारे फडके अबोल झाले आणि सद्गदलेल्या स्वरांत म्हणालेः

"कोल्हापूरांत पंचवीस वर्षांपूर्वीं आलों तेव्हां पहिला घांस गोविंदरावांच्या घरीं खाल्ला. आज त्यांचाच आशीर्वाद घेऊन मी परत जात आहे, पण कुणी सांगावें, पांच–दहा वर्षांनीं पुन्हां या ठिकाणीं कायमपणें रहावयासाठीं येईन सुद्धां. तें कांहींहि होवो. तुमचें प्रेम आजपर्यंत लाभलें तसेंच तें यापुढेंहि लाभेल या खात्रीनेंच मी आतां तुमचा निरोप घेतों. नमस्ते !"

—०—

# फडके आणि मी

लेखकः- गोपीनाथ तळवलकर

आप्पासाहेब आणि मी यांच्या मैत्रीचा योग असा आहे कीं, त्यांत अखंड संबंध राहिला नाहीं. मी तारुण्याच्या उंबरठ्यावर असतांना फडक्यांच्या लौकिकाचा आलेख झपाट्यानें चढत होता. तरुण मनावर अलीकडील काळांत त्यांच्याइतकी मोहिनी दुसऱ्या कोणी लेखकानें क्वचितच घातली असेल. 'रत्नाकर' मासिकाच्या ज्या अंकांत फडक्यांच्या कादंबरीची प्रकरणें किंवा लघुनिबंध येत ते अंक आम्हांला पोथ्यापुराणाप्रमाणें पवित्र व संग्राह्य वाटत. १९३१ सालीं किर्लोस्करवाडी येथें श्रीयुत शंकरराव किर्लोस्कर ह्यानीं आपल्या अंतरंग साहित्यिक मित्रांचें एक छोटेसें संमेलन भरविलें होतें. मी किर्लोस्करांचा एक छोटा मित्र आणि नवोदित साहित्तिक या नात्यानें तेथें हजर होतों. कोल्हापूराहून फडके येणार आणि आज त्यांची भेट होणार या कल्पनेनें मी सकाळपासून किती धुंद होतों याची मला चांगली आठवण आहे. त्यांतून या गाढ उत्सुकतेला एक धन्यतेची आणि अभिमानाचा डूब मिळाली होती. कारण किर्लोस्करमध्यें प्रसिद्ध झालेल्या माझ्या एका लघुनिबंधाची स्तुति फडक्यांनीं केली असें शंकररावांनीं मला कळविलें होतें. फडके भेटले त्या वेळीं खरोखरच मला विशेष बोलणें सुचलें नाहीं. त्यांची ती लहानखोर, रंगेल आणि चमकदार मूर्ति पहातच मी तटस्थ उभा राहिलों.

१९४१ सालीं मी माडीवाले कॉलनींत राहायला आलों त्यावेळीं आमच्या बंगल्याच्या माडीवर कमलाताई ( त्यावेळीं दीक्षित ) रहात असत. दीक्षित मंडळी, संत कुटुंब आणि आम्ही मिळून सर्व बंगला म्हणजे एकच एकत्रित कुटुंब होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं फडके नेहमी भेटत. पहिल्या साहित्यिक ऋणानुबंधाला थोडासा घरगुती जिव्हाळा मिळाला परंतु आम्ही ते घर सोडल्यानें पुन्हाः सूत्र सुटलें.

अगदीं अलीकडे आप्पासाहेब आमच्या येथील विजयनगर कॉलनींत स्थायिक झालेले आहेत. त्यांच्या अखंड उद्योगांत व्यत्यय नको म्हणून मी त्यांच्या-

कडे जाण्याचा मोह टाळतों. आणि माझेंहि जीवन फार कार्यव्यग्र झालें आहे. पण आप्पासाहेबांची गोड व गुणी मुलगी छोटी अंजली ही ' बालोद्याना ' त कलाकार म्हणून येते. या नव्या अंकुरामुळें पुन्हा जुन्या वृक्षाची ओढ वाढूं लागते. आम्ही एकमेकांना भेटत नसलों तरी त्यांच्याबद्दल आणि त्यांच्या सुविद्य व सुस्वभावी पत्नीबद्दल मला निरतिशय आदर वाटतो. माझ्याबद्दलहि त्यांना सद्भाव वाटत आहे असें अनुमान काढल्यास चूक होणार नाहीं.

फडके आणि मी यांचा असा गुढित, खंडित पण सतत ऋणानुबंध आहे. ऐन पंचविशीच्या काळांत फडक्यांच्या सहवासांत गेलेले कांहीं क्षण अविस्मरणीय आहेत. ते मी जपून ठेवले आहेत. फडक्यांना कदाचित् ते मुद्दाम आठवण्याचा प्रयत्न करावा लागेल. त्यांच्या त्या शिस्तबद्ध, टापटिपीच्या आणि रंगेल जीवनाची मोहिनी आमच्यावर फार होती. व्यवहारांत अपयशी ठरावें इतकी धुंदी त्यांना कोठल्याहि गोष्टीनें आली नाहीं हें खरें. पण साहित्य-कलेच्या उपासनेतली त्यांची निष्ठा वाखाणण्यासारखी आहे. आपल्या मनाच्या शक्तींना वळण लावून यंत्राप्रमाणें त्यांच्याकडून हुकमी कामें करून घ्यायची सिद्धि त्यांनीं मिळविली आहे. फडके रूढ अर्थानें आस्तिक किंवा धार्मिक नसतील. रूढीची चौकट खिळखिळी करण्यासाठीं त्यांनी केलेला प्रचार क्वचित् उत्तानहि असेल पण प्रेम, कृतज्ञता, त्याग इत्यादि उच्च गोष्टींपुढें ते जरूर अवनम्र होतात. अध्ययन आणि उद्योग यांचा तर एवढा मोठा आदर्श साहित्य क्षेत्रांत क्वचितच असेल. आपली कला ही मानवी संस्कृतीची संरक्षक व संवर्धक आहे असा गाढ अभिमान फडक्यांना आहे. आणि या अभिमानाची एक विशेष शान त्यांच्या वागण्यांत दिसते. आविष्काराच्या तळमळीमुळें आणि जीवन खेळकरपणानें जगण्याच्या ईर्षेमुळें ते नेहमी कार्यमग्न असतात. ते कांहींसे तुसडे व अलिप्त वाटतात ते याचमुळें. पण साहित्याच्या उपासकांनीं गिरवावेत असे कितीतरी बहुमोल गुण फडक्यांच्या अंगीं आहेत. त्यांच्या आणि माझ्या स्नेहाचा इतिहास मी डोळ्यापुढें आणतों तेव्हां त्यांचा स्नेह मला सतत मिळाला नाहीं या रुखरुखीपेक्षां त्यांच्या सहवासांत येऊन त्यांच्या गुणांचें मी अनुकरण मोठ्या प्रमाणावर करूं शकलों नाहीं याचेंच दुःख अधिक तीव्र असतें !

०—०

[ प्रो. ना. सी. फडके, एम्. ए. यांच्या ता. ६ नव्हेंबर रोजीं होणाऱ्या सत्काराचे वेळीं सुप्रसिद्ध कवि—गिरीश यांनीं खास केलेली कविता. ]

# ★ रसमेघ ! ★

प्रतिभा तव बलवान ।
खेळवी कला चिरंत महान् ॥ ध्रु ॥

वीणा तव कुजांत वाजती,
पदन्यास मंजुळ रुमझुमती,
झंकारी रसरग बहरती,
चढती होत कमान ! ॥ १ ॥

रसरसलें तें वीणा वादन,
नसानसांतुन भरलें गायन !
मधुर बोलके रस ते होऊन,
स्फुरली तुजला तान ! ॥ २ ॥

वदे शारदा तव उद्गारीं-
रसमय वाणी, नव आकारीं !
स्वप्नें उभवुन नित सोनेरी,
करिशीं अमृतपान ! ॥ ३ ॥

यक्ष-अप्सरा संसारांतील,
स्पर्शानें तव फुलती स्नेहल !
जीवन दावुन नव, रस कोमल,
निववििशि डोळे कान ! ॥ ४ ॥

क्रीडतिल रस तुवां घेतला,
लीलेने आकंठ सेविला!
रसिकत्वें रसमेघ वर्षिला
अतुल, अलौकिक ज्ञान! ॥ ५ ॥

कांट्यांतुन तव गुलाब फुलले!
स्पर्शें कंटक पुष्पें झाले!
सौंदर्याचें विश्व उमललें!
शमवी दृष्टि-तहान! ॥ ६ ॥

२३ सप्टेंबर १९६० —गिरीश
पुणें ४

# स्नेहाभिनंदन

( पृथ्वी–वृत्त )

असख्य सुमन मुद स्मितमुखीं परागासव ॥
सुगंधगुणगौरवें बहरलीं स्वयें वैभवें ॥
स्तवार्थ विविधा तुझी अमित शारदोपासना ॥
सुमान्य महिमा जिचा रसिक सूज्ञ विद्वज्जना ॥ १ ॥

अपूव बहुमान हा उचित जो तुला लाभला ॥
तया बघुनिया तुझा खाचित मित्र भारावला ॥
कितीहि जरि दूर मी सुदिन थोरवी धन्यवी ॥
प्रकाशकिरणें नभीं उदित मित्र भू भूषवी ॥ २ ॥

कुशाग्र तव लेखणीं ललितनिष्ठ शब्दागणीं ॥
सुवर्णगुणकोंदणीं विलसते मनोहारिणी ॥
बहुप्रसव लक्षणीं लघुकथादि नानागुणीं ॥
निरंकुशविलासिनी रत सदैव सत्कारणीं ॥ ३ ॥

प्रसिद्ध मनरंजनीं प्रणय रम्य कादंबरी ॥
शतार्ध कनकोत्सवी तव अतर्क्य जादूगिरी ॥
प्रभा प्रगटली तिची प्रथम खास ' रत्नाकरीं ' ॥
कृतार्थ पद पावली सकल वाचकांचे करीं ॥ ४ ॥

सलील रसना तशी रुचिर भाषणीं मोहवी ॥
नितांत रमवी झणीं वशकरी सभा डोलवी ॥
अथांग सरिता जशी विहरते प्रवाही गती ॥
सुबद्धलय गामिनी मृदुल वैखरी तेवि ती ॥ ५ ॥

सुकीर्ति पसरो घडो विपुल लोकसेवा सदा ॥
प्रसन्न वरदा असो बहुविधा तुला शारदा ॥
विशुद्ध सुख निर्भरें सुरभिकाव्य पुष्पांजली ॥
सहर्ष शुभ भावनासहित ही तुला वाहिली ॥ ६ ॥

शिल्पकार-**फडके.**

# ठग कसा निवळला ?

लेखकः—शं. वा. किर्लोस्कर

" — आणि हे आमचे प्रो. फडके " असें म्हणून राजाराम कॉलेज क्रिकेट कॅप्टननें त्यांची व माझी ओळख करून दिली. १९२८ च्या ऑगस्ट मधील ही गोष्ट. त्यापूर्वीपासून राजाराम कॉलेजशी दरसाल आमच्या टीमची एक मॅच व्हायची ही प्रथा सुरू झाली होती. या सामन्यांना फार रंग चढायचा. यंदा प्रो. फडके राजाराम कॉलेजचे एक खेळाडू म्हणून आमचेकडे आले होते. आमच्या टीमचा मी कॅप्टन. हीच अप्पासाहेबांची व माझी पहिली मुलाखत.

या भेटींत अप्पासाहेबांनीं आमच्या कारखान्याबरोबर आमचा छापखानाहि पाहिला. आमची तेव्हांची " किर्लोस्कर खबर " किती चिमुकली, तथापि तिचा आकार असा लहान असला तरी आम्हास तिची अजून किती वाढ करायची आहे व तिच्याद्वारें केवढें मोठें कार्य करायचें आहे हेहि जाता जातां त्यांना मी सांगून टाकलें. अप्पासाहेबांचें लेखनसाह्य मिळवितां आल्यास पहावें हाच त्यामागील हेतु.

सुदैवानें तो लवकरच फलद्रुपहि झाला. प्रो. फडक्यांचें लेखनसाह्य मिळणें हा आमच्या मासिकांना झालेला एक मोठाच अलभ्य लाभ, पण ते आमचे नुसते लेखकच राहिले नाहींत, तर थोड्याच काळांत आमच्या मासिकांचे एक प्रमुख सहाय्यक व आधार बनले. आमच्यातील स्नेह वाढुन आमचें एकमेकांकडे जाणें येणें सुरू झालें.

मी कोल्हापुरास गेलो म्हणजे पुष्कळदां आम्ही दोघे संध्याकाळीं गांवाबाहेर कोठेतरी दूर फिरायला जायचे. कोल्हापुरच्या आजुबाजुला असे फिरायला जाण्यासाठीं पुष्कळ सुंदर जागा आहेत. त्यांतलें एखादें निवडक ठिकाण पाहून आम्ही बैठक मारायची व यथेच्छ गप्पागोष्टी करायच्या. अप्पासाहेबांच्या कादंबऱ्यांची लज्जत सर्वांना माहीत आहे. पण त्यांच्या तोंडून कोणत्याहि विषयावरील विचार अथवा एखाद्या प्रसंगाचें वर्णन ऐकायला मिळणें ही सुद्धा केवढी

अपूर्व बौद्धिक मेजवानी असते, हें ज्यांनीं तिचा मिष्ठासपणा चाखला असेल त्यांनाच माहीत.

आमची ही दुक्कल पुढें पुढें चांगलीच जमली. थोडक्यांत सांगायचे तर एखाद्या मॅचमध्यें 'सेट' झालेले दोन गडी डावांत जशी आपल्या टोलेबाजी-मुळें रंगत आणतात तसेंच, ह्या सुमारास आमचें साहित्यिक क्रीडांगण आम्ही चांगलेच गाजविलें.

अप्पासाहेबांचा व माझा ३०–३२ वर्षांपूर्वी जुळुन आलेला हा स्नेहसंबंध अद्यापहि तितकाच प्रेमाचा व आपुलकीचा राहिलेला आहे. तथापि ह्या संबंधांत केव्हां केव्हां ढग निर्माण झाल्याशिवास राहिले नाहींत हेंहि तितकेंच खरें, मात्र ते येत तसे वितळूनहि जात. अशाच एका प्रसंगाचें येथें थोडक्यांत वर्णन देण्याचें योजिलें आहे. यावरून अप्पासाहेबांच्या स्वभावाचें किंचित् दिग्दर्शन तर होईलच, पण त्याबरोबरच कादंबरी लेखनांत त्यांनी जें असामान्य यश मिळविलें, त्याचे एक इंगितही लक्षांत येऊं शकेल.

झाला तो प्रकार असा. अंधश्रद्धा व रूढी यांच्या दडपणामुळें आपला समाज कसा गतानुगतिक बनत चालला आहे, व त्यामुळें आपण जगांत कसे मागें पडत आहोत हें सिद्ध करणारे अनेक लेख त्या वेळीं आमच्या मासिकांत येत. आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षासाठीं वैचारिक क्रांतीची किती आवश्यकता आहे, हे वाचकांच्या लक्षांत आणून देण्यासाठींच हा प्रयत्न असे. आमच्या उपक्रमाला सनातनी वर्गाकडून विरोध व्हावयाचा हें अपेक्षितच होतें. जुने तें सारें सोनें हाच त्यांचा एकमेव सिद्धांत. तेव्हां त्यांच्या टीकेला आम्ही शांतपणानें तोंड देत होतो. पण एक दिवस मासिकाच्या धोरणाबद्दल नाराजी प्रदर्शित करणारें खुद्द अप्पासाहेबांचेच पत्र आल्याचे पाहून मी सहाजिकच मोठ्या फिकिरींत पडलो. तें पत्र म्हणजे जवळजवळ एक निर्वाणीचा खलिताच होता.

त्यांचा कटाक्ष कोणत्या बाबीवर होता, हें माझ्या ताबडतोब लक्षांत आलें. त्यावेळीं स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं सुरुं झालेली चळवळ देशांत सगळीकडे जोरानें फैलावत चालली होती. त्याचबरोबर पुढें देशाची पुनर्रचना कोणत्या तत्वानुसार व्हावी याबद्दल निरनिराळे पक्ष आपापली विचारसरणी पुढें मांडू लागले होते.

भावी लोकशाहीचे व समाजवादाचें तें बीजारुपणच. आगामी समाजवादी राजवटींत बहुसंख्य शेतकरी व कामगार वर्गाचे महत्व वाढणार हेंहि ठरलेले. एवढ्यासाठीं चळवळ व तिचे तत्वज्ञान याबद्दलचे लेखही अधूनमधून आमच्या मासिकांतून येत. आमच्या मासिकांचा पुरोगामीपणा इतर सर्व बाबतीत अप्पासाहेबांना पसंत असला तरी या पश्नांत त्यांचें मत थोडें निराळें होतें व त्यामुळेंच गोष्ट या थराला आली.

अप्पासाहेबासारखा खंदा मोहरा आमच्या सहाय्यकातून बाजूला झाला तर त्याचा आमच्या मासिकांना व त्यांच्या अंगीकृत कार्याला मोठाच धक्का बसणार हें ठरलेलें. तेव्हा या पेंचातून बाहेर कसें पडायचें ! या बाबतीत त्यांच्याशी तोंडी अथवा लेखी चर्चा करून कांहीं निष्पन्न होण्याजोगेहि नव्हतें. कारण त्यांचें जें मत असेल तें अगदीं पक्कें हें मी ओळखून होतो. तें नुसते कादंबरीकार नव्हते तर तर्कशास्त्राचे विख्यात प्रोफेसर. तेव्हां त्यांच्याशी शक्य तो वादविवादाच्या भरीला न पडलेलेंच बरें.

तितक्यांत माझ्या डोक्यांत एक कल्पना आली. मी आप्पासाहेबाना लिहिलें, " कामगार चळवळीसंबंधी माझेंहि प्रत्यक्ष ज्ञान बेताचें आहे. तेव्हां या बाबतीत दुरूनच अनुकूल अथवा प्रतिकूल कल्पना करण्यापेक्षां, जिथें अशी चळवळ प्रत्यक्ष चालू असल, तिथें जाऊन तिचें खरेखुरें स्वरूप जाणून घेतल्यास बरें होणार नाहीं कां ? हें तुम्हाला पसंत असल्यास आपण दोघे मिळून एकदां सोलापुरास जाऊं. तेथील परिस्थिती बारकाईनें अवलोकन करूं. तिथल्या पुढाऱ्यांना भेटूं व त्या सर्वांवरून जें मत ठरेल, त्याप्रमाणें पुढें चालूं."

अप्पासाहेबांनीं माझ्या पत्राला होकार दिला.

तें १९३७ साल होतें. आम्ही दोघे सोलापुरास गेलो. तेथील विडीकामगार बायकांनीं संप पुकारला होता. तसें पाहिलें तर बायकांची जात मुळांतच अगदी गरीब. त्यातून या बायका अगदी अशिक्षित व दारिद्यामुळें गोगलगाय बनलेल्या. अशा या दीनदुबळ्या बायकांनीं कंबर बांधून संप करण्यास तयार व्हावें ही मोठ्या नवल्याची गोष्ट. त्यांची मिरवणुक ज्या रस्त्यानें जाणार होती त्यावरच आमचें घर होतें. त्याच्या गच्चीवर उभें राहून आम्ही मिरवणुकीची वाट पाहूं

लागलों. थोड्याच वेळांत चावडीच्या बाजूनें घोषणांचा वाढता आवाज व गलबला कानावर येऊं लागला. ती मिरवणुकहि हळूहळू दृष्टीपथांत येत चालली. तिच्या अग्रभागीं हातांत झेंडा घेतलेली या बायकांची पुढारी होती. तिची वेषभूषा अगदीं साधी होती. पण ती एक उच्चविद्याविभूषित मुलगी असल्याचें आम्हास नंतर समजलें.

तिच्या मागून संपवाल्या बायकांची लांबच लांब फलटण मोठ्या बेडरपणें घोषणा करीत शिस्तित चालली होती. त्यांत कांहीं म्हाताऱ्याहि होत्या, तर कांहीं बायकांच्या कडेवर मुलेंहि होतीं. हा साराच देखावा मोठा विस्मयजनक व थरकांप उत्पन्न करणारा होता.

अप्पासाहेब हें सारें दृश्य मोठ्या एकाग्रतेनें पहात होते. ते मध्येंच मला म्हणत, “ अहो, ती बाई पाहिलीत कां, कशी वाघिणीसारखी चवताळून चालली आहे ! ” नंतर दुसऱ्या एकीकडे बोट करून म्हणत, “ आणि ह्या म्हातारीच्या अंगांतहि कडक लक्ष्मीचा संचार झालेला दिसतो. ”

दुपारी ह्या बायकांची पुढारी आमच्या भेटीस आली. तिच्या तोंडून या बायकांच्या परिस्थितीची आम्हास पुष्कळ माहिती मिळाली. ती त्यांच्यातच वावरत असल्यानें या बायकांना किती खडतर जीवन कंठावें लागतें यांची अनेक उदाहरणें तिनें सांगितलीं. तीं मोठीं करुणास्पद व क्षोभजनक होतीं. नंतर सोलापुरांतील प्रमुख कामगार नेते आम्हांस भेटले. तेहि एक उच्च पदवीधर होते. कॉलेजमध्य एक अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी असा त्यानीं लौकिक संपादन केला होता. इंग्रजी भाषेवरील त्यांचं प्रभुत्वहि तसेंच असामान्य. पण त्यांच्यापुढें आलेल्या सुखासीन जीवनाचा मोह बाजूला सारून त्यांनीं स्वतःला कामगार चळवळीला वाहून घेतलें होतें. त्यांच्याशीहि अप्पासाहेब बराच वेळ बोलत बसले.

त्या मंडळीना निरोप दिल्यावर अप्पासाहेब मला म्हणाले, “ आपण आज रात्रीं कामगारांच्या कचेरीला भेट द्यायची बरं कां ! ” त्यावरून या बाबतींत त्यांचें विशेष कुतुहल जागृत झाल असल्याचें दिसून आलें. एरव्ही त्यांनीं हा बेत ठरविला नसता.

त्याप्रमाणें रात्री नवाला आम्ही त्या युनिअनच्या ऑफीसकडे निघालों. शहराच्या गरीब वस्तीतील एका चंद्रमाळी घराच्या दुसऱ्या मजल्यावर हें ऑफीस होतें. एका अंधेऱ्या जिन्यानें आम्ही वर गेल्यावर आंतल्या बाजूस पंधरा सोळा माणस एका कंदिलाभोवतीं बसून मोठ्या आवेशानें कसली तरी चर्चा करीत असलेलीं दिसलीं. खोलींतील हवा विड्यांचा धूर व माणसांच्या घामाचा दर्प ह्यांनीं कुंद झाली होती. त्या कामगारांच्या मध्यभागीं सकाळीं भेटलेला तरुण पुढारी आसन मांडून सर्वांच्या प्रश्नांचीं शांतपणें उत्तरें देत, त्यांचें शंकासमाधान करीत होता. आम्ही दोघेजण त्या जमावांत मुळींच न शोभणारे, पण त सारे त्यांच्या वादविवादांत एवढ गर्क झालल कीं, आम्ही त्या टोळक्यांत जाऊन बसलों तरी आमच्याकडे कुणीहि विशेष लक्ष दिलें नाहीं.

कामगारांची संघटित शक्ती ही काय चीज आहे हें आम्हाला तेथें जवळून पाहावला मिळालें. सोलापुरच्या गिरण्यांत, कारखान्यांत, व विड्या बांधण्या-सारख्या धंद्यांत हजारों स्त्रीपुरुष कामावर आहेत. त्यांच्या संघटनेचीं सूत्रें या खोलींतून हालत होतीं. एखाद्या पॉवरहौसमधील कळ फिरतांच असंख्य दिवे लागतात अथवा विझतात, तद्वतच या खोलीतून सुटणाऱ्या आदशाबरो-बर असख्य यंत्रें चालू रहाणार होतीं अथवा बंद पडणार होती. आधुनिक यंत्र-युगांत अवतीर्ण होत असलेल्या ह्या सहस्रशीर्ष, सहस्रबाहु विराटपुरुषाचें दर्शन मोठ उग्र व भयानक वाटणार आह यांत शंका नाही. पण त्याची उपेक्षा करून कसें चालेल? तेव्हां त्याचा जास्त उदोउदो करावयाचा नसला तरी त्याचें खरें स्वरूप प्रत्येकास माहीत झालेलें बरे नाहीं कां?

सोलापुरच्या आमच्या मुक्कामांत आम्ही कामगारांच्या एका जाहीर सभेलाही हजर राहिलो. गुन्हेगार जमातीच्या वसाहतीला भेट दिली व त्यावेळीं तेथें भरलेलें शिक्षक संमेलनहि पाहिलें. या सर्व ठिकाणीं अप्पासाहेबांची कुशाग्र शोधकबुद्धि व साहित्यिक दृष्टि अनेक प्रकारचे संस्कार सारखे टिपून घेण्याचें काम करीत होती.

आम्ही सोलापुराहून परतल्यावर थोड्याच दिवसांत विडी कामगार बायकांच्या संपावर लिहिलेली "आगलावी" ही नाटिका अप्पासाहेबांनी

माझ्याकडे पाठविली. तिच्या नावाप्रमाणेंच हे भडका उडवणारें एक साहित्य होतें. किर्लोस्करच्या जानेवारीच्या १९३८ च्या अंकातून ती प्रकाशित झाली. वाडीच्या हौशी नट संचान रंगभूमीवर करून दाखविली. तिचा प्रयोगहि तेवढाच बहारीचा झाला. कामगारांपुढें अशा प्रकारच ज्वलजहाल नाटक करून दाखविणें हें आमचेंहि धाडस होतें. पुढें या नाटिकेचें हिंदित "चिनगारी" नांवाचें रूपांतर झालें. तेंहि तितकेंच प्रभावी व चटकदार झाल्याचें कळतें.

कलेसाठी कला हें अप्पासाहेबांचें आवडतें तत्व. कलावंतानें प्रचारकाची भूमिका पत्करिल्यास त्याची कृति खऱ्या कलेच्या कसोटीला उतरत नाही हें त्यांचे प्रतिपादन. एवढ्यासाठीं कोणत्याही कलेचें मूल्यमापन करितानां तंत्राच्या दृष्टीनें ती कृती निर्दोष आहे याचा प्रथम विचार व्हावयास हवा हें त्यांच मत कोणासही मान्य होण्यासारखें आहे.

असें असलें तरी त्यांच्यासारखा श्रेष्ठ कादंबरीकार जेव्हां जेव्हां समाजांत चाललल्या अन्यायाची चीड घेऊन जनतेला जागृत करण्यासाठीं सिद्ध होतो, तेव्हां त्याच्या कृतीपासून केवढें अद्‌भुत कार्य होतें व ती एक श्रेष्ठ प्रतीची कलाकृतीहि कशी होते हें अशा वेळीं छान पहावयास सापडतें.

सोलापुरांत दृष्टोपत्तीस आलेल्या घटनांच्या आधारें शाळामास्तराच्या जीवनावरील "जागृतीतील स्वप्न" व एका गुन्हेगार, गुन्हेगार जमातीतील स्त्रीवरून लिहिलेली "चंद्रा" या दोन्ही लघुकथाही किर्लोस्करमधून पाठोपाठ प्रकाशित झाल्या. आमच्या उभयतांमधील स्नेहांत उठूं पहाणारा ढग निवळल्याचीच ती साक्ष होती. एवढेंच नव्हे तर पुढें त्यांनाच थोडें सबूरीनें घ्या असें म्हणण्याची उलट माझ्यावर पाळी येणार असें वाटूं लागलें.

या सुमारास मुंबईस फार मोठा संप झाला. त्यांत लाठीचार्ज, धरपकड व गोळीबाराचाही प्रसंग ओढवणार असें अगोदरपासून दिसूं लागलें. या दंग्याचे वेळीं कामगार भागात हिंडून तेथील सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहाण्यासाठीं अप्पासाहेबानी मुंबइस जायचे ठरविलें व मलाहि बरोबर चलण्याविषयीं त्यानीं लिहिलें. या बाबतीत माझा तेवढा उत्साह नाहीं, असें दिसल्यावर ते एकटेच गेले.

यावरून कोणालाहि हें सहज दिसून येईल कीं, उत्कृष्ट कादंबरीकार होण्यास प्रतिभेची आवश्यकता तर असतेच पण तिच्या जोडीला आपल्या कादंबऱ्यांत वास्तवता व जिवंतपणा आणण्यासाठीं त्याला समाजाच्या अनेक थरांतून वावरावें लागतें. पुष्कळ प्रवास करावा लागतो व केव्हां स्वतःचा जीव धोक्यांतही घालावा लागतो. प्रो. फडक्यांच्या कादंबऱ्या वाचताना त्यांत वर्णन केलेली सृष्टी ते वाचकापुढें हुबेहुब उभी करतात. याचें कारण त्या त्या ठिकाणीं ते स्वतः संचार करून आलेले असतात. त्यासाठीं पडतील ते कष्ट करण्याची त्यांची तयारी असते. अप्पासाहेबांच्या प्रतिभेला अशा कष्टाची तपश्चर्येची व अविश्रांत उद्योगाची जोड मिळाली आहे. हेंच मराठी साहित्य सृष्टींत त्यानीं संपादन केलेल्या अपूर्व यशाचें रहस्य नाहीं कां ?

घटप्रभा
२३-९-१९६०

—००—

# ना. सी. फडके असं लिहितात! असं वागतात!

— म. अ. देशपांडे

१९५७ च्या फेब्रुवारीची अठ्ठावीस तारीख. त्या दिवशीं प्रोफेसर फडक्यांनीं मला संध्याकाळीं सहा वाजतां मुलाखतीसाठीं बोलाविलेलं होतं.

" आंत येऊ का ? " मी धीर धरून विचारलं.

" ये. बस. जरा थांब. थोडं लिहितो, आणि मग बोलतो. "

मी तसाच उभा राहिलों. येवढ्यात पुन्हा माझ्या कानीं शब्द पडले. " बसना. समोरच्या खुर्चीवर !

मी क्षणभर समोरच्या खुर्चीवर पाहिलं, आणि त्रीत बसलो.

" हां बोल, काय ? तू काम करणार ? अक्षर कसं काय आहे ? " लेखन संपवून वृत्तपत्राचा ताजा अंक वाचतां वाचतां त्यांनीं मला प्रश्न केला. परंतु माझ्या उत्तराची वाट न पहातां तो अंक माझ्या हातीं देत ते म्हणले, " हा पहिला पॅरेग्राफ लिहून दाखव पाहूं. अक्षर जितकं चांगलं काढतां येईल तितकं काढ. वेळ कितीहि लागला तरी हरकत नाहीं. "

माझ्या जिवांत जीव आला. मी मान खाली घातली. मी तो सबंद परिच्छेद लिहून काढला, आणि तसाच शांत बसून राहिलो. कारण कुठलं तरी इंग्रजी पुस्तक वाचताना त्याना मी पाहिलं. पण थोड्याच वेळांत त्यानीच पुस्तक दूर ठेवलं, आणि ते म्हणाले, " दाखव पाहू हस्ताक्षर आणि शुद्धलेखन "

खुर्चीवरून उठून हस्तलिखित त्यांच्या हाती देताना मला थरकाप सुटला होता. क्षणभर मी तसाच उभा राहिलो तोंच माझ्या कानी शब्द पडले, " अक्षर फारसं चांगलं नाहीं. शुद्धलेखन मात्र उत्तम दिसतंय..." माझी चर्या समाधानानं उजळली. आणि "उद्यापासून ये कामावर " असें शब्द माझ्या कानी पडल, तेव्हा तर मला विशेष आनंद झाला. त्यानीं माझं नांव गांव मोठ्या आस्थेनं विचारलं. ते सारं मी सांगितलं. त्यानी मला कामाची सविस्तर कल्पना दिली. अंजलि प्रकाशनचं काम मी पाह्यचं असं ठरलं. " उद्या साडे आठला येतो " असं म्हणत मी त्यांची रजा घेतली. परंतु रजा घेण्यापूर्वी त्यांना घरांत 'आप्पा' म्हणतात हें माझ्या लक्षांत आल्यावाचून राहिलं नाहीं.

दुसऱ्या दिवशी बरोबर साडेआठ वाजतां अंजलिच्या कचेरीत मी हजेरी लावली

त्यांचा लेखक होण्याचा योग मला नंतर महिनाभरातच आला. परंतु लेखक होण्यापूर्वी देखील त्यांचा स्वभाव, घरातलं वागणं, संवयी, आवडीनिवडी इत्यादि मी बघतच होतो.

ज्या पुढच्या खोलीत आप्पासाहेब लिहायला बसायचे, तिथून समोरच्या खिडकीतून निसर्गाचा देखावा दिसत असे, तो ते पहात असत. मजकूर सांगत असताना सिगारेट सहसा ओढीत नसत. दुपारचं जेवण झाल्यावर एक, संध्याकाळीं पर्वतीला फिरायला गेल्यावर एक आणि रात्रीच्या जेवणानंतर एक

अशा नेमक्या तीन, आणि कुणी ओढणारा मित्र आला तर त्याच्याबरोबर एक ‘ एक्स्ट्रा ’ असं त्यांचं सिगारेटचं माफक व्यसन होतं. पानावाचून सुपारी व तंबाखू मात्र वरचेवर घ्यायचे. मजकूर सांगताना मनाशी विचार करायच्या वेळेस तंबाखू तोंडात असायची. त्यांच्या तंबाखू खाण्यावर कमलाबाईंचा कटाक्ष होता. सोडा म्हणून त्या त्यांच्यामागे लागत, पण ती सुटत नसे.

सकाळीं बरोबर साडेआठ वाजतां आप्पासाहेब कामाला सुरुवात करायचे. साडेअकरा पर्यंत साधारणपणे ते लिहीत असत. नंतर दुपारी साडेतीन चारला पुन्हा कामाला सुरुवात व्हायची, ती रात्री साडेसात आठपर्यंत चालायची. कामाचा त्याना मुळीदेखील कंटाळा येत नसे. कुणी विचारलं तर ते गंमतीनं सांगत, “ माझं दुकान आहे. रात्रीं आठला फळ्या बंद करतो ! ” मात्र कामा-इतकीच स्वतःच्या तब्येतीचीही दक्षता आप्पासाहेब घेत असत.

अप्पासाहेब प्रत्यक्ष लेखन करीत चार सहा तास; आणि बाकीची कामं उरकण्यांत जात असत त्यांचे चार सहा तास. ‘ अंजलि ’ चा एक खास अंक काढायचा म्हणजे ते सतत तीन महिने परिश्रम करीत. अंकासाठीं संपूर्ण कादंबरी तर ते लिहीतच, परंतु व्यवहाराच्या सर्व गोष्टी ते जातीनं बघत. पुष्कळदा ते विनोदानं कुणाजवळ तरी म्हणत, “ मी लेखक आहे, संपादक आहे, जाहिरातींचा कॅनव्हासर आहे, हिशोब लिहिणारा आहे, प्रुफं तपासणारा आहे, गावोगांवच्या एजंटांकडे अंक रवाना करणारादेखील मीच आहे ! म्हणजे असं म्हणा ना, नाटक मीच लिहितो, नाटकाच्या जाहिराती मीच लावतो, पडदे मीच ओढतो, आणि रंगभूमीवर तोंड रंगवून येतो मीच ! ” त्यांच्या या विनोदात पुष्कळ सत्य होतं.

त्यांचा लेखक म्हणून मी दोनवर्षं काम केलं. त्यांच्या लेखनांतील प्रभावी हत्यार म्हणजे त्यांची भाषा. फडक्यांच्यासारखी भाषा फडक्यानीच लिहावी असं त्यांचा शत्रूदेखील म्हणतो. लिहिताना मला देखील मजा वाटायची. हस्तलिखित फार सुंदर असावं याकडे त्यांचा भयंकर कटाक्ष ! फडक्यांच्या सहवा-साचे जे अनेक फायदे मला लाभले त्यातला मोठा फायदा म्हणजे माझं अक्षर सुधारलं. थोडसं निष्काळजीपणानं अक्षर काढलं कीं ते बिघडायचे तेव्हां ते

म्हणायचे, " अरे, इतर गोष्टींवर तुम्ही जसं प्रेम करता तसं अक्षरावर का करीत नाहीं ? अक्षरावर प्रेम करायला शिका. " त्यांचं स्वतःचं हस्ताक्षर मोठं वळणदार आणि देखणं होतं, आप्पासाहेब विनोदानं पुष्कळदा म्हणत, " माझं साहित्य इतर कुणी वाचलं नाहीं तरी कंपोझिटर लोक त्यावर फार खुष असतात. "

ते मजकूर सांगू लागले की त्यांच्या विचाराच्या ओघाचा प्रत्यय येत असे. मला वाटतं, त्यांची भाषा अत्यंत मोहक असते याचं मुख्य कारण त्यांच्या विचाराचा ओघ स्वच्छ, निर्मळ व निश्चित असायचा हेंच होतं. वर्णनात्मक किंवा निबंधात्मक मजकूर ते सांगू लागले कीं जो लेख लिहावयाचा त्याचे सर्व भाग त्यांच्या मनात तयार असल्यासारखे दिसायचे. कसलेंही टाचण त्यानी करून ठेवलेलं नसे. परंतु लेखातले मुद्यामागून मुद्दे कसे आपोआप येत असत. त्या वेळस एखाद्या लहान मुलास आपण मुद्यामागून मुद्दे लगवावेत त्याप्रमाणे माझी अवस्था व्हायची. पण तसंच ते मला पुढे दामटीत. खूप माहिती जमविली असली तरी ती त्यांच्या डोक्यात असायची, आणि ती सगळी लेखात प्रगट व्हायची. साऱ्या विचारांचा क्रम त्यानी आधी कागदावर लिहून ठेवल्याप्रमाणे असायचा. विचारांची मांडणी आपोआप अत्यंत सफाईनं होत चाललेली दिसायची पाकळ्यातून फुलं उमलावीत त्याप्रमाणे परिच्छेदातून परिच्छेद निघावेत याकडे त्यांची सराइत नजर लागलेली असायची. वाचकानं लेखाच्या प्रारंभापासून अखेरीपर्यंत अत्यंत उत्सुकतेनं मऊ गालिच्यावर चालल्या-प्रमाणे लेखाच्या शेवटापर्यंत जावं असा सुंदर एकसंध लेख आपोआप तयार झाल्यासारखा वाटायचा. पण तो आपोआप तयार झाला असं कसं म्हणायचं ? तो तसा तयार व्हायचा त्यामागचं कारण, लेखकाचं त्यामागचं चिंतन ! त्यामगची दीर्घ तपश्चर्या !

कथा किंवा कादंबरी लिहिताना तर वाक्यातूनवाक्य, परिच्छेदातून परि-च्छेद, प्रकरणातून प्रकरणं निघत जावीत याकडे आप्पासाहेबांचा फार कटाक्ष असे. त्यांचं कादंबरीलेखन पुष्कळसं केल्यामुळे मला वाटू लागलं की चित्तवेधक प्रसंग, खुमासदार संभाषण आणि आल्हाददायक निसर्ग वर्णनं यांचं अतिसुंदर संमिश्रण ह्याच फडक्यांच्या कथेच्या किंवा कादंबरीच्या गुरुकिल्ल्या ! त्यांचा

मजकूर लिहून घेताना त्यांच्या कल्पकतेची आणि प्रतिभेची ओळख क्षणाक्षणाला पटायची व ती बघून मला जो आनंद व्हायचा त्याचं वर्णन करणं शक्य नाहीं.

मांडी ठोकून तीनतीन चारचार तास आप्पासाहेबांनी मजकूर सांगितलेला मात्र मला आठवत नाहीं. फार तर दीड दोन तास ते एकसंघ बैठक घालून बसत. मजकूर सांगण्याचं थांबविण्याची त्यांची निमित्तं दोन! एखाद्या जागी अडले, म्हणजे ते म्हणत, "पुरे आता! पुढे विचार करावयास हवा!" किंवा कित्येकदा पुढचं सारं सुचलेलं असायचं तेव्हा ते म्हणत, "देशपांडे, थांबा आता! नंतर लिहू!"

कधी कधी कादंबरीच्या एखाद्या जागेवर ते भयंकर अडत. मग ती निरगाठ सुटेपर्यंत ते आपल्याच विचारांच्या तंद्रीत असत. चिडल्यासारखे वागत. त्यांना मजकूर खूप सुचलेला असला की, मग मात्र कितीही व्यत्यय आलातरी ते चिडत नसत. रोहिणी, अंजलि, विजय ही त्यांची मुलं वरचेवर त्यांच्या खोलीत येत, त्रास देत. पेन्सिली, टाक, कागद पळवीत असत. अरे, माझी जांभळी पेन्सिल कुठे गेली, कात्री कुठे गेली, फुटपट्टी कुठं गेली, अशा दिवसाकाठी रागाच्या चार सहा आरोळ्या त्यांना माराव्या लागतच. त्यांची दोन लाडकी मांजरं त्यांच्या मांडीवर येऊन बसत. कमलाबाईंच्या फेऱ्याही अधून मधून होत असत. एखादा माकडवाला किंवा जादूगार गारोडी बाहेर आलेला असे. मुलं आग्रह करायची "आप्पा, जरा वेळ पाहयला चला." कमलाबाइंना चित्रपटाला जायची मधूनच लहर यायची. इष्टमित्र किंवा अनोळखी मित्र सारखे भेटायला यायचे. येवढ्यात स्वाक्षरी घ्यायसाठीं शाळकरी मुलं येऊन दाखल व्हायची व म्हणायची, "स्वाक्षरी आणि संदेश हवा आहे." या सर्व वर्दळीत आप्पासाहेब मला मजकूर सांगत असत, आणि तोही अगदी सहजपणानं! कुणी बोलायला बसायला आलं की त्याच्या आधी सांगितलेलं वाक्य अर्धच राहिलेलं असेल, पण तो माणूस उठून गेल्याबरोबर आप्पासाहेब नेमकं ते वाक्य पुरं करीत. त्यांचं अवधान सुटलेलं नसे.

पण हें झालं खूप. सुचलेलं असेल तेव्हाचं. सुचलेलं नसलं म्हणजे निराळे आप्पासाहेब मला दिसू लागत! अस्वस्थ झालेले, कांहींसे चिडलेले, आपल्याच तंद्रीत असलेले! मग चहा, जेवण, गप्पा कशातही त्यांचं लक्ष लागत नसे.

त्यामुळें मी देखील अस्वस्थ होऊन जाई. कारण अशा वेळेस माझ्यावर ते कशावरून रागावतील यांचा नेम नसे. ते मला बहुधा 'अरे, जारे' म्हणत. त्यामुळें 'अहो, देशपांडे' अशी हाक त्यानीं मारली कीं मी मनाशीं म्हणायचा, चुकलंय आपलं कांहीं तरी. हा त्यांचा चिडकेपणाचा मूड केव्हा जाईल याची कमलाबाई देखील वाट बघत. अशा वेळेस त्याना सल्ल्यानिमित्त कुणी कांहीं विचारलं तर ते म्हणत, "करा काय वाटेल ते! मला कांहीं विचारू नका!"

थोड्याफार अवकाशानं आप्पासाहेबांच्या मनाची निरगाठ सुटे. मग ते खुषीत येत. साऱ्याना खुषीत आणीत. अशा वेळस काय वाटेल ते मोठ्या आनंदानं करीत. अशाच क्षणाची मी वाट पहात असे. तो आला की मी आप्पासाहेबाना म्हणे, "आप्पा, इंटरला बसायचं आहे बाहेरून, पन्नास रुपये हवेत." त्यावेळी नकार म्हणून मला कधी मिळाल्याचं स्मरत नाहीं. संध्याकाळीं ऑफीसमधून बाहेर पडायचं तो खिसा गरम करूनच! त्यांची ही वृत्ति एकदम बदलायची ती पुढचं सुचल्यानं याबद्दल पुष्कळदा ते असं सांगत की "केव्हां सुचतं आणि का सुचतं या गूढाचा मला देखील उलगडा झालेला नाहीं." सुचलेलं असलं म्हणजे निवांतपणा पाहिजे, एकांत पाहिजे असं आप्पासाहेबाना वाटत नसे. लिहिण्यासाठीं खंडाळयाच्या बंगल्यावर जाणाऱ्या एका प्रसिद्ध लेखकाची ते गंमतीनं कधी कधी चेष्टा करीत, ती ऐकण्यासारखी असे.

खूप काम केल्याशिवाय चैन करायची नाहीं असं त्याचं तत्व ठरलेलं होतं. नाटक, चित्रपट बघायला, किंवा एखादी गाण्याची मैफल ऐकायला ते आणि कमलाबाई जातात तेव्हां आधी मनाजोगं खूप काम केलेलं असलं म्हणजे ते खुषीत असायचे. आपल्या मुलांना ते नेहमीं शिकवीत कीं, जे सोपे आहे ते करण्यांत काय अर्थ आहे? काही तरी अवघड करावं. विद्यार्थ्यांनादेखील ते हाच उपदेश करीत. पानसुपारी खाणं, सिगारेट ओढणं, नोक झोक कपडे करणं, सिनेमा नाटकं पाहणं, हॉटेलात जाणं या गोष्टी कुणीही करील. कोणतीही चैन करण्यापूर्वी आधीं काही तरी महत्त्वाची गोष्ट हातावेगळीं करून चैन करण्याची पात्रता ठेवावी असं ते नेहमीं म्हणत. ते काश्मीरच्या सफरीवर गेले होते, परंतु जाण्याच्या आधीं सातशे पानांचं लेखन पूर्ण करण्याचं त्यानी

मनाशी ठरविलं होतं. आणि ते पूर्ण केल्यावरच ते काश्मीरला गेले होते. जाताना ते कमलाबाईना म्हणाले होते, "आता मी प्रवासांत लिहिणार नाही, वाचणार नाही, विचारदेखील करणार नाही. एखाद्या बोकया सारखा राहणार !"

टापटीप आणि सौंदर्य यांची आप्पासाहेबाना कमालीची आवड ! त्यांच्या टेबलावरच्या कामाचे सर्व कागद नहमी व्यवस्थित ठेवलेले असत. महिना भरात करावयाची कामं, नव्या दिवशीं करावयाची कामं यांचं टिपण करून टेबलावर ठेवलेलं असायचं. लिहायचं टेबल अत्यंत स्वच्छ दिसलं पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. त्यांच्या टेबलावर, जवळच्या खिडक्यातून फुलानी भरलेल्या फुलदाण्या असायच्या. माळी बागेतली चाफ्याची फुलं सकाळीच आणून माझ्या ताब्यात देई. फुलदाण्या फुलानी भरलेल्या दिसताच आप्पासाहेबांच्या चर्येवर आनंदाची छटा पसरल्यासारखी दिसे. डाव्या हाताकडच्या लहान टेबलावर कमलाबाईंचा सुंदर फोटो असायचा. उत्तम सुगंधी उदबत्तीचा दरवळ सुटलेला असे. सेंट, लव्हेन्डर यांची त्याना फार आवड ! त्यचा नवा बंगल आणि त्या भोवतालची बाग म्हणजे साऱ्या लोकांचा कौतुकाचा विषय होता !

परंतु एकंदरीत पाहिलं तर आप्पासाहेबांची राहणी फार साधी ! साध्या लांब्या बाह्यांचा गंजीफ्रॉक घालून ते बहुधा लिहायला बसत. एकाद्यावेळीं पॅन्ट घालून कामाला बसण्याची त्याना लहर येई. परंतु उंची झोक नोक कपडे करावेत असा षोक त्याना कमी. कमलाबाईनी खूप आग्रह करावा, आणि मग त्यानीं एकादा सूट शिवावा असं चाले. गबाळा पोषाख त्याना आवडत नसे. त्याचप्रमाणे उगाच कुणी भडक पोशाख केलेलाही त्याना आवडत नसे. पैशाची उधळपट्टी करण्याची त्यांची एक बाब मात्र ठरलेली. ते एकट्यानं प्रवासाला जातील, किंवा कमलाबाईना अगर मुलाना घेऊन जातील तव्हां फर्स्टक्लास खेरीज कधी जाणार नाहींत. नाटक, चित्रपट, जलसा अशांची तिकिटं देखील नेहमीं पहिल्यादुसऱ्या रांगेतलीच ते काढीत. परंतु चैनीच्या बाबतींत तरुण विद्यार्थ्यांना जो उपदेश करीत तोच ते स्वतः पाळीत. तो असा कीं जे करायचं ते करण्याची पात्रता आपण कमावली आहे का हे प्रथम पहा. या तत्त्वामुळे त्यांची राहणी त्यानीं साधी ठेवली असावी. धोतर, साधा शर्ट येवढाच काय तो त्यांचा नित्याचा पोशाख !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



आणि राहणी जशी साधी तशीच शिस्तशीर आणि व्यवस्थित. सकाळी साडेआठपासून दुपारी साडेअकरापर्यंत ते लिहीत. घरच्या माणसांबरोबर दोन्हीं वेळेचं जेवण आणि दोन्ही वेळचा चहा गप्पा मारीत मजेत घ्यायचा असा त्यांचा क्रम होता. जेवणाला उशीर झालेला त्यांना चाले, परंतु चहाला अर्धातास उशीर झालेलाही त्याना खपत नसे. दुपारच्या जेवणानंतर अंथरूणात पडल्या पडल्या ते वाचन करीत, आणि मग झोपत. रोज चांगली आठ नऊ तासांची झोप ते घेत. त्याना झोंप लागेही वाटेल तेव्हां, आणि वाटेल तितकी! परंतु कामाची वेळ झाली की झोपेची पर्वा ते करीत नसत. त्यांचं लिखाण दुपारी पुन्हा साडेतीन चारला सुरू होई. मी तीनलाच जाऊन बसे. मला पाहताच ते म्हणत, " बस बाबा, आलोच. " या वेळी दुपारी ते दाढी उरकीत असत. संध्याकाळीं सात साडेसातला लिहायचं बंद करीत. आठला कमलाबाई आणि ते फिरण्यासाठीं पर्वतीला जात. व्यायामासंबंधी त्यांचा नियमितपणा पाहून मला तर आश्चर्यच वाटे. स्नानापूर्वी मालीश आणि व्यायाम ते कधी चुकवीत नसत. ते पुष्कळदां तरुण लोकाना म्हणत, " अरे, काय तुमची शरीरं! तुम्हाला उघडं व्हावयाची लाज वाटावी अशी तुमची देहयष्टी! " ते स्वतः कित्येकदा उघडे बसत, आणि मग विद्यार्थी दशेत त्यानी तालीमकडे लक्ष दिलं होतं, ते वेताचा मल्लखांब उत्तम करीत, कॉलेजात असताना क्रिकेट, टेनिस भरपूर खेळत याची साक्ष पटे. रात्री जेवणानंतर ते कधी देखील लिहीत नसत. निजेपर्यंत वाचनमात्र करीत. नित्य नवी पुस्तकं आणि मासिकं त्यांच्या आणि कमलाबाईंच्या टेबलावर येऊन पडलेली असायची. दैनिकं, साप्ताहिकं यांकडे देखील त्यांचं लक्ष असे.

मी दोन वर्षं त्यांच्याकडे होतो. परंतु आप्पासाहेबांच्या गप्पांचा अड्डा पडलेला मी पाहिला नाही. ते कधी पत्ते खेळत बसलेले मला दिसले नाहीत. कधी कधी त्यांना लहर येई ती कॅरम खेळण्याची. पण तीही अगदी क्वचित. ते आणि कमलाबाईला एका बाजूला; धाकटा विजय आणि मी दुसऱ्या बाजूला. आप्पासाहेबाना कॅरम बिलकूल खेळता येत नसे. परंतु आरडा ओरडा करून खेळण्याचा मजा ते घेत. घटकाभर केवळ करमणूक करून घ्यायची येवढाच त्यांचा उद्देश असायचा. डाव बहुतेक आम्हीच जिंकायचे, आणि त्यामुळे छोटा विजय खूष व्हायचा.

आप्पासाहेबांच्या चाहत्यांचा खूपच मोठा परिवार जिकडे तिकडे पसरलेला! परंतु माझ्या लक्षात आलेलं होतं कीं त्यांचे विशेष निकट मित्र त्यानी कसोशीनं निवडलेले होते. मी त्यांचं लेखन करी, त्याचप्रमाणें खाजगी पत्रव्यवहार देखील माझ्याच हातून होई. त्यांच्या बहुतेक पत्रांच्या शेवटी मी ' स्नेहांकित ' हा शब्द लिही ( आणि नंतर त्याखाली ते सही करीत ) तेव्हां माझ्या मनांत येई, सगळ्यांच्याच पत्रांखालीं आप्पासाहेब सही करतात खरी, परंतु जिव्हाळ्याचा स्नेह त्यानी अगदी निवडक माणसाना दिलेला होता. अशी निवडक माणसं त्यांच्याशी बोलायला बसायला आली की आप्पासाहेब खुशीत असत. कमलाबाई देखील बैठकीत सामील होत, आणि मग हास्य विनोद कसा चाले ते मी कितीकदा तरी पाहिला आहे. कोटीबाज माणसावर किंवा ज्याला विनोदबुद्धी आहे अशा माणसावर आप्पासाहेब आणि कमलाबाई यांचं प्रेम चटकन बसे. चारचौघानी आपल्याकडे यावं, चहापाणी घ्यावं, जेवावं याची कमलाबाईना फार हौस ! ही हौस भागविण्याच्या संधीची त्या वाटच बघत असत, आणि यावरून आप्पासाहेब त्यांची नेहमी चेष्टा करीत. जेवायला आलेल्या माणसाला खूप आग्रह केल्यावाचून कमलाबाईना समाधान होत नसे.

परंतु आप्पासाहेबाना प्रिय असलेली माणसं आलीं की ते जसे खुशीत असत, त्याचप्रमाणे इतर माणसं आली की त्यांच्या स्वभावाचा निराळा पैलू मला दिसे. येणाऱ्या माणसाचं ते स्वागत करीत. दोनचार मिनिटं मोठी आस्था दाखवून सौजन्यानं बोलतील. विचारपूस करतील. आलेला माणूस जास्त वेळ घेणार असा रंग दिसला की मला म्हणतील, " चला, देशपांडे. लिहायचंय आपल्याला ! " पाहुणा समंजस असला तर उठून जायचा. आणि नसला तर आप्पासाहेब निर्वाणीचं शस्त्र काढीत, आणि म्हणत, " आत्ता मला लिहायला पाहिजे. " भेटायला आलेला माणूस आप्पासाहेबांची प्रशंसा करू लागला तर तो विषय ते कौशल्यानं टाळीत. मला याचंदेखील नेहमी नवल वाटलं की " सध्यां काय लिहिताहात " असं कुणी विचारलं तर आप्पासाहेब येवढंच म्हणत, " चाललं आहे कांहीं तरी. " आपण अमुक लिहीत आहोत, लिहिणार आहोत असं ज्याला त्याला बेत सांगणं, किंवा भेटेल त्या माणसाला वेठीला

धरून लिहिलेलं वाचून दाखविणं या साहित्यिकांच्या नेहमीच्या संवयी आप्पा-साहेबाना अजिबात वर्ज्य असत.

आप्पासाहेबांच्या लेखनात पुरोगामित्व भरपूर! परंतु त्यांच्या स्वभावात जुनेपणाचे काही अवशेष मला आढळले. ते स्वतः निरिक्षरवादी आहेत. परंतु त्यांच्या तिन्ही मुलानी रोज संध्याकाळी देवापुढे बसलं पाहिजे, प्रार्थना केली पाहिजे अशी शिस्त होती. आप्पासाहेब स्नानसंध्या करताना मला कधी दिसले नव्हते. 'प्रभूची इच्छा,' 'ईश्वरी कृपा' असले शब्द त्यानी उच्चारलेले मी कधी ऐकले नाहीत. पण त्यांच्या लहान मुलांनी देवघर सजविलेलं होतं, आणि ते उत्तम ठेवलेलं होतं. पूजाअर्चा सगळं काही तिथें चाले. आप्पासाहेबांच्या जुनेपणाचा पुरावा म्हणून आणखी एक गोष्ट सांगता येईल. जुन्या गोष्टीत ते सहसा बदल करण्यास उत्सुक नसत. न्हावी, शिंपी, धोबी, गवळी, चांभार माळी बदलायचं त्यांच्या जिवावर येई. गेली कित्येक वर्षे फर्ग्युसन कॉलेजातला एक शिपाई त्यांचे केस कापायला घरी येई. कमलाबाईंची नेहमी तक्रार असायची, आप्पा, हा तुमचे केस चांगले कापीत नाही. दुसरा न्हावी बदला. पण आप्पा काही ऐकत नसत. शिंप्याच्याहि बाबतीत दोघांत प्रेमळ भांडण चालू असे, ठरलेल्या जुन्या शिंप्यानं कमलाबाईंना पसंत पडेल असा सूट शिवून दिला की आप्पासाहेबाना विजय मिळाल्यासारखं वाटे. जे जुनं ते सहसा सोडायचं नाही, अशा वृत्तीचा गमतीदार लकेर आप्पासाहेबांच्या स्वभावात होती खास!

त्यांचं इतकं प्रचंड लेखन झालं आहे याचं कारण ते चार चार पांच पांच तास बैठक मारून लिहितात असंही नाहीं किंवा मजकूर खूप वेगानं सांगतात असंही नाहीं. कधीं कधीं मजकूर सांगताना त्यांच्या मनांत विचारांची खूप गर्दी झालेली असे. पुढची कित्येक वाक्यं त्याना आठवलेली असत. मग घोड्याला चाबूक मारावा त्याप्रमाणें ते मला दामटायला लागत. परंतु बहुधा ते मजकूर सांगत तो संथपणानंच. सांगता सांगता त्याचं माझ्या अक्षराकडे लक्ष असे. शुद्ध लेखनाकडेही असे. आणि मी चूक करणारसं वाटल तर आधीच सांगत, "ऱ्हस्व बरं का, दीर्घ बरं का! 'च' 'घ' सारखा लिहूं नका.

'ल' च्या पाकळ्या स्पष्ट दिसू द्या. 'ह' ला दोन पोटं आहेत हे लक्षांत ठेवा, नाहींतर त्याचा गर्भपात कराल!" त्यांच्या तोंडून मजकूर बाहेर पडे तो व्याकरणशुद्ध टीपबंद होऊनच. त्यांत खोडाखोड कधीदेखील मला करावी लागली नाहीं. जे लिहून व्हायचं ते सरळ छापखान्याकडे पाठविण्याच्या योग्यतेचं असायचं. रफ कॉपी, फेअर कॉपी असले कांहीं प्रकार त्यांना माहीत नसावे. आजपर्यंत त्यांनीं जवळ जवळ अठ्ठावीस तीस हजार पृष्ठांचा मजकूर लिहिला त्याचं श्रेय त्यांच्या या तपश्चर्येला आहे.

स्वतःच्या लेखनाच्या दर्ज्याबद्दल त्याना विलक्षण आत्मविश्वास! विरोधी टीकेचं त्याना काही महत्व वाटत नसे, त्याचं कारण हे कीं आपलं कुठलंही लिखाण किती उत्सुकतेनं सगळीकडे वाचलं जातं हे त्याना पुरतं माहीत असतं. 'अंजलि' चा नवा अंक बाहेर पडला की भेटायला येणाऱ्या माणसाना ते विचारीत, "काय, बरी आहे का आमची कादंबरी? लिहितां येतंय की नाही आम्हांला?" आणि या प्रश्नाचं उत्तर त्यांचं त्यानाच माहीत असे. चहात्यांची पत्रं त्याना येत. 'अंजलि' खास अंकाचा खप वाढत होता. ते पुष्कळदा विनोदानं म्हणत, "वृत्तपत्रात विरुद्ध टीका करणारे धंदेवाईक टीकाकार हे माझे वाचक नव्हेतच मुळी. माझे वाचक दूर दूर पसरलेले आहेत. एखाद्या लहानशा गावांतला प्राथमिक शाळेतला मास्तर माझं पुस्तक घेऊन वाचतो, आणि किती आनंद झाला ते कळवितो. बिचारा वर्षभर काटकसर करतो, आणि 'अंजलि' चे अंक विकत घेतो. माझे खरे वाचक आहेत ते हे." ते पुष्कळदा असं सुद्धां म्हणतात, "लोकाना माझं लिहिणं हवं आहे तोंवर मी लिहिणार!" कुणी तरी एकदा लिहिलं होतं, "फडक्यांच्या सर्व कादंबऱ्या समुद्रात बुडवून टाकण्याच्या लायकीच्या आहेत." या टीकेचा उल्लेख करून आप्पासाहेब एका व्याख्यानांत म्हणाले, "येवढा तुकाराम! त्याचे अभंग बुडवायला इंद्रायणीचा लहानसा डोह पुरला. माझ्या कादंबऱ्या बुडवायच्या झाल्या तर समुद्राची गरज वाटावी म्हणजे मी तुकारामापेक्षां किती श्रेष्ठ झालो नाही का?"

# प्रो. ना. सी. फडके यांची
# मुलाखत

[ ज्या लेखकाचं साहित्य आपण वैपुल्यानं आणि आवडीनं वाचतो त्याच्या साहित्यिक उद्योगाविषयी आपल्या मनात अनेक प्रकारचं कुतूहल असतं. साहित्य लेखनामागची त्याची भूमिका कोणती, त्याच्या मताप्रमाणे साहित्याचा हेतु कोणता, तो जे लिहितो ते कां लिहितो, कुणासाठी लिहितो, लिहिण्यासाठी कोणती साधना करतो, त्याचं लेखन आणि परिस्थिती यांचे अन्योन्य संबंध कसे असतात, त्याच्या कृतीपैकी कांहीं वाचकांनी विशेष श्रेष्ठ ठरविलेल्या असतात याबद्दल त्याला स्वतःला काय वाटतं, इत्यादि अनेक प्रश्न शक्य तर त्याला विचारावे असं आपल्याला वाटत असतं.

मुख्यतः विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीं परंतु सामान्यतः प्रो. ना. सी. फडके यांच्या सर्वच वाचकांसाठीं आकाशवाणीच्या पुणें केंद्रानं असेच काही प्रश्न प्रो. फडके याना विचारण्याचा व त्यांच्याकडून उत्तरं मिळविण्याचा एक कार्यक्रम कांहीं दिवसांपूर्वी घडवून आणला.

या कार्यक्रमाच्या वेळेस प्रो. ना. सी. फडके यानी एकंदर दहा प्रश्नांना जी उत्तरं दिली ती अनेक मूलभूत वादग्रस्त साहित्यिक प्रश्नांवर महत्वाचा प्रकाश टाकणारी, जितकी मनोरंजक तितकीच उद्‌बोधक, मार्मिक वाचकांचं आणि होतकरू लेखकांचंहि मार्गदर्शन करणारी असल्यामुळें ती येथें सादर करीत आहोत.]

प्रश्न १ —आपल्या दृष्टीने आपल्या एकंदर साहित्याची मुख्य धारणा कोणती ?

उत्तर—'एकंदर साहित्य' असा शब्दप्रयोग आपण करीत आहा. माझ्या ग्रंथांची एकूण संख्या १४० च्या घरांत गेलेली आहे. त्यापैकी पन्नास कादंबऱ्या असून बाकीच्या नव्वद ग्रंथांचं स्वरूप विविध प्रकारचं आहे. तथापि आपला प्रश्न फक्त माझ्या कादंबरी साहित्याला उद्देशून असावा असं मी समजतो. आणि या समजुतीच्या अनुरोधानंच आपल्या प्रश्नाचं उत्तर देतो. माझ्या साहित्याची मुख्य धारणा कोणती या प्रश्नाचं उत्तर आपण मागता

याचा अर्थ मी असा समजतो की कोणत्या हेतूनं मी कादंबऱ्या लिहितो, लेखनामागची माझी भूमिका कोणती आहे, माझ्या कादंबऱ्यातून वाचकाना काय मिळावं अशी माझी इच्छा असते याबद्दलचं स्पष्टिकरण आपल्याला हवं आहे. बरोबर आहे ना ? ठीक आहे. सांगतो.

कादंबरींचे गौण हेतू अनेक असू शकतील. कुणी वाचक केवळ मनोरंजनासाठीं कादंबरी वाचतील, कुणी एखादी मतप्रणाली समजून घेण्यासाठीं वाचतील, कुणी तिच्यातील तत्वज्ञानासाठीं वाचतील, कुणी तिच्यातील स्थल वर्णनासाठीं वाचतील, कुणी कशासाठीं, कुणी कशासाठी, परंतु वाचकांच्या या भिन्न रुची बघितल्यावर येवढंच म्हणावसं वाटतं कीं कादंबरीनं साध्य होणारे गौण हेतू अनेक आहेत, आणि त्यापैकीं कोणत्याहि एकाचा निर्देश करून कादंबरी लेखनाची ही खरी कसोटी 'असं' म्हणता येणार नाहीं. कारण कादंबरीची मुख्य प्रतिज्ञा, तिचं प्रयोजन वेगळंच आहे आणि ते प्रयोजन म्हणजेच कादंबरीची खरी कसोटी आहे.

या बाबतीत माझा जो नेहमीचा सिद्धांत आहे तो मी आपणास सांगत नाहीं किंवा असं म्हणू की तोच सिद्धांत, परंतु थोड्या वेगळ्या शब्दात सांगतो. सौंदर्याचा आस्वाद देणं हे कोणत्याहि कलाकृतीचं मुख्य कार्य होय असं मी नेहमी म्हणतो. आणि यामुळेच 'सौंदर्यवादी' असा शिक्का माझ्यावर मारला गेला आहे, तुम्हाला ठाऊकच असेल. परंतु सौंदर्यवाद हा शब्द टीकाकारानी थोडासा निसरडा करून ठेवला आहे. तेव्हा तो शब्द आपण सोडूनच देवूं, आणि कादंबरी का लिहिली या प्रश्नाचा अगदी वेगळ्या रीतीने विचार करूं. माझ्या साहित्यामागची मुख्य धारणा तुम्हाला हवी आहे ना ? म्हणून. असं पहा, तुमच्या आमच्यापैकी प्रत्येकाच्या वाट्याला जे आयुष्य आलेलं आहे ते मर्यादित आहे, संकुचित आहे. मी प्रोफेसर होतो, लेखक आहे, याचाच अर्थ असा की इतर किती तरी मी नाहीं. मी बस कंडक्टर नाहीं, दुकानदार नाहीं, पोस्टमन नाहीं, पुढारी नाहीं, मंत्री नाहीं. आयुष्याच्या अनंत तऱ्हा माझ्या प्रत्यक्ष जीविताच्या कक्षेच्या बाहेर आहेत. मात्र या तऱ्हांची अनुभूति मला हवीशी वाटते. बस कंडक्टरची, पोस्टमनची, बँक मॅनेजरची, कसोटी सामन्यात शतक फडकविणाऱ्या बॅटसमनची,

गायकाची , नटाची, वेश्येची, चोर ची, संताची सुखदुःख कशाप्रकारची असतात या विषयी माझ्या मनांत विलक्षण जिज्ञासा आहे, आणि त्या विविध सुखदु खांचा अनुभव मिळेल तर मला हवा आहे. ही ओढ मला एकट्यालाच आहे असे नव्हे, तर मनुष्यमात्राला आहे. आपण असतो 'एक'च परंतु 'अनेक' व्हावसं आपल्याला वाटत असतं. 'एकोऽहं बहुस्याम्' असं कांहीं वेदांतातलं वचन आहे ना? तशीच स्थिती असते आपली प्रत्येकाची.

आपल्या मर्यादित संसारांत, घराच्या चार भिंतींत आपण कोंडलेले असतो. हा कोंडमारा आपल्याला नकोसा झालेला असतो. या पिंजऱ्यांतून बाहेर पडावं, आणि परोपरीच्या अनुभवानी भरलेल्या जगांत पंख पसरून भरारी घ्यावी असं आपल्याला वाटत असतं. मनुष्यमात्राच्या ठिकाणीं असणारी अनुभूति विस्ताराची आत्म्याच्या विकासाची-ही इच्छा पूर्ण कोण करतं ? तर कथाकार.

कथाकार कुणाला म्हणावं याची एक सोपी व्याख्या सांगू का ? स्वतः अनुभविलेली सुखदुःख आणि सहानुभूतीच्या सहाय्यानं जाणलेलीं इतरांची सुखदुःखं प्रभावी भाषेंत जो सांगतो तो कादंबरीकार. कोणत्याहि भाषेतल्या कोणत्याहि मोठ्या कादंबरीकाराचं नांव घ्या. ही व्याख्या त्याला लागू पडेल. हरिभाऊ आपट्यांचा मोठेपणा हाच की त्यांच्या काळांतील महाराष्ट्रीय स्त्रियांचीं दुःखं त्यानी जाणली आणि ती प्रभावी भाषेंत चित्रीत केलीं. जगांतील सर्व प्रकारचे अनुभव घेण्याची शक्ति आणि ते अनुभव वाचकापर्यंत पोचविण्याची हेच कथाकाराच्या कलेचें मुख्य मर्म आहे. उत्कट संस्कार आणि प्रभावी अविष्कार हीच दोन कादंबरीच्या उद्योगाचीं प्रमुख अंग आहेत. कादंबरीकाराचा अनुभव जितका समृद्ध असेल तितकाच त्याच्या वाचकांचा अनुभव समृद्ध होतो. आणि वाचकांची रुचि कितीहि भिन्न आणि वैचित्र्यपूर्ण असली तरी कादंबरीपासून सर्व वाचकांना जी एकच गोष्ट हवी असते ती म्हणजे अनुभवसमृद्धी ! अनुभवविस्तार !

कादंबऱ्या वाचून वाचकाला असं वाटलं पाहिजे, आपण खूप खूप जग पाहिलं, मानवी स्वभावांचे अनंत प्रकार पाहिले, सुखदुःखांच्या अनंत तऱ्हा आपल्याला समजल्या. हरिभाऊंच्या एका कादंबरीचं नांव तुम्हाला आठवतं

कां ? ' जग हे असे आहे ! ' खरोखर प्रत्येक कादंबरीला हे नाव शोभण्यासारखं आहे.

कादंबरी लेखनाविषयीचा हा सिद्धांत गेल्या चाळीस वर्षांच्या लेखनात मला अधिकाधिक पटत गेला आहे. माझ्या साहित्याची धारणा कोणती असं तुम्ही विचारलंत. त्याचं उत्तर हे आहे. वाचकाच्या अनुभवाचा विस्तार व्हावा, आपल्या मर्यादित संसारांत मानवी व्यवहारांचे जे अनंत प्रकार आपल्याला अप्राप्य आहेत ते आपण अनुभविले असं वाचकाला वाटावं, त्याचं अंतःकरण संस्कारित व्हावं, समृद्ध व्हावं, हा हेतू डोळ्यापुढं ठेवून मी कादंबऱ्या लिहितो. दूरदूरच्या स्थलांची व प्रदेशांची वर्णनं नाना प्रकारांच्या पात्रांचं व प्रसंगांचं चित्रण, सुष्ट, दुष्ट, श्रीमंत, गरीब, सदाचारी, दुराचारी शूर, भेकड माणसांच्या कृत्यांनी उद्‌भवलेले कमी अधिक प्रक्षोभक प्रसंग यांचं वैपुल्य माझ्या कादंबऱ्यात वाचकाना आढळतं, आणि म्हणूनच ते त्याकडे आकृष्ट होतात.

आणखी काय सांगू ? तुमचा प्रश्न असा आहे कीं त्यावर बोलावं तितकं थोडंच होईल. परंतु आतां थांबू या. तुमचा पुढचा प्रश्न विचारा.

प्रश्न २ —लघुनिबंध, कथाकादंबरी, तत्वज्ञान, मानसशास्त्र, संगीत क्रीडा, टीका असे विविध साहित्य प्रकार आपण सारख्याच निपुणतेनं हाताळले आहेत. स्वभावतः भिन्न भिन्न असलेले हे प्रकार एकाच व्यक्तीला कसे हाताळता येतात ? यातलं रहस्य काय ?

उत्तर—तुमचा हा प्रश्न जरासा कठीण आहे. त्याचं उत्तर द्यायचं झालं तर मानसशास्त्रीय विश्लेशणात खोल शिरावं लागेल. मात्र एवढंच सांगतो की यात गूढ रहस्य असं काही नाही. हा केवळ लखकाच्या जन्माजात वृत्तीचा आणि संस्कारांचा प्रश्न आहे. एक दाखला देतो. पटला तर पहा. क्रिकेटच्या खेळात बॅटिंग आणि बोलिंग ही दोन भिन्न भिन्न क्षेत्रं समजली जातात. बहुसंख्य मोठमोठे खेळाडू कोणत्या तरी एका प्रकारात प्रवीण असतात. परंतु काही खेळाडू दोन्ही प्रकारात असामान्य प्राविण्य दाखवितात. त्याना All-raunder म्हणतात. माहीत आहे ना ? तशातलाच हा काहीसा प्रकार आहे. मला साहित्याच्या सर्व प्रकाराची पहिल्यापासूनच गोडी वाटली, ते हाताळण्यात यश मिळू लागलं, खूप

लिहिलं, खूप लिहीत आहे. तुम्हाला रहस्य हवं असेल तर एवढंच सांगतो की याबाबतीतदेखील लेखकाच्या अनुभवाची विविधता आणि समृद्धी यांचाच उल्लेख करावा लागेल. आणि त्याच्या भरीला एवढंच सांगेन की जे कांहीं लिहावयाचं ते अत्यंत चटकदार आणि चित्तवेधक वाटलं पाहिजे. अशा कटाक्षानं कमावलेल्या भाषाशैलीचा मला फार उपयोग झाला आहे.

प्रश्न ३ — लेखकाच्या निर्मितीत काळाचं प्रतिबिंब पडत असतं असं म्हणतात. आपल्या साहित्याच्या बाबतीत हे विधान कितपत खरं आहे ?

उत्तर — अगदी पूर्णतः खरं आहे खरं असणं अटळच आहे. हरिभाऊ आपटे ज्या काळात लिहित होते त्याहून भिन्न काळांत मी कादंबऱ्या लिहूं लागलो. माझ्या काळातील सामाजिक परिस्थिती भिन्न होती. ज्या सामाजिक प्रश्नावर हरिभाऊंच्या कादंबऱ्या होत्या ते प्रश्न मागं पडले होते, नवे प्रश्न उद्भवले होते. भोवतालच्या परिस्थिती विषयींचा असंतोष हेच नाट्यलेखनाचं आणि कथालेखनाचं उगमस्थान असतं. ज्या विषयी हरिभाऊना असंतोष वाटला त्या गोष्टी माझ्या काळांत विशेष महत्त्वाच्या राहिल्या नव्हत्या. विधवावपनं, स्त्रीशिक्षण या दोन प्रश्नांविषयी हरिभाऊनी समाजाला जागृत केलं. माझ्या काळात हे प्रश्न शिळे झाले होते. प्रौढ विवाह आणि प्रीतिविवाह या प्रश्नाना महत्त्व प्राप्त झालं होतं. 'जादुगार' ' दौलत ' वगैरे माझ्या प्रारंभीच्या कादंबऱ्यांत हेच विषय मी घेतले. ' कलेसाठीं कला ' या तत्त्वाचा आग्रह धरणारा मी. परंतु माझ्या प्रत्येक कादंबरीत त्या त्या घटकेचा कोणता तरी ज्वलंत प्रश्न मी हाताळलेला आहे. जीवनाकडे मी पाठ फिरविलेली नाहीं. काळजी घेतली ती एवढीच की कोणत्या तरी एकाद्या विवाक्षित प्रश्नाकडे माझ्या वाचकाचं लक्ष वेधताना कादंबरीची कलात्मकता कटाक्षानं संभाळली. ' कलेसाठीं कला ' या माझ्या आवडत्या सिद्धांताचा अर्थ यावरून स्पष्ट होण्यासारखा आहे. कलात्मक साहित्य हे जीवनावरची टीका असते असं जे सुभाषित आहे ते महत्वाचं आहे. माझ्या प्रारंभीच्या कादंबऱ्याच्या नंतरच्या काळांत सामाजिक परिस्थिती झपाट्यानं बदलत होती. अस्पृश्यांवर होणारा अन्याय, प्रौढ कुमारिकेची नाजूक अवस्था, विवाहपूर्व मातृत्व, अशा अनेक समस्या निर्माण होत होत्या. औद्योगिक क्षेत्रांत मजूरांचे संप घडत होते. क्रिमिनल ट्राइब्जचा प्रश्न पुढे येत होता. राजकीय क्षेत्रात तर मोठमोठे

उसात घडत होते. या सर्व गोष्टींचं प्रतिबिंब माझ्या कादंबऱ्यात दिसेल. मी गर्वानं बोलतो असं समजू नका, सत्य गोष्ट म्हणूनच सांगतो. १९२० सालापासून भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या एकंदर सुमारे तीस वर्षांच्या काळातील भारतीय राजकारणातली स्थित्यंतर माझ्या 'प्रवासी' कादंबरीपासून तों 'उजाडलं, पण सूर्य कुठे आहे?' या कादंबरीपर्यंतच्या कादंबऱ्यात वाचकाना आढळतील. काश्मिरच्या प्रश्नावर कादंबरी लिहिणारा माझ्याखेरीज दुसरा कुणी नाहीं. हैद्राबादच्या पोलिस ॲक्शनवर पहिली कादंबरी लिहिली मीच. सुभाषचंद्र बोस यांच्या अतिपूर्वेकडील सशस्त्र उठावाची साद्यंत हकिगत वाचकाना सादर करण्यासाठी 'शोनान', 'अस्मान' आणि 'तुफान' अशा तीन कादंबऱ्या मी लिहिल्या. हे सारं सांगितलं ते प्रौढी मिरविण्यासाठीं नव्हे, तर तुमच्या प्रश्नाचं उत्तर द्यावं म्हणून. काळाचं प्रतिबिंब माझ्या लेखनात अगदीं भरपूर पडलेलं आहे.

प्रश्न ४ —आपल्या नायिकांपैकी कोणती नायिका आपल्याला विशेष आवडते? आणि का?

उत्तर—मोठा गैरसोयीचा आहे तुमचा हा प्रश्न. एक तर माझ्या साऱ्या कादंबऱ्या माझ्या लक्षांत नाहींत अर्थात् त्यांतल्या नायिका मला आठवत नाहींत. कन्या सासरी गेली, संसाराला लागली की ती आपल्या जीवनात रमून जाते, माहेराला विसरते, पिताहि तिला विसरतो. अशातला काहीसा प्रकार लेखक आणि त्याच्या मानसकन्या यांच्या बाबतील घडणं स्वाभाविक आहे, नाही का? माझ्या कादंबऱ्यातील नायिका वाचकांच्या स्वाधीन मी केल्या. त्यांचं कोड कौतुक वाचक काय करीत असतील ते खरं. मी त्या नायिकाना विसरूनदेखिल गेलो. या बाबतीत वाचकांचे अभिप्राय माझ्या कानावर येतात. त्यांचाच निर्देश मला करता येईल 'जादूगार' मधील इंदुमति 'दौलत' मधील निर्मला 'प्रवासी' तली उमा, 'अटकेपार' मधील मीनाक्षी, अंजलि मधील अंजलि अशा काही नायिका वाचकांच्या विशेष प्रीतीतल्या आहत असं म्हणतात. जी नवी कादंबरी मी लिहीत असतो तिची नायिका माझं सर्व लक्ष वेधून घेत असते, आणि त्या वेळेपुरती तीच मला अत्यंत प्यार असते. सध्या मी माझी पन्नासावी कादंबरी लिहीत आहे. या कादंबरीचं नाव आहे 'कुहु! कुहु!' आणि तिच्या नायिकेचं नाव आहे अबोली. चालू घटकेला मी तिच्या प्रेमात सापडलो आहे.

प्रश्न ५ —आपल्या साहित्यातील कोणत्या व्यक्तीरेखा अविस्मरणीय म्हणून राहतील असं आपल्याला वाटतं ?

उत्तर--याबद्दलची देखील साक्ष काढायची ती लेखकाची नव्हे, वाचकांची काढावी असं मला वाटत. मघाशीच सांगितलं ना की मी निर्माण केलेल्या व्यक्ती-रेखा माझ्या स्वत:च्या फारशा लक्षात नाहीत. त्या लक्षांत ठेवायच्या असतात वाचकानी.

प्रश्न ६ --आपल्या प्रातिभेवर कोणत्या पूर्वसूरींचे विशेष संस्कार घडले ? ते नेहमीच आपल्याला उपकारक ठरले असं आपल्याला वाटतं का ?

उत्तर — तुम्हाला माहीतच आहे की मी स्वतःला कुणाचा शिष्य म्हणवून घेत नाहीं, कुणाचाहि गुरु म्हणवून घेत नाही. हरिभाऊ आपटे, तात्यासाहेब जोशी, नारायण हरि आपटे हे माझ्या जेष्ठ पिढीतील कादंबरीकार. या सर्वांविषयीं मला आदर वाटला. परंतु यापैकी कुणाचेहि संस्कार माझ्यावर घडले नाहीत. याचं मुख्य कारण असं की या सर्वांहून माझी कादंबरीविषयीची कल्पना भिन्न होती. या बाबतींत माझ्यावर संस्कार झाले ते पाश्चात्य लेखकांचे. मारी कॉरेली, एच्. जी. वेल्स, एच्. ए. व्हॅशेल, व्हिकी बाऊम, ब्रुनो फ्रँक, हचिन्सन, वॉरिक डीपिंग, सेसिल रॉबर्ट्स, मिसेस इ. डब्ल्यू सावी, ॲलेकवॉ, हॉवर्ड स्प्रिंग, जेम्स हिल्टन, क्रोनीन अशा अनेक कादंबरीकारांच्या कृतींपासून कादंबरीलेखनाची विविध अंगं मी शिकलो. या सर्वांच्या लिखाणात विशेषतः व्हिकी बाऊम, हॉवर्ड स्प्रिंग, हिल्टन, क्रोनीन यांच्या लिखाणात मला एक समान विशेष गुण आढळला तो हा कीं त्यांची पात्रं अत्यंत सुसंस्कृत वाटतात. त्यांची संभाषणं केव्हाहि रुक्ष तत्वज्ञानासारखी नसतात. परंतु नेहमी फार वरच्या पातळीवरची असतात. पूर्वी एकदा जो मुद्दा सांगितला ना त्यालाच अनुलक्षून सांगतो की ही सारी पात्रं अनुभवानं फार समृद्ध आहेत असं वाटतं. कादंबरी वाङ्मयाचं हे फार मोठं आकर्षक आहे. आणि ते माझ्या लिखाणात यावं अशी तीव्र इच्छा मला झाली ती मघाशी ज्यांचा उल्लेख केला त्यांच्या कादंबऱ्या वाचून.

माझ्या प्रतिभेवर झालेल्या संस्काराबद्दल तुम्ही प्रश्न केला आहे म्हणून

आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते. सांगू काय ? माझ्या पूर्वीच्या जेष्ठ पिढी-तल्या लेखकांपैकी कुणाचंहि शिष्यत्व मी पत्करलं नाही. कुणाचाहि कित्ता नजरे-समोर ठेवला नाहीं. परंतु इतर कांहीं संस्कार माझ्यावर झाले आणि ते मला उपकारक ठरले. सर्व प्रकारचे मर्दानी खेळ, शिल्प, चित्र, नाट्य, नृत्य, संगीत इत्यादि कला यांची आवड मला फार आहे. क्रिकेट टेनीस सारखे खेळ मी मनःपूत खेळलो आहे. संगीताचा शोक मनमुराद केला आहे. या सर्व क्षेत्रांतील नामांकितांच्या सहवासात मी यथेच्छ वावरलो आहे. सामान्य जनरीतीच्या विरुद्ध जाऊन अशुद्ध आचरण केलेलं आहे. या गोष्टींचे फार मोठे संस्कार माझ्या लेखनावर झाले आहेत, आणि त्यामुळे माझ्या कादंबऱ्यांच्या विषयांत तर वैचित्र्य आलं आहेच, परंतु शिवाय भाषाशैलीचा जो माझा गुण माझ्या टीकाकारानाहि तत्परतेने मान्य करावा लागतो त्या गुणाचा परिपोष झाला आहे.

माझ्या संगीताच्या वेडामुळेंच माझ्या भाषेंत नादमाधुर्य आलेलं आहे. आणि क्रीडा, संगीत अशा कलांचा जो आस्वाद मी स्वतः घेतला तो वाचकाना देण्याच्या इच्छेमुळें—म्हणजेच माझ्या पूर्वीच्या लेखकांच्या पिढीनं जे विषय हाताळले नव्हते ते हाताळण्याच्या इच्छेमुळें, सर्व प्रकारांच्या सौंदर्याचं वर्णन करण्यास मराठी भाषा समर्थ ठरलीच पाहिजे अशा एक प्रकारच्या जिद्दीमुळें माझी भाषाशैली अधिकाधिक विकसित होत गेली आहे.

प्रश्न ७ — जादूगार, दौलत, अटकेपार, या आपल्या प्रारंभीच्या कादंबऱ्यांइतक्या आपल्या अलीकडच्या कादंबऱ्या सरस नाहींत असं कांहीं लोकांचं मत आहे. ते आपल्याला कितीसं मान्य आहे ?

उत्तर — बिलकुल मान्य नाहीं. जादूगार, दौलत, अटकेपार या कादंबऱ्या मी जवळ जवळ पस्तीस वर्षांपूर्वी लिहिल्या. त्या वेळेस माझा अनुभव आजच्या इतका समृद्ध खचित नव्हता. माझं लिहिणं बाल्यावस्थेत होतं. त्या मानानं आता माझ्या अनुभवाची समृद्धी आणि माझ्या लेखनातील कलात्मकता किती तरी वाढलेली आहे. माझ्या अलिकडच्या कादंबऱ्या खाचितच अधिक सरस आहेत. त्याची काय गंमत होते सांगतो. ज्यानी माझ्या जादूगार, दौलत, अटकेपार कादंबऱ्या मिटक्या मारीत वाचल्या

ती सारी माणसं आता पस्तीस वर्षांनी मोठी झाली आहेत. संसारचक्रात सांपडलीं आहेत. आपापल्या उद्योगात गढली आहेत. माझ्या नव्या नव्या कादंबऱ्या वाचण्याची सवड त्याना नाहीं. सवड असली तरी वाचनाची अभिरुचि त्यानी गमावली आहे. अशा माणसाना सहाजिकच माझ्या पहिल्या कादंबऱ्या तेवढ्या आठवतात, आणि वाचनाची आणि त्यांची जी फारकता झालेली आहे तिच्यावर पांघरूण घालण्यासाठीं ते म्हणू लागतात, फडक्यांच्या पहिल्या कादंबऱ्या उत्कृष्ट होत्या, अलीकडच्या त्यांच्या कादंबऱ्या तशा नाहींत. वाचकांची ती जुनी पिढी अस्त पावली आहे. त्याना माझ्या कादंबऱ्याच नव्हे, कोणतंच साहित्य वाचण्यास फुरसत नाही, इच्छा नाहीं. आणि त्यांचं स्वतःचं वाचन बंद झालं असल्यामुळे त्याना भ्रम होतो, की फडक्यांच्या कादंबऱ्यांत पूर्वीचं आकर्षण राहिलेलं नाही, लोक त्या वाचीत नाहीत, फडके संपले! मी लहान होतो तेव्हां श्रावणातल्या सोमवारी पर्वतीला जात असे, नवरात्रात चतुःशृंगीला जात असे. आता जात नाही आणि मला वाटू लागलं आहे की ज्या अर्थी मी जात नाही, त्या अर्थी कुणीच जात नाही. परंतु वस्तुस्थिती किती निराळी असते, हजारो माणसं जात असतात. पर्वती संपत नाहीं, चतुःशृंगी संपत नाहीं! साहित्याच्या क्षेत्रांतदेखील असाच काहीसा प्रकार घडतो. वाचकांची एक पिढी जाते, दुसरी येते. जुन्या पिढीनं जे वाचलं तेवढंच त्या पिढीला सुंदर वाटतं, आणि एके काळी जी दैवतं त्याना प्रिय होती ती आता कुणालाच प्रिय नाहीत अशी ते स्वतः गैरसमजून करून घेतात. परंतु वस्तुस्थिती अशी असते की त्या दैवतापुढें नव्या पिढीतील लोकांचा थवा गोळा झालेला असतो. 'फडके संपले!' या म्हणण्यात इंग्रजीत ज्याला Wishful thinking म्हणतात त्याचाहि भाग असतो. फडक्यांचा अखंड उद्योग आणि त्यांच्या कादंबऱ्यांची अखंड लोकप्रियता ज्याना सुखाची वाटत नाहीं, फडके एकदाचे संपावेत अशी ज्यांची इच्छा असते, ते म्हणू लागतात, फडके संपले!

प्रश्न ८ — आपण गेली कित्येक वर्षे सातत्याने लेखन करीत आला आहात, यासाठीं आपण जी कांहीं साधना केली तिची थोडी रुपरेषा सांगाल का?

उत्तर—का नाहीं सांगणार? अवश्य सांगतो. मात्र थोडक्यांत हो.

तुमच्या पूर्वीच्या एका प्रश्नाला उत्तर देताना लेखकाच्या अनुभव समृद्धीबद्दल जें मी बोललो त्याची आठवण करा म्हणजे तुमच्या या प्रश्नाचं उत्तर देताना पाल्हाळ करण्याची गरज रहाणार नाहीं. केवळ कादंबरीचंच नव्हे तर कोणत्याहि साहित्याचं खरं आकर्षण हे असतं कीं ते वाचताना वाचकाला वाटलं पाहिजे, ज्यानं आयुष्याच्या अनंत तऱ्हा बघितल्या आहेत, दूरचे जवळचे प्रदेश पाहिले आहेत, मानवी स्वभावाचे अगणित नमुने टिपले आहेत, सुखदुःखावर विचार केला आहे, अशा मोठ्या माणसाच्या संगतीत आपण आहोत. त्यानं जे लिहिलं ते वाचताना दुनियेचे नाना रंग आपल्याला कळत आहेत, जिवीताची विशालता आपल्या ध्यानी येत आहे, आपणहि मोठे होत आहोत. श्रेष्ठ साहित्याचं हे गुह्य आहे म्हणाना. हें गुह्य लक्षात घेऊन मी सतत वागलो हीच माझी साधना. १९२० पासून १९२६ पर्यंतच्या ६ वर्षांत माझ्या आयुष्याची तऱ्हा शीड फाटलेल्या गलबतासारखी झाली होती. उद्योग शोधण्याच्या निमित्तानं सिंध हैद्राबाद, कराची, दिल्ली, अमृतसर, लाहोर, बनारस, भावनगर, नागपूर अशा दूरदूरच्या ठिकाणीं मी भ्रमंती केली. आपत्ती सोसल्या परंतु माझ्या हातून न कळत ही एक साधनाच घडली. या माझ्या भ्रमंतीमुळेच जादूगार आणि दौलत या माझ्या कादंबऱ्या लोकांना एकदम वेगळ्या वाटल्या आणि कादंबरीकार म्हणून माझं स्थान निश्चित झालं. सक्तीच्या भ्रमंतीचा मला हा जो फायदा झाला तो ध्यानात घेऊन नंतरच्या काळात खुषीची भ्रमंती मी स्वीकारली. काश्मीरच्या स्वातंत्र्य चळवळीवर कादंबरी लिहिण्याचं मी ठरविलं तेव्हां त्या नंदनवनांत समक्ष गेलो, मनसोक्त हिंडलो, काश्मीरी जनतेचं अवलोकन केलं. हैद्राबाद पोलिस ॲक्शनच्या घटनेवर कादंबरी लिहिण्याचं योजलं तेव्हां त्या मुलखात जाऊन राहिलो, हिंडलो. हैद्राबाद शहरातील गल्ल्या कुच्या पालथ्या घातल्या. कुप्रसिद्ध मंदी बाजारात देखील एखाद्या चंगीभंगी माणसासारखा भटकलो. सुभाषचंद्र बोस यांच्या चळवळीवर तीन कादंबऱ्या लिहिण्याचं योजलं तेव्हादेखील हीच गोष्ट केली. आणि मुख्य म्हणजे इंग्रजीत ज्याला Banal म्हणतात — म्हणजे सामान्य प्रतीचं — असं काहीदखील लिहायचं नाही अशा कटाक्षानं लेखन केलं. आणि आळस नावाचा जो पदार्थ आहे ना, त्याचा स्पर्श कधी होऊ दिला नाही.

प्रश्न ९ — आपले बरेचसे वाङ्मय अन्य भाषात अनुवादित झाले आहे. ते त्या त्या भाषातहि लोकप्रिय व्हायला त्याच्या आशयात आणि आविष्कारात मौलिक असे कोणते गुण असावे लागतात ?

उत्तर — असं पहा की अक्षर साहित्याची व्याख्याच मुळी अशी की त्यातील रसस्वाद स्थलकाल निरपेक्ष असतो. शेक्सपिअरच्या नाटकांची गोडी जगांतील सर्व लोक आपापल्या भाषेत घेत आहेत. तीच गोष्ट कालिदासाच्या नाटकांची आणि तीच गोष्ट सर्व भाषात मान्य होणाऱ्या सर्वच ललितकृतींची ज्या कादंबरीत शाश्वत मानवी भावनांचं चित्रण असेल तिचे अन्य भाषातले अनुवाद लोकप्रिय सहज होतील. मात्र या ठिकाणी दुसराहि एक विचार सांगितला पाहिजे. जोसेफ कॅलमन् नावाचे एक ऑस्ट्रियन लेखक आहेत. ते माझ्या कथा-वाङमयाची फ्रेंच, जर्मन, इटालियन भाषात मी स्वतः केलेल्या इंग्रजी भाषांतरावरून भाषांतरं करतात आणि तिकडल्या नियतकालिकात ती प्रसिद्ध होतात. सुमारे सात वर्षांपूर्वी ते भारतांत आले होते आणि मला भेटले होते. समक्ष भेटींत त्यानी मला सांगितलं होतं, ' भारतीय आचार विचार, भारतीयांच्या चालीरीती, भारतीयांचीं विशिष्ठ सुखदुःखं यांचा परिचय व्हावा म्हणून पाश्चात्य देशातले वाचक तुमच्या कथासाहित्याकडे वळतात. जे जगात कुठेहि घडेल ते ज्यात घडलं आहे अशा तुमच्या कथा अनुवादासाठीं नकोत. ' ज्या कादंबरीतील रसस्वाद स्थल-काल निरपेक्ष आहे ती अनुवादाला योग्य ठरेल असं मी मघाशी म्हटलं, त्याच्या सर्वस्वी विरुद्ध जोसेफ कॅलमरचा हा सल्ला होता. म्हणून मी त्यांच्याशीं वाद घालू लागलो. तेव्हा मग ते म्हणाले, ' माझं सांगणं कांहीं एका मर्यादेपर्यंतच खरं आहे. प्रादेशिक साहित्याची परप्रांतीयांना आणि परदेशीयांना गोडी वाटते हे जरी खरं, तरी प्रादेशिकपणाचा अतिरेक असू नये. कथावाङमयांतल्या व्यक्ति त्या त्या प्रदेशांतल्या प्रातिनिधी असाव्यात, परंतु त्याच्या कृतीमागे शाश्वत भावना असाव्यात. त्याचं बोलणं, चालणं, वागणं कोणत्याहि देशातल्या वाचकाला समजेल असं असावं. प्रादेशिक बोली तर शक्यतो वर्ज्य समजावी. प्रादेशिक बोली हेंच ज्या कथेचं किंवा कादबरीचं वैशिष्ठ्य आहे तिचा परप्रांतीय किंवा परदेशीय भाषेतला अनुवाद साफ पडल्याखेरीज रहाणार नाहीं.

प्रश्न १०—होतकरू लेखकांनी आपली प्रतिभा टिकविण्यासाठीं आणि वाढविण्यासाठीं काय करावं असं आपल्याला वाटतं ?

उत्तर--जे जे मी केलं ते साधल्यास करावं. या खेरीज दुसरं मी काय सांगणार ? पुनरुक्तीचा दोष पत्करून येवढंच म्हणेन की जगांतल्या कोणत्याहि जीवनप्रकाराचा अनुभव निषिद्ध मानू नये. स्वतःचा अनुभव समृद्ध होईल यासाठीं यत्न करावा. प्रवास खूप करावा. सुख उपभोगावी, दुःखं पचवावी. सुखांत जसं सौंदर्य आहे तसंच दुःखांतहि आहे. एकंदरीत जीवनात मौज आहे, अशा वृत्तीनं जीवनाकडे बघावं. भाषेवर प्रेम करावं. शुद्ध कसं बोलावं आणि शुद्ध कसं लिहावं याकडे दुर्लक्ष करूं नये. संपादकाकडून साहित्य साभार परत आलं तरी संपादकाला मूर्ख ठरवू नये. उत्कृष्ट साहित्याच्या शोधांत संपादक आणि प्रकाशक सतत असतात—त्यांच्या फायद्यासाठीच—असतात याची खात्री ठेवावी. उच्च स्थानावर रगड जागा असते. अशा अर्थाचं ' There is always room at the top ' म्हणून जे सुभाषित आहे त्यावर श्रद्धा ठेवावी. पूर्वीच्या जेष्ठ साहित्यिकाच्या खांद्यावरच आपण उभे आहोत याची योग्य ती जाणीव ठेवून स्वपराक्रमाचा जो काही दावा करायचा असेल तो करावा. आणि मुख्य म्हणजे बोलावं थोडं, लिहावं पुष्कळ !

★●★

# कादंबरीकार फडके—एक चिंतन

प्रा. वसन्त कानेटकर

समीक्षणाचे एक लोकविलक्षण आणि अजब तंत्र मराठी टीकालेखनात आता चांगले रूढ झाले आहे. असें म्हणण्यास हरकत नाहीं. या तंत्रानुसार समीक्षकाला इतिहासाची साक्ष पुसण्याची गरज कधी भासत नाहीं. साहित्य-शास्त्रांतले सनातन मानदंड 'जुने पुराणे आणि बुरसटलेले म्हणून

निकालात काढतां येतात. 'लोकप्रियतेच्या' नाकावर बेमुर्वतखोरपणें थुंकून तिला गारद करता येते. सामान्य वाचकाना बावळट, अडाणी मूर्ख, वा अधःपतित ठरवून त्यांना चपराक लगावता येते. आणि हा पराक्रम करता करता आपल्या पोतडींतून एखाद्या नव्या निकषाचे चकचकीत धारदार पातें बाहेर काढून साहित्याच्या उद्यानात 'पानिपत' केल्याचे समाधान लुटतां येतें. मात्र हे पातें उपसताना सातासमुद्रापलीकडून एखाद्या गुलबकावलीच्या फुलाप्रमाणें आपण ते महाप्रयासानें हस्तगत केले आहे असा डांगोरा पिटावा लागतो. तसेच मधून मधून शेक्सपियर, टॉलस्टॉय, रविंद्र, व्यास, वाल्मीकी यांच्या नांवाने 'हर हर महादेव' ची आरोळी ठोकली कीं हे पानिपत करून हरण्याची भीति उरत नाहीं. क्वचित बांका वक्त ओढवलाच तर " गच्छं सूकर भद्रंते " अशी आवेशपूर्ण गर्जना करून वेळ मारून नेण्याची सोय देखील या तंत्रांत करून ठेवलेली आहे. तंत्रकार जर नवसाहित्याचा उपासक असेल तर एखाद्या गहन गूढ सिद्धांताचा ( उदा. भावनात्मक समतानता, अनुभवाचे पद्मबंध, आकृतीची गोलाई वा टोकदारपणा इ. ) त्यानें आधार घ्यावा. पण तो सनातन साहित्य-परंपरेचा पुजारी असेल तर सभासम्मेलनांतून वक्तृत्व गाजवतांना एखादे लोकमान्य फुटकळ विचारसूत्र ( उदा. क्रांति, साधुत्व, मांगल्य, मानवता इ. ) त्याला हजार हिश्यानीं उपयोगी पडूं शकेल. कोणी कोणतें सूत्र उचलावें व कोणत्या सिद्धांताचा काथ्याकूट करावा याला या तंत्रपूजेंत फारसें महत्व नाहीं. वाग्यज्ञासाठीं भक्ष शिकाऱ्याच्या धूर्ततेनें आधी हेरून ठेवले पाहिजे; सूर टिपेत लागला पाहिजे; 'जिहादचा आवेश अंगीं बाणला पाहिजे.' आणि प्रेषिताचा अविर्भाव शंभर टक्के उतरला पाहिजे. ही साधना उत्तम प्रकारे जमली तरच साधकाच्या मुखांतून शब्दब्रह्म उंचबळून आम जनतेला साक्षात्कारी मुक्ताफळें ऐकण्याची पर्वणी प्राप्त होते. उदाहरणार्थ पुढील कांहीं मुक्ताफळें ऐकावीत...... " ...... समग्र खांडेकर साहित्य जळून गेलें तरी मराठी कथावाङ्मयाचें काडीमात्र नुकसान होणार नाहीं. ... " " ... रविकिरण मंडळाची कविता ही सामान्यांनीं सामान्यांसाठी लिहिलेली सामान्य कविता होती... " " ... नवकाव्य हे मराठीचे वेडविद्रे माथेफिरू पोर आहे... "

"... खरी कथा ही नवकथेबरोबरच जन्माला आली..." "...कवितेच्या रसग्रहणाला अर्थ कळण्याची तत्सदृश्य मुळीच गरज नसते..." यासारखे तेजस्वी उद्गार " शद्बसृष्टीच्या ईश्वराखेरीज " अन्य कोण काढूं धजेल ?

## मूल्यमापनाची एक तऱ्हा

प्रो. फडके यांच्या कादंबरी लेखनाबद्दल मराठीतील एका ख्यातनाम लेखिकेचें याच नमुन्याचें एक साक्षात्कारी वक्तव्य अलिकडेच वर्तमानपत्रांतून वाचण्याचें भाग्य मला लाभले आहे. प्रो. फडके यांचें कादंबरीलेखन तमाम तरुण वर्गाच्या वैचारिक अधःपतनाला कारणीभूत झालें आहे—हे सत्य सिद्ध करण्यासाठीं या महान विदुषीनें एक लाडका ( आणि अर्थात नवाहि ) सिद्धांत सांगून टाकला आहे..." ज्यावेळीं लेखकाला विचार टाळायचा असतो त्यावेळीं त्याचा कल सौंदर्यवादाकडे झुकतो. सौंदर्यवाद विचारशक्तिला नाहीशी करून जन्माला येतो..." हा सिद्धांत मांडून बाईनी एकाच धोंड्यात अनेक पक्षी जायबंदी करण्याचा विक्रम करून दाखवला आहे यांत शंका नाहीं. फडक्यांच्या कादंबऱ्या सुळी देतां देतां शेक्सपीयर पासून शेलीपर्यंत आणि रविंद्रनाथापासून तांबे बोरकरापर्यंत जगांतील झाडून साऱ्या नव्या जुन्या सौंदर्यवाद्यांना बाईनी एकदम वधस्तंभावरच चढविलें आहे. या न्यायदानाबद्दल रामशास्त्र्याच्या महाराष्ट्रांत तरी बाईंचें मोठेंच कोडकौतुक होईल याबद्दल मला शंका वाटत नाहीं. तथापि हे वक्तव्य ऐकून माझ्यासारख्या पामराच्या मनांत काहीं पाखंडी शंका कुशंका निर्माण झाल्या आहेत हे मात्र मला कबूल करणें भागच आहे. कोणत्याहि पिढीच्या वैचारिक अधःपतनाला एखाद्या ललितकृति कितीशा कारणीभूत होतात हा विवाद्य प्रश्न बाजूला ठेवला तरी ज्या ' कोण्या एका तरुण पिढीच्या ' वैचारिक अधःपतनाबद्दल बाईनी एवढा करूण विलाप आरंभिला आहे ती ' तरुण पिढी ' इसवीसनातील नेमक्या कोणत्या दसकांतली वा वर्षांतली आहे याचा त्यांनी खुलासा केला असता तर बरे झाले असते. निदान माझ्या पिढीतल्या वाचकांना ( बाईच्या हिशवी ) आपला नंबर कुठें लागतो याचा अंदाज तरी घेतां आला असता. अडचण अशी आहे कीं प्रो. फडके यांची पहिली लोकप्रिय कादंबरी १९२६ साली प्रसिद्ध झाली आणि

दा. क्र. 90662

तेव्हांपासून आजतागायत कितीतरी तरुणांचे काळ्याचे पांढरेदेखील होऊन चुकले आहेत. गेल्या पस्तीस वर्षांतल्या 'तरुण' पिढ्या एका पाठोपाठ या अधःपतनाच्या खोल गर्तेत पडत होत्या असा निष्कर्ष काढावा तर हें वक्तव्य करणाऱ्या बाईंची देखील या गर्तेतच संभावना होण्याचा दाट संभव आहे. बहुधा शक्यता अशी दिसते कीं बाईंनी तारुण्यावस्था ओलांडली आणि नंतरच तरुण पिढीच्या वैचारिक अधःपतनाला प्रारंभ झाला असावा.

## कांहीं साधे पण मूलभूत प्रश्न

सदर विदुषीबाईंच्या एका सुप्रसिद्ध वक्तव्याचा मी केवळ उदाहरणादाखल उल्लेख केला आहे. पण मूल्यमापनाची ही तऱ्हा मराठी साहित्यांत आजच उपजली आहे असे मात्र नाहीं. साहजिकच कोणत्याहि सुबुद्ध वाचकाला असें वाटतें कीं—हे बुद्धीमान समीक्षक अशी एकारलेली टोकाची विधाने करण्यांत आणि अर्धसत्यें प्रसृत करण्यांत धन्यता कां मानतात ? कलावन्ताच्या आणि कलाकृतीच्या मूल्यमापनात "ज्याचें जे श्रेय ते त्यास दिलेच पाहिजे" ही न्यायबुद्धि हे रसिक जाणकार का दर्शवीत नाहींत ? स्वतःच्या श्रद्धास्थलांना जपतांना दुसऱ्याची मतें आणि मूल्यें निखालस हिणकस आणि अनर्थकारी ठरविण्याचा अट्टाहास हे विद्वान पंडित कां करतात ? स्वरूपतः कला ही बहुरुपीणी आहे हे त्यांना उमजलें नाहीं काय ? कलेची मूलतत्वें नदीप्रमाणेंच प्रवाही आणि विकसनशील असतात याचें आकलन त्यांना झालें नाहीं काय ? प्रत्येक कलावंताला प्रकृतीच्या मर्यादा असतात आणि काळानें आंखून दिलेल्या परिघांतच त्याचें कर्तृत्व फुलत असतें; याचें भान त्यांना उरत नाहीं काय ? प्रत्येक प्रतिभेला वार्धक्य हे अटळ आहे. पण वृद्ध प्रातिभेची देखील कात टाकण्याची धडपड अहोरात्र चालू असते, याची जाणीव हे विचारवंत मनाशीं बाळगतात काय ? ज्याचे गुणावगुण विकसित होवून चुकले आहेत अशा कलावंताच्या प्रतिभेतील मूळ शक्तिशाली बीजें कोणती होती आणि त्यापैकीं प्रत्यक्षांत कोणत्या बीजांना कसें धुमारे फुटले याची अभिनिवेशरहित मीमांसा करणें शक्य असते, एवढेच नव्हे तर इष्ट आणि आवश्यकहि असते, हे या टीकाकाराना ठाऊक नाहीं काय ? प्रो. फडके यांच्या कादंबरीवरील चिंतनांत यासारखे कांहीं साधे पण मूलभूत प्रश्न प्रथमदर्शनीच मनांत उभे राहतात.

## इतिहासाची साक्ष आणि तंत्रविचार

१९२६ पासून १९६० पर्यंतच्या प्रदीर्घ कालावधीत प्रो. फडके यांनीं पन्नास कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांच्या प्रकाशनकालाकडे नजर टाकल्यास त्यांत कांहींएक शिस्त आणि नियमीतपणा आढळतो. फडक्यांच्या संबंध साहित्यसंसाराचा नेटकेपणा आणि टापटीप हा एक प्रमुख गुणधर्म आहे. संपूर्ण अभ्यासाशिवाय त्यांनीं कधीं लेखणी उचलली नाहीं. आणि लेखणी उचलल्या-नंतर स्फूर्तिसाठीं ते कधीं अडून बसले नाहींत. संख्यावैपुल्य आणि नियमितपणा हा कांहीं फार मोठ्या पराक्रमाचा भाग आहे असे नाहीं. परंतु पस्तीस वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात प्रो. फडके यांनीं आपल्या बऱ्यावाईट कलाकृतीनी बहुसंख्य मराठी वाचकांना मंत्रमुग्ध करून आपल्या कवेत ठेवले होते, या घटनेची नोंद प्रत्येक समीक्षकानें आवर्जून घेतलीच पाहिजे. वामन-मल्हारांसारख्या आधींच्या कादंबरीकाराला प्रो. फडके यांनीं लोकप्रियतेंत निष्प्रभ करून टाकले, केतकरांच्यासारख्या मातब्बर समाजशास्त्रज्ञाला कादंबरी-लेखनाकडे त्यांनीं खेचून आणले आणि खांडेकरांच्या–सारख्या तुल्यबल प्रतिस्पर्धी लेखकाला कादंबरीचा ' फडके पॅटर्न ' उचलण्यास आरभी तरी भाग पाडले– या वस्तुस्थितींचा निर्देश अनेक अर्थांनीं उदबोधक होण्यासारखा आहे. प्रो.फडक्यांच्या तंत्रबाजीवर पुढें अनेकांनीं कडाडून हल्ले चढवले व अनेकांनी त्यांची मनमुराद सवंग चेष्टाहि करून घेतली. पण कथा–कादंबरी लेखनांत तंत्रविचार प्रथम प्रो. फडक्यांनीच आणला आणि प्रत्यक्ष कलाकृतीद्वारा कांहीं काल त्याला प्रतिष्ठाहि प्राप्त करून दिली यांत काडीमात्रहि शंका नाहीं. फडक्यांनी ज्या काळांत कादंबरी लेखनाला प्रारंभ केला त्यावेळीं तंत्रविचाराला प्राधान्य मिळणें आवश्यकहि होते. कारण वामन-मल्हारांची ' रागिणी ' ही वस्तुस्थिति ' काव्यशास्त्र विनोद ' च होती. आणि तत्पूर्वीच्या हरिभाऊंच्या ' आजकालच्या गोष्टी ' अंगपिंडानें सकस असल्यातरी ओबडधोबड नि अस्ताव्यस्तच होत्या. आजच्या मराठी कादंबरीनें सुटसुटीत नि आटोपशीर रूपच नव्हे तर मांडणीच्या आणि रचनेच्या दृष्टीनें जी प्रयोगक्षमता धारण केली आहे तिची गंगोत्री फडक्यांच्या तंत्रविचारांत सापडल्याशिवाय राहणार नाहीं. आजचा

तंत्रविचार हा 'गुंतागुंत-निरगाठ आणि उकल' इतक्या ढोबळ स्वरूपाचा राहिलेला नाहीं किंबहुना कथाकादंबरीत कथानकच अदृश्य होण्याचा समय येऊन पोचल्यानें प्रो. फडके यांनी तंत्रविचार सांगताना योजलेल्या अनेक संज्ञादेखील निरुपयोगी ठरण्याची आतां शक्यता निर्माण झाली आहे. पण थोडक्यांत अधिक आशय सांगणाऱ्या, उत्कट रसपरिपोष नि जिवंत व्यक्तिरेखा साधणाऱ्या ज्या ज्या निरूपणपद्धति प्रो. फडक्यांनी आपल्या तंत्रविचारात वेळोवेळीं सांगितल्या आणि आपल्या लेखनात प्रत्यक्ष वापरल्या त्या सर्व आत्मसात करून आजच्या मराठी कादंबरीनें आपली रूपशोभाच नव्हे तर आत्माविष्काराचे सामर्थ्यहि निश्चितपणें वाढविले आहे.

" तंत्र हें साधन आहे, साध्य नव्हे. प्रो. फडक्यांनी साधनालाच साध्य केले- " अशी सौ. कुसुमावती देशपांडे यांनी आपल्या कादंबरीवरील ग्रंथात टीका केली आहे. विशिष्ट अर्थाने त्यात सत्यांश देखील आहे. परंतु सौ. देशपांडे यांनी एक गोष्ट विचारांत घेतलेली नाहीं. हरिभाऊंच्या आणि वामन मल्हारांच्या सर्व संग्राहक गाठोडेवजा कादंबरीनंतर मराठी कादंबरी लेखनांत तंत्रविचाराला प्राधान्य मिळावे ही एक काळाची ऐतिहासिक गरज होती. भावकाव्यात रविकिरण मंडळानें बहिरंगाबाबत जी चळवळ केली ती देखील काळाने वाढून ठेवलेली इतिहासदत्त कामगिरीच होती ही कामगिरी पार पडली नसती तर कादंबरीत पेंडसे दांडेकरांच्या कर्तृत्वाला नि कवितेत कुसुमाग्रजापासून मर्ढेकरांपर्यंतच्या कवींच्या कविता विलासाला इतकं घोसदार रूप मिळाले असते कीं नाहीं याबद्दल शंकाच वाटते. आजचा तंत्रविचार हा कथेंत, कादंबरीत आणि कवितेत प्रामुख्यानें आशय व्यक्त करण्याचा धडपडितून जन्माला आला आहे असें म्हटले जाते. पण कादंबरीतील तंत्राच्या प्रयोगाबद्दल विचार केला, तर फडके-खांडेकरांनंतर तांत्रिक बाबतींत मराठी कादंबरीनें कांहीं विशेष मजल मारली आहे असे दिसत नाहीं. संज्ञाप्रवाहासारखें कांहीं फुटकळ प्रयोग झाले पण ते जिद्दीनें आणि सातत्यानें चालवून लोकप्रिय करण्याची हिम्मत कोणाहि नवीन कादंबरीकारानें दाखवली नाहीं. आशयावरच केंद्रीकरण करण्याच्या आजच्या युगांत मर्ढेकरांसारखे नवकवितेचे

निर्मातेदेखील केवळ तांत्रिक प्रयोगादाखल ' रात्रीचा दिवस ', सारखी कादंबरी रचतात आणि गाडगीळासारखें नवकथाकार ' ब्रिनचेहऱ्याची संध्याकाळ ' सारखी कथा निव्वळ प्रयोग म्हणूनच ' लिहून बघतात, ' ही वस्तुस्थिती अर्थपूर्ण आहे.

## कथानकांतील कामगिरी

फडक्यांच्या कादंबरीलेखनात तंत्राला प्रथमपासूनच प्राधान्य मिळाल्यानें ' रचना कौशल्याच्या ' दृष्टीनें ' कुलाब्याची दांडी ' ते ' प्रवासी ' पर्यंतच्या दहा कादंबऱ्यांतच त्यांनी फार मोठी झेंप घेतली आणि पुढेंहि प्रयोगक्षमतेची कलात्मक दृष्टि सातत्यानें व्यक्त केली. या कादंबऱ्यांतील त्यांची बहुरंगी 'कामगिरी' (Graft) डोळ्यांत भरण्याइतकी ठसठशीत उतरली आहे. ' कारागिरी ' या शब्दानें व्यक्त होणाऱ्या आशयाचा सगळा गौरव आज झडून गेला आहे. मराठी कादंबरीने 'कारागिरी' पचवल्याचेंच ते द्योतक आहे. पण प्रो. फडके यांनी कादंबरीलेखनाला प्रारंभ केला त्यावेळीं मराठी कादंबरीजवळ ही कारागिरीदेखील नव्हती. याची दखल घेतली म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाचे महत्व नीट ध्यानांत येते. कथानकाची बंदिस्त रचना हा कादंबरीलेखनातला, ज्याला मी फडके पॅटर्न म्हणतो त्याचा प्रमुख विशेष म्हणून सांगता येईल. एकहि दुवा ढिलापांगळा न ठेवता लहानमोठ्या प्रसंगाची चतुराईनें गुंफण करून आणि जे सांगायचे ठरले आहे त्यावर तीर साधून कथावस्तूचा स्वाभाविक आणि चित्तवेधक विकास करण्याचें कसब प्रो. फडक्यांइतकें अन्य कादंबरीकारानें अद्याप दर्शविलेले नाही. हे त्यांचे कसब, दौलत, अटकेपार, कलंकशोभा यासारख्या निव्वळ सामाजिक कादंबऱ्यांतून तर व्यक्त होतेच पण प्रवासी, जेहलम, सितारा मंझील व आझाद हिंद सैन्याच्या उठावावरील शोनान, अस्मान आणि तूफान यासारख्या कादंबऱ्यांच्या रचनेतहि, प्रत्यक्ष इतिहास आणि कल्पित घटना यांची त्यांनी जी बेमालूम सांगड घातली आहे त्यांतहि प्रत्ययाला आल्याशिवाय रहात नाहीं. राजकीय कादंबरीला त्यांनी माडखोलकरांच्या कादंबरीप्रमाणें निव्वळ वृत्तांत निरूपणाचे स्वरूप येऊं दिले नाहीं. वृत्तांत कथन करताना ( शोनान, अस्मान, तूफान यांचा अपवाद सोडून ) माडखोलकरांच्यासारखे ते कधीं बेहोषहि होत नाहींत. कथानकाचे त्यांचे भान पक्के

असते. फार फार पक्के असते. क्वचित् वाजवीपेक्षा जास्त पक्के असते. कादंबरीच्या अंगोपांगाचा विचार करताना लेखकाने कथानकावर किती प्रेम करावे याचा तोल प्रो. फडके यांना राखता आलेला नाहीं ही दुर्दैवाची बाब मानली पाहिजे. गोड गळ्याच्या गवैयानें सुरांच्या मस्तीत राहावे आणि गाण्याची इतर अंगोपांगे दुर्लक्षून आपल्या सुरावटीनेच श्रोत्यांना मंत्रमुग्ध करावे तसे प्रो. फडके यांचे कथानकाबद्दल झाले आहे. प्रो. फडक्यांच्या कथानक प्रेमाचे उदाहरण म्हणून मी एकच मजेदार गोष्टीचा निर्देश करतो. ‘ प्रवासी ’ ही फडक्यांची अत्यंत श्रेष्ठ म्हणून गाजलेली कादंबरी. या कादंबरीच्या महात्मतेच्या मर्मस्थलांचा विचार केला तर त्यात एकूण कथारचनेला कितीतरी गौणस्थान द्यावे लागते. पण प्रो. फडके या कादंबरीचे जे विभाग पाडतात त्यापैकीं पहिल्या छोट्या विभागाला ‘ कथानकाचे पूर्वसूत्र ’ असे नांव देतात आणि उरलेल्या भागांना चक्क ‘ कथानक ’ असे नांव देतात. साहजिकच कथानकाचे इतके कोडकौतुक करणाऱ्या प्रो. फडक्यांचा कथानकच गमावून बसलेल्या नवकथेवर रोष व्हावा यांत नवल ते काय ? महाकवि कालिदासाबद्दल असे सांगतात कीं त्याला आपल्या नाटकातील नांद्या आणि भरतवाक्येच फार प्रिय वाटत असत. जिवंत व्यक्तिरेखा निर्माण करण्याचे सामर्थ्य आणि आझाद हिंद सैनिकांच्या उठावासारख्या प्रचंड विषयाला हात घालण्याची हिम्मत दाखविणाऱ्या कादंबरीकारानें कथानकाच्या सौंदर्यावरच इतके लुब्ध होऊन राहावे हा प्रतिभाव्यापारातील एक अनाकलनीय चमत्कारच म्हटला पाहिजे.

## रहस्य, अपघात आणि योगायोग

कथानकाचा सहजसुंदर आणि बंदिस्त विकास करतांना प्रो. फडके यांनी ज्या तत्वाचा वारंवार वापर केला आहे त्याची चिकीत्साहि अशाच मनोरंजक आणि उद्बोधक आहे. कथानकाचे सौंदर्य हे नेहमीच उत्कंठा संवर्धनावर आणि चमत्कृतीवर उभे असते. ही चमत्कृति साधण्यासाठीं प्रो. फडके अपघात, योगायोग आणि रहस्य यांचा मोठ्या खुबीने वापर करतात. जादूगार आणि दौलत या आरंभीच्या दोन्ही कादंबऱ्यांत वाचकांचे औत्सुक्य जागृत ठेवण्यासाठीं त्यांनी एकेका रहस्याची योजना केली आहे. अटकेपार या कादंबरीत तर ( एके

ठिकाणीं त्यांनी स्वतःच सांगितल्याप्रमाणें ) सामाजिक कादंबरी आणि इंग्रजीत जिला थ्रिलर म्हणतात अशी रहस्यकथा यांचा कलम करण्याचा प्रयोगहि त्यांनी केला आहे. हा प्रयोग यशस्वी होऊन देखील त्यातील वैय्यर्थ ओळखल्यामुळेंच या प्रयोगाचा त्यांनी पुढें पाठपुरावा केलेला दिसत नाहीं. मात्र रहस्यानें प्रो. फडक्यांचा पाठपुरावा अद्यापपर्यंत सोडलेला नाहीं हें त्यांच्या अलिकडच्या कादंबऱ्या वाचल्या तरी सहज लक्षांत येण्यासारखे आहे. या रहस्यांची जाति आणि मांडणीच्या पद्धति यांत प्रो. फडक्यांनी पुष्कळच वैचित्र्य आणि विविधता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे पण खांडेकरांच्या प्रमाणेच प्रो. फडक्यांनाहि सर्व रहस्यांत जन्मरहस्य फार प्यार असावें असे ' उद्धार ', ' माझा जन्म ' अथवा जेहलम सारख्या कादंबऱ्या वाचताना वाटूं लागतो. घटनेवर आधारलेल्या रहस्यांचा उपयोग पुढें पुढें प्रो. फडक्यानी सोडून दिला आणि रहस्याला मनोविश्लेषणाची जोड दिली. त्यांतूनच भिन्न प्रवृत्तीच्या जुळ्या भावांच्या कथा जन्माला आल्या. उन्मादमधील श्रीनिवास-शामकान्त, जेहलममधील उस्मान–सुभान, शिकारमधील रवि--राज आणि तूफानमधील मोहन--आनंद या जोड्यांचे चित्रण या दृष्टीनें उल्लेखनीय आहे. मनोविश्लेषणाबरोबरच अनुवांशिकतेच्या सूत्राचा उपयोगहि प्रो. फडक्यांनीं उत्कंठासवर्धनासाठीं अनेक ठिकाणीं मोठ्या कौशल्यानें केला आहे. ' प्रवासी ' मधील राजाभाऊचे विरोधी वृत्तिविशेष आणि पंजाबरावांच्या स्वभावधर्माशी त्या वृत्तिविशेषांची पडलेली सांगड अथवा ' अखेरचं बंड ' मधील रोहिणी आणि तिची भावंडे यांचे भिन्न स्वभाव आणि मातापित्यांच्या स्वभावविशेषांशी त्यांचा सूचकतेने जोडलेला कार्यकारणसंबंध प्रो. फडक्यांच्या कलाचातुरीची साक्ष पटवतो. रहस्याच्या रचनेत लेखकाने उत्तरोत्तर साधलेली ही उत्क्रांति निस्संशय स्वागतार्ह अशीच मानली पाहिजे.

रहस्याच्या जोडीने प्रो. फडके यांनी आपल्या कादंबऱ्यांत चमत्कृति साधण्यासाठीं योगायोग आणि अपघात या दोन तत्वांचा वापर अत्यंत सढळ हातानें केलेला आहे. हा वापर रहस्यप्रधान कादंबरीला क्वचित् बाधक झालेला असला ( उदा. उद्धारमधील नायिकेचा स्वतःच्या गरोदरपणाचा गैरसमज ) तरी

संभाव्यतेच्या तत्वाला तो कोठेहि मारक झालेला नाहीं किंबहुना वास्तवतेची व्याख्या संभाव्यतेच्या तत्वावरच उभारली पाहिजे हा फडक्यांचा ठाम सिद्धांत असल्यानें त्यांच्या कादंबरीतले अपघात आणि योगायोगच नव्हे तर सर्व लहान-मोठ्या घटना आणि प्रसंग यांची गुंफण करताना या तत्वाला धक्का लागणार नाहीं याची त्यांनी कमालीची दक्षता घेतलेली आहे. मानवी संकल्प आणि विधिघटना यांचा नेहमीच लपंडाव चाललेला असतो. जीवनांतले हे सूत्र प्रो फडक्यांनी अत्यंत चातुर्यानें आणि प्रत्ययकारिकतेनें आपल्या बहुतेक कादंबऱ्यांतून योजिले आहे. त्यांच्या बहुसंख्य नायक नायिकांच्या पहिल्या भेटी, त्यांच्यावर कोसळणारी दुःख-संकटे, त्यांची ताटातूट, सुटका आणि पुनर्मिलनें, यांचे पराक्रम आणि पतन इत्यादि सर्व घटनांच्या चित्रणात त्या त्या पात्रांच्या स्वभावधर्माइतकेंच अपघाताला आणि योगायोगालाहि लेखकाने अनन्यसाधारण महत्व दिले आहे. प्रो. फडक्यांची पुढें ज्याबद्दल ख्याती झाली त्या प्रणयभावनांच्या चित्रणानंतर या अपघातानें आणि योगायोगानें विलक्षण माधुर्य आणि लज्जत निर्माण केली आहे. या तत्वाच्या योजनेने कथावस्तूंत चमत्कृतिबरोबरच प्रो. फडक्यांनी जो नाट्यगुण साधलेला आहे त्याचाहि याच संदर्भात सकौतुक निर्देश केला पाहिजे. अटकेपारमधील सुधीर-मीनाक्षी वा आशामधील विलास-आशा यांची पहिली भेट अपघातानेच घडून येते. दौलतमधील माधुरी, जहरमधील काशी, जेहलममधील जेहलम, आणि तूफानमधील इरावती या नायिकेच्या संकटातून सुटका त्या त्या नायकाकडून केवळ अपघातानें आणि अकल्पित योगायोगानेच होतात. त्यामुळें प्रो. फडक्यांच्या कादंबऱ्या ओळीने वाचू लागताच या अपघातात आणि योगायोगातहि कांहींएक सूत्र आणि शास्त्र असावें याची जाणीव होऊं लागते. " हे अपघात आणि योगायोग खरे; पण त्यांतहि कांहींएक पद्धत आहे ! " — असा वाचकांच्या मनात संशय बळावूं लागतो. व्यक्ति आणि नियती यांचा उग्र संघर्ष रेखाटताना शेक्सपीयरने देखील अनेक ठिकाणीं अपघातांचा आणि योगायोगांचा वापर केला आहे. पण शेक्सपीयरच्या नाटकातील नियतीचे रौद्र तांडव आणि व्यक्तीचें सर्वशक्तीनिशीं प्राप्त परिस्थितीशी घेतलेली धडक यांचा प्रत्यय फडक्यांच्या चित्रणात ( अपवादः अखेरचं बंड, प्रवासी, तूफान ) फार

करून येत नाहीं. नियतीच्या विक्षीप्त वर्तनालादेखील लेखकाने लगाम घालून तिला हेतुपुरस्कार सौम्य केले आहे असे वारवार वाटूं लागते. त्यामुळें 'प्रतिज्ञा' आणि 'अस्मान' मधील नायक-नायिकांची पहिली भेट वारंवार हुकत राहिली तरी प्रो. फडक्यांचा ईश्वर दयाळू आहे यावर वाचकांची श्रद्धा असते. आणि पुढें प्रत्यक्ष अनुभवानंतर ती ठामच होते. नायक नायिकांच्या स्वप्नरम्य सुखदुःखामध्यें आणि कथानकाच्या चित्तवेधकतेमध्यें असले सौम्य अपघात आणि मधुर योगायोग निःसंशय फार मोठा गोडवा निर्माण करतात. सामान्य वाचक कथेच्या ओघात वाहून जातो हें कांहीं खोटे नाहीं. पण इतके गोड अपघात आणि गोजिरवाणे योगायोग आपल्याच वाट्याला कां बरें येऊं नयेत अशी रुखरुख बिचाऱ्या चिकित्सक वाचकांना मात्र उगीचच लागून राहाते.

## प्रणयाचे मोहक चित्रण

कथानकाच्या चित्तवेधकतेपेक्षांहि प्रो. फडक्यांनी रेखाटलेल्या प्रणयाच्या मोहक, दाहक आणि मादक चित्रामुळें त्यांच्या कादंबरीत कांहीं एका आगळ्या सादयाची भर पडली आहे. फडक्यांच्या पूर्वीच्या कादंबऱ्यांतून प्रीतिभावनेचें संयमी आणि सोवळे चित्रण अनेक कादंबरीकारानीं केले होते. पण प्रो. फडक्यांइतके धीट, खेळकर, उत्कट आणि लाघवी, अनुनयाच्या सर्व गडद फिक्या रंगछटा दर्शविणारें आणि तरुण स्त्री पुरुषांच्या अंतप्रवृत्तीचा मागोवा घेणारे प्रणयाचे चित्रण एकाहि कादंबरीकाराने केलेले नव्हते. साहजिकच स्वतंत्र वृत्तीचा सुशिक्षित स्त्रीपुरुषांचा जो एक संमिश्र पांढरपेशा समाज नव्यानेंच बहुसंख्येनें उदयास येत होता त्या समाजाला प्रो. फडक्यांच्या प्रीतिकथानीं विलक्षण वेड केलें. या प्रीतिकथामुळेंच प्रो. फडके तरुणपिढीचे लाडके कादंबरीकार बनले; सोवळ्या वृत्तीच्या सनातन्यांचा त्यांनी रोष ओढवून घेतला आणि भिन्नभिन्न कारणासाठीं टीकाकारांच्या प्रखर टीकास्त्राचे ते लक्ष झाले. 'कुलाब्याच्या दांडी' पासून तं गल्याच वर्षी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'निर्माल्य' कादंबरीपर्यंत प्रा. फडक्यांनी बहुतेक सर्व कादंबऱ्यातून प्रा. फडक्यांनी पहिल्या प्रेमाच्याच वैचित्र्य-पूर्ण कथा मोठ्या रसाळपणें आणि तन्मयतेनें रंगविल्या आहेत. प्रेमिकांना

परस्परांबद्दल वाटणाऱ्या गाढ आकर्षणाचे बहुशः सर्व प्रकार त्यांनी आतांपावेतो आपल्या कादंबऱ्यातून हाताळले आहेत. प्रेमिकांची मीलनोत्सुकता, त्यांची विरहव्यथा, त्यांचा स्वतःच्या अंतःकरणाशी आणि परस्परांशी चाललेला लपंडाव, वडीलधाऱ्यांच्या दुराग्रहाशी वा लब्धप्रतिष्ठीतांच्या दुनियेशी त्यांनी पुकारलेलं बंड, परिस्थितीजन्य कर्तव्याशी त्यांची झुंज, उग्र ध्येय आणि गाढ प्रणय यांचा त्यांच्या मनांतील तीव्र संघर्ष, अशी कितीतरी विविधरंगी चित्रे प्रो. फडक्यांनीं प्रत्ययकारिकतेनें रंगविली आहेत. त्यांच्या नायक-नायिकांना प्रणयाचे जणू वेडच जडलेले दिसते. इतके, कीं त्यांच्या सभोवती रौद्र वा भीषण संघर्ष सहसा पोंचूच शकत नाहींत, आणि पोचलाच तरी अखेर प्रणयाला तडे जाण्याऐवजी हा संघर्षच चारी मुंडे परामूत होऊन दशोधडीला लागतो. या सर्व नायक - नायिकांची नावें, रूपें, त्यांचे स्वभावधर्म, व्यवसाय, हाल-चाली, संवयी, लकबी वेगवेगळ्या आहेत यांत शंका नाही. परंतु त्या सर्वांना बांधणारे प्रणयाचे अंतःसूत्र एकच आहे. 'दौलत' मधला अविनाश असो, 'आशा' मधला विलास असो, 'प्रवासी' मधला राजाभाऊ असो, 'जेहलम' मधला उस्मान असो, वा अस्मनमधला दिलीप असो—हे सर्व नायक ( आणि त्यांच्या नायिका देखील ) आपापल्या कर्तृत्वाच्या आणि कर्तव्याच्या शृंखला सांभाळून वा प्रसंगी तोडून आपल्या प्रीतिविषयाकडे धांव घेताना दिसतात. प्रो. फडक्यांच्या एका कादंबरीचं नांव 'वेडं वारं' असं आहे. प्रणयाच्या या 'वेड्या' वाऱ्यांने त्यांच्या बहुशः सर्वच नायक-नायिका झपाटलेल्या दिसतात. 'अखेरचं बंड' मधील रोहिणी आणि शाकुंतलमधील शकुंतला या दोघा प्रणयिनीच्या वेडाची जात एकच आहे.

या प्रीतिकथाना रुचिरता आणण्यास प्रो. फडक्यांची प्रत्ययकारक शली जशी उपकारक झाली आहे तसेंच त्यांच्या निरनिराळ्या क्रिडांचें नि कलांचें वर्णन देखील अत्यंत परिपोषक झाले आहे. संगीत, नृत्य, शिल्प चित्रादि ललित कला आणि टेनीस, क्रिकेट वा शिकारीसारख्या मर्दानी क्रीडा यांचा उपयोग पार्श्वभू-मीदाखल कां होईना पण त्यांनीं मोठ्या कौशल्यानें करून घेतलेला आहे. त्यांची स्थलकाल वर्णनें, त्यांनी रेखाटलेली दृश्ये, प्रत्ययकारी व्यक्तिवर्णनें, त्यांची

निसर्गवर्णनें, त्यांची स्थलकाल वर्णनें, त्यांनी रेखाटलेली गोड लाडवी संभाषणें, आणि त्यांनी रंगवलेली रतिक्रीडा वर्णनें, सर्वार्थानें मराठी कादंबरीत अभूतपूर्व अशीच आहेत. त्यांनी रंगवलेली प्रणयाची भावना त्यागापेक्षा भोगाकडे आणि संयमापेक्षा विलासाकडे अधिक झुकते. एखादी उमा वा अंजली प्रणयातल्या त्यागामुळें आणि संयमामुळें त्यांच्या नायीकांत उठून दिसत असली तरी हा त्याग वा हा संयम या त्यांच्या स्वाभाविक अंतःप्रवृत्ति आहेत असें वाटत नाहीं. उत्तान शृंगारिक वर्णनें—माडखोलकरांच्या कादंबरी-इतकी विपुल नसली तरी मधून मधून त्यांच्या प्रीतिकथातून डोकावतात. क्वचित बलात्काराची वर्णनेहि त्यांनी अकारण वा जरूरीपेक्षा जास्त तपशीलानें कोठे कोठे रंगविली आहेत. अशा प्रकारच्या वर्णनामुळें समाजाचे कोणते नैतिक अधःपतन होते यावर कडाक्यानें चर्चा करण्यापेक्षा, कोणते कलात्मक उद्दीष्ट साध्य होते असा प्रश्न उपस्थित करणें अधिक वाजवी होईल.

अलिकडच्या काळांत या बाबतीत विशेष आक्षेपार्ह ठरलेल्या त्यांच्या ‘ धोका ’ कादंबरीचेंच उदाहरण या संदर्भात घेता येण्यासारखे आहे. मदनबाधेचे पहिले गहिरे रंग उडाल्यावर परस्परांच्या उपेक्षेमुळे स्त्री पुरुषांच्या प्रणयाला तडे जातात आणि त्यांचे संसार दुःखाचे होतात-हा या कादंबरीतील आशय आहे. इतका जिव्हाळ्याचा आशय हाती घेऊन देखील कादंबरीमध्यें प्रत्यक्ष चित्रणाच्या वेळीं प्रो. फडके भलतीकडेच भटकल्यासारखे वाटतात आणि तऱ्हेवाईक निष्कर्षा-पाशी येऊन पोचल्यासारखे दिसतात. नायकाने आपला कामधंदा सोडून नायिकेच्याभोवती अनुनयाचें रुंजन घालीत बसावें ही मागणी करणारी नायिकाहि धन्य आणि ही मागणी पुरवणारा बहाद्दर नायकहि धन्य ! या कादंबरीत आलेली भोगविलासांची रोचक नि तपशीलवार वर्णनें आक्षेपार्ह आहेत असे मला मुळींच वाटत नाहीं. भोगविलासांची यापेक्षाहि अधिक उन्मादक वर्णनें आलेल्या श्रेष्ठ पाश्चात्य आणि पौर्वात्य डझनभर तरी कृती या संदर्भात पुराव्यादाखल कुणालाहि सहज उभ्या करता येतील. स्त्रीपुरुषां-ची ‘ रति भावना ’ हाच ज्या कादंबरीचा लक्ष्यविषय असतो, तिथें अशी वर्णनें अपरिहार्य मानली पाहिजेत. मात्र ही रतिभावना कलादृष्टीच्या प्रयोगशाळेत नेऊन

तिची चिरफाड करण्यासाठीं लागणारी वृत्तीची अलिप्तता आणि तिचे सर्वंकष रूप जाणून घेण्यासाठी लागणारी मनाची चिंतनशीलता ही दोन धारदार आयुधे लेखकाजवळ असावी लागतात. अनेक व्यभिचारकथा लिहिणाऱ्या टॉलस्टॉयपाशी ही ऋषीतुल्य अलिप्तता आणि चिंतनशीलता असल्यानेंच त्यांची 'क्राइट्सर सोनाता' काय अगर 'ॲना कॅरेनिना' काय वाचकांच्या गाढ सहानुभूतीलाच पात्र होतात. व्यवसायानें तत्वज्ञ असलेल्या प्रो. फडक्यांच्या अंगी मनोवगाहनाचे असाधारण कसब असून देखील प्रणयाच्या खास त्यांच्या प्रान्तात त्यानीं पाऊल ठेवले की एरवीची त्यांची अलिप्तता आणि चिंतनशीलता ठार होते, ही या प्रकरणातली दुर्दैवाची गोष्ट आहे. एका विशिष्ट वयातील प्रणयानुभवाचे चित्रण ते वारंवार साक्षेपानें कां करतात, या प्रश्नाचे उत्तरहि वरील विवेचनात सांपडते. प्रो. फडक्यांच्या कादंबरीतील प्रणयकथांच्या सौंदर्यावर विचार करीत असताना एक कल्पना माझ्या मनात तीव्रतेने येत असते—अनेक श्रेष्ठ गुणांचा समुच्चय असलेल्या या कादंबरीकाराला कांहीं एका चमत्कारानें प्रणय भावनेकडे अलिप्तपणें बघता येईल आणि ती भावना आपला चिंतन विषय बनविता येईल तर—

पण हा 'जर तर' चा संकेतार्थ साहित्यमिमांसेत शेवटी प्रश्नचिन्हापाशीच आणून सोडतो, नव्हे काय !

## राजकीय कादंबऱ्यांची जडण घडण

मात्र प्रणयाचा हा प्रांत सोडला तर अनुभवाच्या इतर सर्व क्षेत्रांत प्रो. फडक्यांनी ही कलात्मक अलिप्तता आणि चिंतनशीलता विलक्षण सामर्थ्यानें व्यक्त केलेली आढळते. त्यांच्या बहुतेक सर्व राजकीय समजल्या जाणाऱ्या याच वस्तुस्थितीची साक्ष देतात. भारतातल्या अनेक राजकीय चळवळींचें मर्म सांगणाऱ्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. पण कोणत्याहि पंथाची, पक्षाच्या धोरणाची वा वैचारिकेची तळी उचलून धरण्याचा प्रचारकी बाणा त्यांनी कधीं स्वीकारला नाहीं. प्रारंभीच्या कांहीं कादंबऱ्यामध्यें राजकीय घडामोडी त्यांनी केवळ पार्श्वभूमीदाखल वापरल्या. पण त्यातहि त्यांची अभ्यासशीलता आणि निरूपणाचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. प्रवासी कादंबरीत राजकीय

चडामोडी केवळ पार्श्वभूमी सजवण्यापुरत्या येत नाहींत. कादंबरीतील प्रमुख पात्रांच्या जीवनाचा त्या धर्म बनतात. आणि साहजिकच त्यांच्या निरूपणात अधिक जिव्हाळा ओतला जातो. 'जेहलम' आणि 'सितारा मंझील' या कादंबऱ्यात लेखकानें हा पुढला टप्पा गांठला आहे. काश्मीर आणि हैद्राबादमधील उठावाची कहाणी हा मुख्य विषय कांहीं पात्रांना हाती घेऊन सांगण्याचा प्रो. फडक्यांनी या कादंबऱ्यातून प्रयत्न केला आहे. या चळवळीचा केवळ तारीखवार इतिहासच त्यांनी दक्षतेनें या कादंबऱ्यातून सांगितला आहे असं नाहीं तर काश्मीरी आणि हैद्राबादी माणसांच्या व्यक्तीरेखा, त्यांचे मनोधर्म आणि जीवनहेतु यांचा इतिहासातील मर्म विशद करण्यासाठीं विलक्षण चातुर्यानें त्यांनी उपयोग करून घेतला आहे. या कादंबऱ्यांच्या चित्रणासाठीं लेखकानें आंखून घेतलेला फलक मोठा असून देखील परप्रांतीय समाजाची संस्कृति, त्याचे आचारविचार, पेहराव, समजुती इ. बाबतीत सर्वांगिण प्रत्ययकारिकता आणि वास्तवता सफाईनें साधलेली दिसून येते. भिन्न भिन्न प्रदेशातील वा व्यवसायातील माणसाच्या जीवनप्रणालीचा अभ्यास आणि त्यांच्या चालीरीतीचें तपशीलवार अवलोकन हे प्रो. फडक्यांच्या प्रतिभेचें भीमबळ आहे. सर्कसच्या जीवनावरील 'हंसू आणि आंसू' ही त्यांची एकच कादंबरी वाचली तरी या भीमबळाचा प्रत्यय कोणलाहि सहज येऊं शकेल. आझाद हिंद सैनिकांचें स्वातंत्र्ययुद्ध आणि नेताजी सुभाषचंद्राचें नेतृत्व या प्रचंड विषयाला हात घालण्याचें धाडस मराठी कादंबरीकारापैकीं एकट्या फडक्यांनीच दाखविलें याची इतिहासकाराला आवर्जून नोंद करावी लागेल. या कादंबऱ्या वाचताना प्रो. फडक्यांच्या जबर व्यासंगाची आणि अवलोकन सांक्षेपाची सांक्ष पटते. प्रो. फडक्यांच्या या व्यासंगशीलतेचा आदर्श नव्या मराठी कादंबरीकारांनीं सतत डोळ्यासमोर ठेवावा इतकी चिकाटी, परिश्रम आणि बुद्धीचे सामर्थ्य त्यांनी कृतीने व्यक्त केलें आहे. या कादंबरीची कथावस्तू सिद्ध करण्यासाठीं प्रो. फडक्यांनी हजारों मैलांचा प्रवास केला. नाना प्रदेश, तेथील रीतिरवाज आणि संस्कृति यांचा प्रत्यक्ष परिचय करून घेतला, अनेक ग्रंथांचे आणि कागदपत्रांचे परिशीलन केले, निरनिराळ्या महत्वाच्या व्यक्तिंच्या मुलाखती घेतल्या आणि मगच त्यांनी

लेखणी उचलली. नव्या पिढीतील कादंबरीकारात प्रतिभा आहे, नित्य नवे प्रयोग करण्याची धडपड आहे, नवे पिळदार अनुभव कलात्मकतेनें सांगण्याचे कसब देखील आहे. पण प्रो. फडक्यांची ही जबर व्यासंगशीलता त्यांचजवळ दिसत नाहीं, म्हणूनच त्या गुणांचा मुद्दाम निर्देश करावासा वाटतो.

## महान राष्ट्रीय शोकांतिकाः—शोनान, अस्मान, तूफान

प्रो. फडक्यांनी शोनान, अस्मान आणि तूफान या कादंबऱ्या लिहून राजकीय विषयावरील कादंबरीचा पुढचा उत्क्रांत टप्पाच नव्हे तर कळसच गांठलेला आहे. या कादंबऱ्यांच्या रचनेंत तांत्रिक दृष्ट्याहि त्यांनी फार मोठी झेप घेतलेली आहे. कथावस्तूच्या मांडणीबद्दल ते प्रस्तावनेत म्हण-तात... "माझ्या या तीन कादंबऱ्या नायक प्रधान किंवा नायिका प्रधान नाहींत. यांत व्यक्तींना प्राधान्य नाही. साऱ्या चळवळीचे सूत्रधार नेताजी, परंतु त्यांचेदेखील चरित्र रेखाटनेचा माझा हेतु नाहीं. जो अभूतपूर्व चळवळ आणि उठाव झाला त्याचे चित्र काढण्याचा माझा प्रयत्न आहे. या तिन्ही कादंबऱ्यात विशेष महत्व आहे ते त्या त्या वेळच्या परिस्थितीला. वेगवेगळ्या व्यक्तीच्या मनावर त्या परिस्थि-तीच्या ज्या प्रतिक्रीया घडल्या त्यांना. उलटसुलट आंदोलनाना! प्रक्षोभाला! वातावरणाला!..." या कादंबऱ्या लिहिण्यापूर्वी लेखकाने ही जी प्रतिज्ञा केली होती ती फडक्यांच्या आजवरील कादंबरी लेखन संकेतांच्या दृष्टीनें अभूतपूर्व अशी होती. या पक्क्या बैठकीवरून त्यांनी या तिन्ही कादंबऱ्या गाढ जिव्हाळ्यानें लिहिल्यामुळेंच केवळ इतिहास निरूपणालाच नव्हे तर त्यांत आकार घे-णाऱ्या लहानमोठ्या घटनांना आणि व्यक्तिरेखांना विलक्षण जीवंतपणा प्राप्त झालेला आहे. महाकाव्याच्या पातळीवर जाणारी आझाद हिंद सैनिकांची ही प्रचंड शोकांतिका प्रो. फडक्यांनी अनेक अंगानी समर्थपणें हाताळली आहे यांत शंका नाहीं. निरनिराळ्या मुत्सद्यांची खलबतें, योध्यांचे डावपेच, रणांगणावरील हल्ले, प्रतिहल्ले, हातघाईचे मुकाबले, बलिदानाची पराकाष्टा, विजयोत्सवाचा हर्ष, जयपराजयाची उलटसुलट आंदोलनें आणि दैवदुर्विलासाचे सर्वंकष तांडव, या सर्वांचे भेदक आणि रसपूर्ण चित्रण प्रो. फडक्यांनी या कादंबऱ्यातून अत्यंत प्रभावी रीतीने केले

आहे. व्यक्तीरेखांना प्राधान्य द्यायचे नाहीं ही त्यांची प्रतिज्ञा त्यांनी कांटेखोरपणें पाळली आहे. पण व्यक्तिरेखाटनाचे त्यांचे बळच इतके मोठें आहे की या कादंबऱ्या वाचून संपवताना वाचकाच्या मनात घोळत राहाते ती नेताजींची तेजस्वी व्यक्तिरेखाच. प्राधान्य न देता देखील थोड्या शद्बांत नि प्रसंगांत प्रो. फडक्यांनी जे हृदयस्पर्शी व्यक्तिचित्र रंगविले आहे, त्याला मराठी कादंबरीत तरी दुसरी तोड नाहीं. व्यक्तिलेखनांचे प्रो. फडक्यांचे कसब इतके दांडगे आहे की नेताजीच्या चरित्राला नव्हे तरी त्यांच्या व्यक्तित्वाला केंद्रबिंदू करून त्यांनी या कादंबऱ्या कां लिहिल्या नाहीत अशी रसिक वाचकांना हुरहूर लागून राहाते. मूळ कथावस्तूत ज्या पात्राला महत्व नाहीं अशा नेताजीच्या चिटणीसांचे– अबीद हसनचे चित्रहि त्यांच्या लेखणीनें अगदीं जाता जाता हृदयंगम रेखाटलें आहे. याशिवाय लहान सहान अशा कितीतरी व्यक्तिरेखा जागजागीं वाचकांच्या अंतःकरणाला चटका लावून अन्तःर्धान पावतात. मग साहजीकच विचार मनात येतो कीं व्यक्तिरेखांना प्राधान्य द्यावयाचे नाहीं अशी प्रतिज्ञा तरी लेखकानें कां केली ? त्यापेक्षा राष्ट्रीय शोकांतिका रंगविणाऱ्या या कादंबऱ्यांना जुन्यापुराण्या प्रणयकथांची ठिगळे जोडायची नाहींत अशी एखादी प्रतिज्ञा लेखकानें केली असती तर या कादंबऱ्यांचे मूल्य कितीतरी पटीनें वाढले असते. आझाद हिंद सैनिकांची कहाणी आणि या प्रणयकथा यांचा अर्थाअर्थी कोणताहि संबंध नाहीं. परिणामी, दिलीप-असला अथवा मोहन, आनंद आणि इरावती यांचा प्रेमाचा गोंधळ सुरूं झाला की पर्वतशिखरावरून आसमंतातील वनश्रीची शोभा पाहण्यात गुंग झालेल्या रसिकाला, अचानक पाय घसरून कोठल्यातरी गल्ली-बोळातल्या हलवायाच्या दुकानासमोर कोसळल्यावर जसें वाटेल, तशी वाचकांची अवस्था होते. खरोखर, या प्रेमिकांची बेचव प्रेम प्रकरणें वाचताना मला प्रो. फडक्यांचा इतका राग येत होता कीं हातातल्या क़ादंबरीची तेवढी पानें फाडावीत आणि निषेध व्यक्त करण्यासाठीं लेखकाकडे तीं धाडून द्यावीत अशी उबळ येत होती. या कादंबऱ्या वाचल्यानंतर माझी खात्रीच पटली कीं ' कथानका ' प्रमाणेंच ' प्रणया ' चे पिशाच्च देखील प्रो. फडक्यांच्या प्रतिभेच्या मानगुटी बसले आहे आणि या पिशाच्चानें लेखकाच्या हातून कांहीं भले होऊं द्यायचें नाहीं असा चंग बांधला

आहे. म्हणूनच गमतीने कधी कधी असा विचार मनात येतो की—स्त्रीपुरुषांच्या प्रणयाचे चित्रण करण्याची यापुढें तुम्हाला बंदी करण्यांत आली आहे!"—असा एखादा वटहुकूम जर कुणी प्रो. फडक्यांच्यावर बजावूं शकेल तरच हे पिशाच्च या प्रतिभासंपन्न कादंबरीकाराच्या स्वाभाविक सामर्थ्याला पूर्ण वाव देण्याची शक्यता आहे.

## व्यक्तिरेखाटनाचे असाधारण चातुर्य

'कथानक' आणि 'प्रणय' या दोन पिशाच्चांनी प्रो. फडक्यांच्या व्यक्तिरेखाटनाच्या शक्तिला मर्यादा घातल्या आहेत म्हणूनच इतका रोषपूर्वक त्याचा उल्लेख करायचा. एरवी स्वभाव लेखनाच्या त्यांच्या पराक्रमाला कसलीहि अटक नाहीं. जिथे जिथे 'कथानकांची आणि प्रणयाची त्यांनी शिरजोरी चालू दिलेली नाहीं तिथे तिथे व्यक्तिरेखाटनाचीच नव्हें तर एकूण जीवनदर्शनाची देखील उंच पातळी गाठलेली आहे. त्यांच्या साधारण आणि सामान्य कादंबऱ्यांतहि व्यक्तिरेखाटनाचे हे कसब लपून राहात नाही, विशेषतः लहान सहान दुय्यम प्रतीची जी असंख्य पात्रे त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून रेखाटली आहेत ती ओझरत्या शब्दरेखेतहि जीवंत होऊन जागजागी उभी राहतात. 'निरंजन'मधला जॅक क्रेन, 'आशे'मधला व्हाईटफील्ड, 'जहलम'मधील मिसेस जोसेफ, 'अस्मान' मधले हॅरी पंडीत अशा कितीतरी पात्रांचा या संदर्भात उल्लेख करता येण्यासारखा आहे. दुय्यम पात्रांच्या रेखाटनांकडे कादंबरीकाराचे फारसे अवधान राहात नाहीं म्हणून प्रो. फडक्यांच्या या विशेषाचा मुद्दाम निर्देश करावा लागतो. पण प्रो. फडक्यांच्या स्वभावलेखनाचें खरे सामर्थ्य प्रत्ययाला येते ते त्यांच्या प्रधान पात्रांच्या चित्रणांतच. 'प्रवासी' आणि 'अखेरचे बंड' या दोन्हीं कादंबऱ्यांत 'प्रणयाची' आणि कथानकाची दंडेली त्यांनी फारशी चालू दिलेली नाहीं. म्हणूनच या कादंबऱ्यांतील कितीतरी स्वभावरेखा अव्वल दर्जाच्या उतरल्या आहेत. पंजाबराव, राजाभाऊ, उमा, रेवा, रोहिणी, भास्कर ही नितांतसुंदर स्वभावचित्रे न्याहाळली तरी फडक्यांच्या लेखणीतील असाधारण बळाची सहज कल्पना येऊं शकेल. 'उन्माद' सारख्या कादंबरीत दोन जुळ्या भावंडांची बालपणीची जी चित्रे प्रो. फडक्यांनी रंगविली आहेत त्यावरून बालमनाचं विश्लेषण करताना त्यांची अवलोकनशक्ति

शीर जोपासना करून त्यांनी आपल्या अभिरूचीचं एक मधुर विश्व निर्माण केले आहे. इतक्या बहुरंगी व्यक्तित्वाची रसिकता या पिढीत तर सोडाच. पण गेल्या पिढीतदेखील अन्य कोणाहि साहित्यिकानें प्रगट केलेली नाहीं. प्रो. फडक्यांच्या महाराष्ट्रातील असाधारण लोकप्रियतेचें रहस्य या त्यांच्या बहुरंगी व्यक्तित्वांत सापडतें. त्यांनी निर्माण केलेल्या मधुर विश्वांत प्रणयाचा उन्माद आहे. रंगविलासांचे उत्सव आहेत. सामाजिक समस्यांचा प्रक्षोभ आहे. राजकीय चळवळींचा उठाव आहे, त्याग–बलिदानाचा आत्मयज्ञ आहे आणि पराक्रमाचे पोवाडेहि आहेत. पण या सर्व घटना आणि प्रवृत्ति प्रो. फडक्यांच्या सौंदर्यवादी कलादृष्टींतून वस्त्रगाळ होऊनच वाङ्मयात उतरल्या आहेत. सामान्य वाचकाला त्यांच्या दैनंदिन कुरूप आणि कंटाळवाण्या दिनचर्येतून घटकाभर तरी मुक्त करून निर्भेळ आनंद देण्याच्या प्रतिज्ञेनें त्यांचे कलात्मक विश्व अवतरलें आहे. साहजिकच जे जे नविन दिसेल, रस रूप गंधाहि संवेदनांना जे जे आकर्षक वाटेल ते ते विशेष टिपून त्यांनी आपले विश्व एखाद्या राजमहालाप्रमाणें सजविलें आहे. प्रत्यक्षांत वेगळीच सुखदुःखे अनुभविणारा महाराष्ट्रांतील शिक्षितांपैकीं एक पांढरपेशा वर्ग अशा विश्वाच्या दर्शनासाठीं आणि कल्पनेनें त्यांत अवगाहन करण्यासाठीं आसूसलेला होता. प्रो. फडक्यांनी या वर्गाचे प्रामाणिक प्रतिनिधीत्व केलें हें मान्य करणं भाग आहे.

## शैलीचें सामर्थ्य

या कोमलांगी मधुर विश्वदर्शनांत प्रो. फडक्यांच्या सुकुमार, लाघवी आणि अर्थवाही शैलीनें फार मोठी कामगिरी बजावली आहे. प्रो. फडक्यांची उत्कृष्ट वक्तृत्त्वाबद्दल जी पुढें प्रसिद्धि झाली त्या कलेनें त्यांच्या ग्रांथिक शैलीवर फार मोठे संस्कार केले आहेत. जुन्या पंडिती वळणाची पल्लेदार आणि सामासिक वा संस्कृतप्रचूर वाक्यरचना टाळून पण तिचे गुणविशेष तेवढे उचलून इंग्रजी भाषेतील लवचिकपणा आणि सफाई मराठी भाषेंत आणण्याची महत्वाकांक्षा त्यांनीं बाळगली आणि परिश्रमपूर्वक ती त्यांनी यशस्वी केली. सहजसुंदर, सुबोध लालित्यपूर्ण, खेळकरपणाचे आणि आधुनिकपणाचे सर्व सस्कार अशी अग्रांथिक पण साहित्यक शैली त्यांनीं मराठी कादंबरीला अर्पण केली. ‘ हकप्रतिमानिष्ठता ’ हे त्यांच्या

शैलीचे असाधारण सामर्थ्य आहे. या सामर्थ्यामुळेंच प्रो. फडक्यांनी अनेक ठिकाणी रंगवलेली शृंगारिक वर्णनें देखील कमालीची जिवंत होऊन उसळतात आणि म्हणूनच टीकाकारांच्या टीकेची ती लक्ष्यविषय होतात. शैलीच्या या सामर्थ्यामुळेंच प्रो. फडके ' वादळ ' वा ' गुप्त प्रायश्चित्त ' सारख्या कादंबरीची बहारीची भाषांतरें मूळांतील वातावरण आणि ओघ कायम राखून सहजतेनें आणि सफाईनें करूं शकतात. भाषांतराच्या क्षेत्रांत प्रो. फडक्यांची शैली अद्यापीहि अद्वितीय अशीच आहे. शैलीच्या या संदर्भांतच त्यांच्या संवादचातुर्याचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. त्यांची संभाषणें रूचित सत्याभासपूर्ण आणि प्रत्ययकारी असतात. प्रणयाच्या चित्रणांत तर ती कमालीची गोड, आर्जवी आणि डौलदार रूप धारण करतात. शैलीचे हे सर्व गुणविशेष आजच्या मराठी कादंबरीनें पूर्णपणें आत्मसात केलें आहेत.

## आणि टीकाकार

प्रो. फडक्यांच्या एकूण कर्तृत्वाचा अनेक टीकाकारांनी जसा प्रांजळपणें गौरव केला आहे तसा कित्येकांनी भिन्नभिन्न कारणासाठीं त्यांचा कडकडून विरोधहि केला आहे. त्यांच्या लेखनावरील सर्वच आक्षेपांचा परामर्ष या लांबलेल्या चिंतनांत घेतां येणें शक्य नाहीं, त्याची गरजहि नाही. फक्त एकाच महत्वाच्या आक्षेपाची मीमांसा मला करावीशी वाटते...... "...फडक्यांची कला विस्मृतिनिष्ठ आहे, जीवनदर्शन तिच्या प्रकृतिधर्माशी विसंगत आहे..." असा सौ. कुसुमावती देशपांडे यांनी प्रो. फडक्यांच्या कादंबरीचे आपल्या ग्रंथांत मूल्यमापन करताना निष्कर्ष काढला आहे. प्रो. फडक्यांच्या कादंबरीतील ' हीण ' मान्य करून देखील त्यांची कला ' विस्मृति-निष्ट ' आहे आणि त्याहिपेक्षां ' जीवनदर्शन तिच्या प्रकृतीशी विसंगत आहे ' हे आक्षेप सरसकट मान्य करतां येण्यासारखे नाहींत. ' प्रवासी ', ' अखेरचें बंड ', ' अंजली ', ' जेहलम ', ' सितारा मंझील,' 'शोनान,' 'अस्मान' आणि 'तूफान' या कादंबऱ्यांत जीवनदर्शन नसेल तर मग ते आहे तरी कोठे ?– असा प्रतिप्रश्न विचारावा लागेल. ' जीवनदर्शन ' ही संज्ञा सौ. देशपांडे यांनीं आपल्या ग्रंथांत अन्यत्र ज्या सोयीस्करपणें आणि अति लवचिकपणें वापरली आहे त्यांतून लेखिकेच्या मनांतील गोंधळच अधिक प्रगट

होतो. प्रो. फडक्यांच्या कलेशीं जीवनदर्शन विसंगत आहे हा सिद्धांत मान्य केला तर असा कलावन्त प्रथम श्रेणीच्या जिवंत व्यक्तिरेखा रंगविण्याची कितपत शक्यता आहे याहि प्रश्नाचा उलगडा होणे जरूर आहे. जीवनदर्शनाचा आणि व्यक्ति-रेखाटनाचा सुतराम संबंध नाहीं असाच अजब समज आक्षेपकांचा असेल तर मात्र बोलणेंच खुंटलें !

वस्तुस्थिती अशी आहे की लेखकाला मान्यता मिळत असतांनाच त्याच्या लेखनधर्मावर गुणावगुणांची कांहीं लेबल्स चिकटवलीं जातात. आणि आंधळ्यांच्या माळेप्रमाणें पुढें त्यांचाच वारंवार उद्घोष होत राहातो. प्रतिभा विलासांत आणि विकासांत कलावंत स्वतःवर जे प्रयोग करत राहातो त्याची ओळख डोळसपणें फार करून घेतली जात नाहीं. तशी दखल घेतली जात असती तर ' धोका ' कादंबरीतील श्रृंगारिक वर्णनांबद्दल अहमहमिकेनें निषेध नोंदविणाऱ्या टीकाकारांनी ' शोनान, ' ' अस्मान ' आणि ' तूफान ' या कादंबरी लेखनांतल्या, कमीत कमी लेखकाच्या साहसाचे तरी खास स्वागत केलें असतें.

## उद्यांचे फडके

विशेषतः ज्या वार्धक्यांत सर्व शक्तींचा ऱ्हास होत असतो त्या वयांत प्रो. फडक्यांनी हे साहस आणि ही प्रयोगशीलता व्यक्त केली होती हे अशा वेळीं मुद्दाम सांगणे जरूर वाटते. प्रो. फडक्यांची आज पन्नासावी कादंबरी प्रसिद्ध होत आहे आणि तीहि लेखक वयानें सत्तरीच्या जवळपास उभा आहे अशा वेळीं. अशा स्थितीत कोणत्याहि कलावंताकडून कसलीहि अपेक्षा करणें धाडसा-चेच ठरेल. परंतु प्रो. फडक्यांनी ज्या दक्षतेनें आपल्या आचार विचारांत आधुनिकता आणि वृत्तींत ताजेपणा राखला आहे आणि कलानिर्मीतीत जी प्रयोग-शीलता व्यक्त केली आहे ती न्याहाळतांना उद्याचे फडके कांहीं मातब्बर कलाकृति देऊं शकणार नाहींत असें म्हणता येणार नाहीं. फिनिक्स पक्षी मरतो आणि आपल्या राखेंतूनच नव्या झळाळीनें पुन्हा जन्माला येतो अशी ग्रीक वाङ्मयांत एक कल्पना आहे. वृत्तीने चिरतरुण राहाणाऱ्या प्रो. फडक्यांच्यासारख्या सिद्धहस्त कलावंताच्या प्रतिभेनें नवें रूप आणि नवें चैतन्य घेऊन प्रगट होण्याचा निर्धार केला तर तो चमत्कार करून दाखविणें तिला अशक्य आहे काय ?

–:०:–

# कादंबरीकार फडके

लेखकः—प्रा. पद्माकर पेशकार

प्रा. ना. सी. फडके हे एक सिद्धहस्त मराठी साहित्यिक आहेत. टीकाकार, कुशल प्राध्यापक, उत्तम वक्ते, जातिवंत शिक्षक, उत्कृष्ट क्रीडासमालोचक, मर्मज्ञ संगीतज्ञ इ. अनेकविध नात्यांनी ते महाराष्ट्राला परिचित असले तरी मराठी वाचकांचे 'लाडके कादंबरीकार' म्हणून त्यांचें स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या कादंबऱ्यांनी तरुण वाचकांना वेड लावलें आहे. त्यांची कादंबरी-कामिनी पन्नाशींत आली असली तरी एखाद्या मादक विलासिनीसारखी ती चिरयौवना आहे.

प्रा. फडके हे 'कलावादी' असून आपल्या आवडत्या मतांचा त्यांनी वारंवार पुरस्कार केला आहे. बोधाच्या बुरख्याआडून सवंग प्रचाराचें आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनी दर्शन घडविलेलं नाहीं. त्यांची कलाविषयक मतें ठाम आहेत. त्या मतांचा कित्येक वेळा विपर्यास करण्यात येतो.बोध किंवा नीतिवादाचे ते वैरी आहेत असें नव्हे. उलट त्यांच्या 'दौलत' किंवा 'उद्धार' या कादंबऱ्यांतून जें विचारधन वाचकांना मिळूं शकते ते त्याच विषयांवरील एखाद्या निबंधाने, परिणामकारक रीतीनें वाचकांच्या मनावर ठसूं शकेल काय ? फडक्यांना एवढच म्हणावयाचे आहे कीं कादंबऱ्या किंवा ललित वाङ्मयाच्या कोणत्याहि शाखेचा आद्य हेतु 'आनंद' हाच आहे. बाकीचे सारे हेतु गौण आहेत. या बाकीच्या हेतुंनी मूळ हेतुला मुळीच बाध येता कामा नये. आणि ही दक्षता प्रा. फडक्यांनी सदैव ठेवलेली असल्यामुळेंच त्यांच्या कादंबऱ्या कलादृष्ट्या निर्दोष झाल्या आहेत.

कला म्हटली कीं तिला कांहीं नियमांचीं बंधनें पडणारच असें त्यांना वाटतें. त्यामुळें कलेला तंत्राची चौकट अनिवार्य आहे या मताचे ते पुरस्कर्ते आहेत. त्यामुळें गुंतागुंत—निरगांठ—उकल अशा क्रमानें त्यांच्या कादंबऱ्यांतील कथानकाचा विकास आकार घेतो. त्यामुळें सांकेतिकता त्यांच्या कादंबऱ्यांत आलेली असली तरी रचनेच्या दृष्टीनें त्यांच्या कादंबऱ्या अगदी बांधेसूद झाल्या

आहेत. आपल्या वाचकांची उत्कंठा सदैव जागृत राहावी, यासाठीं ते प्रकरणांचे शेवट उत्कंठावर्धक करतात. वाचकांच्या मनाला आशा-निराशेच्या हिंदोळ्यावर झुलत ठेवतात. मधूनमधून विस्मयाचे गोड धक्के बसूं देतात. आपल्या कादंबरींतील कथानक एकाच शहरांत घडलेले न दाखविता पात्रांबरोबरच वाचकांनाहि ते प्रवास घडवतात. आपल्या कादंबरींत एखादें रहस्य पेरून वाचकांची मनें त्यांत गुंतवून ठेवतात. ' दौलत 'मधील मधुरेचें रहस्य या दृष्टीनें मधुर झालें आहे.

त्यांचें तंत्रकौशल्य योगायोगांचाहि फार मोठ्या प्रमाणावर आश्रय घेते. कधी कधी कल्पनाहि करतां येणार नाही असे योगायोग मानवी जीवनांत घडत असतात हें खरें ! पण केवळ योगायोगांनीच मानवी जीविताचे धागे गुंफलेले नसतात. प्रोफेसरसाहेबांच्या कादंबऱ्यांत कित्येकदा असे योगायोग घडलेले आढळतात कीं ते त्यांनी मुद्दाम घडविलेले आहेत हे कळून चुकते. ते योगायोग ' असंभाव्य ' नसलें तरी ' क्वचित्संभाव्य ' असतात हें कबूल करावें लागेल.

कथारचना चातुर्यापेक्षा व्यक्तिदर्शन दसपट महत्त्वाचे असल्यामुळें आपल्या कादंबऱ्यांतील पात्रचित्रण करतांना ते विशेष दक्षता घेतात. व्यक्तींच्या आयुष्यांतील बारीकसारीक प्रसंग, साध्यासुध्या हालचाली, विशिष्ट संवयी यांच्यावर प्रकाशझोत टाकून ते त्यांचे व्यक्तिदर्शन घडवतात. ' दौलत ' कादंबरींतील आगगाडींत निर्मला व कमल यांचा झालेला संवाद साधाच खरा ! पण दोघींच्याहि स्वभावांतील विरोध स्पष्ट दाखविणारा झाला आहे. त्याचप्रमाणें ' अटकेपार ' मधील शंभुरावाच्या रूपानें एका सनातनी कर्मठाचें चित्र वाचकांसमोर साकार करतांना त्याची वेषभूषा, त्याच्या संवयी त्यांनी काळजीपूर्वक नमूद केल्या आहेत. व्यक्तीची विशिष्ट मनोभूमिका, तिच्या हालचालींतून, तिच्या संवादांतून किंवा विचारांतून ठळकपणे दाखविण्याच्या त्यांच्या या कसबामुळेंच त्यांच्या भैय्यासाहेब, आनंदराव, राजाभाऊ, इंदुमती, निर्मला, विद्या या व्यक्तिरेखा मराठी कादंबरी वाङ्मयांत अमर झाल्या आहेत.

पात्रांच्या वैविध्यांत केतकरांपुढें फडके हे ठेंगणें ठरतात. मात्र भिन्नजातीय व भिन्नप्रांतीय पात्रें त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटली आहेत. दाक्षिणात्य अरुणा, बंगाली सुजाता, सिंधी चंदा या त्यांच्या नायिका परप्रांतीय

च भिन्नजातीय आहत. प्रा. फडके यांनी आपल्या कादंबऱ्यांतून प्रामुख्यानें उच्च मध्यम वर्गीय जीवनांतील सुखदुःखांचेंच चित्रण केलें आहे. त्यांच्या कादंबऱ्यांत समाजाच्या इतर वर्गांतील पात्रें वावरतात ती फक्त वरील व्यक्तींना उठाव देण्यासाठींच!

प्रोफेसरसाहेबांच्या अविनाश, सुधीर, आनंदराव इ. पुरुषनायकांपेक्षां त्यांच्या निर्मला, इंदुमती, मीनाक्षी, मंदाकिनी या नायिकांच वाचकांना जास्त वेड लावतात ( कदाचित् त्यांचें सौंदर्य, बुद्धिमत्ता, प्रीतिलोलुप वृत्ति हें याचें कारण असावें ) या सर्व नायिकांच्या तोंडवळयांत एक प्रकारचा सारखेपणा आढळत असला तरी आपल्या सौंदर्यानें व प्रेमप्रभावानें वाचकांचीं मनें त्या आकृष्ट करून घेतात. आपल्या नायिकांच्या सौंदर्याचें व अंगप्रत्यंगाचें सूक्ष्म वर्णन करण्यास प्रा फडके चुकत नाहीत. या दृष्टीने निर्मला पुस्तक वाचत असतां तिच्या सौंदर्याचें त्यांनी केलेलें वर्णन उल्लेखनीय वाटते. ' जादूगार 'मधील इंदुमतीचें पुढील वर्णन पाहाः

'...पालखींतून डोकावणाऱ्या कुंदकळयांप्रमाणें तिचे दांत दिसत होते, आणि दोन्ही नाकपुड्या किंचित् प्रसरण पावून वायुलहरींनी थरारणाऱ्या गुलाबाच्या पाकळयासारख्या भासत होत्या. तिच्या नेत्रांच्या तेजांत लाडिकपणाचें मार्दव मिसळल्यासारखें दिसत होतें, तिच्या शुभ्र कंठाला स्पर्श करून खाली लोंबलेल्या बारीक सोनेरी दोऱ्याचा एक पदर तिच्या दक्षिण वक्षःस्थलावर स्थिर झाला होता. '

अशा प्रकारच्या वर्णनांमुळें त्यांच्या सौंदर्यशालिनी नायिका अविस्मरणीय झाल्या आहेत. त्या सुंदर असल्या तरी प्रेमळ, विनयी व सुसंस्कृत आहेत.

प्रीति हा फडक्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांचा वर्ण्यविषय आहे. नायक-नायिकेची प्रेमकहाणी ते ज्या कौशल्यानें रंगवतात तें कौशल्य अप्रतीम म्हणावें लागेल. हजारों वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या रुक्मिणीची प्रेमकथा आजहि ऐकण्यास व त्यांत रस घेण्यास मानवी मन विटलेलें नाहीं. त्यामुळेंच फडक्यांच्या कादंबऱ्यांतील प्रेमलीलामृताचें पान करण्यास रसिकांनी अंतराय दिलेला नाहीं.

आपल्या पात्रांच्या मनांतील भावनांची गुंतागुंत ते कौशल्यानें उलगडून दाखवितात. या बाबतीत एखाद्या कुशल शस्त्रक्रियाविशारदाचीच उपमा त्यांना

शोभेल. व्यक्तींच्या मनांतील भाववर्तुळें ते हळुवारपणें दिग्दर्शित करतात. मनोविश्लेषण करण्याचें त्यांचें सामर्थ्य नेत्रदीपक आहे. ' खेळणी ' मधील संभोगाविषयीच्या विचित्र कल्पनांनी, स्वतःच्या सुखाची परवड करून घेणाऱ्या नायिकेच्या मनांतील कोंडमारा त्यांनी यथार्थ रेखाटला आहे. तसेंच ' इंद्रधनुष्य ' मधील वासंती, 'उद्धार' मधील विद्या किंवा 'धोका' मधील हसा यांच्याहि हृदयदरींतील भावभावना त्यांनी सूक्ष्म व हळुवारपणें रंगविल्या आहेत.

पात्रांच्या मनांतील भावना, विचार व त्यांच्या घडणाऱ्या कृति यांत ते संवादित्व ठेवतात कार्यकारणभावाला ते धक्का बसूं देत नाहींत. त्यामुळें त्यांच्या कादंबऱ्यांत तर्कदुष्टता आढळत नाहीं. व्यक्तींच्या स्वभावांतील परिवर्तनें दाखवितांना देखील ते तशाच प्रभावी प्रसंगाची योजना करतात. ' दौलत'मधील भैय्यासाहेबांच्या मनोवृत्तींत पडलेला फरक किंवा ' जादूगार 'मधील पुरुषांचा तिरस्कार करणाऱ्या इंदुमतीच्या मनांत आनंदरावाविषयीं निर्माण झालेली प्रीतिभावना हें फेरबदल दाखविण्यासाठीं तें इष्ट प्रसंगाची मालिका चातुर्यानें गुंफतात.

पात्रांच्या भावविश्वाबरोबरच सृष्टीसौंदर्याचें रेखीव वर्णन करण्याची त्यांची हातोटी आहे. ' अटकेपार ' मधील वर्णनें या दृष्टीने पाहाण्यासारखी आहेत. ' जेहलम् ' या कादंबरींतील निसर्गशोभेची त्यांनी रेखाटलेली शब्दचित्रें अविस्मरणीय आहेत. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ' ऋतुसंहार ' या कादंबरींत त्यांनी ऋतुचीं जी मनोहर वर्णनें केली आहेत ती अलंकारिक असून शब्दशिल्पाचे उत्तम नमुनेच होत.

ही सर्व वर्णन करणारी त्यांची भाषा समर्थ व परिणामकारक आहे. ती साधी असली तरी सहजसुंदर आहे. नानाविध अलंकारांनी ती मढविलेली नाहीं. मात्र अलंकारांचे त्यांच्या भाषेला वावडे आहे असे नव्हे. एखाद्या नागर स्त्रीने वेचक अलंकार परिधान केल्यानें तिचें मूळचें सौंदर्य जसें वृद्धिंगत व्हावें तसें त्यांच्या भाषावनितेचे आहे. समर्पक उपमा व दृष्टान्त यांचा ती यथोचित वापर करते. त्यांची भाषा प्रासादिक असून मराठीकादंबरीला तिने ' लालित्याचें लेणें ' चढविलें आहे. अर्थवाहीपणा व माधुर्य यांच्या संयोगाने ती रमणीय झाली आहे. सूचकता व संयम हें तिचें वैशिष्ट्य प्रथमदर्शनीच नजरेंत भरण्यासारखें आहे

प्रणयाचीं उन्मादक वर्णनें त्यांची लेखणी आत्मीयतेनें रेखाटते. प्रणयरसानें न्हाल्यानें त्यांची लेखणी धुंद झाली आहे. त्यामुळें शृंगारचेष्टितेतहि त्यांची लेखणी निर्भयतेनें रेखाटतें. मात्र संयमाची लक्ष्मणरेषा ती उल्लंघित नाहीं. प्रणयी जनांचे

प्रेमळ व मधुर संवाद हे त्यांच्या कादंबऱ्यांचें लक्षणीय वैशिष्ट्य आहे. या मधुर संवादांत कोटिबाजपणा, खेळकरपणा व मार्मिकता यांचा त्रिवेणी संगम झालेला आहे. त्यांच्या कादंबऱ्या यशस्वी ठरण्यास त्यांच्या या संवादांची त्यांना फार मदत झालेली आहे.

'समरभूमि', 'आशा', 'उजाडलं पण सूर्य कोठे आहे?' या किंवा सुभाषचंद्रावरील आपल्या कादंबऱ्यांतून राजकारण आणण्याचा प्रा. फडके यांनी प्रयत्न केला असला तरी व्यक्तींच्या सुखदुःखानाच अग्रमान मिळाल्याने या कादंबऱ्या राजकीय म्हणतां येण्यासारख्या नाहींत. राजकीय विचार किंवा आंदोलने यांना जसा उठाव, मिळावयास हवा होता तसा न मिळतां त्यांना गौणत्व प्राप्त झाल्याने फक्त प्रीतिकथेंचेच वाचकांना दर्शन घडते आणि राजकीय आत्म्याचा आढळ त्यांत होत नाहीं.

कल्पनारम्य सृष्टीच्या मोहनगरींत वाचकांना परिभ्रमण करावयास लावून खऱ्या जीवनांतील दुःखापासून 'पलायन' करण्यास त्यांच्या कादंबऱ्या कारणीभूत होतात. प्रत्यक्ष जीवन जसें आहे तसें न दाखवितां सुखाचा आभास त्या निर्माण करतात इत्यादि आक्षेप त्यांच्या कादंबऱ्यांवर घेतले जातात. पण दुःखांचा विसर पडून मनरंजन व्हावें व आनंद मिळावा हेंच कलेचे व म्हणून 'रिझविणाऱ्या साहित्याचें' कार्य आहे हें लक्षांत घेतले असतां या आक्षेपांतील अतिशयोक्ति दिसून येईल

प्रा. फडके यांचें कादंबरी लेखन सातत्याने सुरू आहे. मरठी कादंबरीला अद्भुतांतून बाहेर पडावयास लावणाऱ्या हरिभाऊंनंतर यशस्वी व श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून फडक्यांचेंच नांव घ्यावें लागेल. आज मराठी कादंबरीचा ओघ प्रादेशिकतेकडे वळला आहे. या प्रादेशिक कादंबऱ्याबरोबर फडक्यांच्या कादंबऱ्यांची तुलना करणे अप्रस्तुत आहे. त्यांच्या कादंबरीचा पिंड मुळीच बदललेला नाहीं. तो सर्वस्वी त्यांचाच आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील वैशिष्ट्यें आजहि अभंग राहिली आहेत. मराठी वाङ्मयांत स्वतंत्र पन्नास कादंबऱ्यांची त्यांनी भर घातली आहे. कथानकरचनेंतील बांधेसूदपणा, तंत्रसफाई, लालित्यपूर्ण भाषा, सूक्ष्म मनोविश्लेषण, प्रणयपूर्ण मधुर संवाद या गुणांमुळे त्यांच्या कादंबऱ्यांतील दोष जमेस धरूनहि 'कादंबरी सम्राट' असें त्यांना म्हणावेसें वाटतें.

—०—

# विजिगीषु शरदः शतम् !

लेखकः-श्री. रं. कृ. चिंचलीकर, एम्. ए.

प्रा. आप्पासाहेब फडके हे चतुरस्त्र लेखक म्हणून जितके लोकप्रिय आहेत तितकेच ते नामवंत प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध आहेत !

हरएक विद्यार्थ्याच्या जीवनांत अनेक शिक्षकांचा संबंध येतो. तथापि असे कांहीं निवडक आध्यापक आढळतात कीं ज्यांचा विद्यार्थ्याला कधीहि विसर पडत नाहीं.

"प्रा. फडके यांचा विद्यार्थी होण्याचे भाग्य लाभले" असे साभिमानानें कितीतरी विद्यार्थी आज सर्वत्र आढळतील !

तर्कशास्त्र, मानसशास्त्र, तत्वज्ञान यासारखे थोडेसे रुक्षतेच्या सदरात गणले जाणारे अभ्यासविषय प्रा. फडके इतक्या सुबोध व सोदाहरण पद्धतीनें शिकवीत कीं नाठाळ विद्यार्थ्यांचेहि लक्ष त्यांच्या शिकवण्याकडे वेधून जात असे. अतिशय परिणामकारक अशा अध्यापन कौशल्यामुळें कुठल्याहि विद्यार्थ्याला त्यांच्या विषयांत उत्तीर्ण होण्यास सहजासहजीं अडचण पडत नसे. प्रा. फडके आपला अभ्यासविषय इतक्या आकर्षक पद्धतीनें विशद करीत कीं त्यांचा प्रत्येक 'तास' हा त्यांच्या ललितलेखनाइतकाच चित्तवेधक ठरत असे.

पण त्यापेक्षांहि एखाद्या कठीण विषयाचे आकलन होण्यासाठीं ज्या पृथःकरणात्मक आणि सुटसुटीत मांडणीचा प्रा. फडके अवलंब करीत त्या पद्धतीचा त्यांच्या विद्यार्थ्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठींच नव्हे तर व्यवहारिक जीवनातील समस्या सोडविण्यासाठींहि उपयोग होत आला असेल. प्रा. फडके यांचे सहस्त्रावधी विद्यार्थी आपल्या गुरूजींचे हे ऋण मोठ्या आनंदानें मान्य करतील.

ललित लेखकाचे अंतरंग आणि प्राध्यापकाचा जिव्हाळा यामुळें वर्गातील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांकडे त्यांचे नेहमीच लक्ष असे. त्यांच्या भावदर्शी व उत्तेजनपर शब्दानीं पुलकित झालेली कितीतरी विद्यार्थ्यांची अंतःकरणें आजहि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दुर्मिळ — पुस्तक.



आढळून येतील. अशा या अनमोल ठेवीवर फार थोड्या अध्यापकांना अधिकार सांगता येईल !

कॉलेजांतील शैक्षणिक प्रगतीशिवाय क्रीडा, संगीत नाट्य, वक्तृत्व, लेखन या अनेक कलाविकासांत विद्यार्थ्यांच्या नैपुण्याला मिळण्यासारखे प्रा. फडके यांचे सक्रिय प्रोत्साहन असे. विद्यार्थ्यांत त्यांची किती लोकप्रियता होती याचे एक उदाहरण आठवते.

सुमारें तीस बत्तीस वर्षांपूर्वी कोल्हापूरांत साथीच्या रोगानें थैमान घातले होते. बहुसंख्य विद्यार्थी परगांवचे असल्यानें कॉलेज लौकर बंद करावे अशी त्यांची मागणीं होती; पण कॉलेजचे अधिकारी तिकडे लक्ष देऊं शकले नाहींत. एके दिवशीं विद्यार्थ्यांनीं संप पुकारला. सर्व विद्यार्थी कॉलेजबाहेर राहिले. तीस वर्षांपूर्वीच्या संस्थानी वातावरणांत कॉलेज विद्यार्थ्यांचा संप हा अधिकारी वर्गाला ' आव्हान ' वजा वाटण्याचा संभव होता. प्रसंग अटीतटीवर येऊन ठेपला.

प्रा. फडके सर्व विद्यार्थ्यांसमोर गेले आणि एवढेंच म्हणाले,

" तुम्ही आमचे विद्यार्थी आहात. आपण उभयतांचे कॉलेज हेच कार्यक्षेत्र आहे. आपले प्रश्न तिथेच सोडवले पाहिजेत, रस्त्यावर नाहीं. तुम्ही सर्वजण कॉलेजात चला. आपल्या अडचणी आपल्या घरांत सोडवणे हाच खरा मार्ग आहे !—"

या साध्यासुध्या पण अंतःकरणापासून उच्चारलेल्या शब्दांचा विद्यार्थ्यांच्यावर विलक्षण परिणाम झाला. दोन मिनिटांत कॉलेज विद्यार्थ्यांनीं भरून गेले !

प्रा. फडके कॉलेजांतील कामाव्यतिरिक्त गोष्टींत वेळ न घालवतां वाचन लेखनाकडे सातत्यानें लक्ष देत. दैनंदिन व्यवसायात दहावीस मिनिटांचा अवधि मिळाला तरी कादंबरी लेखनातील भावस्पर्शी प्रसंग तेवढ्या वेळांतहि लिहीत. इतकी असामान्य विलक्षण एकाग्रता त्यांच्याजवळ असलेली दिसून येई. अत्यंत सुंदर अक्षराइतकेंच एकटाकी लेखनाबद्दल प्रा. फडके महशूर आहेत. त्यांची ओघवती भाषाशैली जितकी लयबद्ध तितकीच हुकमी आहे.

कॉलेजांतील अध्यापन वक्तृत्व आणि विविध कलाक्रिडा प्रांतांतील संचार, नियतकालिकांचे संपादन यासारखें अनेक व्याप संभाळून त्यांनीं आतांपर्यंत सुमारें ३०,००० पृष्ठांच्यापेक्षां अधिक लिहिलेले विपुल व भरघोंस साहित्य हे त्यांच्या नवनवोन्मेष प्रातिभेचे व दीर्घपरिश्रमाचे द्योतक आहे.

'कलेसाठीं कला' कीं 'जीवनासाठीं कला' या पंडिति वादविवादापासून अलिप्त असलेल्या बहुजन वाचकाला प्रा. फडके यांच्या लेखनांतून मानवी जीवनांतील सुखदुःखाच्या प्रत्ययाचा आनंद मिळत राहिल्यानें प्रा. फडके हे जीवनविषयक कलेचे एक प्रणेते आहेत असे त्यास वाटल्याशिवाय राहणार नाहीं. आणि यांतच प्रा. फडके याची लोकप्रियता सामावली आहे.

प्रा. फडके यांचे दीर्घ आणि पद्धतशीर परिश्रम त्यांच्या मितार्हराइतकेच वाखाणलेलें आहेत. कादंबरी लेखनांतील अर्ध शतक साधलेल्या आजच्या या प्रसंगीं त्यांचे असंख्य विद्यार्थी व चाहते सद्‌गदित अंतःकरणानें एवढेंच म्हणतील

भावना व बुद्धि यांचा पदोपदीं उत्कर्ष घडवून आणणारा जीवनांच्या कलाविषयक प्रांतांतून हळुवार अंतःकरणानें मार्गक्रमण करणारा हा प्रवासी विजिगीषु शरदः शतम् आणि कालिदास–भवभूतीच्या परंपरेतील श्रेष्ठ दर्जाचें 'अक्षर' वाङ्मय अधिकाधिक निर्माण करो !

# प्रा. ना. सी. फडके यांस—

आदरपूर्वक अभिवादन तुज रसिकवृन्दश्रेष्ठा
ललितशब्दसृष्टिचा विधाता, सौंदर्यांचा तूं स्त्रष्टा ॥
गायन क्रीडन भाषण लेखन ज्ञात कला तुजशी
मीमांसक तूं कुशल, त्यांतलें रहस्य फुलवुनि विशदविसी ॥
मराठींतली ललितकथा ही हरिभाऊंनी वाढविली
वात्सल्याची, हितदृष्टीची माया तिजवर पांघरली ॥
यौवनप्रांतीं पद ठेवी ती, जडली संगत गोड तुझी
जादुगार तूं तव सहवासीं खूपच खुलली कळी तिची ॥
रम्य मुग्ध मधु सूक्ष्म तरल बहु प्रणयाच्या त्या अमित परी
तूंच तिला शिकविल्या, दिसे ती प्रणयदेशची जणू परी ॥
विलोल वेधक तिचे भ्रमविती मनास विभ्रम मोहक ते
हस्तिदंति त्या मनोऱ्यामधी बसवुनि सुखविति रसिकांतें ॥
महाराष्ट्रदेशिच्या वाचका कानीं पडतां 'कुहू कुहू'
आजहि त्याच्या उत्कंठेला ये 'भरतीची लाट' बहू ॥
तूंच लेवविसि नवेंच लेणें ललित निबंधाचें
मराठीस तें, तेज त्यांत किती जीवनप्रीतीचें ॥
नाट्य - काव्य - वक्तृत्व - समीक्षा-कथा अशी विविधा
कलानिर्मिती आहे कां तव वहुरत्ना बसुधा ? ॥
सुहास्यवदनें जीवनरस हा लुटा मस्त व्हा त्यांत सदा ॥
ऐनपंचावीशि वृत्ति जागवा, त्यांतच आहे सार्थकता ॥
संध्याछाया जमूं लागल्या तुझ्या जीवनांत
भिवविति वा तुज आजहि असशी जीवनानुरक्त ॥
ही अनुरक्ति अद्भुत शक्ति दिव्य तिची महति
आदरपूर्वक अभिवादन तिज भावपूर्ण प्रणति ॥

—अ. ना. देशपांडे

**दोन आठवणी**

## (१) एक अविस्मरणीय प्रस्ताव

सुमारें दोन तपांपूर्वीची गोष्ट. प्राध्यापक ना. सी. फडके यांच्या प्रयत्नानें साहित्य सम्राट कै. तात्यासाहेब केळकर, 'रागिणी' कार कै. वामन मल्हार जोशी व भारताचार्य कै. वैद्य यांचें आगमन जवळजवळ दीड दोन तपांनंतर प्रथमच कोल्हापूरास होत होते. नगरवाचन मंदिरांत तात्यासाहेबांचे व्याख्यान होते. तुफान गर्दी लोटली होती. तात्यासाहेबांचा परीचय करून देण्यास प्रा. फडके उठले. आपल्या अनुपम शैलींत त्यांनीं प्रारंभ केला, "तीन प्रकारचे वक्ते असतात. कांहीं वक्त्यांचीं भाषणें नारळासारखी असतात. त्यांचें बाह्यांग कठीण, ते फुटले म्हणजे व्याख्यान समजले तर मग आंतील रस मिळावयाचा. दुसऱ्या प्रकारच्या वक्त्यांची भाषणें केळ्यासारखीं असतात. त्यांच्या व्याख्यानांत रुचकर गाभा भरपूर, पण जातांजातां ते वरची साल इकडे तिकडे अशीं टाकतील कीं, त्यावरून घसरण्याचाहि धोका असतो. तिसऱ्या प्रकारचे वक्त्यांचें भाषण द्राक्षासारखें अंतर्बाह्य रसपूर्ण. अलगद सगळें फळ तोंडांत टाकावें तसे. तात्यासाहेब केळकर हे या तिसऱ्या प्रकारचे वक्ते होत. रसपूर्ण!" त्या दिवशीं फडके यांनी प्रास्ताविक भाषण केलें तसले प्रमाणबद्ध, समयोचित, अर्थपूर्ण व नर्मविनोदाची रुपेरी कडा असलेले प्रास्ताविक भाषण मी दुसरें ऐकललें नाहीं.

## (२) कै. पंढरीनाथ सरनाईक

सत्तावीस वर्षांपूर्वींची गोष्ट. पंढरीनाथ सरनाईक या नांवाचा एक विद्यार्थी राजाराम कॉलेजमध्यें होता. काव्याचा मोठा चाहता. कवि यशवंत आणि फडके यांचा मोठा भक्त. दिसायलाहि मोठा सुंदर होता. हुषार होता. सुंदर कवितांहि करी. मोठा स्नेहशील. पण जून महिना सुरू झाला तोंच टायफॉईडनें आजारी पडला व त्यांतच त्याचा दुर्दैवी अंत झाला. प्रा. फडके वर्गांत हजेरी घेतांना त्या नांवावर आलें व ते नांव वाचतांच अडखळले. क्षणभर थांबले. त्यांना पुढें तास घेणे अशक्य झाले व ते वर्गांतून बाहेर आले. प्रा. फडके यांच्या स्वभावांत उत्कटतेचा अभाव आहे असें ग्रह पसरविणाऱ्यासाठीं मी ही आठवण मुद्दाम नमूद करीत आहे.

—नी. गो. पंडितराव, ठाणें

# प्रा. ना. सी. फडके

## — मराठी लघुनिबंधाचे जनक —

( प्रा. मधुकर वि. फाटक, एम. ए. एम. एड्. धुळे )

मराठी कादंबरीवाङ्मयांत आपल्या प्रतिभेची दौलत मुक्तहस्तानें उधळणारा जादुगार, मराठी निबंधाचाहि कायापालट करून गुजगोष्टी सांगणारा जादुगार ठरावा ही किती विलक्षण योगायोगाची घटना ! पण प्रा. ना. सी. फडके या मराठीतील अग्रगण्य प्रतिभासंपन्न जादुगारानें हीं दोन्हीं क्षेत्रे सलीलया जिंकलेली आहेत, आणि मराठी वाचकांची अंतःकरणें सतत तीन तपें वश करून घेतली आहेत. मराठी कादंबरीला हरिभाऊंनीं आकार आणून दिला होता, समाजांत प्रतिष्ठा निर्माण करून दिली होती. कादंबरी-क्षेत्रातल्या जादुगारापुढें कांहीं कलाकृतींचे नमुने हरिभाऊ, वामनराव इत्यादि लेखकांनीं पूर्वी ठेवलेले होतें. पण प्रा. फडके यांनीं हे जुने नमुने दूर करून, थोडे फार सुधारून, नवीन घाटाच्या कादंबरी-लेखनास आरंभ केला—पण गुजगोष्टीच्या बाबतींत प्रा. फडके यांची करामत ही कीं हा अपूर्व प्रकारच त्यांनी आपल्या प्रतिभेच्या किमयेनें निर्माण केला. मराठी कादंबरी म्हटली कीं अभ्यासक बाबा पदमनजीपासून आकडे मोडूं लागतात. पण लघुनिबंध वा गुजगोष्टी म्हटल्याक्षणींच वाचकांना प्रा. ना. सी. फडके यांचीच पहिली आठवण येते. तो अनामिकेपाशी येतो आणि चटकन त्याच्या तोंडून उद्गार निघतो, अनामिका सार्थवती बभूव ! आज ज्या मनमोहक गद्यबंधाला आपण लघुनिबंध वा ललितनिबंध म्हणतो, या वाङ्मय प्रकाराच्या जन्माचें श्रेय प्रा. ना. सी. फडके यांनाच द्यावयास हवं. प्रा. फडके यांनींच या छोटेखानी पण बहुगुणी वाङ्मय प्रकाराला जन्म दिला आणि प्रा. फडके यांनींच या वाङ्मय प्रकाराला ' गुजगोष्टी ' हे सार्थ नामाभिधान दिलें.

मराठींत निबंध हा वाङ्मय प्रकार आज शेसव्वाशें वर्षं रूढ आहे, आणि वृत्तपत्रें व नियतकालिकें यांनीं तो समृद्धहि केला आहे. लोकहितवादी

विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर, शिवरामपंत परांजपे आणि केळकर, प्रो. माटे, सावरकर आणि माडखोलकर, साने गुरुजी आणि विनोबा यांनीं निरनिराळ्या कालमानानुसार निरनिराळ्या विषयांवर स्फुट पण पांडित्यप्रचुर लेखन करून हा वस्तुनिष्ठ ( विषयनिष्ठ ) वाङमयप्रकार पुष्कळच राजमान्य व लोकमान्य करून टाकला. या पंडिती भारदस्त लढाऊ निबंधाच्या जोडीनें, इंग्रजी वाङमयांत लघुनिबंध गेली शेदीडशें वर्षे वाटचाल करीत होता याची दखल प्रथम कोणी घेतली असेल तर ती प्रा. ना. सी. फडके यांनींच ! इंग्रजी वाचक वर्गाची अभिरुची बेकन, जॉन्सन, मेकॉले कडून कौले, गोल्डस्मिथ, चार्लस लॅम्ब, इ. व्ही. लुकास, चेस्टर्नटन, गार्डिनर, बेलॉक आणि रॉबर्ट लिंड यांच्याकडे वळली आहे याची नोंद झाली प्रथम फडके यांच्यांच रसिक मनांत-आणि त्या नोंदीचा पहिला उत्कट व कलात्मक उद्रेक झाला रत्नाकर मासिकांत आणि तोहि १९२६ मध्यें !

म्हणजे आतां मराठी लघुनिबंधाची तीन तपें होत आली आणि या कालखंडांत लघुनिबंधकार म्हणून जे नांव आजहि आघाडीवर आहे तें म्हणजे प्रा. ना. सी. फडके ! गेल्या तीस वर्षांत प्रा. फडके यांच्याप्रमाणें लघुनिबंधांत वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, वि. पां. दांडेकर, कुसुमावती देशपांडे, गं. भा. निरंतर, वि. द. साळगांवकर, ना. मा. संत, म. ना. अदवंत इत्याहि लेखकांनीं जरी स्पृहणीय भर घातली असली तरी पहिले मानाचे पान दिले जाते ते प्रा. आप्पासाहेब फडके यांना ! हे मानचिन्ह केवळ आद्यलेखक म्हणूनच नव्हे तर गुणवत्तेनेंहि श्रेष्ठ लेखक म्हणून !

लघुनिबंधाच्या क्षेत्रांतील या सम्राटानें घातलेली भर संख्या व गुण या दोन्ही निकषांवर अतुलनीयच ठरेल. गुजगोष्टी, नव्या गुजगोष्टी, धूम्रवलयें, अबोलीच्या गोष्टी, मैफल इत्यादि त्यांचे लघुनिबंध संग्रह वाचकांनीं सहजच हातांत घेऊन बघावें आणि त्यांना ते खाली ठेवण्याचा धीरच होणार नाहीं. लघुनिबंधाच्या सर्व कसोट्यांना उतरणारे हे लेख म्हणजे खरोखरच आप्पासाहेबांची मनोज्ञ जीवनचित्रणेंच होत !

आप्पासाहेबांचे हे लघुनिबंध म्हणजे चरित्र, कथा आणि काव्य यांच्या

सीमारेषांना स्पर्श करणारे सजीव, रसरसीत भावगर्भ पण विचाराचा कणा असणारे चैतन्य–पुतळे होत. कवि–केशवसुत म्हणतात ना– "साध्याहि विषयांत आशय कधी मोठा किती आढळे ? " तें सुभाषित जर कुठें प्रत्ययास येत असेल तर तें म्हणजें आप्पासाहेबांच्या लघुनिबंधांत, आणि त्यांच्या 'पाणी स्पर्शाची आमुचा शकतसे वस्तुप्रती द्यावया सौंदर्यातिशया–' या विधानाची सत्यता कोठें अनुभवास येत असेल तर ती प्रा. फडके यांच्या विविध गुजगोष्टींत !

अगदीं आरंभीचा त्यांचा लघुनिबंध बघा ना ? " शाई " नांव किती साधे, वस्तु किती क्षुद्र व चिरपरिचयाची. या सामान्य विषयावर लिहिण्यासारखें आहे तरी काय ? या किंचित शंकेनें आणि किंचित उपहासानें वाचकानें आठ-दहा ओळी वाचाव्या मात्र आणि एकदम तो आश्चर्यानें थक्क होऊन जातो.

शाईसारख्या सामान्य विषयाचें असामान्य सुंदर वर्णन, एका पैशाला विकत मिळणाऱ्या या द्रवरूप पदार्थाचें सर्व जग हलवून सोडणारें सामर्थ्य, प्रा. फडके इतक्या रसिकतेनें व मोहक प्रवाही शैलीनें करतात कीं आपणांस अचंबा वाटल्याशिवाय राहात नाहीं. " सुधा आणि हलाहल एकाच कोठ्यांत सांठविणारा किती अजब द्रव पदार्थ हा ! " ही शाई क्षुद्र नव्हे या धाग्याकडे आपलें मन येतें न येतें आणि लेखकांना दिलेला इशारा आपण बघतों न बघतों तों हा लघुनिबंध संपूनहि जातो ! आहे कीं नाहीं ही करामत !

गुजगोष्टींत विषय निवडायच्या तंत्रांत मोठा भाग आहे चमत्कृतीचा ! विषयाच्या निवडींत आणि मांडणींत या चमत्कृतीचा स्पर्श वाचकाच्या मनाला होत जाईल याची काळजी प्रा. फडके यांनीं आरंभापासून घेतलेली आहे व तसा त्यांनीं 'गुजगोष्टीच्या' प्रस्तावनेंत निर्वाळाहि दिला आहे.

याच संग्रहांतील 'सुहास्य,' 'ऐन पंचविशी', 'पत्रे' हे त्यांचें निबंध याच पद्धतीचे आहेत. सामान्य वस्तुतील असामान्य सौंदर्य, सामर्थ्य वा सत्य हुडकून काढणाऱ्या आणि तें गप्पांच्या ऐन भरांत आपला गळी उतरविणाऱ्या या जादुगाराची सौंदर्यदृष्टि व आविष्करणाची शैली अपूर्व नव्हे काय !

प्रा. फडके आणि लुकास यांच्या लघुनिबंधाच्या तंत्रांत हें एक विलक्षण साम्य आहे. त्यामुळें लुकासबद्दलचे वुडहौसचे पुढील उद्गार— " He will

take some object so utterly dead and meaningless at first sight, that the very choice of it has an air of grotesquance. And then, by the magic of his art, he will proceed to spin round it-so radiant-a web of thought and fancy, of humour and of pathos, that the thing will seem a miracle. " तंतोतंत प्रा. फडके यांच्याबद्दलहि वापरतां येतील.

एखाद्या मित्राच्या भूमिकेवरून केलेलें हृद्य आत्मनिवेदन तुम्हांला ऐकावयाचें असेल तर 'हरवली म्हणून सांपडली' हा उत्कृष्ट लघुनिबंध बघा. केवळ कपाटाची एक किल्ली ती हरवते काय-? आणि लेखकाच्या गत-जीवनाच्या कमनीय आठवणींच्या खजिन्यांचीं दारें उघडून देणारी सुखद किल्ली सांपडते ती काय? किती चित्ताकर्षक आहे मथळाच हा गुजगोष्टीचा! 'हरवली म्हणून सांपडली' या विरोधाभासामुळेंच आपलें येथें आकृष्ट होतें. उत्सुकता उत्पन्न होतें आणि लेखकाच्या आत्मनिवेदनाच्या रसाळ ओघांत ती उत्कट होत जाते. एका पत्राच्या निमित्तानें प्रा. फडके यांच्या गतायुष्याचीं कपाटेंच उघडूं लागतात. आणि त्यांची विद्यार्थीदशा, त्यांची वक्तृत्वकला, अलगुजाची आवड, त्यांची पारितोषिकें, फार काय त्यांच्या आवडत्या कुत्रीचा पट्टा व मृत्यु इत्यादि अनेक घटनांची रम्य चलत्चित्रे वाचकांच्या डोळ्यासमोर येऊं लागतात. लघुनिबंध म्हणजे 'उघडी खिडकी' ( window opening ) असेंच नाहीं कां पी. जी. वुडहाऊस म्हणत? प्रा. फडके यांचा हा लघुनिबंध म्हणजे त्यांच्या आत्मचरित्ररुपी दालनांत डोकावूं देणारी 'उघडी खिडकी'च आहे. साध्या प्रसंगाने आरंभ झालेली ही गुजगोष्ट जीवनातील मधुर व रम्य सत्याकडे वाचकाच्या मनाला इतक्या सहजतेनें व नकळत घेऊन जाते कीं वाचकच अखेरीस आनंदाने दिग्मूढ होऊन जातो.

अशा या व्यक्तिनिष्ठ लघुनिबंधांत वैयक्तिक स्मृतींना केवढें महत्वाचें स्थान आहे हें स्पष्ट होईल. या चटकदार गुजगोष्टीत उगाच तत्वप्रतिपादनाचा हव्यास नाहीं, गंभीर विषय नाहीं, चर्चा नाहीं. खंडन-मंडन नाहीं. उपरोध नाहीं, उपहास नाहीं. जे आहे ते भावसृष्टीचें मनमोकळें व आकर्षक वर्णन! आणि तेंहि ललितरम्य भाषेंतील! एखाद्या भावगीतकाराला लाभणारी आत्मप्रकटीकरणाची किमया येथें

आढळून येईल. भावना, विचार आणि कल्पना यांचें हें काव्यमय नादमधुर आविष्करण पाहिलें, कीं प्रीस्टलेच्या पुढील उद्‌गारांचीच आठवण व्हावी—

"He is a poet, his instrument laid aside musing over a pipe" आतां हा बघा दुसरा एक मनोज्ञ लघुनिबंध – 'वाट चुकल्याचा आनंद'! नांवच किती मजेदार. वाट चुकल्यावर स्वतःशींच संतापून जाणारा, भलत्या मार्गानें चालून चालून पाय दुखूं लागणारा अनुभवी वाचक क्षणभर बुचकळ्यांत पडतो हा मथळा पाहून. महाबळेश्वरच्या निसर्गरम्य प्रदेशांत लेखक वाट चुकला– होय, रूळलेली वाट चुकला आणि भलत्याच वाटेला लागला. क्षणमात्र भय, चिंता यांनी ग्रस्त झालेले लेखकांचे मन, अभावितपणें निसर्गाच्या अपूर्व सौंदर्यानें ओढून घेतलें गेलें. ठराविकाच्या पलिकडचें, अपेक्षेच्या चाकोरी पलिकडचें विशाल निसर्ग व मानव दर्शन कोणाला आनंद देणार नाहीं! गप्पा मारतां मारतां, निसर्गाचे समोर उभे केलेलें चित्रण अधिक विलोभनीय कीं त्याद्वारें होत असलेलें सूचित जीवन तत्व अधिक चेतोहर याचा संभ्रम वाचकांना पडतो. प्रा. फडके यांच्या कलासक्त पण मर्मज्ञ अंतःकरणाची ओळख येथें पटते. आणि 'कलेकरतां कला' असे आवर्जून सांगणाऱ्या या जादूगाराच्या जीवनविषयक विचारसरणीची जाणीवहि वाचकांना येथेंच होते.

प्रा. फडके यांची 'जुनीं पुस्तकें' ही गुजगोष्ट हातीं घ्या-क्षणभर तुम्ही तुमच्या बालपणाचा पुनः प्रत्यय घ्याल. जुनीं पुस्तकें ही आत्मचरित्राची पृष्ठें कशीं हें कळून येताच किती जाणीवयुक्त आनंद होतो तें बघा. या गुजगोष्टींतून आपणांस फडके यांच्याच गतायुष्यांतील पानें आढळल्याशिवाय रहाणार नाहींत. हॅम्लेट, मायेचा बाजार, गीतारहस्य या जुन्या पुस्तकांच्या स्मरणानेंच प्रा. फडके यांच्या आयुष्यातील कांहीं सोनेरी पानें सळसळूं लागलीं. फडके यांच्या आवडीनिवडी प्रकट होऊं लागल्या आणि त्यांचें हृदय उघडे होऊं लागलें. 'सहल' ही त्यांची आणखी एक रमणीय गुजगोष्ट बघा. ट्रॅव्हेलियनच्या 'On walking' मधील विचाराची मौज येथें आहेच, पण प्रा. फडके यांच्या बहुरंगी

व्यक्तिमत्वाची, त्यांच्या साक्षेपी सौंदर्य समीक्षणाची आणि मोहक शैलीची आपणांस जोड लाभेल. 'सहलीचा' आरंभ जितका खेळीमेळीचा आहे तितकाच तिचा गाभा काव्यात्मकतेचा आहे, आणि शेवट विचारगर्भ आहे. आत्मविष्करणानें आत्मचरित्राच्या जवळ आपण उभे असल्याचा भास होईल तर रम्य कल्पनांच्या साहचर्यानें काव्याच्या एखाद्या नादमधुर स्वप्नील भावगीताच्या धुंदींत आपण जग विसरत आहोत असा संभ्रम होईल. सहलमधील ही बघा बहारदार अखेरी. अशा स्वच्छंदानें, एकट्यानें रमत गमत सहल केली तरच ती खरी सहल. अशा सहलीपासूनच खरा आनंद होतो. इतकेंच नव्हे तर आपली इहलोकीची यात्रा म्हणजे देखील एक सहलच होय, असें माणसानें मानावें म्हणजे तो सुखांत राहील–मी त्याच्या हिताची एकच गुजगोष्ट सांगतों,कीं त्यांनीं जीविताच्या रस्त्यावरून धांवत पळत जाण्याऐवजीं रमत गमत स्वच्छंदाने सर्व सुंदर वस्तूंचा उपभोग घेत सहल करावी. मग सुखाचा शोध निराळा करावयास नको.

या एकाच उताऱ्यांत आपणाला प्रा. फडके यांची सहज मधुर आंजवी भाषा, मित्राची सलगी, जीवनविषयक उमेदीचें तत्वज्ञान दिसत नाहीं काय ?

आतां ही बघा आणखी एक निराळ्या तऱ्हेची गुजगोष्ट. 'एक रात्र आणि एक पहांट'–या लघुनिबंधाचा आरंभ लेखकानें थोड्याशा भारदस्तपणानें ग्रंथाच्या जाती सांगून केलेला आहे. लेखक एक शास्त्रिय स्वरुपाचें गंभीर विषयावरील पुस्तक रात्री वाचीत बसलेला आहे या पुस्तकाच्या लेखकानें निरनिराळे शोध व पुरावे देऊन पृथ्वीचा शेवट लवकरच होणार हा सिद्धांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या शोकगंभीर विचारसरणीचा परिणाम जणू वाचकांच्या मनावर होतो आणि तो कांहीं काल चिंताकुल व भयभीत होतो. याच खिन्न अवस्थेंत कांहीं तास जातात आणि तो झोंपी जातो. पहाटेचा मंगल प्रहर उगवतो. सनईच्या गोड नादलहरी पसरतात, पक्ष्यांची मधुर किलबिल सुरू होते. आणि काय आश्चर्य, त्या पहाटेच्या प्रसन्न वातावरणानें, रात्री लेखकाच्या मनांत निर्माण झालेले विषादाचे किल्मिष नष्ट होतें.

लेखकाचे मन पुन्हां आशावादी होतें. व जीवनांतील विविध रस घेण्यास तें पुढें सरकतें. केवळ 'एक रात्र आणि एक पहाट'! पण या दोन टोकांतील दृष्टिकोनांत केवढें महदंतर! आत्मविष्करणानें उत्कंठा वाढवीत नेणें, आणि प्रसंगाच्या ओघांत व गप्पांच्या एन विणकामांत, जीवनविषयक आशावादाचा विचार-धागा सोडून देणें ही लघुनिबंधकाराची युक्ति येथें यशस्वी झालेली आहे. प्रा. फडके हे आशावादी आहेत, अंधःकारांतूनही त्यांची दृष्टि प्रकाशाचा शोध घेणारी आहे, जीवनाचा विविध रस घेण्याची रसिकता त्यांच्याजवळ आहे याचीच खूणगांठ येथ पटत नाहीं काय?

हाच जीवनविषयक दृष्टिकोन त्यांच्या 'आंबट द्राक्षें' या लघुनिबंधांत आढळून येतो. इसापची सुप्रसिद्ध "कोल्हा व आंबट द्राक्षें" ही बोधकथा प्रा. फडके आपल्यासमोर आरंभी ठेवतात. त्यांतील तात्पर्य मांडतात आणि एखाद्या मिस्किल पण बुद्धिवादी मित्राच्या भूमिकेवरून म्हणतात- 'छे, छे, ही गोष्ट आज थोडी फ़िरवूनच लिहावयास पाहिजे.' जी द्राक्षें आपणास सहजासहजीं मिळत नाहींत तीं आंबट असा शेरा मांडून निघून जाणारे लोक येथें इसापनें दाखविले आहेत. मनुष्य स्वभावाचा हा एक मासला आहे यांत शंकाच नाहीं. पण दुसऱ्याहि मासल्याची कांहीं कांहीं माणसें आहेतच. जे सहजगत्या मिळतें तें चांगलें असले तरी चांगलें नाहीं म्हणून कुरकुर करणारी व दुसऱ्याच्या हाती जें असेल तें चांगलें नसलें तरी तेंच चांगलें आहे असें म्हणून हळहळणारी माणसेंहि या जगांत कांहीं कमी नाहींत. या मानसशास्त्रीय सिद्धांतासाठी प्रा. फडके एक कारकून व एक प्रिन्सिपॉल यांची कथा सांगतात. अनेक उदाहरणें देऊन, गप्पांच्या भरांत स्वमत प्रतिपादन करायचे पण त्याची वाचकांना जाणीवहि होऊं द्यावयाची नाहीं अशी ही कलावंताची छुपी कला आहे.

लघुनिबंधकाराचें हे यशाचें गमकच जणूं आला वुइल्यम्सच्या पुढील शब्दांत आढळून येईलः

"An essay is the most delightfully airy mould of thought, which admits of every literary grace and every high

quality of mind compatible with its essential small men of scale."

प्रा. फडके यांची एक उत्कृष्ट गुजगोष्ट म्हणजे 'पहिला पांढरा केस'. या मार्मिक गुजगोष्टीचा आरंभच किती घरगुती वातावरणांत आणि हंसतखेळत केलेला आहे तो बघावा. "मी एकदम दचकलों अन आरशातल्या स्वतःच्या प्रतिबिंबाकडे अगदी टक लावून पहात राहिलो!

तो माझ्या दृष्टीस पडेल अशी माझी यत्किंचितहि कल्पना नव्हती. त्यामुळें तो दिसतांच मला अत्यंत आश्चर्य वाटलें—मी चांगलाच चपापलों! भांबावून सुद्धां गेलों!"

तो कोण तें तुमच्या लक्षांत आले ना?

डोक्यावरचा पहिला पांढरा केस!..........

लघुनिबंधकार म्हणजे हंसत खेळत गप्पा मारणारा, चहा पितां पितां थट्टामस्करी करीत, सहजच एखाद्या जीवनविषयक तत्वाला स्पर्श करणारा रसिक तत्वज्ञ—इंग्रजींत म्हणूनच लघुनिबंधकाराला "A philosopher on the hearth" (J. B. Priestlay) म्हणतात—ही भूमिका जर शंभर टक्के कुठें आढळत असेल तर ती या उपरोक्त गुजगोष्टींत. दाढी करतांना सहजगत्या डोक्यावर एक पांढरा केस दिसावा—त्या केसानें वार्धक्याचा इशारा द्यावा आणि लेखकाला वाढत्या वयाची व संपत आलेल्या आयुष्याची जाणाव व्हावी अशा प्रसंगांतून हा लघुनिबंध सुरूं होतो—प्रथमदर्शनी तर एखाद्याला वाटायचें कीं या 'नांवांत काय आहे आणि विषयांत तरी काय असणार?' पण चार वाक्यें ओलांडून, संवाद-संभाषण आणि सलगी यांच्यातून आपण थोडें पुढें जातांच आपणांस कळतें कीं यामध्यें लघुनिबंधकाराच्या निव्वळ वायफळ गप्पा नाहींत, जीवनाचा अर्थ विशद करणाऱ्या तात्विक संवादी सुरांचा हा विलास आहे. वृध्यावस्था ही वयावर वा केसाच्या रंगावर अवलंबून नसते. ती मनाच्या अरसिकतेवर आणि पराभूत वृत्तीवर अवलंबून असत. पंचविशी ओलांडणारे अरसिक तरूण हेच अकाली प्रौढत्व प्राप्त झालल महाभाग आहत उलट पन्नाशी उलटली तरी जर तरुणांची इर्षा कायम असेल, जीवनांतील रस–

रंग–रूप यांचा आस्वाद घेणारी रसिकता शिल्लक असेल तर तो मनुष्य खुशाल तरुण मानावा. मग त्याच्या डोक्यावरील केस पांढरे झाले असले तरी हरकत नाहीं. जीवनाकडे बघण्याचा केव्हढा आशावर्धक व उत्साही दृष्टिकोन आहे येथें. लहान मुलांच्या मेळाव्यांत क्षणभर जगाचें राजकारण विसरून तल्लीन होणारे पंडीत जवाहरलाल नेहरू वृद्ध ठरतील काय ! घरगुती भाषेच्या ऐन ओघांत मिस्किलपणें वागडणारा विनोद व उपहास येथें आपणांस पहावयास मिळतो. आत्म-चरित्रकार, गप्पिष्ट-मित्र, मर्मज्ञ-तत्वज्ञ आणि रसिक कवि व कथाकार या सर्वच भूमिका आळी-पाळीनें येथें प्रा. फडके यांनी घेतलेल्या आहेत आणि हा बघा ऐन साठीमध्यें लिहिलेला दुसरा एक चटकदार लघुनिबंध–' बाजार '. केवळ तीन अक्षरीं. एक शब्द उच्चारतांच किती विविध सहचारी कल्पना आपल्या मनांत उसळतात-मग येथें तर हा लेखक म्हणजे एक प्रतिभासिद्ध जादुगार ! लेखक सहज बोलतां बोलतां आपल्याला बाजारच्या गर्दीत नेऊन सोडतो–त्या अफाट जनसमुदायांत आणि भिन्न कोलाहलांत आपण आपलें क्षुद्र व दुबळ व्यक्तिमत्व कसें विसरून जातो या मानसशास्त्रीय घटनेचें किती लोभस दर्शन लेखकानें करून दिलेलें आहे. छप्पन्न रोगावरील रामबाण औषध सांगणाऱ्या डॉक्टरप्रमाणेंच येथे लेखकहि घरांत कोंडी करून बसलेल्या संसारव्यथांनीं दुःखी झालेल्या मानवाला या ' बाजार ' ची हवा खाऊन बरा होण्यास सांगत आहे. या बाजारांत मनुष्यस्वभावाचे कितीतरी नमुने लेखक आपणापुढें उभे करीत आहे. आपल्या मालाची आकर्षक जाहिरात करणारे जसे येथें आहेत तसेंच ' नमुना नमुना ' म्हणून प्रपंचाची आजची गरज भागविणारेहि येथेंच आहेत. मथुरेला बाजारासाठीं जाणाऱ्या गौळणीही येथें आहेत आणि त्यांची वाट अडवून मनोविनोदन करणारे श्रीकृष्णही येथें आहेत. सुखदुःखांची ही एक प्रचंड उलाढाल आहे. या गर्दीत यावें आणि स्वतःला विसरावें हीच तर खरी मौज आहे. जनता संमर्दातही सौहार्द आणि सौंदर्य बघणारी आप्पासाहेबांची व्यापक मनोवृत्ती सहजपणें दिसून येते.

अप्पासाहेब फडके यांच्या लघुनिबंधाचीं उदाहरणें किती द्यावीं ? थोर लघुनिबंधकार हा संपन्न व समृद्ध व्यक्तिमत्वाचा असावा लागतो. त्या दृष्टीनें प्रा.

फडके यांच्या विविध अनुभवांची व अवलोकनांची साक्ष या विविध विषयांवरून सहज दृष्टीस पडते. त्यांच्या कादंबऱ्यांचें अर्धशतक पूर्ण होण्यापूर्वीच त्यांच्या गुज-गोष्टींचें शतक पूर्ण झालेलें आहे. आणि हे शतक निर्विवाद आहे. लघुनिबंधकार म्हणून प्रा. ना. सी. फडके यांचे स्थान पहिल आहे. या क्षेत्रांतील अग्रपूजेचा मान त्यांचा आहे! त्यांच्या साहित्यशास्त्रविषयक विचारांबद्दल आज विद्वानांत मतभेद आहेत पण मतभेद नाहींत फक्त त्यांच्या भावगर्भ आणि मनोज्ञ गुज-गोष्टींबद्दल! त्यांच्या समृद्ध व कलासक्त व्यक्तिमत्वाचा आविष्कार जर संपूर्णतया कुठें होत असेल तर तो लघुनिबंधांतूनच होय. आणि म्हणूनच त्यांच्या परखड शत्रूंना, आणि कठोर टीकाकारांनाही येथें मानाचा मुजराच करावा लागेल. रसिक व सुविद्य महाराष्ट्राच्या शारदेवर साहित्याचे हें 'नवें लेणे' घालून प्रा. फडके यांनीं केलेली स्वतंत्र कामगिरी बघतां, लघुनिबंधकारांचा 'सम्राट' असाच त्यांचा या प्रसंगी जयजयकार होईल.

# प्रा. फडके यांच्या गुजगोष्टी

लेखकः-म. श्री. दीक्षित, पुणें

'कुहू ! कुहू !' नांवाची कादंबरी लिहून प्रा. ना. सी. फडके यांनी आपल्या कादंबरीचे अर्धशतक पुरें केलें ही गोष्ट महाराष्ट्र-सारस्वताला निःसंशय भूषणास्पद आहे. या सुवर्णमहोत्सवी कादंबरीनिमित्त प्रा. फडके यांच्या चहात्यांकडून त्यांचा सत्कार व्हावा हीहि उचित गोष्ट आहे. मराठी ललितवाङ्मयाच्या क्षेत्रांत प्रा. फडके यांच्याइतकी विविध आणि विपुल सेवा करणारा लेखक विरळाच. फडके यांच्या कादंबऱ्यांवर व वाङ्मय-कलाविषयक मतांवर टीका कितीहि होवो, वाचकांचा त्यांना बिलकूल तुटवडा पडत नाही ही सत्य गोष्ट आहे. मराठी वाचकांना फडक्यांनी जेवढी मोहिनी घातली आहे तेवढी कोणीहि घातलेली नाहीं. फडके कांहींहि लिहोत, वाचक तें आवडीने वाचतो. खुद्द फडके यांचा टीकाकारांपेक्षा जबर विश्वास आहे तो रसिक वाचकांवर. त्यांच्या कलंदर मनोवृत्तीस हें साजेसेंच आहे.

दौलत, जादुगार आदि कादंबऱ्यांनी फडके यांच्या लोकप्रियतेस आरंभ झाला. त्या लोकप्रियतेंत अद्याप खंड पडलेला नाहीं. तंत्र, कथानक व वातावरण यांच्यांत भासमान होणारा कांहींसा तोचतोचपणा लक्षांत घेऊनहि असें म्हणावेसें वाटतें कीं, त्यांची नवी कादंबरी अद्यापहि आवडीने वाचली जाते व रसिक मन रमवून टाकते. तंत्रकौशल्य, सरस स्वभावचित्रण, सजीव वातावरणनिर्मिति, संवादचातुर्य आणि सहजरम्य अशी मधुर भाषाशैली ही फडक्यांची आयुधें जिथपर्यंत धारदार आहेत तिथपर्यंत त्यांची कादंबरी टवटवीतच रहाणार आहे. मत्सरग्रस्त टीकाकारांनी तिला 'पाडण्या' चा यत्न केला तरी रसिक वाचक ती पडू देत नाहींत असा अनुभव आहे. हरीभाऊ सोडले तर कादंबरीच्या क्षेत्रांत फडक्यांइतकी योग्यता व लोकप्रियता अन्य कोणाच्याहि वाट्याला आलेली नाही.

प्रा. फडके यांच्या वाङमयाचा मी चहाता आहे तो केवळ त्यांच्या कादंबऱ्यांची मनावर भुरळ आहे म्हणून नव्हे. त्यांची रसिकता, कलाप्रेम, पुरोगामी

विचारसरणी, निर्भिड मतप्रतिपादनाची वृत्ति इत्यादि गुणांचाहि मी चहाता आहे. त्यांनीं सातत्याने केलेली विपुल आणि विविध अशी ललितसाहित्यसेवा मनाला अशीच भुरळ पाडणारी आहे. दीडशेंच्यावर पुस्तकें लिहून प्रा. फडके यांनीं आजवर जे विविध विषय व विविध वाङ्मयप्रकार यशस्वीपणें हाताळले त्याला मराठी वाङ्मयांत तरी तोड सापडणार नाही. काव्य आणि नाटक या क्षेत्रांतहि त्यांनीं हौसेखातर संचार केला. पण तिथें ते यशस्वी होऊ शकले नाहीत. तथापि काव्यमय वृत्ति आणि नाट्यप्रेम या दोन गुणांचा आढळ त्यांच्या वाङ्मयांत भरपूर आढळतो. कथा, कादंबरी, ललितनिबंध, चरित्र, टीका या क्षेत्रांतील गेल्या पंचवीसतीस वर्षांतील त्यांची सेवा इतकी भरघोस आहे की त्यांना आधुनिक मराठी ललितवाङ्मयाचे कालिदास म्हणण्यास रसिक व उदार अंतःकरणाची हरकत नसावी. विशेषतः कथा, कादंबरी व निबंध या क्षेत्रांत त्यांनी जी क्रांती केली व या प्रकारांना एक नवें आकर्षण कलात्मक स्वरूप प्राप्त करून दिलें त्याचें मोल फार आहे. प्रा. फडके यांना मार्मिक सौंदर्यदृष्टीचें व अकृत्रिम मोहक भाषाशैलीचें असें आगळे देणं लाभलें आहे की, त्यांच्या जोरावर त्यांनी कांहीहि लिहिलें तरी त्यावर रसिक वाचक लुब्ध होतो. गायकाचें व्यक्तिचित्र असो, प्रवासवर्णन असो, जुन्या आठवणी असोत, टीकाकारांना उत्तर असो की एकाद्या क्रिकेटच्या सामन्याचें वर्णन असो फडके हे सारे प्रकार मैफल रंगवावी अशा कसबाने रंगवतात.

प्रा. फडके यांच्या वाङ्मयीन लोकप्रियतेचें रहस्य माझ्या मतें त्यांच्या रसिक सौंदर्यदृष्टींत व बहुढंगी सुखलोलुप वृत्तींत आहे. मानसशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांचे पदवीधर असल्यामुळे त्यांचें मनुष्यस्वभावाचें निरीक्षण सखोल व साक्षपी आहे. प्रवासाची तर त्यांना उदंड हौस. ललितकलांपैकी प्रायः सर्व प्रकारांचे ते भोक्ते आहेत. संगीत, चित्र, नृत्य या विषयांत अधिकारवाणीनें लिहावें—बोलावें इतकी योग्यता त्यांनी प्राप्त करून घेतली आहे. त्यांचे क्रिकेटप्रेम तर सर्वश्रुत आहे. फडक्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सर्वसामान्य व्यवहारी माणसाप्रमाणें

प्रवृत्तिवादी व सुखलोलुप असल्यामुळेंच सामान्य वाचकावर त्यांच्या वाङ्मयाची जबरदस्त मोहिनी पडते. जीवन दुःखमय आहे. त्याचा विसर पाडून घटका दोन घटका मनाला विरंगुळा पाडणारं वाङ्मय वाचकाला हवं असतं. जें जीवनांत असतं तें वाङ्मयांत रेखाटलं कीं वास्तव ठरतं, पण रुचकर लागत नाहीं हें सत्य आहे. फडक्यांचा भर काय सांगितलं आहे यापेक्षां कसं सांगितलं आहे यावर असतो याचं इंगित हेंच आहे. सुखासाठीं धडपडणाऱ्या सामान्य रसिक वाचकांसाठीं फडके लिहितात ही गोष्ट विद्वान् टीकाकार विसरतात आणि म्हणून त्यांना फडक्यांच्या लोकप्रियतेचा अचंबा वाटतो.

लेखणीप्रमाणें अप्पासाहेबांची वाणीहि कलाकुशल आहे. कर्तृत्वाकडे ते कला या दृष्टीने बघतात व या कलेची त्यांनी पद्धतशीर जोपासना केलेली आढळते. सोपें, तर्कशुद्ध, प्रमाणबद्ध व परिणामकारक बोलावें तर तें अप्पासाहेबांनीच. कृत्रिमपणाला किंवा नाटकीपणाला त्यांच्या बोलण्यांत बिलकूल वाव नसतो. जें बोलायचें ते तयारी करून, व निभिडपणें असा त्यांचा खाक्या असतो. आपल्या मतप्रतिपादनाने कोणी दुखावले जाईल याची त्यांना पर्वा नसते. एकाद्या व्यक्तिचा मोठेपणा सांगतांना तिचा उणेपणाहि ते परखडपणें सांगतात. विषयाला सोडून तर ते कधीच बोलणार नाहीत. भाषणाच्या ओघांत एखादा विचार किंवा मत ठासून सांगतांना ते वाक्यरचना अशी करतात की जणू तें एकादें सुभाषितच वाटावें. 'मार्मिक' हें विशेषण आजकाल फार सैलपणें वापरलें जातें. त्याचा रास्त उपयोग करायचा झाल्यास मी तें विशेषण अप्पासाहेबांच्या वक्तृत्वाला उद्देशून वापरीन. त्यांचे भाषण जितकें आटोपशीर, डौलदार व परिणामकारक असतें तितकेंच मनोरंजकहि असते. श्रोता कंटाळला, जांभया देऊ लागला असा प्रसंग त्यांच्या भाषणप्रसंगीं कदापि येत नाही. अप्पासाहेबांचे भाषण म्हणजे बौद्धिक आनंदाची एक मेजवानीच असते.

फडक्यांच्या कादंबऱ्यांपैकीं दौलत, जादुगार, उद्धार, प्रवासी, अखेरचे बंड इत्यादि कादंबऱ्या माझ्या विशेष आवडीच्या आहेत. तथापि या कादंबऱ्यापेक्षांहि मला विशेष आवडणारा त्यांचा वाङ्मयप्रकार म्हणजे त्यांच्या गुजगोष्टी. फडक्यांनी 'रत्नाकरां'तं लिहिलेल्या गुजगोष्टी म्हणजे आजच्या लघुनिबंधाचा

वा ललितनिबंधाचा प्रारंभ होय. गुजगोष्टी निर्माण केली फडक्यांनी व ती लोकप्रिय केली त्यांनीच. गुजगोष्ट लिहावी तर अप्पासाहेबांनीच असं सुद्धां मी म्हणेन. त्यांच्या-शिवाय हा प्रकार क्वचितच कुणी हाताळला असेल. यशस्वी नाट्यछटा ज्याप्रमाणें फक्त दिवाकरांनी लिहिली त्याचप्रमाणें यशस्वी गुजगोष्ट फक्त अप्पासाहेबांनी लिहिली. १९४२–४३ सालीं कॉलेजांत असतांना आमच्या अभ्यासक्रमांत 'गुजगोष्टी' चा अंतर्भाव होता, आणि हा नवीन नाजुक ललितवाङ्मयाचा प्रकार शिकवीत असत डॉ. शं. दा. पेंडसे. डॉ. पेंडसे म्हणजे मूर्तिमंत पांडित्य आणि ओजस्वी वक्तृत्व. तरूण विद्यार्थ्यांना त्यांचा धाक फार वाटे. फडक्यांच्या 'गुजगोष्टी' शिकवण्यापेक्षां डॉक्टरांनी चिपळूणकरांचे निबंध किंवा मोरोपंती वेंचे शिकवावेत अशी साधारणपणे अपेक्षा असे. त्यांतून द्वितीय लग्नसंबंधामुळे फडके त्यावेळी टीकेचा विषय झालेले होते. डॉ. पेंडसां-नाहि हें लग्न पसंत नव्हते. धर्म, नीति, चारित्र्य इत्यादि विषयांच्या संदर्भात त्यांनी या लग्नाबद्दल एकदा वर्गातहि नापसंती व्यक्त केली होती. तेंव्हा 'गुजगोष्टी' ते कसे काय शिकवितात अशी आम्हा विद्यार्थीवर्गास जिज्ञासा लागून राहिली होती.

होता होता एक दिवस डॉ. पेंडश्यांनी 'गुजगोष्टीं' चे पुस्तक उघडलें व 'सुहास्य' ही पहिलीच गोष्ट ते खणखणीतपणें वाचून दाखवू लागले. वीशीपंचविशीतले आम्ही विद्यार्थी एकेका गोष्टीत रंगू लागलो यांत नवल तें काय ? पण खुद्द डॉ. पेंडसेहि फडक्यांच्या गुजगोष्टी शिकवतांना हळूहळू रस घेऊ लागले, रंगू लागले आणि या अवीट वाङ्मयप्रकाराची मोकळेपणाने प्रशंसा करू लागले. सामान्य रसिकास मोहून टाकणाऱ्या गुजगोष्टींनी विद्वान पंडिताच्या रसिकतेसहि मोहांत पाडले. मोरोपंताने रामजोशीची पाठ थोपटावी असाच हा प्रकार झाला. त्या काळानंतर फडक्यांच्या गुजगोष्टी मी पुन्हा वाचल्या नव्हत्या. तथापि त्यातील विचारसौंदर्य व शैली यांची आठवण कायम होती. प्रस्तुत लेख लिहि-ण्याच्या निमित्ताने त्या गोष्टींचा मी पुन्हा एकदा आस्वाद घेतला. मला त्या पूर्वीपेक्षांहि सुरस वाटल्या व आवडल्या.

फडक्यांनी ज्या काळांत आपल्या गुजगोष्टी लिहिल्या तो काळ आतां मागे

पडला आहे. गेल्या वीस वर्षांत त्यांनीं एकादीच गोष्ट लिहीली असावी. साधारणपणें पंचवीस ते चाळीस वयाच्या दरम्यान त्यांनीं आपल्या उत्कृष्ट गोष्टी लिहील्याचें दिसतें. ते स्वतः गुजगोष्टींचे निर्माते असल्यामुळें या प्रकाराचें तंत्रहि त्यांनींच बसविलें आहे. 'मार्मिक आणि नवे विचार आणि ते पुढे मांडण्याचें लालित्य ही गुजगोष्टी लिहिण्याची मुख्य सामग्री होय.' हें मुख्य सूत्र सांगून या तंत्राचे पुढील शद्बांत ते विशदीकरण करतात—'गुजगोष्ट म्हणजे निबंधाचाच प्रकार खरा. पण या लेखनप्रकाराचें स्वरूप, निबंधापेक्षां निकटवर्ती मित्राशी केलेल्या गुजगोष्टीसारखें अधिक असावे हें दर्शवावें. या लेखनप्रकारांत मार्मिक विचारास अवकाश असतो, पण एकाद्या विषयाचा सांगोपांग विचार करण्याची खटपट केली तर ती सौंदर्यविघातक ठरते. तसेंच या लेखनप्रकाराची खरी शोभा उपमालंकारांवाचून प्रकट होत नाहीं. पण काव्याचा अतिरेक त्यास यत्किंचितही खपत नाहीं. चमत्कृति हा गुजगोष्टीचा आत्मा होय. ही चमत्कृति विषयाच्या निवडींत असावी किंवा त्यांत नसेल तर गोष्टीच्या ओघांत आणावी. पण या चमत्कृतीपेक्षाही अधिक महत्त्वाचें तंत्र म्हणजे तिच्यांत प्रकट होणारी वृत्ती आणि तिची भाषा. लेखन व वाचक यांजमधील अंतर जितकें नाहींसें झाल्यासारखें गुजगोष्टींत वाटेल तितकी ती सरस वठेल.'

फडक्यांनी स्वतःच्या शब्दांत गुजगोष्टीचें जें तंत्र सांगितलें व तिच्या यशाचें मर्म सांगितलें त्या कसोटीला त्यांच्या गुजगोष्टी किती उतरतात तें पाहू. प्रा. फडके हे प्रतिभावान व व्यासंगी लेखक असल्यामुळे व त्यांची एक विशिष्ट जीवनदृष्टि असल्यामुळे त्यांचेजवळ सांगण्यासारखे खूप आहे. त्यांच्या वाङ्मयीन व कलात्मक अशा समृद्ध जीवनाचें प्रतिबिंबच त्यांच्या गुजगोष्टींतून पहावयास सापडते. त्यांची कोणतीहि गुजगोष्ट वाचा. मार्मिक व नवा विचार तींत हटकून सांगितलेला असतो. हा विचार वाचकाच्या अंतःकरणावर बिंबवण्यासाठीं ते त्याच्याशी अगदी आपुलकीने हितगुज करतात. गोष्ट वाचतांना फडके आपल्याशी बोलत आहेत असा पदोपदी भास होतो. बरं, जो नवा मार्मिक विचार सांगायचा तो पटवण्यापूर्वी उपमादृष्टांतादि साधनांचा वापर

करून विषयाची ते अशी कांहीं मोहक खुलावट करतात कीं वाचकाला विषयाच्या ओघातच तो विचार पटतो. फडक्यांचे हे विचार सुभाषितवजा अर्थपूर्ण वाक्यांनी किंवा अलंकारित भाषेत व्यक्त होतात हें त्या विचारांचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. कित्येकदा गुजगोष्टीची अखेर करतांना व्यावहारिक व तात्त्विक विचारांतील संगतीहि ते चातुर्यानें दाखवतात. 'विरह' या गोष्टींतील पुढील विचार या दृष्टीने किती अर्थपूर्ण आहे पहा—'सहवाससुखांत नाविन्याचें माधुर्य उत्पन्न करण्याचा हा विरहाचा धर्म पाहिला व पुनर्जन्मावर विश्वास असला तर मृत्यू ही गोष्टदेखील भयप्रद वाटण्याचें कारण उरणार नाही.' "सहल' या गोष्टीचा शेवटहि असाच अर्थपूर्ण आहे. विचारांचे नाविन्य आणि ते व्यक्त करण्याचें सौंदर्य ही दोन त्यांच्या गुजगोष्टींची अजोड वैशिष्ट्यें आहेत.

फडक्यांची वृत्ति नी शैली यांचा परिपाकच त्यांच्या गुजगोष्टीतून झालेला आढळतो. त्यांच्या गुजगोष्टींना त्यांच्याच शब्दांत उपमा द्यायची तर 'रसदार मधुर काबुली द्राक्षांची' द्यावी लागेल. गुजगोष्टीचा आरंभ व अखेर ते एखाद्या मार्मिक विचारानें किंवा आकर्षक वर्णनानें करतात प्रथमदर्शनी प्रेम बसावें त्याप्रमाणें त्यांची गुजगोष्ट पहिल्याच परिच्छेदाने चित्त खेचून घेते. 'ऐन पंचविशी' या गोष्टीची ही बहारदार सुरुवात पहा— 'समुद्र अतिशय खवळलेला होता. वारा असा सोसाट्याचा सुटला होता कीं, किनाऱ्यावर उभ्या असलेल्या स्त्रियांना आपलें पदर व केस सावरतां सावरतां पुरेवाट झाली होती, आणि त्यांच्या त्या संभ्रमाकडे पुरुषमंडळींच्या चोरट्या नजरा पुनःपुन्हा धावत होत्या' सुहास्याची महती सांगतांना या गुजगोष्टीच्या अखेरीस ते लिहितात की, 'सुहास्य केवळ काव्यविषय नसून उच्च धर्मतत्व आहे. त्याचें आचरण प्रत्येकाने करावें. सर्व स्त्रीपुरुष सुहास्यवदन झाले तर सृष्टीची नुसती शोभाच वाढणार नाही, तर संसार अधिक धर्ममय होईल. खरं सौंदर्य आणि खरा धर्म हीं परस्परविरोधी नसतात ही गोष्ट सिद्ध करण्याचें सामर्थ्य सहस्र प्रवचनांत नसेल, पण सुहास्यवदनांत खचित आहे!'

गुजगोष्टींत फडक्यांची व्यक्त होणारी दृष्टि केवळ सौंदर्यवादीच नाहीं तर व्यवहारी आहे, ऐहिक आहे. जीवनांत सौंदर्य कसें शोधावें, नीटनेटकेपणानें व

सुखानें कसें रहावें, मौज कशी लुटावी इत्यादि विचारांची पखरण सर्वत्र आढळते. 'सुहास्य' व 'बालवृत्ति' या गोष्टींतून मुख्यतः हीच विचारसरणी मांडली आहे. पण ती मांडतांना जुन्या निबंधातील पांडित्य त्यांनी कुठेहि येऊ दिलेलें नाही. उलट प्रसन्न व मधुर भाषाशैलीने व मिस्कील विनोदानें त्यांनी या गोष्टी सजविल्या आहेत. चमत्कृतीचा वापर करून वाचकांना चकविण्याचा यत्न 'ऐन पंचविशी' या गोष्टीत चांगला साधला आहे. वरवर पहाता गद्धे पंचविशीतील प्रमादांचा इशारा देण्यासाठी ही गोष्ट लिहिली असेल असें वाटतें. पण गोष्टीत ऐन पंचविशीतील उद्दाम वृत्तीचें लाडकें समर्थन असून तरुणांना नांवें ठेवणाऱ्या वृद्धांच्या मनोवृत्तीवर प्रेमळ टीका आहे. फडक्यांना जीर्ण आचारांची व सामाजिक ढोंगाची अतिशय चीड आहे. मिरव्या पांडित्याशी तर त्यांचा उभा दावा. वाचलेल्या ग्रंथांपेक्षा 'न वाचलेल्या ग्रंथांची गोडी' त्यांना पुष्कळदा अधिक वाटते व कित्येकदा 'अज्ञानाची महती' हि त्यांना सुखावह वाटते. रूढ समजुतीला धक्का देऊन सुखाचा किंवा आशेचा नवा आशय दाखविण्याचें कसब 'विरह', 'मैत्री', 'सहल' इत्यादि गोष्टींतून चांगले व्यक्त होते. 'पाऊस' ही गोष्ट काव्यात्मकतेच्या दृष्टीने अतिशय बहारीची उतरली आहे. तंत्रदृष्ट्या सर्वोत्कृष्ट गोष्ट कोणती असें मला विचारले तर 'हरवली म्हणून सांपडली' या गोष्टीचा मी उल्लेख करीन. 'एक रात्र आणि पहाट' या गोष्टीतील गूढ रम्यता मनाला रमवून टाकते. जड वस्तूतहि सौंदर्य शोधणारी फडक्यांची वृत्ति 'शाई' या गोष्टीत नुसती फुलून आली आहे. शिशवींत डौलाने चमकणाऱ्या शाईचें अप्रतिम वर्णन अतिशय हृदयंगम उतरलें आहे. 'शाई' आणि 'ऐन पंचविशी' या गोष्टींमधील भाषा आणि कल्पकता तर थेट गडकरी छापाची वाटते. तथापि फडक्यांच्या खास भाषाशैलीचा विलास आढळतो तो सुहास्य, अलंकार, विरह, मित्र, पाऊस इत्यादि गुजगोष्टींतून. सुरस, अर्थपूर्ण व अलंकारित वाक्यांच्या खरातीनें वाचकांस होणारा आनंद केवळ अनुपम असा आहे.

विचारसौंदर्य आणि मनोरम भाषाशैली या दृष्टीनें 'मित्र' या गुजगोष्टीतील पुढील परिच्छेद किती बहारीचा आहे तें वाचा— 'प्रशंसा व मित्रभाव'

या भिन्न गोष्टी आहेत. योग्यवेळीं खरा मित्र प्रशंसा करील हें सांगावयासच नको. आणि खऱ्या मित्राकडून मिळालेल्या प्रशंसेच्या शब्दाचीच काय, पण नुसत्या दृष्टिक्षेपाची सर दुसऱ्या कसल्याही पारितोषकाला येणें शक्य नाही हेंही खास. परंतु कारण नसतांना प्रशंसा करण हा खऱ्या मित्राचा धर्मच नव्हे. वी णे च्या ता रां व रू न के व्हां हि चो ट फि र वि लें त री त्यांतून आपल्याला आल्हाद देणारा मधुर नादच निघतो. पण खऱ्या मित्राच्या हृदयाच्या तारा अशा नसतात. आपण सत्कृत्य केलें तर त्या तारांतून गौरवाचे गोड शब्द निघतील, पण आपण चुकत असलों तर अनुशासनाचा गंभीर शब्द त्यांतून निघाल्याखेरीज राहणार नाहीं. सदासर्वदा नम्र भाषणांनीं रिझविणें हें मित्राचें कार्य नाही. आपुलें चुकतें पाऊल जो फिरवितो आणि जाणारा तोल जो सांवरतों तोच आपला खरा मित्र होय. मित्र म्हणजे केवळ आपल्या जीविताचे अलंकार नव्हेत. आपल्या जीवितप्रवाहाला योग्य वळण देणारे ते तट आहेत. 'आपल्याला सुखविण्याच्या वेळीं जो कुसुमाहून मृदु असतो आणि आपल्याला जागृत ठेवण्याच्यावेळीं जो वज्राहून कठिण होतो तो खरा मित्र.'

फडक्यांच्या गुजगोष्टींचे आणखी एक प्रधानअंग जें—उपमादृष्टांतादि अलंकार किंवा चतशीर काव्यमय भाषा त्यांची कांहीं उदाहरणें या ठिकाणीं मुद्दाम देत आहे. 'सुहास्य'–हंसतमुख हें उमलल्या कळीप्रमाणे किंवा चतुर्थीच्या चंद्रकले-प्रमाणे आहे. विचार किंवा मतें हीं मधाप्रमाणे होत. एका अंतःकरणांतून दुसऱ्या अंतःकरणांत त्यांचे प्रसरण व्हावयास उशीर लागतो. भावना किंवा विकार मात्र तैलबिंदुप्रमाणें शीघ्रगामी असतात. मानवी शरीरांतील रोग घाल-विण्याचें सामर्थ्य सूर्यप्रकाशांत आहे, त्याचप्रमाणें लोकांची कुढणारीं मनें प्रफुल्लित करण्याची शक्ति सुहास्यमुखी मनुष्यांत आहे. 'बालवृत्ति'–या संसारांत लहानमोठा प्रत्येक मनुष्य कोणत्या तरी एकाद्या खेळण्याच्या नादीं लाग-लेला असतो. 'संसार'–संसार सत्य समजून त्यांतील सुखदुःखांस सारख्याच तयारीनें आणि खुषीनें तोंड दिलें तर तें काय वाईट? पायाचें रक्षण करून सौख्य देणारा जोडा पायाला थोडासा लागूं लागला तर तो त्रास होऊ नये म्हणून जोडाच मिथ्या आहे असें मानू लागण्यांत काय स्वारस्य आहे? 'विरह'– दूरच्या

प्रवासाची पूर्णता करून मातृभूमीला परत आलें की, ती अधिकच आकर्षक व प्रिय वाटू लागते, तद्वत् विरहाच्या कालानंतर प्रेमवस्तूचा सहवास अधिकच मधुर होतो. ' शाई '—शिशवीच्या आंत डौलानें चमकणाऱ्या त्या मनोहर जांभळ्या द्रवाकडे पहातच रहावेसें वाटतें मला. एकाद्या मोत्यातील पाणी चमकावें तसा तो द्रव पदार्थ दिसत होता. शर्यतीच्या मैदानांत सुटण्यास अधीर झालेल्या अश्वराजानें साईसाच्या हाताला हिसके द्यावे व खुरांनी जमीन खरडावी त्याप्रमाणें तो द्रव पदार्थ अधिरतेनें उचंबळत होता. ' मित्र '—एकाद्याचा अधिक सहवास झाला की, लगेच त्याचा मित्र म्हणून उल्लेख करण्यांत येतो. जणू काय मैत्री हें सहवासाच्या वेलीला हमखास येणारें फळच आहे. सहवास वाढला की, त्या मानाने स्नेह उत्पन्न झालाच पाहिजे असें समजणें म्हणजे जाईची वेल मांडवावर पोचण्याइतकी वाढली की, तिला बहर आलाच पाहिजे असें म्हणण्यासारखें आहे. ' न वाचलेल्या ग्रंथांची गोडी '—जिंकलेल्या लढायांपेक्षा योजलेल्या युद्धांच्या धुमश्चक्रीची कल्पनाचित्रेंच वीरपुरुषांस मोठी चित्तवेधक वाटत असतात. ' सहल ' – ताशी चार मैलांच्या चालीला सहल म्हणायचें म्हणजे मारवाडणीच्या अंगाखांद्यावरच्या सोन्याच्या ओझ्याला अलंकार समजण्यासारखें आहे.

पहिल्या पावसाचे फडके यांनी केलेलें काव्यमय वर्णन किती हृदयंगम आहे पहा—' आणि अशा वेळी वर्षाऋतुतील पहिला पाऊस आला की, तो क्षणांत केवढी क्रांति करून टाकतो ! वृक्षांची पानें एकदम टवटवीत होतात, मैदानावरची सुकलेली हिरवळ एकदम तेजस्वी दिसू लागते, भूभागावरची खेदाची व उदासपणाची धूळ दाबली जाऊन तेथे ताजेपणा उत्पन्न होतो, आणि दशदिशांत एक प्रकारचें मांगल्य भरल्यासारखें वाटू लागतें. मी तर पावसाच्या मंगल घटिकेची प्रतिवर्षी चातका इतक्याच उत्कंठेने वाट पहात असतों. भूगर्भात अनंत चमत्कार आहेत यांत संशयच नाहीं; परंतु विलासमंदिरांतलीं सारीं अत्तरें ज्यापुढें कवडीमोल ठरतील अशा सुगंधाचा जो चमत्कार वर्षाकालाच्या पहिल्या धारांच्या स्पर्शाबरोबर भूगर्भातून बाहेर पडतो त्याचें वर्णन कोणाची लेखणी करू शकेल ? जलधारांच्या पहिल्या

धुटक्याबरोबर हवेंत दरवळणाऱ्या त्या मृत्तिकागंधाला, स्तनपान करताच मस्त आनंदाने–चळवणाऱ्या बालकाच्या निःश्वासाचीच उपमा साजेल!'

मार्मिक नवे विचार, भाषालालित्य, उपमादृष्टांतादि अलंकार, सौंदर्यदृष्टि, काव्यमय वर्णनें, तत्त्वचिंतन इत्यादि गुणांनी समृद्ध असणारी फडक्यांची गुजगोष्ट मराठी सारस्वताचा एक सुंदर चमकदार अलंकार आहे. या गोष्टींतून व्यक्त होणारी लेखकाची आनंदी व खेळकर वृत्तीहि अशीच विलोभनीय आहे. गुजगोष्ट लिहिणे हें येरा गबाळाचें काम नोहे. गुजगोष्ट लिहिण्यास जें संपन्न व्यक्तिमत्व व रसाळ शैली लागते तिचें वरदान फडक्यांना चांगले लाभले आहे. 'गुजगोष्टी' सदृश लघुनिबंध वा ललितनिबंध अनेकांनी लिहिले आहेत. तथापि गुजगोष्ट ती गुजगोष्टच. तिचें असें खास तंत्र आहे, स्वरूप आहे. अप्पासाहेबांखेरीज इतरांना गुजगोष्ट लिहिणें न जमल्यानें तिचा कालहि नाट्यछटेप्रमाणें मागे पडला आहे. गुजगोष्ट लघुनिबंध होऊ शकत नाहीं. कारण लघुनिबंध हा लघुकथेला जवळचा वाटतो तर गुजगोष्ट म्हणजे जुन्या निबंधाचे सुटसुटीत व ललितस्वरूप आहे. भाषाविलासाला लघुनिबंधांत वाव नाहीं. गुजगोष्ट हीं भाषासुंदरीच्या अंगाखांद्यावरच खेळू शकते. जुन्या निबंधाप्रमाणें विचारांच्या खंडनमंडणाला गुजगोष्टींत जरूर अवसर आहे. पाल्हाळ न करतां लालित्याच्या पुष्पधनूने तें करावें लागतें एवढेंच. प्रा. फडके एकेकाळी अशा गुजगोष्टीं लिहून गेले. तशा गोष्टी त्यांचे हातूनहि आता पुन्हा लिहिल्या जातील की नाहीं याची शंका वाटते.

ग्रं. क्र. १०८८२

# प्रा. फडके : व्यक्तिमत्व आणि शैली

ले. प्रा. श्री. के. क्षीरसागर

१९४० पासून मराठी वाङमयात नवी पिढी सुरू झालीं असें म्हटलें जाते. तथापि गेलीं चाळीस वर्षं मराठी वाचकापुढें असलेले, मराठी वाचकांना प्रिय असलेले, व मराठीं वाङमयावर-निदान शैलीवर-चिरस्थायी परिणाम घडविणारें जे थोडे लेखक सांगतां येतील त्यांत प्रा. ना. सी. फडके यांचे नांव बहुदा अग्रगण्य ठरेल. प्रा. फडके यांनीं ललितसाहित्य लिहिणें आणि तर्क-प्रधान साहित्यही लालित्यानें लिहिणे एवढा एकच प्रमुख उद्योग आपल्या ह्यातींत केला असें म्हटलें, तर चुकीचे होणार नाहीं. तर्कप्रधान साहित्यांत लालित्याची लज्जत आणण्याचा जो मी निर्देश केला, तो निर्देश करीत असतां, फडक्यांचें आज प्रायः विसरलेले पुस्तक माझ्या मनासमोर होतें. तें म्हणजे डॉ. गणपुले ह्यांच्या सहकार्यानें त्यांनीं लिहिलेले मानसोपचारा-विषयीचे पुस्तक होय. 'प्रतिभा-साधन' हे त्यांचे प्रख्यात पुस्तकही मी याच वर्गांत घालीन. ललित वाङ्मयाचा तर्कशास्त्राशी संबंध फारसा नसला, तरी ललित वाङ्मयाची शास्त्रीय मीमांसा तर्कशास्त्राच्या क्षेत्रातच मोडते. पण ती चर्चा प्रतिभा-साधन या पुस्तकांत इतकी चित्तवेधक बनली आहे कीं, वस्तुतः शास्त्रीय चर्चेचें असलेले हें पुस्तक तरुण वाचक कादंबरीसारखें वाचून काढतात. शास्त्रीयतेचा बाऊ न वाटता वाचली जाणारी जी अगदी थोडी शास्त्रीय मराठी पुस्तकें आहेत, त्यांत प्रतिभा-साधन हें प्रमुख आहे. थोडी चमत्कारिक तुलनाच करायची म्हटली तर जुन्या पिढीचें ज्योतिषशास्त्रत कै. दिक्षित यांच्या 'ज्योर्तिविलास' या पुस्तकाशींच 'प्रतिभा-साधन' या पुस्तकाची तुलना करावी लागेल.

कोणताही विषय चटकदार करण्याची फडके यांचीं एक विशिष्ट तऱ्हा आहे. फडके शास्त्रीय विषय चटकदार करतात असें जेव्हां मी म्हणतो तेव्हां मराठींत त्यांच्याखेरीज कोणीही शास्त्रीय विषय चटकदार केलेले नाहींत, असें मला अर्थातच म्हणावयाचें नाहीं. पण फडक्यांची एक खास वेगळीं तऱ्हा,

आहे. त्यांचें व्याख्यान असो लेख असो कीं पुस्तक असो, त्यांच्या प्रतिपादनांत एक हुकमी प्रसन्नता असतें. माझ्या-सारख्या-स्वतःचीं मतें असलेल्या-प्रौढ वाचकाला मतभेद, विवाद्यता आणि क्वचित विसंगति जाणवत असूनहि फडक्यांची प्रसन्नताच त्यांच्या लिखाणांत अधिक जाणवतें. मग ज्यांच्या मनावर स्वतःच्या मतांचें ओझें नाहीं अशा तरुण वाचकांच्या बाबतींत त्यांच्या लेखनातली लाघवी शैली आणि प्रसन्न वृत्ति किती संसर्गकारी ठरत असेल याची कल्पना सहज करतां येईल. त्यांची ही ' कॉन्टेजस् ' प्रसन्नता त्यांच्या व्याख्यानांत तर थोडी फार मादकही ठरतें. श्रोत्यांना एका स्वच्छ, सुस्पष्ट, प्रसन्न आणि सहज-स्वीकार्य अशा दृष्टीकोनाजवळ आणून पोहचविणें—अगदीं हंसत नाचत हाताला धरून ओढीत-नेऊन पोहचविणें हें त्यांचे तंत्र असतें. त्यांना आपल्या प्रमेयासंबंधी संदेह नसतो; त्यांना आपल्या कलात्मक मांडणीसंबंधीं विश्वास असतो. आणि प्रतिपक्षाच्या आक्षेपासंबंधीं त्यांना फारशी पर्वा नसते. आणि म्हणूनच त्यांचें प्रतिपादन एखाद्या लाडावलेल्या बालिकेप्रमाणें आपल्याच ढंगांत चालत असते.

प्रतिपादन आकर्षक करण्याचा हा एकच मार्ग आहे असें नव्हे, हे मी सांगितलेंच आहे. अत्रे आपलें प्रतिपादन विनोदानें आकर्षक करतील; तर केतकर राजवाड्यांसारखें पंडित पदोपदींच्या आव्हानानीं वाचकांच्या विचार-शक्तीला धक्के देतील व जाग आणतील. ते बौद्धिकदृष्ट्या आळशीं असलेल्या वाचकांची गय करणार नाहींत, — त्यांची झोपमोड होईल म्हणून भिणार नाहींत. पेंगत असलेल्या बहुसंख्य वाचकांच्या मस्तकावर बर्फ-मिश्रित पाणी शिंपडणें हेंच केतकर संप्रदायी लेखकांचे झणझणीत तंत्र असते ! किंबहुना शास्त्रीय प्रतिपादन आकर्षक करण्याचें महाराष्ट्रांत दोन भिन्न पंथच आढळतील. एक पंथ एक प्रकारची गुंगी आणून आपले विचार सामान्य वाचकांच्या गळी उतरविणारा, तर दुसरा पंथ वाचक गुंगला नाहीं तरी चालेल; आपले विचार प्रथमदर्शनी अग्राह्य वाटलें तरी चालतील; पण जुन्या-पुराण्या गृहीत कृत्यांच्या फाटक्या दुलईतून वाचकाला बाहेर ओढून काढावयाचें हा दुसऱ्या पंथाचा खाक्या आढळतो. गणपुल्यांच्या मानसोपचारामुळें असो कीं मूळच्याच

' जादुगार ' वृत्तीमुळें असो फडके या दोहोपैकीं पहिले तंत्र अधिक पसंत करतात असे मला वाटतें. वाचकाला एक प्रकारची गुंगी आणून नंतर आपला दिर्घ विचारानें ठरलेला मंत्र त्यांच्या कानांत फुंकणें फडक्यांना अधिक मानवतें ! या तंत्रानें बुद्धिमान वाचकाला विचाराला प्रवृत्त करण्याचें कार्य होत नसले तरी फडक्यांसारख्या बुद्धिमान लेखकाचें विचार स्वतः विचार करण्याची शक्ति नसलेल्या असंख्य वाचकांपर्यंत पोहचविण्याचें कार्य तरी निश्चित होतें. गेल्या वीस वर्षांत लिहूं लागलेले अनेक वाचक फडक्यांचे विचार जणूं आपलेंच विचार आणि फडक्यांची शैली म्हणजे आकर्षक भाषेची एकमेव तऱ्हा, अशा श्रद्धेनें लिहीतांना आढळतात तें यामुळेंच.

टिळक-आगरकरांच्या बुद्धिमान् ध्येयवादी पिढीनें आवशयुक्त वृत्तपत्रीय शैलीची वाढ केली. केळकर-परांजप्यांच्या पिढींत राजकारणी लेखांतहि विभ्रम आणि नखरे अपेक्षिण्याची वाचकांना संवय लागली. फडके, खांडेकर, माडखोलकर यांची शैली म्हणजे केळकरांच्या आणि कोल्हटकरांच्या नंतरची शैली होती. इतकंच नाहीं, तर गडकऱ्यांच्या तेजाळ प्रतिभेच्या प्रकाशांत लिहूं लागलेली पिढी होती. आलंकारिक, कोटीबाज, कल्पनारम्य गद्याच्या या सुप्रभातीं तरुण लेखकांना अनुकरणाचं एवढं प्रलोभन होतं, कीं ज्यांच्या व्यक्तिमत्त्वांत कांहीं खराखुरा पीळ आहे, तेच त्या अनुकरणाच्या लोंढ्यांत वाहात गेले नाहींत. अत्रे, खांडेकर, माडखोलकर यांसारखे मल्ल या काळांतच आपला वाङ्मयीन पिंड केळकरी,-कोल्हटकरी,-गडकरी खुराकावर पोशीत होते ! आणि या तिघांच्याहि शैलीची अनुकरणशील प्रथमावस्था दाखवून देतां येते. प्रो. माटे या वेळीं अनुकरणाच्या पलीकडे गेले असले, तरी विशिष्ट प्रसाधनांनी भाषा सजवण्याचा हव्यास त्यांना अखेरपर्यंत होता. सजावटीकरतां ते हा शहरचा बाजार सोडून खेड्यांतल्या बाजाराकडे वळत इतकाच फरक. फडके यांच्या शैलीवरहि केळकर, परांजपे, गडकरी यांचे संस्कार दाखवतां येतील. पण ज्यांच्या शैलीला अनुकरणाची अपक्व अवस्थाच नव्हती, ज्यांची शैली प्रगल्भ अशीच जन्मली अशा लेखकांत मी फडक्यांची गणना करीन. फडक्यांचा समकालीनांच्या शैलींत पुढें फरक झाला, विचारांतहि वाढ झाली. फडक्यांची शैली आणि विचारसरणी एकदांच बनून गेली.

फडक्यांच्या जीवनांत आणि जीवनविषयक तत्त्वज्ञानांत एकप्रकारचें स्थैर्य आहे आणि स्थिरताहि आहे. फडके आपल्या जीवनक्रमासंबंधीं साशंक आणि घाबरलेले नाहींत—कधींच नव्हते, या अर्थानें त्यांच्या जीवनांत स्थैर्य आहे. फडक्यांच्या तरुणपणच्या शैलींत आणि विचारसरणींत काडीमात्र बदल झाला नाहीं, या अर्थानं त्याचं जीवन स्थिर आहे. फडके विचारांत आणि जीवनांत चिर-तरुण आहेत आणि यामुळेंच त्यांच्या कित्येक टीकाकारांना त्यांच्या वार्धक्याचा पुनः पुनः उच्चार करण्याची गरज भासत असावी ! फडके वयानें सत्तरीकडे चालले आहेत, ही कांहीं विवाद्य होण्यासारखी गोष्ट नाहीं: वयाचा परिणाम त्यांच्या शरीर-बळावर होत आहे, हीहि आश्चर्याची गोष्ट नव्हे. आश्चर्याची गोष्ट आहे ती ही कीं, यांच्या वयाचा किंवा त्यांच्या शरीरबळाचा परिणाम त्यांच्या शैलीवर, कलेवर अथवा त्यांच्या विचारसरणीवर झालेला दिसत नाहीं. तोच आत्मविश्वास, तीच प्रसन्नता, तेंच बाह्यसौंदर्यपूजन, तेंच विलासपूजन! याला कोणी 'विकासाचा अभाव' हें नांव देईल. "पण ज्याचें पाऊल पुढें पडणार नाहीं त्याचें पाऊल मागें पडत आहे हें निश्चित!" (He who does not advance loses ground) अशा अर्थाचें एक इंग्रजी वचन आहे. हा सिद्धांत खोटा करून दाखवणाऱ्या फडक्यांच्या जीवनांत कुठेतरी एखादा खंबीर खडक असला पाहिजे हाच निष्कर्ष काढणें प्राप्त आहे. वाङमयाच्या क्षेत्रांत फडके आशयापेक्षां आकाराला, 'काय सांगायचें' यापेक्षां 'कसें सांगायचें' या प्रश्नाला अधिक महत्त्व देतात अशी माझी तक्रार आहे. वाङमयाचा हेतु वाचकांचं अन्तरंग ढवळून काढणं, त्याला थोड्या वरच्या पातळीवर नेणं, त्यानं जें पाहिलं नाहीं तें त्याला दाखवणं असाच असला पाहिजे असं फडके मानीत नाहींत अशी माझी फार दिवसांची शंका आहे. ( ही शंका फडके यांना चुकीची वाटत असावी याचीहि मला कुणकुण आहे. ) परंतु फडके यांच्या कलात्मक अगर प्रतिपादनात्मक दोन्ही वाङमयाकडे पाहातां, मला माझा शंका खोटी आहे असें वाटत नाहीं.

ललित-वाङमय जीवनातल्या गंभीर सत्याचें चित्रण करण्याकरतांहि लिहितां येतें आणि तरुणांच्या मनांत सहज गर्दी करणाऱ्या सुखद स्वप्नाचें चित्रण

करण्याकरितांहि लिहितां येतें. फडक्यांच्या वाङ्मयकल्पनेंत सुखद स्वप्नांना अधिक जागा आहे असें मी म्हणेन. त्यांची ही कल्पना चुकीची आहे असें मी म्हणत नाहीं. पण ती अपुरी आहे असें मात्र म्हणेन. या त्यांच्या कल्पनेचा परिणाम त्यांच्या ललित–वाङ्मयावर तर झाला आहेच, पण टीकावाङ्मयावरहि झाला आहे. त्यांच्या सर्वांत अधिक प्रसिद्ध ग्रंथाचं नांव 'प्रतिभासाधन' असूनहि त्या सुंदर ग्रंथात काव्यविचाराला एक पानहि दिलेल नाहीं, हा ' कर्मलोप ' ( omission ) बराच बोलका आहे. प्रतिभेच्या साधनांत काव्याला स्थान न दिलें तरी चालेल या त्यांच्या विचारांत केवळ सोय किंवा केवळ विस्मृति खास नाहीं. या ' लोपा'शीं फडक्यांच्या जीवनांतील मूल्यांचा संबंध आहे. उत्कटतेपेक्षां रंजकतेला आणि खोल अनुभूतीपेक्षां सुखद आस्वादाला ते अधिक महत्व देतात. या माझ्या शंकेला त्यांचा हा प्रसिद्ध ग्रंथ बळकटीच देतो असं मी म्हणेन.

पण याचा अर्थ फडक्यांच्या जीवनांत केवळ सुखासीनतेला, केवळ भोगवादाला जागा आहे असा नव्हे. त्यांच्या मूल्यमालिकेंत कल्पनाविलासाला आणि शरीरविलासाला जेवढं स्थान आहे, तेवढंच शिस्त, परिश्रम आणि दर्जा यांना आहे. केवळ सुखवादी मनुष्यजीवनांत एवढा उद्योग करूंच शकणार नाहीं, असं मला वाटतं. पाश्चात्य लेखकांत जी शिस्त आणि जी निरलसता आढळते ती आपल्याकडच्या फार थोड्या लेखकांत आढळते. योजनाबद्ध नियमित आणि निग्रही जीवन हें फडक्यांचं एक वैशिष्ट्य होय असं मी म्हणेन. या त्यांच्या जीवनाचा ठसा त्यांच्या रेखीव आणि हुकमी लेखनांत दिसून येतो. भाषण असो कीं लेखन असो, तें योगायोगावर किंवा स्फूर्तीच्या वाऱ्यावर सोडणं त्यांना मान्य नाहीं. ते स्वतःच्या कल्पनेबरहुकूम, स्वतःच्या योजनेबरहुकूम झालंच पाहिजे, अशी त्यांनीं आपल्या मनाला शिस्त लावलेली आहे. या शिस्तीचं अगदीं उघड असं प्रत्यन्तर आपणाला त्यांच्या वक्तृत्वांत दिसून येतं. वास्तविक वक्तृत्व हें लेखनापेक्षांहि यदृच्छाधीत आहे असं मी समजतो व्याख्यान चांगलं अथवा वाईट होणं हें अगदीं क्षुल्लक गोष्टीवर देखील अवलबून असतं. सभागृहाची रचना, श्रोत्यांची मांडणी, श्रोत्यांनीं आरंभापासून दिलेली ' दाद ' ( response ) यासारख्या क्षुल्लक आणि परस्वाधीन गोष्टींपासून तें वक्त्याच्या

अन्तःस्फूर्तीपर्यंत अनेक गोष्टींनीं चांगल्याचें वाईट होऊं शकतें. पण ज्यांचं जवळजवळ एकहि वाईट व्याख्यान मी ऐकलं नाहीं;—नव्हे एकहि व्याख्यान वाईट झाल्याचं ऐकलं नाहीं, असें फडके हे मराठींतले एकमात्र वक्ते माझ्यातरी पाहाण्यांत आहेत. वक्तृत्व हें वाङमयाइतकं टिकाऊ नसेल; तरी वक्तृत्वांत हुकमी यश मिळवायला वाङ्मयीन यशाहूनहि अधिक शिस्त हवी असते हें अनुभवी व्यक्तींना सांगायला नकोच. गेलीं कांहीं वर्षें फडके बसून व्याख्यान देतात. त्यांच्या हाताला प्रेक्षकांच्या ध्यानांत येऊं शकेल इतका कंप असतो. पण त्यांच्या प्रतिपादनाची शैली, त्यांच्या वृत्तीची प्रसन्नता, सामान्य श्रोत्याला उत्साहित करण्याची त्यांची शक्ति अद्यापहि इतकी जबरदस्त आहे कीं त्यांच्या वाढत्या शारीरिक दौर्बल्याकडे प्रेक्षकांचे तर लक्ष जात नाहींच पण त्यांचं त्यांनाहि भान नसतें. एखाद्या माध्यमावर एवढी हुकमत मिळवणं यालाच 'उस्ताद' होणं म्हणतात.

फडक्यांचं जीवनविषय तत्त्वज्ञान गंभीर असो, कीं चंचल असो, सत्य भासो कीं असत्य भासो, त्या तत्वज्ञानानं त्यांना एक प्रकारची निष्ठा दिली आहे यांत शंका नाहीं. त्यांच्या विचारांवर, त्यांच्या कलेवर, आणि त्यांच्या जीवनक्रमावर जेवढी निष्ठुर टीका झाली आहे तेवढी ( निवडणुकीचा मोसम सोडून ) राजकारणी व्यक्तिवरहि क्वचितच होत असेल. पण ते आपल्या विचारां-संबंधीं, कलेसंबंधीं वा जीवनक्रमासंबंधीं साशंक कधींच दिसत नाहींत. त्यांच्या टीकाकारांना अत्यंत सोयिस्कर वाटण्यासारखें त्यांच्या जीवनांतलें पर्व म्हणजे त्यांच्या द्वितीय विवाहाचें पर्व होय. पहिली पत्नि हयात असतां, तिचीं अपत्येंहि वाढत्या वयाची असतां त्यांनीं जीवनांतलें हें धीट पाऊल टाकलें. सपत्निकाचा द्वितीय विवाह अन् तोहि आनंदवादी साहित्यिकाचा म्हटल्यावर महाराष्ट्रांतल्या वृत्तपत्रांना एक पर्वणीच मिळाली ! या पर्वणीची विशेष गम्मत ती ही कीं आचार्य अत्रे, त्रिकाळकर्ते करंदीकर आणि कृष्णराव मराठे तिघेहि एकाच घाटावर सचैल स्नान करतांना दिसले असते. वास्तविक या वेळच्या वृत्तपत्रीय वादळाला खऱ्या वैदिक संस्कृतीचाहि पाया नव्हता कीं खऱ्या बुद्धिवादाचाहि पाया नव्हता. फडके बुद्धिवादी होते म्हणून तर त्यांनीं धीटपणानं जें योग्य, वास्तववादी

वाटलं तेंच केलं. ड्यूक् ऑफ विंडसर यांनीं ' एका सम्राटाची कथा ' म्हणून जें आत्मचरित्र लिहिलं आहे, त्यांत आपल्या राजपरंपराविरोधी विवाहाचं समर्थन करतांना म्हटलं आहे, मी जर माझ्या अनेक पूर्वजांनीं जे केलं ते केलं असतं तर मला माझं आवडतं माणूसहि लाभलं असतं आणि माझ्या सिंहासनालाहि मुकावं लागलं नसतं. आणि तें काय ? तर आपल्या आवडत्या बाईला आपल्या राजवाड्याच्या मागच्या फाटकाची किल्ली देऊन ठेवून ठराविक वेळीं रात्री तिनं गुपचुप येऊन जावं अशी व्यवस्था करणं ! घटस्फोट घेतलेल्या बाईशीं मी उघडपणें लग्न करायला निघालो म्हणून मला साम्राज्याला मुकावं लागलं !

फडक्यांच्या छोट्याशा जगांतहि सनातनी लोक आगरकरी सुधारकांच्या गळ्यांत गळा घालून हाच वैचारिक मिथ्याचार करीत होते. आगरकरी बुद्धिवाद्यांनीं फडक्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल व धीटपणाबद्दल त्यांचं वास्तविक अभिनंदन करायला हवं होतं. आणि सनातन वैदिक धर्मानुयायी मंडळींना तर या प्रकरणीं बोलायला तोंडच नव्हतं. एक पति हयात असतां दुसरी पत्नी करणं पूर्णपणें वैदिकधर्म सम्मत आहे. बुद्धिवादी लोक फार तर आपल्या धर्माला आणि कायद्याला शिव्या देऊं शकले असते. कारण त्यांच्या दृष्टीनें पाहातां दुसरें लग्न करण्यापूर्वीं पहिल्या पत्नीला घटस्फोट द्यायला हवा; आणि तशी सोय तर धर्मांतहि नव्हती व त्या वेळीं कायद्यांतहि नव्हती. पण तशी सोय नसतां द्वितीय विवाह करणारावर आग पाखडणें, म्हणजे एखाद्या माणसाला त्याच्या मनाविरूद्ध जखडून ठेवण्यांत, अगर प्रिय व्यक्तीशीं विवाहबाह्य मैत्री ठेवण्यांत, बुद्धिवाद आहे असें मानणें होय ! अर्थात् हा ' निर्बुद्धवाद ' होय !

पण महाराष्ट्रांतल्या ' निर्बुद्धवादा ' संबंधींचं आणि ' ख्रिस्ती ' विवाहनीती-संबंधींचं हें माझं अपरिहार्य विषयान्तर मी बाजूला ठेवतों. पण या प्रकरणीं फडके यांनीं जें मनोधैर्य दाखवलं त्याला मी केवळ ' सुखवाद ' म्हणायला तयार नाहीं. त्यांच्या त्या वेळच्या कृतींत एक खंबीरपणा होता. त्यानंतरच्या त्यांच्या यशस्वी, समाधानी कौटुंबिक जीवनानं तर त्यांची त्या वेळची भूमिका अधिकच स्पष्ट आणि खंबीर केली आहे. अर्थात् याचं श्रेय त्यांच्या इतकेंच त्यांच्या रसिक, सुविद्य आणि धीट द्वितीय पत्नी सौ. कमलाबाई फडके यांना आहे.

फडके यांच्या वाङ्मयकल्पनेचा परिणाम जर सर्वांत अधिक कशावर झाला असेल, तर त्यांच्या कथा-वाङ्मयावर होय. त्यांच्या इतक्या बुद्धिमान् व भाषा-प्रभु लेखकाचें कथा-वाङ्मय केवळ करमणुकीच्या उद्देशानें वाचलें जावें, ही दुःखाची गोष्ट होय. साहित्यिकाची जीवनयात्रा म्हणजे जीवन-विषयक सत्य-शोधनाची यात्रा असली पाहिजे. वाचक हे या यात्रेंतले त्याचे सहप्रवासी होत. जीवनाविषयींचें गंभीर कुतूहल आणि ते अंशतः तृप्त करणाऱ्या अनुभवांचें गंभीर निवेदन हें फडके यांच्या वाङ्मयीन कल्पनेच्या कक्षेंत येत नाहीं असें मला वाटतें. वाङ्मयाच्या रूपानें ते स्वप्नें रंगवतात असेंहि म्हणतां येईल. पण हीं स्वप्नंसुद्धां स्वतःची न रंगवतां, वाचकांची रंगवण्याचा त्यांचा प्रयत्न असावा असें वाटतें. म्हणजेच वाचकाला आपल्या पातळीवर आणण्याऐवजीं व वाचकाला आपल्या अंतरजीवनांत जागा देण्याऐवजीं तेच वाचकाच्या पातळीला उतरतात, असें त्यांच्या कथावाङ्मयावरून वाटतें. त्यांच्या वाङ्मयाचे व त्यांच्या वाचकांचे यांत जे नुकसान होतें, तें फडक्यांच्या विशिष्ट वाङ्मय-कल्पनेमुळें होते, असें मी समजतो. त्यांच्या अलिकडच्या कांहीं कादंबऱ्यांत शृंगाराचा अतिरेक आहे, असा बोभाटा ऐकूं येतो. परंतु उत्कटपणाच्या व खोलपणाच्या अभावामुळें त्यांच्या कथावाङ्मयाचें जेवढें नुकसान झालें आहे तेवढें त्यांच्या विलासी वृत्तीनें खासच झाले नाहीं. ज्ञानकोशकार केतकर म्हणत असत, वाङ्मयांतील 'अश्लीलानें' जेवढें नुकसान होतें, त्याहूनही वाङ्मयांतील अनृतानें अधिक नुकसान होतें, केवळ करमणुकीकरितां लिहिलेल्या कथा-वाङ्मयांत 'अनृताला' म्हणजेच खोट्या जीवन-चित्राला अपरिहार्यपणें जागा मिळतेंच.

पण फडके यांनीं जीवनाविषयीं आणि जीवन चित्राविषयी कोणतीही कल्पना करून घेतलेली असो त्यांच्या प्रतिभेत जे वाङ्मयीन गुण आहेत त्यांनी त्यांचें वाङ्मय व त्यांच्या वाचकाचे मन उजळून निघाल्याशिवाय कसें राहील? रेखीव सुलायम शैलीप्रमाणेंच त्यांची अभिजात रसिकता त्यांच्या वाङ्मयाचे महत्त्व निश्चित वाढवते. त्यांच्या टीकालेखांत, त्यांच्या निबंधांत, त्यांच्या लघुनिबंधांत आपल्याला एका बुद्धिमान्, रसिक आणि सुसंस्कृत लेखकाच्या मनांत प्रवेश मिळतो. किंबहुना त्यांच्या कथा वाङ्मयानेंही मुख्य संस्कार रसिकतेचा आणि

सुसंस्कृतेचाच होतो. त्यांचे कथा-वाङ्मय जीवनाचा खोल अनुभव अर्पण करित नसेल, पण वाचकाला मनाची सुसंस्कृतता निश्चित देते. अर्थात् या ठिकाणीं मी 'सुसंस्कार' याचा अर्थ केवळ नैतिक अगर तात्त्विक संस्कार असा खासच करित नाहीं. जीवनांतल्या विविध अनुभवांची गोडी सुजाणपणें घेतां येण्याकरितांहि सामान्य मनुष्याच्या अभिरुचीला शिक्षण देण्याची गरज असते. सृष्टीतील चांगलें दृश्य, मानवी कंठातून निघणारा मधुर आवाज, अप्रतिम अभिनय, यांसारख्या सौंदर्याचा आस्वाद ज्याला दर्दी माणसाप्रमाणें घेतां येणार नाहीं; त्याच्या मनुष्यत्वांत कांहीं वैगुण्य आहे असेंच म्हणावें लागेल. फार काय, उत्तम खाद्य पेय, उत्तम फर्निचर, उत्तम कपडे, उत्तम अत्तरें यांचा आस्वाद घेणें व त्यांना जीवनांत योग्य तें स्थान देणें याला देखील सुसंस्कारांची गरज आहे असें मी मानतो. सुसंस्कृत उपभोग आणि उच्च निती यांत वाकडें असण्याचें कांहींच कारण नाहीं. किंबहुना ज्याला उच्च संगीत, बौद्धिक संभाषण, मित्रांशीं हास्यविनोद, रसिक स्त्रीयांचा सहवास यांतील आनंद वाकबगारपणें लुटता येत नाहीं, तो 'पुच्छ विषाण हीन' पशूच समजण्यास हरकत नाहीं! मला वाटतें, फडक्यांचें जीवन-विषयक तत्वज्ञान माझ्या या संस्कार-वर्णनांत बहुधा समाविष्ट झालें असेल. अभिरुचीवर हे संस्कार करण्याचें कार्य फडक्यांचें सर्वच वाङ्मय निश्चितच करतें. माझी तक्रार एवढींच आहे कीं, कथा-वाङ्मयाचा परिणाम याहून खोल व्हायला हवा. त्यांत मानवी जीवन नांवाच्या गंभीर अनुभवाचें दर्शन व्हायला हवें. केवळ चतुरालापांनीं आणि वाक्पाटवानें वाचकाच्या मनावर जे संस्कार होतात, ते वाङ्मयाचें प्रमुख संस्कार नसून गौण संस्कार होत. जीवनाचा गंभीर अर्थ न कळतां कथा-वाङ्मयामुळें जर केवळ हे गौण संस्कारच झाले, तर भोजन न होतांच, तांबूल-ग्रहण करण्यांतला तो एक प्रकार होय, असें मी मानतो!

फडक्यांच्यासारख्या लोकप्रिय साहित्यिकानें कादंबऱ्यांचें अर्धें शतक पुरें करून मराठी वाङमयाच्या क्षेत्रांत एक चमत्कारच करून दाखविला असें म्हटलें पाहिजे. सातत्यानें एवढा बौद्धिक उद्योग करणें हें देखील कौतुकास्पदच होय! आणि चाळीस वर्षें सतत लोकप्रियता टिकविणें हें तर त्याहून मोठें कौतुक म्हटलें पाहिजे. पण विपुल लोकप्रिय कथा-वाङ्मय एवढीच फडक्यांची वाङ्मयीन काम-

गिरी नव्हे.—इतर प्रकारचें वाङ्मयही त्यांनीं इतकें विपुल आणि इतकें सुंदर लिहीलें आहे कीं, कादंबऱ्या वगळल्या तरीही त्यांची गणना मराठींतील श्रेष्ठ साहित्यिकांत झाली असती. पण वाङ्मय-लेखन एवढेंच फडक्यांच्या जीवनांतील कार्य नव्हें. व्यवसाय म्हणून त्यांनीं तत्त्वज्ञानाच्या महाविद्यालयीन अध्यापकाचे काम यशस्वीपणें केलें आहे. लोकांचा आग्रह म्हणुन त्यांनीं दिलेली शेंकडो सुंदर व्याख्यानें हेंही त्यांच्या कामगिरीचें स्वतंत्र दालनच होय. एक तरुण ढंगदार विद्यार्थिप्रिय प्राध्यापक या नात्यानें गांधीजींच्या पहिल्या सत्याग्रहाच्या चळवळींत स्वतःच्याच परशुराम भाऊ विद्यालयाच्या अंगणांत उभे राहून फडके यांनी १९२१ सालीं कॉलेज-बहिष्काराचा पुरस्कार केल्यापासून त्यांच्या जिवनांत अनेक स्थित्यंतरें झाली. पण बदल झाला नाहीं तो त्यांच्या तीन प्रमुख गोष्टींत! एक त्यांची लोकप्रियता, दुसरी त्यांची वाङ्मयीन मतें, आणि तिसरी गोष्ट म्हणजे त्यांचें अप्रतिहत ढंगदार लेखन! या तीनही गोष्टींमुळें गेलीं चाळीस वर्षे प्रो. फडके म्हणजे महाराष्ट्रांतील एक 'वाङ्मयीन प्रस्थ' म्हणून ओळखलें जात आहेत! लोकप्रिय असून लोकप्रियतेच्या मागें नसलेलीं किंबहुना लोकांशी बेपर्वाईनें वागणारी अशीं जीं थोडीं माणसें आजच्या महाराष्ट्रांत आहेत, त्यांत फडके यांची अग्रस्थानीं गणना करावी लागेल. कादंबरीचें अर्धे शकत पुरें केल्याच्या निमित्तानें आज महाराष्ट्रांत असंख्य रसिकांकडून त्यांचा जो सत्कार होत आहे तो तर यथोचित आहेच; परंतु आणखीहि एका प्रकारें त्यांचा सत्कार करणें उचित होईल असें मला वाटतें. ते महाराष्ट्र साहित्य संम्मेलनाचे अध्यक्ष झाल्याला आतां वीस वर्षे पुरी होतील या वीस वर्षांत साहित्यिकांच्या दहा पिढ्यां झाल्या म्हटलें तर फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं !आणि त्याहूनही अद्‌भुत गोष्ट म्हणजे वाङ्मयासंबंधी सर्वस्वी उलटी कल्पना सांगणारा संप्रदाय महाराष्ट्रांत बरोबर वीस वर्षापूर्वीच जन्माला आला. बुद्धीनें परिपक्व आणि मनानें तरुण अशा फडक्यांच्यासारख्या दिर्घकाल लोकप्रिय झालेल्या साहित्यिकाला साहित्य संम्मेलनाच्या आसनीं फिरून बसविणें व गेल्या वीस वर्षांतील वाङ्मयीन उलाढाली संबंधीचे त्यांचे विचार त्या व्यासपिठावरून ऐकणें हाच त्यांच्या सत्काराचा योग्य आणि अभिनव प्रकार होईल असें मी म्हणेन!

—००—

# मराठी लघुकथेचे शिल्पकार

लेखकः—प्रा. म. ना. अदवंत

मिडास राजाची अशी एक गोष्ट सांगतात की हात लावील त्याचें सोनें होईल असा वर त्यान मिळविला होता. मराठी वाङ्मयाच्या प्रांतांत प्रा. फडके यांनीहि असाच्च वर आपल्या तपश्चर्येनें मिळविला आहे असें म्हटलें तर फारसें अतिशयोक्त ठरणार नाहीं. कादंबरी, लघुकथा, लघुनिबंध, टीका, प्रबंध, चरित्र इत्यादि मराठी वाङ्मयांतील विविध दालनांपैकी एकहि दालन असें नाहीं कीं ज्यांत प्रा. फडके यांनी आपल्या लेखणीच्या जादूने मोहिनी टाकली नाहीं. मानसशास्त्रासारखा रुक्ष व खडकाळ विषयहि त्यांनी आपल्या लेखणीच्या लालित्यानें मनोहर करून दाखविला तेंव्हा मराठी वाङ्मयांत अशा रीतीनें सव्य-साचीपणानें विहार करणाऱ्या प्रा. फडके यांच्या समग्र वाङ्मयाचा परामर्श तितक्याच्च लालित्यानें घेणें कठिण आहे. ललित साहित्यांत त्यांनी घातलेली भर इतकी विविध व इतकी अमोल आहे कीं त्याचें समग्र दर्शन यथार्थतेने घडविणें कठिण. म्हणून त्यांतील एकाच्च दालनाचा–लघुकथेचा–धावता विचार करून त्यांत त्यांनी घातलेली भर स्पष्ट करणें हीच या लेखाची मर्यादित भूमिका आहे.

प्रा. फडके लघुकथालेखक या नात्यापेक्षा यशस्वी कादंबरीकार म्हणून आपणाला अधिक परिचित आहेत, त्यांची पन्नासावी कादंबरी आतां नुकतीच्च प्रसिद्ध होत आहे—त्या दृष्टीने त्यांच्या कथासंग्रहाची संख्या सुमारें वीसपर्यंन्तच गेली असेल. शिवाय त्यांच्या कादंबऱ्या जितक्या गाजल्या व लोकप्रिय झाल्या तितक्या त्यांच्या लघुकथा गाजल्या नाहींत. ‘ जादूगार ’, ‘ दौलत ’, ‘ प्रवासी ’, ‘ अटकेपार ’, ‘ अखेरचं बंड ’ इत्यादि त्यांच्या कादंबऱ्या मराठी वाङ्मयांत मोठ्या मानाचें स्थान मिळवून अमर झाल्या आहेत. तशा अमर झालेल्या त्यांच्या लघुकथा फार थोड्या आहेत, परंतु कादंबरीइतकें मानाचें स्थान त्यांच्या कथांनी मिळविलें नसलें तरी मराठी लघुकथांच्या दालनांत स्वतःची अशी भर त्यांच्या लघुकथांनी खासच्च घातली आहे. ती भर म्हणजे त्यांनी लघुकथेला दिलेलं आकृति–सौंदर्य.

प्रा. फडके यांच्या सर्व वाङ्मयांत – विशेषतः कादंबरी व लघुकथा यांत – तंत्रावर विशेष भर दिलेला असतो. ‘ प्रतिभा–साधन ’ मध्यें किंवा ‘ लघुकथा तंत्र व मंत्र ’ या ग्रंथांत लघुकथेची चर्चा करतांना त्यांनीं तंत्राचें महत्व पूर्णपणें पटविलें आहे. व तें तंत्र आपल्या कथांतून कटाक्षाने पाळण्याची दक्षता त्यांनी घेतली आहे. ‘ तंत्राचें यथार्थ ज्ञान असणें व तें आपल्या कृतींत पूर्णपणें उतरविणें हा ललित–लेखकांचा आवश्यक गुण आहे. ’ किंवा ‘ अनेक प्रसंगांची चतुराईची मांडणी किंवा गुंफण म्हणजे ललितकथा होय. ’ इत्यादि त्यांच्या वाक्यांवरून त्यांच्या ललितकथांतून त्यांनी तंत्रशुद्धतेची दक्षता किती घेतली असेल हें सहज कळण्यासारखे आहे. किंबहुना तंत्रबद्धता हा त्यांच्या लघुकथेचा प्रमुख गुण असें म्हटलें पाहिजे. लघुकथेची सुरुवात आकर्षक झाली पाहिजे, शेवट परिणामकारक झाला पाहिजे व मध्यें गुंतागुंत, निरगांठ व उकल यांनी वाचकांचा विस्मय व उत्कंठा सतत जागृत ठेवली पाहिजेत हीं मुलभूत तत्त्वें त्यांनी आपल्या बहुतेक लघुकथांतून पाळलेलीं आढळतात.

उदाहरणार्थ, त्यांच्या ‘ दुहेरी गुण ’, ‘ उलटे शाकुंतल ’ किंवा ‘शोभेसाठी’ या सुरुवातीला लिहिलेल्या किंवा ‘ मीरा ’, ‘ काळ चुकला ’ ! वेळहि चुकली !’ किंवा ‘ उन्हं आणि सावल्या ’ या अगदी अलीकडे लिहिलेल्या कथा पहा. प्रत्येक गोष्टीची सुरुवात आकर्षक व उत्कंठा वाढविणारी आहे. मध्यें कथानकाची गुंतागुंत आहे व ‘ अखेरी ’ अतिशय परिणामकारक आहे. ‘ दुहेरी गुण ’ या कथेची सुरुवात “ माझं तर असं स्पष्ट मत आहे कीं, सगळ्या डॉक्टरांची अन् वैद्यांची मुटकुळी बांधून समुद्रात फेकून दिली तरी जगाचें रतिमरसुद्धां नुकसान व्हावयाचें नाहीं. ” या वाक्याने करून सुरुवातीलाच वाचकांना विस्मयाचा धक्का दिला आहे. वाचकांची उत्कंठा जागृत होते न होते तोंच डॉ. बाळासाहेब यांच्या कथेला सुरुवात होते व शेखरच्या जीवनाबरोबर वाचकांचेंहि मन आशानिराशेच्या हिंदोळ्यावर डोलूं लागतें. डॉ. अल्पजीव यांच्या पाकिटांनं शेखरबरोबर वाचकांनाहि चांगलाच धक्का बसतो आणि शेवटी पाकिटांच्या आदलाबदलीचें रहस्य बाहेर पडून वाचकांचा संशय दूर होतो. परिणामकारक अखेरी तर सुरुवातीच्याच वाक्याने कौशल्यपूर्ण साधली

आहे. गटाराच्या भेगेंत बऱ्याच दिवस अडकलेल्या आणि वळवाच्या पावसाच्या सरीनें वाहून जाणाऱ्या फोटोच्या एका तुकड्याने 'मीरा' या कथेची सुरुवात झाली आहे. या फोटोच्या तुकड्याबरोबर 'मीरे'च्या पूर्वजीवनाच्या स्मृति ते वाचकांसमोर रंगवितात. तिची नृत्यकलेची साधना, माधवची व तिची भेट, त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेला प्रेमभाव, मीरेच्या वडिलांकडून त्याला झालेला विरोध व अखेरीस एका अरसिक श्रीमंताशी तिचें झालेलें लग्न इत्यादि घटना एकामागून एक वाचकांच्यासमोर येतात. मीरेच्या जीवनांत तिचा झालेला कोंडमारा ते हळुवार हातांनी रंगवीत पुन्हा सुरुवातीच्या फोटोच्या तुकड्याच्या वर्णनाकडे आपणाला आणतात. पाण्याच्या लोंढ्याबरोबर तो फोटोचा तुकडाच नव्हे तर त्याबरोबर मीराच्या नृत्यकलेच्या प्राविण्याची आणि तिच्या व माधवच्या प्रेमाच्या दिवसाची उरलीसुरली अखेरची खूण अदृश्य झाल्याचें वर्णन करून ते शेवटीं लिहितात, "माणसाचं आयुष्य अंशाअंशानं असंच संपतं! मनुष्य अंशाअंशानं असंच नष्ट होत असतं! अशा या मरणालाच म्हणतात जीवन!" 'उलटे शाकुंतल' या कथेची सुरुवात अशीच परिणामकारक रीतीनें करून वाचकांची उत्कंठा वाढविली आहे. नेहमी फर्स्ट क्लासमधून प्रवास करणाऱ्या शकुंतलाबाई थर्ड क्लासने जात असतांना त्यांची झालली मनःस्थिति, व लोक आपणाकडे पाहून हंसत आहेत हा त्यांना होणारा भास—या सुरुवातीनेच वाचकांचें मन एकदम खेचलें जातें, आणि शकुंतलाबाईच्या मानसिक स्थित्यंतराचे एकेक धागे उकलत प्रा. फडके यांनी गोष्टीची अखेरी एका चाळींत मोठ्या गंमतीने केली आहे. आगगाडींत एक सुंदर मुलगी भेटावी, तिचें नांव माहित नसावें पण योगायोगानें आगगाडींत विसरलेल्या तिच्या हातांतील पुस्तकावरील नांवावरून तिच्या घरीं जावें आणि त्या पुस्तकाची स्वामिनी एकादी कुरुप स्त्री निघावी! अशा वेळी होणारे घोटाळे, गोंधळ त्यांनीं 'शोभेसाठीं' या कथेंत चातुर्यानें वर्णन केलें आहे. परिणामकारक सुरुवात व उत्कृष्ट अखेरी करण्याचें प्रा. फडक्यांचें कौशल्य अशा कितीतरी कथांतून आढळून येतें.

तंत्रदृष्ट्या परिणामकारक अशा पुष्कळच गोष्टींचीं उदाहरणें सांगतां

येतील. ‘ शांता ’, ‘ उपकार की उपद्व्याप ’, ‘ लघुकथेची अखेरी ’, ‘ खोटी प्रेम-कथा ’, ‘ सुरंगा ’ , ‘ उद्याची बात ’ अशा कितीतरी गोष्टीत लघुकथातंत्राचा अतिशय चांगल्या रीतीनें परिपोष केलेला आढळतो. तंत्रदृष्टया त्यांच्या लघुकथांतून आणखी दोन वैशिष्ट्यें दिसून येतात. एक म्हणजे उत्कंठा वाढविण्यासाठीं एकाद्या रहस्याची योजना करण. कादंबरींत जो उपाय त्यांनीं अवलंबिलेला आहे तोच त्यांनीं लहान प्रमाणांत लघुकथांतूनहि आणला आहे. पण लघुकथेंतून ही रहस्याची योजना मूळ कथानकाशीं एकरूपच असल्यानें लघुकथेची परिणामाची एकता ढळत नाहीं. किंबहुना या रहस्याच्या उलगड्यामुळें वाचकांना आपले अंदाज चुकल्याबद्दल गोड धक्का बसतो. ओ. हेन्रीच्या गोष्टीं असे विस्मयाचे धक्के देण्याबद्दल फार प्रसिद्ध आहत. फडक्यांच्या ‘ सुरंगा ’, ‘ अपूर्व दीपोत्सव ’, ‘ पत्रिका ’ लघुकथेची अखेरी ’, ‘ खोटी प्रेम कथा ’, ‘ माल्याची शिकार ’, ‘ संप बरं हा—संप ! ’ इत्यादि गोष्टींत केलेली रहस्ययोजना मोठी चातुर्याची आहे. ‘ सुरंगा ’, ‘ लघुकथेची अखेरी ’, ‘ शोभेसाठीं ’ इत्यादि कांहीं ठिकाणी कथांतील व्यक्तिच गोड कपट करीत असतात तर कांहीं ठिकाणी योगायोगानें तें कपट केलें जातें. ‘ दुहेरी गुण ’ मधील पाकिटाची आदलाबदल, ‘ अपूर्व दीपोत्सव ’ मधील नायकाने पद्मजेची बहिण पद्मजाच मानून केलेली चूक वगैरेसारख्या ठिकाणी योगायोगाने हें रहस्य किंवा गोड कपट घडून आलें आहे. या रहस्यामुळें कथांतील व्यक्तींच्या मानसिक आंदोलनाबरोबर वाचकांच्याहि मनाचें आंदोलन चाललेलें असतें व ‘ अखेरी ’ ला दोघांनाहि विस्मयाचा धक्का बसतो. अर्थात् अशा प्रकारचे योगायोग खऱ्या आयुष्यांत कितपत येतात किंवा अशा प्रकारचें गोड कपट व्यवहारांत कोण करते हा मुद्दा वादग्रस्त म्हणून सोडून देऊ.

त्यांच्या कथेंतील दुसरें वैशिष्ट म्हणजे त्यांनीं आपल्या प्रत्येक लघुकथेंत पात्रांचा व प्रसंगांचा अगदीं कसोसीनें केलेला मितव्यय. परिणाम होण्याला आवश्यक अशा मर्यादित व्यक्ति व प्रसंग घेऊन त्यांनीं आपलें लक्ष त्यांच्यावर केन्द्रित केलेलें आहे. त्यामुळें त्यांच्या लघुकथा अतिशय रेखीव झाल्या आहेत. ‘ शांता ’ ही त्यांच्या पहिल्या संग्रहांतील पहिलीच कथा घेतली तर मितव्ययामुळें व संयमामुळें योग्य तो परिणाम साधण्याच्या प्रा. फडके यांच्या सामर्थ्याची कल्पना येईल.

त्यांत ‘ शांता ’, ‘ शंतनु ’ व ‘ मावशी ’ या तीनच पात्रांना प्राधान्य दिलें असून त्यांतहि ‘ शांता ’वरच लेखकानें आपलें सर्व लक्ष केन्द्रित केलें आहे. ‘ माणूस जगतो कशासाठीं ? ’ यांत ‘ भास्कर ’ ही एकच व्यक्ति लघुकथेच्या केन्द्रस्थानी आहे. ‘ ऑपरेशन ’, ‘ उन्ह आणि सावल्या ’ , ‘ गुलामाचें राज्य ’ या त्यांनीं अगदीं अलीकडे लिहिलेल्या लघुकथांतूनसुद्धां त्यांचें तेंच कौशल्य दृष्टीला पडते. पात्रांच्या व प्रसंगांच्या मितव्ययामुळें एकाद्या रेखीव शिल्पाचें सौंदर्य त्यांच्या लघुकथेला प्राप्त झालें आहे.

रचनासौंदर्याबरोबर भाषेचें लालित्य ही फार मोठी देणगी प्रा. फडके यांनी मराठी लघुकथेला दिली आहे. प्रा. फडके यांच्या कालखंडाच्या पूर्वीच्या लघुकथा वाचल्या तर त्यांत भाषेचा बोजडपणा, पाल्हाळिक रचना, लांब व पल्लेदार वाक्यें व अनेक ठिकाणीं अलंकाराचा सोस यांमुळें लघुकथा भारावलेली वाटत असे. कांहीं कथांतून काव्याचा फुलोरा फुलविला जात असे. कादंबरीपेक्षा लघुकथा हा वाङ्मय प्रकार निराळा आहे – त्याची प्रकृती अगदी वेगळी आहे हें प्रा. फडके यांनीच प्रथम ओळखलें.त्यामुळें लघुकथा लिहितांना खेळकर भाषाशैली, सुटसुटीत वाक्यरचना, चतुर व मार्मिक संवाद यांचा त्यांनी आश्रय केला. लघुकथेला लागणारा भाषाशैलीचा जो लय तो त्यांच्या लघुकथांतून प्रामुख्याने दिसून येतो यांचीं अनेक उदाहरणें दाखविता येतील. उदाहरण म्हणून ‘ पत्रिका ’ या लघुकथेची खालील सुरुवात पहा —

“ सायकलवर बसणारी मुलगी म्हणजे लोकांना एक अपूर्व दृश्य वाटतें. तेव्हां मुंबईच्या भर रस्त्यांत सायकलवरून पडणारी मुलगी म्हणजे लोकांच्या दृष्टीने अधिकच अपूर्व दृश्य होय हें उघडच आहे.

त्यामुळें मालती सायकलवरून पडल्याबरोबर आजुबाजूची सगळी माणसें तिच्याकडे पाहूं लागली. कोणी नुसतेच पाहात राहिले, कोणी उपहासपूर्वक हंसले, कोणी आपापसांत कुजबुजले, ‘ चला, विचारूं कीं कितपत लागलं आहे तें. ’ ”

किंवा ‘ वेडी ’ या त्यांच्या कथतील संवादाचा खालील नमुना पहा.

ती म्हणाली, “ दादा फार वाट पहात होते तुमची. ”

“ असं का ? ”

" अन् आई देखील."

जयंत हंसला आणि म्हणाला, " आलं लक्षांत, तूं तेवढी माझी वाट पहात नव्हतीस—"

" वा! असं कसं होईल?"—असं पुटपुटून ती हंसली, आणि इतका वेळ त्याच्यापुढे उभी होती ती आंत जाऊं लागली.

" हें काय, निघालीस कुठे?"

" चहा देतें—"

" इथेंच घेतला पाहिजे का?"

" म्हणजे काय? इथें नाहीं घ्यायचा तर आमच्या स्वयंपाकघरांत बसून घ्यायची इच्छा आहे काय?" असं विचारून ती हंसली.

तो म्हणाला, " तसं नाहीं. पण चहा घ्यायसाठीं आपण दोघंहि बाहेर जाऊं या कीं."

" अय्या!" असं म्हणून तिनं डाव्या पंज्यानं तोंड झाकलं.

" कां? माझ्याबरोबर यायला भीति वाटते होय?"

तिनं तोंडावरचा पंजा आणखीच दाबला आणि मग तो दूर करून ती म्हणाली, " आतां कसली भीति?"

त्यानं हंसत विचारलं, " आतां म्हणजे काय? काय झालं म्हणून आतां म्हणतेस?"

" मला नाहीं माहित जा!" असं म्हणत खोटा फणकारा दाखवून ती पुन्हा दाराकडे जाऊं लागली.

वरील वर्णनांत व संवादांत भाषेची सहजता, त्यांत साधलेला अन्तर्गत लय आणि त्यांत डोकावणारा मिस्किलपणा यामुळें कथा मनाची कशी पकड घेते हें लक्ष्यांत येईल. भाषेतील खेळकरपणा, सहजता व लालित्य हा प्रा. फडके यांच्या लघुकथांचा सर्वात मोठाच गुण समजावयास हवा.

रचना सौंदर्य व भाषा सौंदर्य यांबरोबरच नीटस व रेखीव व्यक्तिचित्रें हेंहि त्यांच्या लघुकथेचें वैशिष्ट्य समजावयास हवें. बाह्यतंत्र व कथानकांतील रहस्ययोजना यांमुळें त्यांच्या पुष्कळशा गोष्टी घटनाप्रधान झाल्या आहेत हें खरें

आहे. पण अशा घटनाप्रधान गोष्टी रंगवतांनाहि व्यक्तिदर्शन अतिशय आकर्षक व्हावें याबद्दल कमालीची दक्षता ते घेतात. 'सुरंगा' मधील सुरंगा, 'उपकार की उपद्व्याप' मधील राघोपंत नाटककार, 'लाडकी लक्ष्मी' मधील सोनी, 'भाग्यचिन्ह' मधील कुसुम व अच्युत अशीं कितीतरी आकर्षक व्यक्तिचित्रें त्यांनीं घटनाप्रधान कथांतून रंगविली आहेत. कोणतीहि व्यक्ति लेखणीच्या दोनचार फटकाऱ्यांत ते आपणापुढें उभी करतील व हळूहळू त्या व्यक्तीच्या सुखदुःखःशी, तिच्या स्वभावांतील गुणदोषांशी ते आपणाला समरस करतील. त्यामुळें त्यांच्या स्वभावप्रधान कथा फारशा नसल्या तरी यथार्थ व यशस्वी व्यक्तिदर्शन त्यांच्या पुष्कळ लघुकथांतून आहे हें आपणास मान्य करावें लागेल.

यावरून त्यांनीं व्यक्तिनिष्ठ कथा अजीबात लिहिल्या नाहींत असें मात्र नाहीं. त्यांच्या 'शांता', पंतांची पदवी', 'लोला', 'कोंडमारा', 'वत्सला', 'चंद्रा' इत्यादि जुन्या व 'मीरा', 'गुलामाचें राज्य', 'उन्हं आणि सावल्या', 'जिथे ते तिथं मी', 'वेडी' इत्यादि अलीकडच्या कथांतून व्यक्तिदर्शन अतिशय परिणामकारक झालें आहे. मात्र तंत्राच्या आहारीं गेल्यामुळें यांतहि अनेकदा कथानकाला प्राधान्यच मिळते. त्यामुळें प्रा. फडके व्यक्तिमनांत फार खोलवर जाऊ शकत नाहींत. मानवी स्वभावांतील विसंगतीचें व वैचित्र्याचें दर्शन त्यांच्या कथेंतून त्यामुळें तितकेंसें परिणामकारक होत नाहीं. त्या व्यक्तीचे स्वभाव कथानकांतील घटनेचे दुवे होतात आणि कथा पुन्हा पहिल्याच वळणाने जाते. 'माणूस जगतो कशासाठीं ?' यामधील भास्करचें व्यक्तिचित्र, 'गुलामाचं राज्य' यामधील गोपुकाकाचं व्यक्तिचित्र, 'सात रुपये दहा आणे' यामधील नानाचें व्यक्तिचित्र, अशासारखी कांहीं यशस्वी व्यक्तिचित्रें अपवादात्मकच समजावयास हवीत.

प्रा. फडके यांनी बाह्यतंत्राचें लेणें मराठी लघुकथेवर चढविलें, लालित्यपूर्ण भाषाशैलीने तिला नटविलें आणि अत्यंत आकर्षक व रेखीव असा तिला आकार दिला. अभिव्यक्तीचें तंत्र त्यांना चांगले साधलें. 'गोष्ट कशी सांगावी ?' याच्या तंत्रासंबंधी चर्चा करून पाश्चिमात्य वाङमयांतील 'नमुनेदार गोष्टींची भाषान्तरें करूनहि रसिकांच्या समोर ठेवलीं. लघुकथेच्या बाह्यांगांत त्यांनी खरोखरच क्रान्ति केली. पण लघुकथेचें अंतरंग मात्र त्यांना वैचित्र्यपूर्ण बनविता आले

नाहीं.' 'कलेकरितां कला' या त्यांच्या ललितसाहित्यविषयीच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळें त्यांनी आपली कथा प्रचाराकरिता राबविली नाहीं याबद्दल कांहींच म्हणावयाचें नाहीं. पण त्यांच्या लघुकथांतून घडून येणारें जीवनदर्शन अत्यंत संकुचित व अत्यंत उथळ आहे असें म्हटल्यावाचून राहवत नाही. अगोदर त्यांच्या पुष्कळच कथांतून श्रीमंतवर्ग व मध्यम श्रीमंतवर्ग यांचेंच चित्रण त्यांनीं केलें आहे आणि त्यांतहि पुष्कळशा प्रेमकथाच आहेत कादंबरी वाङ्मयाप्रमाणेंच लघुकथा वाङ्मयांतहि प्रेमकथा लिहितांना ते विशेष रंगतात. पण त्यांच्या या प्रेमकथाहि आभासमय व कल्पनारम्य अशाच वाटतात. वास्तव जीवनाशी त्यांचा फारसा संबंध असावा असें दिसत नाहीं. नायक-नायिकांची प्रथमभेट, त्यांचें एकमेकांवर बसलेलें प्रेम, मध्यंतरी निर्माण झालेले गैरजमज (चहाच्या पेल्यांतील वादळें) व शेवटी मीलन असा त्यांच्या प्रेमकथांचा ठराविक सांचा आहे. त्यामध्यें योगायोग आहेत, गोड कपट आहे, रहस्येंहि आहेत. मध्यमवर्गीय तरुण मनाला जें हवेहवेसें वाटतें असें आभासमय प्रणयांचे वर्णन त्यांच्या कथांतून असल्यानें तरुणांचे ते आवडते कथाकार झाले यांत नवल नाहीं. ही सारी स्वप्नरंजनाची दुनिया रसिकांसमोर ठेवतांना एक आरामोद्यान निर्माण करावें हाच एक हेतु—लघुकथा काय किंवा कादंबऱ्या काय—लिहितांना त्यांनीं आपणासमोर ठेवला असावा असें वाटतें. जीवनाचें वास्तव स्वरूप फडक्यांच्या कथांतून क्वचितच आढळते. त्यांच्या या पलायनवादी भूमिकेमुळें त्यांच्या कथांना एकांगी स्वरूप आलं आहे.

प्रेम आणि तेंहि विवाहपूर्व प्रेम हा फडके यांच्या कथांचा स्थायीभाव असला तरी त्यांनी इतरहि विषयांवर कथा लिहिल्या आहेत. कांहींतून सामाजिक समस्या व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे ('इंदूताईचा चातुर्मास,' 'सावित्रीचें नवें आख्यान', 'गोषा', 'जागृतीचे स्वप्न', 'तुरुंगांतून सुटका' इत्यादि.) कांहींतून राष्ट्रीय भावनांचा आविष्कार करण्याचा प्रयत्न केला आहे ('माझा देश', 'चंद्रा' इ.) तर कांहीं तात्कालिक राजकीय वा सामाजिक घटनांवर आधारलेल्या आहेत ('हिशेब चुकता', 'आहुति', 'काश्मीर कहानी' इ.) अलीकडील त्यांच्या कथांतून कांहीसें निराळेंच जीवन रंगवतांना ते आपणाला

दिसतात. पण ते खरें फडके नव्हेत. फडक्यांच्या कथांचा खरा बहर आपणाला १९२६ तें १९४५ पर्यंतच्या त्यांच्या कथांतून झालेला दिसतो. तरुण तरुणींच्या मुग्ध प्रेमभावाचा लालित्याने व मोहकपणाने आविष्कार करून त्यांच्यासमोर प्रणयाची एक स्वप्नसृष्टी निर्माण करणारे फडकेच खरे कथाकार फडके म्हणून ओळखले जातात. त्यामुळें आशयाचा विचार करतांना प्रा. फडके यांच्या कथासृष्टीच्या मर्यादा स्पष्टपणें जाणवतात. त्यांत जीवनाचें सखोल दर्शन नाहीं, अनुभवांची विविधता नाहीं, संघर्षाची तीव्रता नाहीं किंवा भावनांची उत्कटता नाहीं. सर्व कसं अगदी मृदु व मुलायम असं आहे.

आणि तरीहि प्रा. फडके यांनी लघुकथेच्या क्षेत्रांत घातलेली भर मोलाची आहे. लघुकथेचा मंत्र जरी त्यांना जमला नाहीं तरी त्यांनीं रसिकांना लघुकथेचें तंत्र शिकवले. मराठी लघुकथा त्यांनीं आकर्षक व रेखीव केली; लघुकथेची सुरुवात, मध्य, अखेरी यांचें महत्त्व त्यांनीं पटवून दिलें; लघुकथेला लालित्यपूर्ण, सफाईदार व लवचिक भाषेचें लेणें त्यांनीं दिलें आणि मराठी रसिकांना एक नवी सौंदर्यदृष्टी दिली. आणि म्हणूनच मराठी कथेला आकृतिसौंदर्य बहाल करणाऱ्या या श्रेष्ठ साहित्यिकाला ' मराठी लघुकथेचे शिल्पकार ' अशी पदवी दिली तर ती यथार्थ ठरणार नाहीं काय

# रेडियोवक्ते-प्रा. फडके

लेखकः–बा. भ. बोरकर

प्रा. फडक्यांच्या संपन्न वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची एक स्पृहणीय आणि अभ्यसनीय विशेष म्हणजे त्यांचें रेडियोवरील वक्तृत्व. असंख्य श्रोते तें ऐकायाला उत्सुक असतात आणि ऐकून संतोष पावतात. त्यांचें प्रत्येक भाषण ऐकतांना त्यांतील प्रत्येकाला वाटत असतें कीं फडके आपल्याशींच गुजगोष्टी करीत आहेत. आपल्या मनोविहाराच्या आवारांतील प्रसन्न आणि चित्तवेधक बगीच्यांतून विश्रब्धपणें आपल्याला घेऊन फेरफटका करीत आहेत. त्यांची जवळीक त्याला जाणवते आणि सुखावते. आपल्या आठवणी, अनुभव, श्रुतता, विविध विषयांसंबंधीची चोखंदळ आवडनिवड इत्यादिकांच्या अनुषंगानें ते आपला विषय असा सजवीत नटवीत जातात आणि त्यावर जीवनभाष्याचें गुलाबपाणी शिंपडून तो असा आल्हादक बनवतात कीं श्रोत्याला आपल्यावर कांहीं खास अनुग्रह झाला असेंच वाटावें. जवळीक देऊनहि फडके श्रोत्याला थोडं अंतरावर ठेवतात. पण त्यांतलें त्यांचें कौशल्य हें कीं ते त्याची नाराजी ओढवून घेण्या-ऐवजीं त्याचा आदरच संपादन करतात. त्यांचें भाषण संपतें तेव्हां श्रोत्याला वाटत असतें कीं फडके आपल्याला फाटकापर्यंत पोचवायला आले आणि म्हणाले 'सवडीनं या बरं का पुन्हा' त्यांच्या या नागर आतिथ्यानं त्यांची अर्हता सुखा-वते आणि त्यांच्या पुनर्भेटीसाठीं तो उत्सुक रहातो.

रेडियोवरील वक्तृत्वांतून जाणवणारें आणि लोभवणारें फडक्यांचें व्यक्ति-मत्व सुसंस्कृत आहे, नागर आहे, कमावलेलें आहे. अगदीं काळजीपूर्वक तयार केलेल्या उपवनासारखें. सुस्वच्छ, नीटनेटकें, आटोपशीर, प्रसन्न, सौम्य, नयन-मनोहर आणि आल्हादकारक. त्यामागें त्यांची अभिजात सौंदर्यदृष्टि आहे, मार्मिक निवड आहे आणि भरपूर परिश्रमहि पण आहेत. अभिप्रेत परिणाम साधण्यासाठीं अवश्य असलेली सर्व सावधानता त्यांनीं ठेवलेली असते. आणि जरूर ती साधनसामग्री कौशल्यानें उपयोगांत आणलेली असते. त्यांत ते कुठेंच

कसूर होऊं देत नाहींत. रेडियोवरील वक्ते या नात्यानें त्यांच्या यशाचें मर्म त्यांच्या या वृत्तिविशेषांतच अधिक आहे असें मला वाटतें. रेडियोवरील वक्ता म्हणून ज्यांना नांव कमवावयाचें असेल त्यांनीं फडक्यांचा हा विशेष अभ्यासणें खचित उद्बोधक ठरेल.

फडक्यांना जेव्हां रेडियोवर भाषण करण्यासाठीं निमंत्रण जातें तेव्हां विषयाच्या व्याप्तीची पूर्वसूचना त्यांना न मिळाल्यास किंवा ती पुरेशीं स्पष्ट नसल्यास लगेच पत्र टाकून किंवा संबंधींत रेडियो अधिकाऱ्याला भेटिला बोलावून ती ते स्पष्ट करून घेतील. त्यांच्याकडे गेलेले करारपत्र त्यांच्याकडे रेंगाळत कधींच रहात नाहीं. तें ते तत्परतेनें सही करून पाठवतात आणि आपले हस्तलिखित ऑफिसच्या हातीं केव्हां पडेल आणि तें ध्वनिमुद्रीत करण्यासाठीं आपण कोणत्या दिवशीं आणि कोणत्या वेळीं येऊं शकूं याची पूर्वसूचनाहि ते त्याच वेळीं देऊन ठेवतात. त्यामुळें फडक्यांनीं भाषण करण्याचें एकदां मान्य केल्यावर रेडियो अधिकाऱ्यांना त्याचा घोर कधींच वागवावा लागत नाहीं. सांगितलेल्या दिवशीं त्यांचें हस्तलिखित टेबलावर हजर होते. उघडून पाहिलें कीं मन कसें प्रसन्न होते. सुवाच्य रेखींव अक्षर, समुचित विरामचिन्हें, भरपूर मार्जिन, नेटके परिच्छेद अशा परिवेषांतले त्यांचें हस्तलिखित वाचायला चित्त आपोआपच उत्सुक होतें. हल्लींचीं आपलीं भाषणें ते 'डिक्टेट' करीत असावे. कारण त्यांतलें हस्ताक्षर त्यांचें नसतें. पण त्यांतले ऱ्हस्व, दीर्घ आणि विरामचिन्हें त्यांनीं ठीकठाक केलेलीं असतात. रेडियोवर वक्ता म्हणून थोडें नांव होतांच आजकालचे नवखे लेखक देखील आपण एकदां खरडलेले भाषण पुन्हा वाचून सुद्धां कसें पहात नाहींत याचा अनुभव मी रोजच घेत असल्यामुळें, आपल्या हस्तलिखिताच्या बाबतींतली फडक्यांची ही दक्षता मला विशेषच आदरणीय वाटते. आपण कशासंबंधीं लिहितों आणि कुणासाठीं लिहितों— किंबहुना बोलतो-याचें फडक्यांचें भान सहसा सुटत नाहीं. ज्या विषयासंबंधीं बोलावयाचें त्याचा त्यांनीं पुरता अभ्यास केलेला असतो. विषय आधीं हाताळलेला आणि सर्वस्वी आपल्या ठेवणींतला असला तरी तो नावीन्यानें नटवण्यासाठीं ते आपल्या चिंतन वाचनाला उजाळा देतील आणि मगच त्याचा प्रपंच करतील.

त्यांच्याजवळ माहितीचें भांडवल कितीहि असलें तरी भाषणाला पेलतील असें मोजकेंच मुद्दे ते घेतील आणि ते पुरते फुलले खुलले आहेत याची दक्षता घेतील. आपल्या भाषणाच्या पहिल्याच वाक्यानें आपल्याला श्रोत्याच्या मनाची पक्कड घ्यावयाची आहे हें ते कधींच विसरत नाहींत. रेडिओवरील भाषणांत आपण काय सांगतों यापेक्षांहि आपण तें कसें सांगतों हें अधिक महत्वाचें असणें ही जाणीव ते सतत ठेवतात आणि आपल्या भाषणाला कलाकृतींसारखा रेखीव आणि हृस्य आकार आणण्याची खबरदारी घेतात.

आपलें भाषण सामान्य माणसें देखील ऐकणार आहेत हें जाणून तें ते जसें सुबोध करतात त्याचप्रमाणें त्यांतल्या आशयाला सौंदर्याची जोड देऊन तें ते रंजक आणि हृद्यहि करतात. प्रसन्न शैलीचे शैलीकार आणि अव्वल दर्जाचे बहुश्रुत लघु-निबंधकार या त्यांच्या दोन गुणांचा त्यांना रेडियोवरील वक्तृत्वांत चांगलाच फायदा झाला आहे. पण हे दोनहि गुण रेडियो माध्यमांतून व्यक्त करतांना त्यांना कशी आणि कुठं मुरड घालावी लागते हें तंत्र त्यांनीं डोळसपणानें बसवलें आहे आणि तें यशस्वी करून दाखवलें आहे. वक्तृत्व हा फडक्यांचा जसा एक आवडीचा विषय आहे तसाच तो त्यांच्या साधनेचाहि विषय आहे. आपल्या स्वभावाला आणि व्यक्तिमत्वाला कशा प्रकारची वक्तृत्वशैली विशेष साजेल आणि उठाव देईल हें त्यांनीं अभ्यासलें आहे. पण ही आपली वक्तृत्वशैली रेडियोवरहि तेवढीच प्रभावी करावयाची असेल तर त्यासाठीं तिनें कोणतीं पथ्यें अंगवळणीं पाडलीं पाहिजेत याची डोळस तालीम त्यांनीं घेतली आहे याची साक्ष त्यांचें भाषण ऐकतांना चोखंदळ श्रोत्याला निश्चितच मिळते.

रेडियोकडे आलेलें त्यांचें प्रत्येक भाषण त्यांनीं घरी ' रिहर्स ' केलेलें असते. जितक्या मिनिटांत तें बसायला हवें असतें तेवढ्यांच मिनिटांत तें बसवलेलें असतें. त्यामुळें ' मायक ' वर तें वाचतांना त्यांच्या गतीत फरक कधीं पडत नाहीं आणि एकहि परिच्छेद कमी अधिक करावा लागत नाहीं. फडके ज्या वेळीं रेडियोवर भाषण वाचतात तेव्हां त्यांत थोडें ' ॲफेक्टेशन ' वाटतें. पण ते सुद्धां अशा बतानें वापरलेलें असते कीं त्यांच्या मराठी शैलीला एकाद्या प्रौढ पाश्चात्य भाषेचा डौल प्राप्त व्हावा. वाचतांना ते बोलल्याचा भास लीलया निर्माण

करतात. त्यासाठीं लागणारे आवाजाचे चढउतार ते अर्थपूर्णतेनें करतात. बोली शैलीला धरून त्यांची वाक्यें छोटी, सुटसुटीत आणि भावसुडौल असतात. एकादे वाक्य अदीर्घ असलेंच तर ते असे विराम घेऊन उच्चारतात कीं त्याची दीर्घता आपणाला जाणवूंच नये.

या सर्व विशेषांमुळें रेडियोवरिल व्यक्तित्वदर्शक शैलीचे वक्ते म्हणून फडक्यांचा नंबर फारच वरचा लागतो. श्रोते तर त्यांच्यावर लुब्ध असतातच पण रेडियो अधिकारीहि त्यांच्या स्वागतासाठीं उत्सुक असतात. त्यांचा निष्कारण कालापव्यय होत नाहीं आणि अल्पायासांत चांगलें भाषण मिळवल्याचें श्रेय त्यांच्या पदरीं पडतें. श्रोते आणि रेडियो अधिकारी या उभयतांचा सारखाच स्नेह मिळवणारे फडक्यांसारखे यशस्वी वक्ते एकंदरींत दुर्मिळच.

# एक आगळें व्यक्तिमत्व

लेखकः-डॉ. **माधव गोपाळ देशमुख**

आजच्या अभिनंदनाच्या मंगल प्रसंगीं आप्पासाहेब फडक्यांच्याविषयीं काय लिहावें आणि काय नाहीं असें होऊन जातें. ना. सी. फडक्यांचे निंदक कांहींहि म्हणोत. मी एक विधान बिनदिक्कत करूं इच्छितों कीं, निदान आजच्या विद्यमान मराठी श्रेष्ठ साहित्यिकांत आप्पासाहेबांएवढा अंतर्बाह्य दिलदार मनुष्य दुसरा नाहीं !

ज्याला एकदा आपला म्हटलें त्याच्याविषयी कधीहि गैरसमज करावयाचा नाहीं, हा त्यांचा बाणा इतरत्र अत्यंत विरळा. वास्तविक आठवणी म्हटल्या कीं, त्या ज्या व्यक्तीविषयीच्या असतात तशाच त्या आठवणी सांगणाऱ्या व्यक्तीच्याहि असतात. पुढील कांहीं आठवणींतील 'आत्मनेपद' अपरिहार्य म्हणून बाजूला ठेवा; पण त्यामुळें आप्पासाहेबांच्या अजोड व्यक्तिमत्वावर अचूक प्रकाश पडतो, म्हणून त्या खचितच ग्राह्य ठराव्या.

पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट. एम्. ए. परीक्षेंतला मराठी कादंबरीवरचा पेपर. ना. सी. फडके परिक्षक. पण पेपर लिहितांना लेखकाला तो कोणाकडे जाणार याची कल्पना नाहीं. फार तर तो वा. म. जोशी यांच्याकडे जाणार असा अंदाज. लेखकाने वा. म. जोशी यांच्या तुलनेनें फडके यांच्या कादंबऱ्यावर असा कांहीं हल्ला चढविला कीं विचारूं नका ! कालान्तराने तो कोणाकडे गेला हें कळलें व आतां आपली कंबक्ती वळणार हें ठरल्यासारखें झालें. पण एका सुंदर सकाळीं आमचे परममित्र वामनराव चोरघडे चौकशी करीत आले, "कां हो माधवराव, नंबर ६३ तुमचाच ना ?" "हो, कां बर ?" नाहीं, तुमचा पेपर फडक्यांना फार आवडला व त्यांनीं तुम्हांला सर्वोच्च गुण दिले आहेत. तुम्हीं त्यांना आतां आभाराचें पत्र लिहूं शकतां" त्यावेळीं विश्वास बसला नाहीं. पण थोड्याच दिवसानंतर फडक्यांचें एक अनाहून प्रमाणपत्र आलें आणि तेंहि असें कीं जसें कोणी कोणाला मागूनहि देणार नाहीं !

या गोष्टीला आज पंचवीस वर्षे झालीं. पण फडक्यांच्या कादंबऱ्यांवर टीका करण्याचा लेखकाचा क्रम अव्याहत सुरू आहे व तो कळत न कळत फडक्यांच्या कानांवर जाऊन त्यांचें अनाहूतपणें प्रमाणपत्रें देणेंहि सुरूच आहे! एकदा दिल्लीच्या मराठी साहित्य संमेलनात फडके-प्रभृति कादंबरीकारांवर जोराचा हल्ला चढविला. कांहीं दिवसानंतर पुण्याला फडक्यांची भेट झाली. त्यावेळीं त्यांची सुभाषचंद्रावरील कादंबरी लिहिणें चालू होतें. दिल्लीचा वृत्तांत त्यांच्याकडे इत्थंभूत आला असेल अशी कल्पना नव्हती. म्हटलें पुण्याहून दिल्ली बहोत दूर आहे! पण औपचारिक पाहुणचार झाल्यावर ऐकूं आलें "माधवराव, तुमचें दिल्लीचें भाषण फार तिखट झालें व सगळ्या कादंबरीकारांना फार लागलें म्हणें!" "पण तुम्हाला?" "मला फार आवडलें. तुमचा परवाचा नवकाव्यावरचा लेखहि तसाच झक्क उतरला आहे.

"प्रातिच्चिया बोला नाहीं पेसपाड! भलतेंसें गोड करूनी घेई" याशिवाय दुसरें काय म्हणणार? पण असल्या विलक्षण प्रेमाचा वांटेकरी असा कोणी एकटा-दुकटा नाहीं. आमच्या पिढींतल्या किती तरी लेखकांचा अप्पासाहेबां-विषयीं हाच अनुभव आहे. त्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष उत्तेजन दिल्यामुळेंच ज्यांनी शिक्षणाच्या व साहित्याच्या क्षेत्रांत नांवलौकिक मिळविला व फडक्यांच्या प्रेमाला पात्र झाल्याबद्दल ज्यांना आजन्म अभिमान वाटत आला आहे अशी एक फार मोठी पिढी आज हयात आहे.

प्रा. ना. सी. फडके यांच्या भाषाशैलीनें मराठी भाषेवर एक कधींहि न मिटून जाणारा ठसा उमटाविला आहे यांत वादच नाहीं. त्यांच्या शैलीचें जाणूनबुजून अनुकरण करणारे लेखक त्यांना मानतात यांत काय नवल? पण आपणाशीं प्रामाणिक मतभेद असूनहि आपल्या ललित लेखनाबद्दल, उदात्त वक्तृत्वाबद्दल आणि प्रशांत भाषाशैलीबद्दल असीम अभि-मान वाटणारा फार मोठा वर्ग आपल्या हयातींत विद्यमान असणें ही कोणत्याहि समकालीन लेखकाला अत्यंत अभिमानास्पद अशी गोष्ट आहे.

अलीकडे प्रा. फडके हे भाषण खुर्चीवर बसून करतात, पण त्यांच्या आवाजांतील गांभीर्य आणि माधुर्य तसेंच चढउतार आणि लयबद्धता ही जशी

पंचवीस वर्षांपूर्वी होती तशीच आजहि आहे. किंबहुना त्यांच्या भाषणांतील प्रारंभीच्या 'मित्रहो' या शब्दापासून तो अखेरच्या शब्दापर्यंत त्यांचें भाषण श्रोत्यांना त्यांच्या युक्तिवादाकडे खेंचून घेण्यांत आज अधिकच प्रभावी ठरलें आहे. ही पकड येऊं शकली याचें मुख्य कारण हें कीं, आज त्यांच्या ठिकाणीं आपण जें कांहीं बोलतों त्यांतील ठामपणाबद्दलचा विश्वास हा अधिक पक्का झाला आहे.

हें सारें कांहीं केवळ सभेंतील वक्तृत्वांतच आहे असें नाहीं. एखाद्या तात्त्विक विषयावरील चर्चेला खासगी बैठकींत फडके हे आधी प्रवृत्तच होत नाहींत, झालें तरी तींत बोलण्यापेक्षां ऐकण्याचेंच काम जास्त करतात. आपलेंच म्हणणें खरें कां व कसें-याबद्दल बहुधा सर्व वक्ते भाषण संपतांच जणूं कांहीं नवा कंठ फुटल्या-प्रमाणे एक नवेंच छोटें भाषण देतात, तसें प्रा. फडके सहसा करीत नाहींत. उलट सभेंत काय, नंतर काय किंवा बैठकींत व संभाषणातहि विरोधकाला विरोध करण्याचें जणूं कांहीं स्वातंत्र्य आहे असें समजून खंडनमंडनापासून ते अलिप्त राहतात.

याचा अर्थ प्रतिपक्षाचें म्हणणे त्यांना माहीत नसतें असें नाहीं. उलट तें जाणून घेऊन त्याचा उत्तरपक्ष म्हणूनच त्यांचें भाषण असतें. पण वा. म. जोशी, न. चिं. केळकरांप्रमाणें दोन्ही पक्ष तोलून किंबहुना प्रतिपक्षाचें म्हणणें अधिक तत्परतेनें मांडण्याचा त्यांचा शिरस्ता नाहीं. यामुळेंच बहुधा त्यांचे विचार सुवर्ण-मध्य गाठणारे व 'आहे म्हटलें तर आहे, नाहीं म्हटलें तर नाहीं' अशा नरसो-पंती पद्धतीचे न ठरतां त्यांच्या विचारांना एक तीव्र धार येते. असलें टोकदार वक्तृत्व अलीकडे दिसतेंच कुठें ?

प्रा. ना. सी. फडक्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक महत्त्वाचा विशेष हा की त्यांचें वक्तृत्व जरी एका प्रकारें गंभीर आणि धीरोदात्त असले तरी त्यांच्या संभाषणांत त्यांच्या दिलखुलास युक्तिपाटवाबरोबरच त्यांचा मिस्कील विनोदहि डोकावल्यावांचून राहत नाहीं.

विदर्भ महाविद्यालयांत कांहीं वर्षांपूर्वी स्त्री - पुरुषांचा संमिश्र असा नाट्यप्रयोग प्रथमतः बसविण्यांत आला. दुसऱ्या दिवशींच्या

मेजवानीच्या प्रसंगीं या नाट्यप्रयोगाची चाललेली चर्चा ते बराच वेळ नुसते ऐकून घेत होते. जणूं कांहीं आपण नवीन माहिती पुरवीत आहोंत अशा ईर्ष्येने एका व्यक्तीने त्यांना उद्देशून म्हटलें, "आप्पासाहेब, कालचे नाटक स्त्री-पुरुषांनीं मिळून केलेलं या कॉलेजांतील पहिलं नाटक होतं!" आप्पासाहेबांनी जणूं कांहीं कळलेंच नाहीं अशा स्वरांत विचारलें, "अस्सं? कालचं नाटक स्त्री-पुरुषांनी मिळून केलं होतं होय?"

स्त्री-पुरुषांचीं कामें त्या नाटकांत यथातथाच झालीं, असें आपलें मत त्यांनी अशा कांहीं विनोदी रीतीन सुचविलें की त्यांच्या बाह्यतः निरागस दिसणाऱ्या त्या खवचट प्रश्नाने सर्व संबंधितांत हास्याची एकच खसखस पिकली.

ना. सी. फडके हे विनोदी लेखक किंवा वक्ते म्हणून फारसे प्रसिद्ध नाहींत. पण विनोदाचें अंग त्यांच्या ठिकाणीं आहे. एवढेंच नव्हे तर त्यांचे नंबर एकचे प्रतिस्पर्धी समजले जाणारे आचार्य अत्रे यांच्या सर्वोत्कृष्ट विनोदाचे व कोट्यांचे प्रा. फडके हे एक चाहते आहेत. ही गोष्ट त्यांचे अंतेवासी जाणतात. फडके–अत्रे वादांत आपल्या कांहीं कोट्यांना आचार्य अत्रे यांनी कसें उलटविलें याचें वर्णन खुद्द प्रो. फडक्यांच्या तोंडून खाजगी संभाषणांत ऐकतांना त्यांच्या प्रांजळपणाची खात्री पटत. या दोन्ही वाग्वीरांनी एकमेकांविरूद्ध आजवर काय काय लिहिलें (किंवा काय लिहायचें ठेवलें) हे जरी प्रसिद्ध असले तरी प्रा. फडके हे आचार्य अत्र्यांच्या विनोदाचें जेव्हां एखाद्या लेखांत रसग्रहण करतील तेव्हां तो मराठी वाङ्मयांतील मोठा सुयोगच समजावा लागेल. हा सुदिन लवकरच येवो अशीच दोघांच्याहि चाहत्यांची सदिच्छा असणार!

पंचवीस वर्षांनंतर गल्याच वर्षी आमच्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून आप्पासाहेबांचा परिचय करून देत होतों. त्यांची भाषाशैली व वक्तृत्व यांची ओळख करून देतांना कॉलेजच्या विद्यार्थ्यांना त्यांचें वाङ्मय कसें प्रिय आहे व त्यांच्या कादंबऱ्या विशिष्ट वयांतील तरुण विद्यार्थी कशा आवडीनें वाचतात हें सांगितले. हजरजबाबी आप्पासाहेबांनीं तें विधान खाली पडूं दिले नाही. ते म्हणाले, "माझ्या कादंबऱ्या तरूण लोक हौसेनें वाचतात आणि वयस्क लोक चोरून वाचतात."

ललित वाङ्मयाचा आद्य हेतु हा त्यांच्या भाषणाचा आवडीचा विषय असून, त्यांनी तो आपल्या असंख्य भाषणांत व लेखांत वेगवेगळ्या तऱ्हांनी मांडला. त्यांच्या शब्दांत कांहीं फेरबदल झाला असेल पण आनंदासंबंधी त्यांची एक विशिष्ट धारणा आहे. तिला अनुरूप त्यांचें ललित लेखन असून " बोलें तैसा चाले " हें वचन त्यांनीं आपल्या बोलण्या-प्रमाणें कृती करून सार्थ केले आहे.

ललित वाङ्मयाची निर्मिति असो कीं चर्चा असो प्रा. फडक्यांची एक विशिष्ट बैठक असते व ती त्यांनीं आजवर कधीहि सोडली नाहीं. त्यामुळें ' प्रतिभा-साधना ' सारखा ग्रंथ त्यांच्याकडून एका विश्रब्ध विश्वासानें निर्माण झाला. ललित लेखनाच्या तांत्रिक बाजूविषयीं गेल्या पंचवीस तीस वर्षांत मराठींत ' प्रतिभा-साधन'च्या तोडीचा एकहि ग्रंथ निर्माण होऊं शकला नाहीं, ही घटना अगदीं साधीसुधी नाहीं.

" आप्पासाहेब, तुम्ही जे प्रतिभेचे गौरवानें वर्णन केले आहे ते संस्कृत साहित्यशास्त्रांत अगदी थोडक्यांत सांगितलें आहे. तुमच्या पाहण्यांत मूळ ग्रंथ नाहींत."

" त्या ग्रंथांत मी म्हणतों तेंच थोडक्यांत सांगितलं आहे ना ! आणि तेंच इतर लेखकांनी विस्तारानें मराठीत मांडलेंच आहे ना ! मग मला तुमचे ते मूळ ग्रंथ वाचण्यास मिळाले नाहींत हें किती चांगलं झालं ! ते मी वाचले असते तर मला प्रतिभेचं साधन करितां येतं हें नव्यानं सांगतां आलं नसतं ! "

निरुत्तर करणारे हे त्यांचे उद्‌गार अनेक अर्थांनी सूचक आहेत. आपणा-जवळ जे कांहीं विचार आहेत त्यांच्यावर स्वतःचे संस्कार करून ते घासून पुसून स्वच्छपणें आबालसुबोध शैलीनें सांगावे फडक्यांनीच, किंबहुना एस. एस. सी. च्या विद्यार्थ्यांपुढें द्यावयाचें परीक्षोपयोगी भाषण असो कीं, एखाद्या साहित्य संमेलनाचें भाषण असो, त्यांतील मुद्यांचें मनन व चिंतन केल्याशिवाय ते सहसा आपले विचार मांडणार नाहीत.

आज त्यांची प्रज्ञा परिणत झाली आहे. आतां ते बोलतील तें शास्त्र अशी त्यांच्या वाणीला प्रतिष्ठा लाभली आहे. पण तरीहि त्यांचा अखंड व्यासंग पंचवीस वर्षांपूर्वी होता तसाच आजहि चालू आहे.

आज १९६० मध्यें त्यांच्या वयाची सत्तरी आली आणि कादंबरीचा सुवर्ण महोत्सव आला. त्यांची पन्नासावी कादंबरी लिहिण्याचें काम त्यांचा लेखक करीत असतांना तुम्हीहि औरंगाबादहून त्यांना भेटण्यासाठीं जा. ते मनापासून स्वागत करतील, अर्धापाऊण तास मनमोकळेपणानें नाना विषयांवर वार्तालाप करतील. परत जातांना तुम्ही संकोचून म्हणालच कीं, "तुमच्या लेखन कार्यांत मध्येंच व्यत्यय आणला, माफ करा."

ते लगेच उद्‌गारतील 'छे हो! माझं लिहिणं आतां अगदीं नळाच्या पाण्यासारखं झालं आहे.'

"म्हणजे कसं?"

"अहो, पाणी नको असलं की तोटी बंद करावी. पाणी आंत असतंच, काम पडलं की तोटी पुनः सुरू करायची. प्रवाह आपला चालू-"

ईश्वर करो आणि मराठी ललित वाङ्मय निर्मितीची ही तोटी आणखी पंचवीस वर्षें तरी रसलोलुप वाचकांना असेंच अखंडपणें जीवनदान देवो!

# जातिवंत कवि : आप्पासाहेब फडके

लेखकः- डॉ. वि. भि. कोलते

प्रा. आप्पासाहेब फडके यांनी साहित्याच्या सर्व क्षेत्रात संचार केला आहे, फक्त काव्य सोडून. कादंबरी आणि लघुकथा ही तर त्यांची विशेष क्षेत्रे होत. पण शिवाय नाट्य, ललित निबंध टीका, विनोद इत्यादि क्षेत्रातहि त्यांनी स्वैर संचार केलेला आहे. पण काव्याच्या क्षेत्रांत ? नाहीं म्हणायला त्या क्षेत्रात त्यांनी थोडीफार ' रुमझुम ' केलेली ऐकू येते. पण ती कानावर पडते न पडते तोच विरून जाते. असें का व्हावे ? काव्याचे क्षेत्र लौकिकदृष्ट्या त्यांनी का उपेक्षावे ? काव्यरचनाच नव्हे तर काव्याविषयीचे लेखनसुद्धा त्यांनी कटाक्षाने टाळले असावे की काय असें वाटण्याइतपत त्यांचा त्यांच्या लेखनात अभाव आहे.त्यांच्या 'प्रतिभा-साधना ' त साहित्याच्या सर्व शाखांचे मंत्र आपल्याला आढळतील. काव्याला मात्र त्यांनीं स्पर्श केलेला नाही. मला नेहमीच प्रश्न पडला आहे की असे का व्हावे ?

हा प्रश्न पडण्याचे कारण असें कीं आप्पासाहेब मनानें, वृत्तीनें आणि प्रवृत्तीनें जातिवंत कवी आहेत. ते हाडाचे रसिक आहेत. याचा अनुभव त्यांचे कोणतेहि लिखाण वाचतांना ताबडतोब येतो. ' प्रतिभा–साधना ' सारखा साहित्य चर्चेचा का ग्रंथ घ्या ना. त्यातील पानापानातून काव्य नुसते निथळते आहे. वस्तुतः हा साहित्याच्या तत्वज्ञानाचा ग्रंथ; पण तो आप्पासाहेबांनी आपल्या लालित्यपूर्ण शैलीने असा सजवलेला आहे की तो वाचतांना मन हरखून जाते. त्यातील केवळ तात्विक विवेचनासाठीं नाही तर 'काव्या'साठी तो पुनः पुन्हां वाचावेसे वाटते. ज्ञानेश्वरांनी अध्यात्मशास्त्राच्या ग्रंथावर टीका लिहिली, पण ती अशा वाक्चातुर्याने की त्यांचा ग्रंथ तत्वज्ञानाचा आहे की काव्याचा, हा प्रश्न पडतो. या तात्विक ग्रंथाला सर्वश्रेष्ठ काव्याच्या मानाचे पान लाभलेले आहे ते उगीच नाही. आप्पासाहेबांच्या सर्व गद्य लिखाणाविषयीहि असेच म्हणता येईल. त्यांनी केलेल्या ' गुजगोष्टीच ' पहा ना. आपले एखादे विशिष्ट गुज सांगताना उपमादृष्टांतांची

नुसती फुले उधळीत ते पुढें जातात. त्यामुळें त्यांच्या गुजगोष्टी म्हणजे सुंदर गद्यकाव्ये झालेली आहेत. असे असल्यामुळे मला नेहमी प्रश्न पडतो की प्रा. फडके यांनी काव्य का लिहिले नाही ? इतर कोणत्याहि कवीपेक्षा काव्याचा मुकुट त्यांच्या शिरावर अधिक शोभून दिसला असता.

पण आप्पासाहेब कवी नाहीत हेच मुळीं मला मान्य नाही. लौकिक दृष्टीनें त्यांनी पद्यरचना केली नसेल. गणमात्रांच्या बरोबर ते खेळले नसतील. मुक्त-छंद त्यांनीं हाताळला नसेल. तथापि काव्याचा खरा आत्मा जो रस त्याची कारंजी त्यांनी आपल्या सर्व लिखाणातून उडवलेली आहेत. रसाळपणा हे त्यांच्या शैलीचे रहस्य होय. ते ‘ मानसमंदिरा ’ त प्रवेश करून अंतःकरणाची कोडीं उलगडत असोत किंवा साहित्याच्या मंदिरात ‘ प्रतिभासाधन ’ करीत असोत, टीकेच्या क्षेत्रांत ‘ टाकीचे घाव ’ घालीत असोत किंवा साहित्याचा संसार साजरा करीत असोत, गोष्टी लिहीत असोत किंवा ‘ गुजगोष्टी ’ करीत असोत, तेथें त्यांच्या रसाळ शैलीचा प्रत्यय आल्यावाचून रहात नाही.

आणि याचे कारण उघड आहे. आप्पासाहेब फडके म्हणजे अभिजात रसिकता होय. असं मी म्हटले तर ती अतिशयोक्ती वाटू नये. त्यांच्या जीवनात ती ओसंडून वहात असलेली कुणालाहि आढळेल. परवा असेच झाले, माझ्या दोन स्नेह्यांना घेऊन मी अनपेक्षितपणे आप्पासाहेबांच्या घरी जाऊन पोहोचलो. त्यावेळीं ते खोलीत नव्हते. लहानशीच अभ्यासिका पण कशी सुंदर सजवलेली ! टेबलावर पुस्तके आणि लेखनसाहित्य नीट व्यवस्थित ठेवलेले ( नाहीतर माझे टेबल पाहण्यास यावें ? ) नागपूरच्या स्नेह्याने त्यांना भेट म्हणून दिलेली, झगा घातलेल्या स्त्रीच्या आकृतीचा दांडा असलेली पितळी घंटी, चित्र-विचित्र वेलबुट्ट्यांचे पेपरवेट, मनोहर निसर्ग दृश्यांची दोनतीन चित्रे पाहून आमची मने प्रसन्न झाली. आप्पासाहेबांच्या चोखंदळ रसिकतेची साक्ष देणारी काही चित्रे भिंतीवर टांगलेली होती. आणि हातात तंबोरा घेऊन वादन करीत असलेल्या सौ. कमलाबाईंचे छायाचित्र एका कोपऱ्यांतील स्टुलावर ठवलेले. सर्व कसे नीटनेटके आणि व्यवस्थित होते. चारपांच मिनिटात आप्पासाहेब आले आणि अभ्यासिका एकदम सुगंधाने दरवळून गेली. मला वाटते त्यांनी नुकतच

सायंस्नान आटोपून अंगाला अंगराग लावलेला असावा. त्याचा दरवळ मंद व प्रसन्न करणारा होता. आप्पासाहेबांच्या मुद्रेवर प्रसन्न हास्य खेळत होते. खोलींत येताच आपल्या सौजन्यपूर्ण आतिथ्याने त्यांनी आमची मने जिंकून घेतली. मी मनांत म्हणालो जीवनाचा आनंद घेणारे खरे रसिक आहेत हे !

आप्पासाहेबांनी, टेबलावर बोटे वाजवीत मला एकदम विचारले, ' कोलते, तुम्ही लताची नवीन रेकॉर्ड ऐकली का ? '

' कोणती ? '

' ती 'ओ सजना,' ' बरखा बहार आई '

' हं...तिचे काय ? '

' नागपूरला मी ' हार्मनी ' संबंधी बोललो होतो ना, तिचे हे एक सुंदर उदाहरण आहे... आणि लताने यात ४ घटांच्या ऐवजी साडेतीन घटांच्या लयीचा एक नवीन प्रयोग यशस्वितेने केला आहे.वा, खूपच छान ! शिवाय आरंभ करतांना तर वाद्याच्या स्वरांत मधेंच आपला स्वर तिने मिसळून दिला आहे; इतका बेमालुम की तो निराळा आहे हे लक्षातच येत नाहीं. चला तुम्हाला ती रेकॉर्डच ऐकवितो......

—आणि आप्पासाहेब एकदम उठून दिवाणखान्याकडे चालायला लागले. आम्ही कुतूहलाने त्यांच्या मागोमाग गेलो. रेडियोग्रामजवळ बसलो. रेकॉर्ड वाजायला आणि महत्वाच्या जागा समजावून देत देत आप्पासाहेब भाष्य करूं लागले. आणि मग त्यांनी ती रेकॉर्ड आम्हाला पुन्हा ऐकवली.

मी मनात पुन्हा म्हणालों, नादलुब्धाच्या आठवणी लिहिणारे खरे रसिक आप्पासाहेब ते हेच.

मंत्रमुग्ध करून सोडणारे वातावरण त्यांनी कांहीं क्षणांत सहज निर्माण केले. आप्पासाहेबांची रसिकता, नादलुब्धता, सुगंध-प्रियता, काव्यात्मता इत्यादि गुणांचा अत्यंत आल्हादकारक अनुभव आम्हाला तेवढ्यात येऊन गेला. त्यांच्या ठिकाणच्या या आभिजात गुणसंपदेचा परिणाम त्यांच्या लेखनावर झाल्यावाचून राहणें कसें शक्य आहे ? भोवतालच्या जीवनातून प्रसन्नतेने व रसिकतेने शक्य तितका आनंद लुटण्याची त्यांची वृत्ति व प्रवृत्त आहे. आणि तीच त्यांच्या लेखनात व भाषाशैलीत प्रतिबिंबित झालेली आहे यात शंका नाहीं.

आप्पासाहेबांच्या व्यवस्थितपणाचें वळण त्यांच्या सर्व लेखनाला लागलेले आहे. त्यांची कादंबरी असो, लघुकथा असो किंवा गुजगोष्ट असो, तिच्यांत बांधेसूदपणा असतो; सर्व पात्रे, प्रसंग योग्य त्या ठिकाणीं व्यवस्थित असतात; रचनेत रेखीवपणा असतो. यालाच आपण कलात्मक सौंदर्य म्हणतो. सौंदर्य म्हणजे तरी काय? 'तत्तदंगेषु यच्छुद्धं तत्सौंदर्यम्' सर्व वस्तु योग्य त्या ठिकाणीं ठेवलेल्या असणे, त्या त्या अवयवाची शुद्धता अर्थात् निर्दोषता म्हणजेच सौंदर्य. 'सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन यथाप्रदेशं विनिवेशितेन। सा निर्मिता विश्वसृजा प्रयत्नादेकस्थसौंदर्यदिदृक्षयेव' या श्लोकांत कालिदासाने अप्रत्यक्षपणें सौंदर्याची व्याख्याच गोवली आहे. महानुभावांच्या महावाक्य प्रमेयात बरोबर अशीच एक व्याख्या आलेली आहे. "तरि सौंदर्य म्हणजे काइ : ना आवयवयुक्त बरवेपण : जीए अवेवी जे बरवे तो अेवेवु बरवा : तैसे सकळ अवयव बरवे : हा एकु अवयव पाहता आणिका अवयवावरि दृष्टि न वच याते सौंदर्य बोलिजे :" हे सर्वावयवी बरवेपणाचे सौंदर्य फडक्यांच्या लेखनांत आपणास आढळून येत नाहीं काय? त्यांच्या कादंबऱ्यांची रचना तंत्रशुद्ध असते. कथानक, त्यांतील व्यक्ति, त्यांचे स्वभाव; त्या स्वभावांच्या एकमेकांवर होणाऱ्या परिस्थितिप्राप्त प्रतिक्रिया, त्यांतून निर्माण होणारी कथानकाची गुंतागुंत आणि त्या गुंतागुंतीची हळुहळू हलक्या हातानें होणारी उकल इत्यादि गोष्टी कशा मनात भरण्याइतक्या वेधकतेने त्यांच्या कादंबऱ्यांच्या रचनेत आढळतात. म्हणजे कथेचे सर्व अवयव कसें योग्य ठिकाणी उत्कृष्टतेनें योजलेले असतात. 'मी माझ्या कादंबऱ्या कशा लिहितो' या आपल्या लेखांत कादंबरीची रचना करतांना आपण मध्यवर्ति कल्पनेचा पूर्त अवतार म्हणून प्रथम कोणत्या तरी एका व्यक्तीची शक्य तितकी रेखीव व स्पष्ट कल्पना मनाशी कशी करीत आलो आहो, यासंबंधी त्यांनी जे निवेदन केले आहे ते पाहावे म्हणजे मी काय म्हणतो याची कल्पना येईल. हेंच त्यांचे प्रतिभासाधन होय. रचनेचा हा रेखीवपणा, व्यवस्थितपणा लक्षांत घेतां त्यांच्या कथा-कादंबऱ्याना कालिदासाच्या शब्दात 'उद्यानलता' यथार्थतेनें म्हणतां येईल. आतां या 'उद्यानलता' ना आपल्या गुणांनी दूर करणाऱ्या 'वनलता' असूं शकतात असे यावर कोणी म्हणेल. ते मान्य करूनहि मी असें विचारतो कीं अव्यवस्थित वनलतांचे गुणसंपन्न सकस

सौंदर्य, व्यवस्थितपणाचा हात लागताच अधिक मनोहारी होणार नाहीं काय ? हे अधिक मनोहारित्व प्रा. फडक्यांच्या कथा–कादंबऱ्यात आहे आणि ते त्यांच्या व्यवस्थितपणाच्या आवडीतून सौंदर्यदृष्टीतून निर्माण झाले आहे.

पण केवळ त्यांच्या कथा–कादंबऱ्यातूनच या रचनात्मक सौंदर्यदृष्टीचा आढळ होतो असे नाहीं. त्यांच्या इतर लेखनातूनहि तो होतो. त्यांनीं मराठीत नव्याने सुरू केलेली 'गुज गोष्ट' अथवा ललित निबंध हा सहज रमत-गमत केला जाणारा हृदयसंवाद असला तरी त्यांतहि एक प्रकारचा व्यवस्थितपणा असतो. विस्कळितपणा किंवा रचनेचा अभाव हे या वाङ्मयप्रकाराचे एक वैशिष्ट्य म्हणून त्यांनी सांगितलेले आहे हे खरे; पण हा 'विस्कळितपणादेखील हेतुपुर्वक प्रयत्नाने साधावयाचा असतो ','हॅमलेटच्या वेडातहि पद्धति होती त्याप्रमाणे ललित निबंधाच्या विस्कळितपणातही लेखकाची योजकता आणि कल्पकता असावीच लागते ' हे सांगण्याला ते विसरत नाहींत, हे लक्षांत घेतले पाहिजे. त्यांचे परस्मैपदीं टीकालेख घ्या, मानसशास्त्राची चर्चा घ्या किंवा आठवणी वजा आत्मनेपदीं लेखन घ्या त्यांतह रचनासौंदर्य सर्वत्र आढळेल. त्यांच्या वाणीत, अर्थात् व्याख्यानातहि त्याचा आढळ झाल्यावाचून राहात नाही. आप्पासाहेबांचे व्याख्यान म्हणजे वास्तुसौंदर्यानें विनटलेला प्रासाद वाटतो. प्रतिपाद्य विषयाच्या कळसावर अढळ दृष्टि ठेवून मनात आखून ठेवलेल्या सूत्रानुसार प्रास्ताविकाची पायाभरणी केल्यावर विषयीपन्यासाचा चौथरा ते उभारतात आणि मग त्यावर प्रतिपादनाच्या मुद्यांचे 'आ ऊ' चढवीत चढवीत त्यावर आपल्या मुख्य विषयाचा कळस उभारतात. तो अशा कौशल्याने कीं त्यामुळें व्याख्यान ऐकल्यावर श्रोत्यांना विषय तर समजतोच पण शिवाय कलात्मक आनंदाचा प्रत्यय येऊन त्यांची मनें मोहरून जातात. आप्पासाहेबांनी मांडलेला विषय एखादे वेळेस आपणाला पटणार नाही पण त्यांच्या 'वाक्चातुर्याने ' आपण 'सुखिये ' होतो यांत मात्र शंका नाही. ही कलात्मकता साधण्यासाठीं आप्पासाहेब आपल्या व्याख्यानांचीहि 'तयारी' करीत असतात हे सांगितले तर आश्चर्य वाटेल. पण नागपूरला विदर्भ साहित्य संघात मराठी नाट्य-वाङ्मयावर व्याख्याने देण्यासाठीं ते आले असतांना त्यांची ही

साधना मी पाहिलेली आहे, एवढा निर्देश येथें करावासा वाटतो. शिवाय, त्यांच्या व्याख्यानातील काय किंवा लेखनांतील काय, प्रतिपादन रूक्ष कधीहि नसते. ते अत्यंत काव्यमय असते. आपला मुद्दा समजावून सांगतांना आप्पासाहेब अलंकारांची अशी अभिनव सृष्टि निर्माण करतात कीं तिच्या सौंदर्याने विषय सुबोध होऊन मन आल्हादाने ओथंबून जाते. ज्ञानेश्वरी वाचतांना हा अनुभव आपणास एकसारखा येत असतो. ज्ञानेश्वर महाराज आध्यात्मिक प्रमेयाचे रत्न दृष्टांताच्या कोंदणात कसे कौशल्याने बसवितात! आणि एक नव्हे, अनेक दृष्टांत ते नुसते उधळीत जातात. प्रा. फडके यांच्या विवेचन शैलीचाहि हा एक विशेष आहे. आपण आपले मन कधी निरखून पाहात नाही हे सांगतांना ते लिहितातः

"कोणी आपल्याला विचारले, काय रे, तुझं मन तू कधी निरखून पाहिले आहेस का? तर आपण झोपेतून दचकून उठलेल्या माणसासारखा भांबावलेला चेहरा करून म्हणू 'माझं मन? ...अं...अं...कोणास ठाऊक!...'"

आपल्या हातून घडणारा हा प्रमाद हास्यास्पद तर खराच, पण तो घडावा हे साहजिक आहे. माणसाच्या अगदी जवळ जी वस्तू असते ती त्याला दिसत नाहीं. दूरचे डोंगर चटकन् दिसतात, येवढेच नव्हे तर ते शोभिवंतहि दिसतात, हे जसें खरे, तसेच जवळचे डोंगर दृष्टींत भरत नाहींत हेहि खरे आहे. मासळीला स्वतःचे चमकदार, चंदेरी पोट कधीं दिसत नाहीं. नागाला आपल्या फणीतला तेजोमणी कधीं पाहावयास सापडत नाहीं. कस्तुरीमृगाला आपल्या पोटातली कस्तुरी अजून कोठे हुंगायला मिळाली आहे? इतके कशाला, 'काचेला पारा लावण्याची कला जोपर्यंत निघाली नव्हती तोपर्यंत माणसाला स्वतःचे डोळे कोठे पाहाता आले होते?'......यातील अलंकारांचे सौंदर्य उकलून दाखवायला पाहिजेच का? अशी उदाहरणें त्यांच्या लेखन संसारात सर्वत्र विखुरलेली आहेत. या अलंकार सौंदर्यातूनच त्यांची काव्यात्मता भासळत असलेली दिसून येते.

आप्पासाहेबांच्या भाषाशैलीचे वैभव या गुणामुळें फार वाढलेले आहे. त्यांची भाषाशैली हें मराठीचे एक मोठें भूषण होय. त्यांच्या अंतःकरणातील

प्रसन्नता, सौंदर्यासक्ति, काव्यात्मता, नादलुब्धता इत्यादि गुणांचा परिपाक तिच्यात उतरलेला आहे. त्यांचे प्रत्येक वाक्य लयबद्ध असते. शब्द हे लेखकाचे अंतःकरण अल्पांशानेहि व्यक्त करूं शकत नाहींत हें खरें, तथापि त्यांना जे काय म्हणावयाचे असते ते शक्य तितक्या समर्पकतेने प्रा. फडक्यांच्या वाक्यातून व्यक्त होते. कारण त्यांची वाक्यें प्रासादिक असतात. स्फटिक शुभ्र पाण्याचा तळ ज्याप्रमाणें स्वच्छ दिसतो त्याप्रमाणें त्यांच्या वाक्यातील अर्थ स्पष्ट असतो. भाषेच्या प्रासादिकपणाचे हें एक महत्वाचे लक्षण होय. अर्थाला अनुकूल अशा वेचक शब्दांची योजना करण्यात ते सिद्धहस्त आहेत. प्रासादिक असूनहि त्यांची भाषा नादमधुर असते. ती वाचत असतांना एखाद्या तालातील स्वरमाधुर्याचा अनुभव एकसारखा येत असतो. त्यामुळें ती अवधानपूर्वक वाचत रहावेसें वाटते. आप्पासाहेब एखाद्या व्यक्तीचे किंवा दृश्याचे वर्णन करावयाला लागले म्हणजे या गुणांचा उत्कट उत्कर्ष त्यांच्या भाषेत अगदी सहज साधला जातो. याची एकदोन उदाहरणें देतो. 'अटकेपार' कादंबरीतील मीनाक्षीच्या वर्णनातील पुढील भाग वाचाः

"तिच्या मानेचा भाग नीट दिसला असता तर कदाचित भुजलतेचे सौंदर्यहि लोपले असते. पण तो नीटसा दृष्टीस पडत नव्हता. कारण तिने आपल्या लांबसडक, काळ्याभोर केसांची वेणी घालून ती तशीच पाठीवर सोडली होती, व वेणीच्या मानेजवळच्या भागावर खडा बसविलेला एक हस्तिदंती चाप लावला होता. वेणीतून खुल्या ठेवलेल्या केसांच्या जटा वाऱ्याने भुरभुरत होत्या त्या इकडून पाठीकडून मोठ्या मनोहर दाटत होत्या, आणि नितंबापर्यंत पोचणाऱ्या त्या केशपाशाकडे पाहताच असंख्य कामशरांनी आपली कुटिलता लपविण्यासाठी या केशगुंफेचा बहाणा तर केला नसेल अशी शंका येण्यासारखी होती."

याच प्रकरणांतील आणखी एक वर्णन वाचाः

"एक हसण्याची लकेर त्याच्या कानीं आली.

ती ऐकताच तो चकित झाला.

हसण्याची लकेर नव्हे, स्वर्गसंगीताची ती तानच होतीसे त्याला भासले. स्फटिकासारखी जलधारा पायऱ्यापायऱ्यावरून उड्या घेत असता तिच्या लाडिक

नृत्याचाच जणूं ध्वनि निघाला. जणूं टपोरे मोती सरातून ओघळून टपटप वाजले. कोवळे तारूण्य आणि रसाळ कंठमाधुरी यांच्या मिलाफाचे बुंदच जणूं मोहोळातून मधाचे थेंब ठिबकावे तसे ठिबकले. ''

या दोन्ही उताऱ्यातील प्रत्येक वाक्य कसे नादमधुर आहे ! ते करतांना सौम्य स्वरातील संगीत ऐकल्याचा भास होतो, असे नाहीं आपणाला वाटत ? यातील शब्द जणूं चोखंदळपणानें निवडल्यासारखे वाटतात. आणि त्यांची गुंफण अशी लालित्यपूर्ण झाली आहे कीं त्या शब्दाच्या जागी दुसरा शब्द घालण्याचा प्रयत्न केल्यास त्यातील सौंदर्य विस्कटल्यासारखे वाटावे ! अप्पासाहेबांच्या भाषेचं एक महत्त्वाचे वैशिष्ट्य यातच आहे असें मला वाटते. शिवाय या दोन्ही उताऱ्यात व्यक्त झालल कल्पनासौंदर्य पाहिले म्हणजे बाणभट्टाची आठवण होऊन माझ्याप्रमाणें आपणालाहि प्रश्न पडेल कीं आप्पासाहेबांनी काव्यरचना का केली नाहीं ? का केली नाहीं ? .........

याला उत्तर हेच कीं लौकिकदृष्टीने त्यांनी पद्यरचना केली नसेल, गणमात्रांच्या बरोबर ते खेळले नसतील, मुक्तछंद त्यांनी हाताळला नसेल पण त्यांच्या लेखनांतून काव्याचा सुगंध सर्वत्र दरवळतो आहे. कारण आप्पासाहेब मनाने वृत्तीनें आणि प्रवृत्तीने जातिवंत कवि आहेत; ते हाडाचे रसिक आहेत !

# नजराणा

लेखकः—प्रा. चंद्रकुमार डांगे

तें वर्ष १९३६ होतं. एक दिवस सकाळीं माझ्या वडील बंधूंनी हाक मारून मला म्हटलं, 'अण्णा, हे आपले आप्पासाहेब फडके!' मी विलक्षण आनंदानं गोंधळून अप्पासाहेबांच्याकडे पाहूं लागलों. रत्नाकर मासिक, बाई सुंदराबाईच्या ध्वनिमुद्रिका, आंधळ्यांची शाळा हें नाटक, कृष्णा मास्तरांचं गाणं, देवधर-नायडूंचं क्रिकेट, मॉरिस शेव्हॅलियरचा 'लव्ह परेड' हा चित्रपट आणि केवळ दोन आण्यात अस्सल दुधाच्या आइसक्रीमची टेकडी देणारे जोगेश्वरीच्या कोपऱ्यावरील बुवा आईसक्रीमवाले यांनींच माझ्यासारख्या कितीतरी मुलांमुलींचं जीवन व्यापून टाकलं होतं आमच्या जोगेश्वरीच्या बोळांतच आपल्या मामांच्याकडे, ताम्हनकर डेअरीवाल्याच्याकडे विनायकराव पटवर्धन राहात असत. संध्याकाळीं सहाच्या सुमारास उत्तम पोषाख करून ते किर्लोस्कर थिएटरकडे निघाले कीं थोड्या अंतरावर राहून, त्यांची नजर चुकवून आम्ही थेट गंधर्व नाटक मंडळीच्या रंगभूषागृहांत जायचे आणि बालगंधर्वांच्याकडे तासन्तास पहात असायचे.त्या जोगेश्वरीच्या बोळातच एक छोटा बोळ होता तो चिपळूणकरांचा महाभारताचे अविट भाषांतर करणाऱ्या चिपळूणकरांचा.नूतन मराठी विद्यालयाची पिछाडीहि याच बोळातली. पुण्यांतला सुप्रसिद्ध फरासखानाहि याच बोळाच्या कडेवर. इतिहासप्रसिद्ध मोरोबा दादांचा वाडाहि आपल्या अनेक वाटा याच बोळाशीं जोडत असे. ज्यांना पहाण्यासाठीं, केवढा उंच आणि काटकिळा माणूस हा असा उद्गार काढीत आम्ही मुलं घोटाळायचे ते आजचे आचार्य अत्रेदेखील याच बोळाच्या तोंडावर, जिथं आज वहाता-लक्ष्मीरोड पसरला आहे तिथं आपल्या काकांच्याकडे -येत असत, राहात असत. खरोखर आम्ही सुवर्णयुगांत राहात होतों या व्यक्ति आणि हे अवशेष यांच्यासंबंधीचं आकर्षण अजूनहि यत्किंचितहि कमी झालंल नाहीं. मग मन सारखा हिशेब करू लागतं कीं यांनीं आपल्याला काय दिलं? कोणता असा ठेवा दिला कीं ज्याचं जतन करावं आणि तो सर्वांना दाखवीत सुटावं, सांगत सुटावं?

कोणी काहिहि म्हणो प्रा. फडक्यांनीहि फार भारी नजराणा मुक्त हस्तानं सर्वांनाच खुला केलेला आहे. त्यामुळेंच कीं काय आज देखील जेव्हां जेव्हां मी त्यांच्याकडे पहातो तेव्हां तसाच विलक्षण आनंदानं गोंधळून जातो.

अमळनेरच्या साहित्य संमेलनांत जवळ जवळ तीनचार हजार श्रोत्यांच्या प्रचंड सभेत आप्पासाहेब कादंबरीकाराच्या शक्तीचं रहस्य स्पष्ट करून सांगत होते. त्यांनीं उदाहरणादाखल उल्लेख केला तो गांधीजींच्या निर्याण प्रसंगाचा. ते म्हणाले की ललित लेखकाच्या दृष्टीनं बळी पडलेली किंवा हत्या करणारी व्यक्ति कोण हा प्रश्न क्षुल्लक आहे. उलट हत्या करणाऱ्या व्यक्तीच्या मनांतली खळबळ, भावनात्मक आंदोलनं, विचारांचा संघर्ष आणि त्याचें लक्ष्य असलेल्या व्यक्तीच्या मनोव्यापारातील विविध आंदोलनं पकडणं यांत कादंबरीकाराच्या शक्तीचं सर्वस्व आहे. असं म्हणून अप्पासाहेबांनीं तो विषण्ण प्रसंग इतक्या पराकोटीच्या कौशल्यानं शब्दांकित करून उभा केला कीं क्षणभर भीतिच्या लाटेनं त्या श्रोतृसमुदायाच्या अंगावर शहारे निर्माण केले! डोळसपणें अवलोकन करून अनुभूतीची अभिव्यक्ति कशी करावी याचा तो एक कलात्मक वस्तुपाठ होता. केवळ लेखनापुरतंच नव्हे तर संगीत, वक्तृत्व, प्रवास, नाट्य, चित्रकला आणि क्रिकेटसारखा एखादा क्रीडा प्रकार यासंबंधी विपुल लेखन करून आप्पासाहेबांनी रसास्वाद कलेची ओळख मराठी वाचकांना करून दिली. ज्याला आपण The Art of Appreciation असं म्हणू तिचा स्वतःच्या ललित कृतीत उपयोग करणारे आणि दुसऱ्या श्रेष्ठ कलाकृतींचा रसिकतेनं आस्वाद घेऊन तो यथार्थपणें अभिव्यक्त करणारे असे हेंच एकमेव लेखक होत. आप्पासाहेबांच्या कादंबऱ्या आणि कथा यासंबंधी मत मतांतरें असू शकतील. पण 'मनोहरची आकाशवाणी', 'वेचलेलं मोती', 'असे वक्ते, अशी व्याख्यानं' किंवा त्यांच्या गुजगोष्टी यासंबंधी संपूर्ण एकवाक्यता सर्वत्र आढळतें त्याचें हें रहस्य आहे.

त्यासाठीं आप्पासाहेबांनी केलेली साधना आणि पाळलेलीं पथ्यं लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. वाचन हें त्या साधनेचं एक प्रभावी साधन. वाचक सगळेच करतात. पण कोणी केवळ अवतरणांची कोणरं भरण्यासाठीं, कोणी पुराव्यांचे ढीग करण्यासाठीं तर कोणी विद्वत्तेच्या प्रदर्शनीयतेसाठीं.

आप्पासाहेबांच्या लेखनांत किंवा भाषणांत असल्या दिखाऊ वाचनाचा मागमूस शोधून सांपडणार नाही. गंमतीनं, विनोदासाठीं अगर विरोधासाठीं एखादं वचन, एखादा वाक्प्रचार किंवा मजेदार शब्द डोकावेल इतकंच. कै. भाटे म्हणत त्या प्रमाणं आप्पासाहेब साहेबाच्या खांद्यावर बसून कधीच बोलले नाहीत किंवा त्यांनी लिहिलं नाही. पण त्याचबरोबर हेंहि खरं की बुद्धीला पटलेला विचार, मग तो कोणाचाहि असो, प्रतिपादन करण्यास ते कचरले नाहीत. ज्या प्रकारचं लेखन करण्याचं त्यांनी योजिलं त्या लेखनप्रकारा व्यतिरिक्त सर्व कांही वर्ज्य अशीहि दृष्टि त्यांनी ठेवली नाही. कोणीहि येऊन एखादी कथा, कादंबरी, चुटका, नाटक, वाखाणलं की त्यांनीं तें वाचलंच म्हणून समजावं. आणि मग त्यांतील गुप्त-प्रकट सौंदर्य स्थलांचं रहस्य आप्पासाहेब सांगू लागले की तें अगोदरच वाचलेल्याला वाटावं, अरे, हें नव्हतं आपल्या लक्षांत आलं !

मग असं वाचन करीत असतांना ते जागोजाग खुणा करतील, प्रश्नचिन्ह काढतील, त्याचा अनुवाद करतील, आपल्या परिचितांना शिफारस करतील आणि मग कुठ त्यांना समाधान वाटेल. आजचा काळ 'पुस्तकी शिक्षण' म्हणून वाचनाची हेटाळणी करण्याचा आहे. अशा वेळीं आप्पासाहेब वाचनाबद्दल जे परिश्रम करतात त्या परिश्रमांतून, मननांतून, चिंतनांतून त्यांच्या शैलीतील बहुमोल सहजतेचा जन्म झालेला आहे हें विसरून चालणार नाहीं. दृष्टांत द्यायचा झाला तर तो अहोरात्र रियाझ करून आपल्या स्वरावर प्रभुत्व गाजविणाऱ्या एखाद्या गानसम्राटाचाच द्यावा लागेल.

तीच गोष्ट प्रवासाची. केवळ प्रवास करून उत्तम लेखन करता येतें असा समज इतरांनीं सोयिस्करपणें करून घेतला आहे. तो त्यांना खुशाल लखलाभ होवो. आप्पासाहेबांनीं जो प्रवास केला आणि ज्यांतील विविध अनुभवांचा उपयोग आपल्या लेखनांत केला तो केवळ वृत्तीतील ताजेपणा टिकविण्यासाठीं. आपल्या एका लेखांत त्यांनींच नकाशा काढून आपण गांवं कशीं कल्पितो हें सांगितलं आहे. भाबड्या टीकाकारांनीं या प्रवासाचें भांडवल करून आप्पासाहेबांच्या लेखनांतील कृत्रिमावर बोट ठेवून आपण कांही नवा शोध लावल्याचा दावा केलेला आहे. पण असल्या निसर्ग किंवा प्रवास वर्णनाची युक्ति किती मोलाची आहे, एकंदर कलाकृतीत तिचें महत्त्व काय याचा विसर

आप्पासाहेबांना पडलेला नाही हें आवर्जून सांगावंसं वाटतं. उलट अशा डोळस भ्रमंतीतूनच त्यांनीं शेकडो व्यक्तिरेखा उचलल्या, निसर्गाचीं विविध रूपं न्याहाळली आणि त्यांचं रसिक दर्शन, धावतं दर्शन घडविलं. या प्रवासाचीदेखील टिपणं त्यांनी काढली. आप्पासाहेबांच्या अवलोकन शक्तीला धार आली ती अशा भ्रमणामुळें. नवं वाचावं, नवं पहावं, नव्या धर्तीचं लिहावं ही ओढ सतत वाटणं हेंच त्यांच्या अप्रतिहत यशाचं मर्म आहे. लेखनाभिमुख होणाऱ्या प्रत्येकासाठीं हें देणं त्यांनीं पुरेपूर देऊन टाकलं आहे. नाटक, कादंबरी, कथा, चरित्र, कोणत्याहि विषयावर खासगी किंवा प्रकटपणें बोलतांना आप्पासाहेब म्हणतील, 'अरे कुठे हरिभाऊ, खाडिलकर, देवल, परांजपे, चिपळूणकर आणि कुठे फडके!' या उद्गारांतून व्यक्त होणारी अकृत्रिम विनयशीलता आज तरी फार फार मोलाची वाटते. नाहींतर एखादी कथा, एखादं नाटक किंवा एखादा टीकासंग्रह प्रसिद्ध होताक्षणींच युगप्रवर्तकत्वाच्या मुकुटांतील पिसांची ओढाताण करणारेच फार! अल्प लेखन आणि प्रतिभा शालित्व यांचें जसें समीकरण नाही तद्वतच विपुललेखन आणि प्रतिभा यांचें हाडवैरहि नाही. केवळ विपुल लेखन करणाऱ्यांच्या यादीत आप्पासाहेबांचा क्रमांक खास: वर लागणार नाही. परंतु आपल्या वेधक रसिकतेनं, अव्याज मनोहर शैलीनं सतत आणि विपुल लेखन करणाऱ्यांची श्रेय नामावली आप्पासाहेबांच्या नांवाशिवाय पूर्ण होणार नाही हेंहि तितकेंच खरं. या लेखन–साधनेत त्यांनी एकच पथ्य पाळलं आणि ते म्हणजे कधीहि आत्मसंतुष्ट राहायचं नाही. अगदी पराकोटीच्या टीका प्रहारांनी ते जसे विचलित झाले नाहीत, आपल्या लेखनाच्या समर्थनाची धडपड करीत राहिले नाहीत तद्वतच आपण जें लिहिलं तें परिपूर्ण असा भ्रमहि त्यांनी बाळगला नाही. ललित लेखनाच्या क्षेत्रांत वाटचाल करणाऱ्या लेखकांना हा किती मोलाचा नजराणा आहे!

जी गोष्ट लेखनाची तीच आप्पासाहेबांच्या वक्तृत्वाची. लेखनासाठीं जे अपार परिश्रम, निदिध्यास आणि चिंतन तेंहि इथं आहेच. गडकऱ्यांच्यावर त्यांनीं किती तरी वेळा व्याख्यानं दिलीत. पण दोन वर्षांपूर्वी एक परिचित कल्पना अशा थाटानं त्यांनी मांडली कीं सारं सभागृह आनंदानं मोहरून गेलं. आप्पासाहेब गडकऱ्यांच्या अफाट कल्पना शक्तीबद्दल बोलत होते. ते म्हणाले,

' आपले गडकरी मास्तर होते डोअर कीपर. परंतु त्यांनी नाटकं लिहायला प्रारंभ केल्यानंतर देखील ते आपला व्यवसाय विसरले नाहीत. आपल्या मनोभूमीवर नाटयरचनेच्या घडणीच्यावेळी प्रवेश करणाऱ्या प्रत्येक पात्राला विचारीत, तुझ्याजवळ अद्‌भुत, असामान्य, अघटिताचं तिकिट आहे काय ? आणि तसं असलं तरच ते त्या पात्राला आंत प्रवेश देत ! मग ती सिंधु असो, सुधाकर असो, कालिंदी असो की मोरेश्वर असो !' आणि हें सारं आप्पासाहेबांनीं अशा आवाजात, लयींत उच्चरित केलं की श्रोत्यांना वाटावं वा ! बस्स ! पण त्यासाठीं अगोदर प्रचंड आटापीट करावी लागतें हेंहि लक्षांत घ्यायला हवं. ग्रीष्म व्याख्यानमालेच्या निमित्तानं त्यांची झालेली व्याख्यानं एखाद्या अनुपमेय मैफलीसारखी गाजली ! गंमत अशी आप्पासाहेबांच्या लेखनांतील प्रमाणबद्धतेला, लालित्यपूर्ण शैलीला आणि रचनेला नाकें मुरडणारे लोक नेमक्या याच त्यांच्या गुणासाठीं त्यांच्या वक्तृत्वाची तारीफ करतांना दिसतात. 'संध्याकाळची वेळ मोठी प्रशांत आहे. आकाशातले मेघ विरळ होत आहेत. जरा वेळानं चांदणं फुटेल !' इतकं बोलता क्षणीच, एम्. ई. एस्. कॉलेजच्या हिरवळीवर बसलेल्या आम्ही निवडक स्त्रीपुरुषांनी माना वळवून आकाशाकडे पाहिलं ! कोणी म्हणेल यांत विशेष काय घडलं ? विशेष असं की आप्पासाहेबांच्या त्या शब्दांनीं आम्ही मोहून स्वतःला विसरलो आणि चांदण्याची वाट पाहूं लागलों. असा विलक्षण प्रभाव आप्पासाहेबांच्या वाणीत लपलेला आहे. त्यांची म्हणून एक खास बोलण्याची, शब्दोच्चाराची धाटणी आहे. बालगंधर्वांच्या उच्चार पद्धतीचा विलक्षण प्रभाव आप्पासाहेबांच्या वक्तृत्वावर झालेला आहे. विवेचनाच्या ओघांत ते एखादेच प्रश्नार्थक वाक्य असे फेकतील की ऐकणाऱ्याला गुदगुल्या वाटाव्या. निर्दोष उच्चार, विलक्षण तादात्म्य, विषयाची चांगली समज श्रोत्यांच्याबद्दलचा विलक्षण जिव्हाळा आणि कलापूर्ण आविष्कार हे आप्पासाहेबांच्या वक्तृत्व शैलीतील प्रमुख पैलू. श्रोत्यांत जर समवयस्य कोणी असेल तर चटकन् ते म्हणतील, 'माझ्यासमोर एका पिंचचे अंतरावर असलेल्या गृहस्थांना विचारा की पुण्यांत खरंच बासुंदी चांगली मिळत होती ना ?' मग फडके कोणाला उद्देशून बोलले असावेत हें पहाण्यासाठीं माना न हलल्या तरच नवल ! १९४० सालीं आप्पासाहेब हिंगण्याच्या कॉलेजमध्यें मानसशास्त्रावर एक व्याख्यान देण्यासाठीं आले होते. व्याख्यान सुरू झालं आणि

जरा वेळानं महर्षि कर्वे सभागृहांत येऊ लागले. आप्पासाहेबांनीं त्यांना पहाताच उच्चारलेलं वाक्य अर्धवटच सोडलं, अण्णांना व्यासपीठावर येऊ दिलं, त्यांच्या चरणांना स्पर्श करून वंदन केलं आणि मग अशा आवाजात ते म्हणाले, ' तर मी सांगत होतों त्या लहान मुलांच्या फुग्याबद्दल ! ' की साऱ्या विद्यार्थिनी खळखळून हंसल्या, आप्पासाहेब हंसले आणि कै. वामनराव जोशीहि हंसू लागले! आपल्या मुद्रेवर कसलाहि आततायी भाव न दिसू देता ते बोलतात. प्रत्येक शब्द अशा आत्मविश्वासानं उच्चारतील की त्यानं काळजाचा ठाव घ्यावा. श्रोत्यांच्यावर कधींहि चिडणार नाहींत. स्वतः मधूनच अशी मुद्रा करून एखाद्याकडे पहातील की त्याला वाटावें हे आपले जुने स्नेहीच आहेत की काय! आप्पासाहेबांचं व्याख्यान कमी जास्त रंगलं हे खरं. पण आज व्याख्यान साफ पडलं, असा दिवस त्यांच्या आणि श्रोत्यांच्या जीवनांत अजून उजडायचा आहे! हाहि खराखुरा वाङ्मय नजराणा कमी मोलाचा आहे काय ?

प्रतिभा आणि प्रयत्न यांच्या परस्पर संबंधाचा विषय नेहमीच वादग्रस्त म्हणून राहील. प्रतिभेच्या असामान्य स्फुलिंगानं सारं विश्व उजळून टाकणारे महात्मे जसे अमर होत तद्वतच आपल्या प्रयत्नाच्या चकमकीतून एखादा तेजःकण निर्माण करणारेहि वंद्य होत. सामान्य माणसाचा मार्ग, या दोन्ही तऱ्हेच्या कर्तृत्वाच्या दीपांनी उजळलेला असतो. आपल्यातील असामान्यत्वाचा शोध ठरवून कोणाला कधी लागलेला नाही. कोरीव लेणी–प्रत्येक डोंगरांत असती तर अजंठा वेरूळाला लोकल स्टेशनची अवकळा आली असती. टिळकांनीं मंडालच्या तुरुंगांत गीता–रहस्य लिहिले. निदान तू आपल्या खोलीत तरी एखादी तशी कथा, कादंबरी किंवा कविता लिही असा हट्ट किंवा आग्रह शहाणपणाचा ठरणार नाही. शाळेतील ' एक सकाळ ' या निबंधाला पकी पैकी पैकी गुण मिळविणार जसे भावी निबंधकार ठरत नाहीत तद्वतच शाळला कंटाळून पळून गेलेले कवीच्याच पदवीला गेलेले आढळत नाहीत. पण ज्यांच्या लेखनानं, वक्तृत्वानं, कर्तृत्वानं आपलं जीवन सह्य होतं, कसलींतरी अंतरीची हुरहूर निवते, अनामिक चटका मनाला लागतो, एखादी लहर सारं जीवन बदलून टाकते, कुंठित मार्ग प्रकाशित

होतो, अंतःप्रेरणा जाग्या होऊ लागतात अशा थोर व्यक्तित्वांच्या जीवन रंगांनीं आपलं जीवन उजळून जातं. या प्रत्येकानं आपल्याला एकेक नजराणा दिलेला असतो. त्या वैभवशाली, दीप्तिमान, लखलखणाऱ्या रत्नराशीतच आप्पासाहेबांचा हा नजराणा मोलाचा ठरेल. हा ठेवा कोणा एका व्यक्तीची मत्ता नाही. ज्यानं त्यानं आपल्या भाग्यानं त्याचा लाभ करून घ्यावा.

लेखन आणि वक्तृत्वाच्या जोडीला मी गुज गोष्टींचा उल्लेख केला तो केवळ एक वाङ्मय प्रकार म्हणून नव्हे. आप्पासाहेबांनी हा लेखन प्रकार रूढ केला म्हणूनहि नव्हे. तर मला या लेखनांत त्यांच्या व्यक्तित्वाचं नितळ आणि रेखीव प्रतिबिंब दिसतं म्हणून. गुजगोष्ट ही भाव-कवितेची सहोदरा मानतात तें पुष्कळ पटण्यासारखं वाटतं ते आप्पासाहेबांच्या गुजगोष्टी वाचल्यानंतर. या लेखनांत त्यांनी कधी एखाद्या कल्पित व्यक्तीतर्फे भाव-भावनांची किंवा विचारांची गुंफण केली नाहीं किंवा रूपकाचाहि हव्यास धरला नाही. लेखनांत राखण्याची अलिप्ततादेखील त्यांनी खुशाल सोडून दिलेली आढळते. आपला जीवनविषयक दृष्टिकोन, आवडी-निवडी, सौंदर्य—शोधक दृष्टि, आपले आदर्श, आपल्या वंदनीय कल्पना आणि व्यक्ति, आपलीं संस्कार-स्थलं या साऱ्यांचं ते मनोवेधक दर्शन घडवितात ते या गुजगोष्टींतून. अगदी स्वतःच्या एनजिनसी अनुभवांना ते इथं साकार करतांना दिसतात. लेखकाचं व्यक्तिगत जीवन आणि त्याचं लेखन यांत तसा संबंध जोडून कलाकृतीचें अंतरंग पहाणें योग्य नाही हें मान्य करूनहि असं स्पष्ट म्हणावसं वाटतं की आप्पासाहेबांच्या गुजगोष्टीत त्यांनी स्वतःचंच मनोरम रेखा - चित्र काढलेलं आहे. कथा, कादंबरीसारख्या लेखनांत फडके दूर काठांवर उभे राहिलेले दिसतात आणि तें चूक नाही. पण गुजगोष्ट आणि आप्पासाहेब यांत भिन्नत्व कल्पिणं म्हणजे त्यांच्या या लेखनांतील सौंदर्याकडं, त्यांतील अपार अनुभव - सृष्टीकडं; त्यांतील संवेदनांकडं दुर्लक्ष करण्यासारखं होईल. या गुजगोष्टींतील जिवंतपणाचं रहस्य या अतूट नात्यांत समावलं आहे. आप्पासाहेबांचे चिरपरिचितच या वास्तवाची ग्वाही देऊ शकतील हें जितकं खरं तितकंच गुजगोष्ट वाचून आप्पासाहेबांच्या व्यक्तित्वाबद्दल अटकळ बांधणारा

त्रयस्थ देखील संपूर्ण फसला जाणार नाहीं हेंहि खरं आहे. मी तर असें म्हणेन की त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्यानं प्रारंभ करावा तो गुजगोष्टींच्या वाचनानं. इथं त्याला वेगळे फडके दिसतील. चिंतनशील, अंतर्मुख, रसिक, तर्कवादी असे आप्पासाहेब गुजगोष्टींत भरून राहिलेले दिसतील. या दर्शनानं त्यांच्या लेखन संभाराची गंगोत्री आढळेल. महाराष्ट्र शारदेच्या दरबारांत मानाचं पान मिळविणाऱ्या आप्पासाहेबांच्या कर्तृत्वाच्या पदचिन्हांचा मागोवा इथं दिसेल. खराखुरा ठेवा लाभल्याचं समाधान अभ्यासकाला लाभेल. हा नजराणा पाहून भान हरपून न गेलं तरच नवल.

# जीवन-संगीत

लेखिका :-सौ. **कमला फडके**, एम्. ए.

कादंबरीचं शेवटलं प्रकरण वाचून हस्तलिखिताचे ते कागद मी खाली ठेवले. आपल्या दिवंगत पित्याचं रेकॉर्ड लावून त्याच्या स्वरांत स्वतःचा स्वर मिसळून अबोली गाऊ लागली आणि कादंबरी संपली. परंतु माझ्या मनावरची मोहिनी संपली नाहीं. अबोलीच्या गाण्याचे स्वर माझ्या कानांत कितीतरी वेळ घुमत राहिले. तिच्या जीवनांतील सुखदुःखांनीं हेलावलेलं, उचंबळलेलं माझं मन तसंच भारावून राहिलं. माझा गळा दाटून आला. माझ्या तोंडून शब्द फुटेना. कांहीं हालचालही मला करता येईना.

वास्तविक आप्पासाहेबांनी मला बजावून सांगितल्याप्रमाणें वाचून झाल्यावर कादंबरीच्या हस्तलिखिताचे कागद नीट लावून त्यांच्या टेबलावरच्या फायलीत जसेच्या तसे ठेवायला हवे होते आणि माझ्या अभिप्रायाची वाट पहात, बाहेर बागेतल्या झोपाळ्यावर सिगारटचे झुरके घेत बसलेल्या आप्पासाहेबांकडे धावत जाऊन सांगायला हवं होतं, " आप्पा, मला तुमची कादंबरी फार फार आवडली ! "

पण मी तशीच बसून राहिले. कलाकृति पाहताना तिच्या निर्मात्याचा विसर पडावा म्हणतात. अबोलीच्या भावविश्वात मी इतकी रमून गेले होते की काही काल ते विश्व निर्माण करणाऱ्या लेखकाचाही मला विसर पडला. पण आतां कादंबरी वाचून हातावेगळी केल्यावर ते भावविश्व निर्माण करणाऱ्या लेखणीची अजब करामत पाहून मी चकित झाले. कादंबरी म्हणजे काय? मानवी जीवनात घडणाऱ्या संभाव्य घटनांची एक मालिका. परंतु ज्याच्या शब्दांच्या जादूनं या घटनामागे दडलेले हर्ष, खेद, काम, क्रोध वगैरे भावना जिवंत होऊन उसळतात, वाचणाराला भिजवून चिंब करतात, त्या कलावंताला 'शब्दसृष्टीचा जादूगार' म्हणावं. आप्पासाहेबांच्या बुद्धीचा आणि कलेचा विकास आज चोवीस वर्षांच्या निकट सहवासात मी अगणित वेळां अनुभवला

आहे. परंतु एखादे वेळीं त्या कलाविकासाचं विराटदर्शन झालं कीं मी दिङ्मूढ होऊन जाते. झाडावर उमललेलं फूल, रानात भटकताना अचानक दृष्टीस पडणारा झुळझुळ वाहणारा निर्झर, ऊन पावसांच्या पाठशिवणीनंतर अकल्पित डोकावून जाणारं इंद्रधनुष्य, चांदण्यानं भरलेलं आकाश, डोंगरमाथ्याआड उतरणारा सूर्य–सारं काही सृष्टिसौंदर्य हरघडी आपल्याला आनंद देत असतं. ते नेहमीचं झाल्यामुळे त्या आनंदाची जाणीवही आपल्याला होत नसते. परंतु काश्मीरच्या खिलनमर्ग पहाडावरून अवतीभोवतीची हिमशिखरं, चिडचिनार-सारख्या प्रचंड वृक्षानी दाटलेल्या त्या विराट उतरणी, पहाड फोडून गर्जत निघालेली अलका नदी हे निसर्गाचं भव्य, विराट रूप पाहून छाती दडपून जाते. आपल्या नकळत त्या विराट शक्तीपुढें आपले हात जोडले जातात. आता तशीच कांहीशी माझी अवस्था झाली आहे खरी. पति-पत्नीच्या निकटच्या नात्यात खेळीमेळीनं वागताना आप्पासाहेबांच्या लिहिण्यातलं, बोलण्यातलं, विचारातलं सौंदर्य मी अनेकदा पाहिलं असेल. परंतु त्यांची ही पन्नासावी कादंबरी वाचून झाल्यावर त्यांच्या कलेचा विलास पाहून मी विलक्षण भारावून गेले. साक्षात्कार घडावा तसा त्यांचा सारा मोठेपणा माझ्यापुढें उभा राहिला. मी मनोमनी खाली वाकून त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून पुटपुटले, " तुम्ही फार मोठे, विद्वत्तेनं, अंतःकरणानं, कलेनं तुम्ही फार मोठे. तरीही माझ्यावर प्रेम केलंत हे केवढं माझं भाग्य ! "...

हा विचार ज्या ज्या क्षणी माझ्या मनांत चमकून जातो त्या क्षणांत गेल्या पंचवीस वर्षांचा इतिहास विजेच्या लकेरीत उजळूत निघावा तसा निघतो.

१९३५ सालीं फर्ग्यूसन कॉलेज सोडून मी राजाराम कॉलेजांत नांव घातलं तेव्हां पहिली टर्म संपली होती. दुसरी सुरू झाली होती. लेडीज रूम पुढच्या बाल्कनीच्या कठड्याला रेलून आम्ही काही मुली उभ्या होतो. आमच्या समोरच प्रोफेसरांची कॉमनरूम होती. तास आटोपून कॉमनरूमकडे जाणाऱ्या प्रोफेसरांकडे आम्ही कुतुहलानं पहात होतो. माझ्या शेजारच्या मुलीला मी एकदम विचारलं, " प्रोफेसर फडके जाऊ लागले कीं दाखव हं. " भला मोठा केशरी फेटा बांधून कोट आणि पांढरा पायजमा घालून डुलतडुलत जाणाऱ्या व्यक्तीकडे खूण करून

ती म्हणाली " हे प्रोफेसर मोडेंकर ". मोडेंकरांच्या मागोमाग फेल्ट हॅट घातलेले बुटके प्रो. पंगू गेले. पांढऱ्या केसांचा नीटनेटका भांग पाडणारे गौरवर्ण स्थूल प्रो. माधवराव पटवर्धन गेले. कोकीळ, शिंदे, बोस, उपाध्ये, सारी प्रोफेसर मंडळी कॉमनरूमकडे गेली.

पण मला फडके दिसेनात, फडक्यांना पाह्यची मला मोठी उत्सुकता लागून राहिली होती, राजाराम कॉलेज म्हणजे प्रोफेसर फडके आणि प्रोफेसर फडके म्हणजे राजाराम कॉलेज असं समीकरण त्यावेळी प्रचारांत होतं. त्यांच्या हाताखाली तर्कशास्त्र आणि तत्वज्ञान शिकण्याकरितां दूरदूरच्या प्रांतातून विद्यार्थी राजाराम कॉलेजात येत असत. इतर विषयांचे विद्यार्थीच काय पण गांवातील व परकी नागरिकही त्यांची परवानगी काढून व्याख्यान ऐकण्यासाठी त्यांच्या तासाला येऊन बसतात असं मी ऐकलं होतं. असंही ऐकलं होतं की प्रोफेसर फडके विद्यार्थ्यांशी मित्राप्रमाणे वागतात. त्यांच्याशी क्रिकेट टेनिस खेळतात. फर्ग्यूसन कॉलेज विरुद्ध झालेली मॅच राजाराम कॉलेजनं जिंकली तेव्हां विजयाच्या आनंदात बॅंड लावून वाजत गाजत त्यांनी आपली टीम स्टेशनपासून कॉलेजपर्यंत नेली होती म्हणे ! ' फडकेज प्लेअर्स ' नांवाची एक नाट्यसंस्था त्यांनी कॉलेजात स्थापली होती. या संस्थेतर्फे नाटकं होतात, स्वतः फडके नाटकात काम करीत. कॉलेजात एक म्युझिक सर्कलही त्यांनी चालविलं होतं. त्या सर्कलतर्फे कॉलेजात गाणी बजावणीं होत असत. असे आहेत फडके, विद्वान पण रंगेल असं मी ऐकलं होतं. प्रोफेसर मोर्डेकर तर म्हणाले होते मला ' बिवेअर ऑफ फडके '.

कदाचित् मोर्डेकरांच्या या सूचनेमुळेच फडक्यांना पाहण्याची माझी उत्सुकता वाढली असावी.

" ते बघ फडके " असं माझ्या मैत्रिणीनं खुणावताच मी उत्सुकतेनं पाहिलं. ओपन कॉलरचा शर्ट, खादीचा लांडा कोट, पांढरी पॅंट अशा पोषाखात लांब लांब टांगा टाकीत ते निघाले होते. अत्यंत तरतरीत चेहरा, ती मिशीची बारीक रेघ, बाकदार नाक, भव्य कपाळ, मान आणि हनुवटी ताठ ठेवण्याची विशिष्ट लकब माझ्या ध्यानात आली.

" अस्सं ! हे फडके होय ! " मी उद्‌गारले.

पण त्यांना जवळून पाहण्याची मला संधि मिळाली ती मी इंटरच्या वर्गात त्यांच्या तर्कशास्त्राच्या वर्गात बसू लागले तेव्हा. कोणत्याही विषयाचा शास्त्रीय अभ्यास मला आवडत नसे. माझ्या अतर्क्य बुद्धीला तर्कशास्त्र काय आवडणार ? परंतु नावडता विषयही विद्यार्थ्यांनी आवडीनं ऐकावा अशी मनोरंजक व्याख्यान फडके देत असत. गुंतागुंतीचा क्लिष्ट विषय सुबोध करून, हंसत खेळत शिकविण्याची त्यांची शैली दुसऱ्या कुणालाच जमणं शक्य नाही. वर्गात शिकविताना त्यांची मुद्राही अत्यंत प्रसन्न दिसे. विद्यार्थ्यांमधून फिरणारी नजर कधी मिस्किल तर कधी बोलकी, तर कधी खोडकर. त्यामुळें पुष्कळदा साध्या वाक्यातून मोठा विनोद निर्माण होऊन वर्गात हशा पिके. एकदा एक विद्यार्थिनी लालभडक पातळ नेसून उशीरा वर्गात आली. ती येऊन बाकावर स्थानापन्न होईपर्यंत आप्पासाहेब बोलायचे थांबले. मग अभ्यासाचा विषय सुरू करण्याऐवजी त्यांनी ' अंधेर नगरीतला न्याय ' अशी एक गोष्ट मुलांना सांगितली. अंधेर–नगरीच्या राजानं नवा राजवाडा बांधला. परंतु राजवाड्याची भिंतच कोसळली. राजा संतापला, त्यानं आपल्या स्थापत्य विशारदाला बोलावून कोसळलेली भिंत दाखविली, आणि त्याला एकदम फासावर चढविण्याचा प्रधानाला हुकूम दिला. स्थापत्यविशारद चळचळा कापत म्हणाला, " महाराज, माझा काय दोष, विटा कच्च्या असाव्या. कुंभाराला बोलवा. " महाराज म्हणाले " ठीक आहे. बोलवा कुंभाराला. लटकवा फासावर ". कुंभार हातापाया पडून म्हणाला " महाराज, माझा काय अपराध ! चुनेवाल्याला विचारा. " शेवटी लेण गवंड्यापर्यंत पोचलं. गवंडी लटलटा कापत राजाला म्हणाला, " महाराज, माझी काही चूक नाही. चूक असलीच तर लालभडक पातळ नेसून एक नखरेल स्त्री राजवाड्यासमोरच्या रस्त्यानं जात होती तिची आहे. तिच्याकडे माझं लक्ष गेल्यामुळें विटा बरोबर बसल्या नाहीत. " राजानं त्या स्त्रीला फासावर चढवली ! गोष्ट संपवून फडके म्हणाले, " तात्पर्य काय ? लालभडक साडी नेसून उशीरा वर्गात येऊ नये ! अंडर लाइन ! "

गोष्ट संपल्यावर दोन मिनिट वर्गात स्टँपिंगचा दणका चालू राहिला.

अशी शिक्षक म्हणून आप्पासाहेबांची लोकप्रियता आजही कायम आहे. त्यांचे विद्यार्थि भारताच्या दूरदूरच्या भागात पसरलेले आहेत. बडोदा, ग्वालियर, धार, इंदोर, देवास वगैरे ठिकाणी आम्ही व्याख्यानाच्या निमित्तानं गेलो कीं त्यांचे विद्यार्थी त्यांच्याभोवती गोळा होतात. विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर सत्कार आणि मेजवानीसाठी एक दिवस राखून ठेवावा लागतो. 'जेहलम' कादंबरी लिहिण्यापूर्वी काश्मीरच्या दौऱ्यावर आप्पासाहेब गेले होते. काश्मीरमधे उडीच्या आघाडीवरच्या तंबूत एक धिप्पाड उचंनिंच कर्नल आप्पासाहेबांना भेटून म्हणाले "सर, मी तुमचा विद्यार्थी, ठकार" सध्याचे कोल्हापूरचे छत्रपती शहाजी महाराज आप्पासाहेबांचे आवडते विद्यार्थी. उमद्या चेष्टेखोर स्वभावामुळे आणि साध्या राहणीमुळे महाराज आप्पासाहेबांना प्रिय झाले होते. शहाजी महाराजहि आपल्या " सर " ना विसरले नाहीत. चार वर्षांपूर्वी देवासच्या शारदोत्सवाच्या निमित्तानं आम्ही देवासला पंधरा दिवस राहिलो तेव्हा महाराजानी मोठ्या अगत्यानं आमचा पाहुणाचार केला. राज्यवैभवाचा त्याग केल्यामुळे या " वनवासी " छत्रपतीच्या व्यक्तिमत्वाचं तेज उलट वाढल्याचं माझ्या लक्षांत आलं. सकाळ संध्याकाळ कॉलेजमधल्या त्या निश्चित बंडखोर जीवनाच्या आठवणी आणि सुखदुःखांच्या गुजगोष्टी करण्यांत गुरुशिष्य तासन्तास घालवीत. विशेष म्हणजे आप्पासाहेबांसमोर मद्याच्या पेल्याला किंवा सिगरेटला महाराजानी स्पर्श केला नाही. " ही माझी पत्नी कमला " अशी आप्पासाहेबांनी ओळख करून देताच महाराज अनपेक्षितपणे खाली वाकले. त्यांनी मला असा नमस्कार करावा याचा मला फार संकोच वाटला. " हे काय महाराज ? " असं मी म्हटलं तेव्हा दृष्टि खालीच ठेवून ते म्हणाले, " आपण माझ्या गुरुपत्नी आहा. " शिवछत्रपतीच्या वंशजाला साजेसंच हे वर्तन नव्हे काय ?

विद्यार्थ्यांना आप्पासाहेबांविषयी जितकं प्रेम वाटतं तितकंच आप्पासाहेबांनाहि विद्यार्थ्यांविषयीं वाटतं. तरुण पिढीविषयी त्यांच्या तोंडून कधी अनुदार उद्गार निघत नाहीत, त्याचं कारण हेच. अलिकडे कामाच्या व्यापामुळें व्याख्यानाची आमंत्रणं ते स्वीकारीत नाहीत. परंतु कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी गळ घातली कीं त्यांना नकार देववत नाही.

दरवर्षी लॉजिकच्या विद्यार्थ्यांना अखेरचं व्याख्यान देताना निरोपादाखल थोडसं बोलण्याचा त्यांचा परिपाठ होता. एकदा निरोपाच्या या व्याख्यानाचा समारोप करताना ते म्हणाले, " पुढच्या आयुष्यात तुमच्यापैकी कुणी नामांकित डॉक्टर होतील, वकील होतील, इंजिनियर, ऑफिसर होतील, पुढारी मंत्री होतील. मी मात्र राहीन साधा शिक्षकच. परंतु मी भेटलो कीं तुम्ही मला म्हणाल, ' सर ' तुमच्या तोंडच्या त्या एका शब्दाचा मला फार फार गौरव वाटेल. तुम्ही प्रेमानं उच्चारलेला ' सर ' हा शब्द हेच माझं पारितोषिक ".

देवासच्या मुक्कामात शहाजी महाराज " सर " याच नावानं आप्पासाहेबांना सम्बोधीत. महाराजानी आपला फोटो आप्पासाहेबांना दिला, त्याखाली देखील त्यांनी लिहिलं आहे, " To my Sir, Prof. Phadke. "

इंटरच्या वगात मी त्यांची विद्यार्थिनी असले तरी गुरु आणि शिष्य या नात्यानं आम्ही फारसे एकत्र आलो नाही. एका निराळ्याच भविष्यकालाची अत्यंत अस्पष्ट अशी चाहूल मला ऐकूं आली ती मात्र त्यांच्या वर्गातच.

एकदां ते तास घेत होते मुलामुलींच्या वह्या उघड्या होत्या. नोटस लिहून घेणं, अंडरलाइन करण चालू होतं. वर्गात शांतता होती. इतक्यांत उजव्या बाजूच्या गॅलरी पलिकडाल झाडीतून अत्यंत मधुर असा आवाज उठला, ' कुहू कुहू ! "

मी चटकन वर पाहिल.

वाक्य अर्धच सोडून ते माझ्याकडे पहात राहिले. शब्दांनी नव्हे तर डोळ्यांनी. त्यांनीं मला स्पष्ट विचारलं, " ऐकलस ? कोकिळा ! " मीही नकळत हसून गेलें. जणू म्हटलं, " खरंच ! कोकिळा ! " ते पुढे मजकूर सांगू लागले. मीही खाली मान घालून लिहू लागले. परंतु ती दृष्टभेट नंतर कित्येक दिवस माझ्या मनात रेंगाळत राहिली. त्यावळीं कल्पनाहि नव्हती कीं त्यांच्या माझ्या भावी जीवनातील अनेक घटनांची बीजं या अर्ध्या क्षणात रुजली गेली होती.

राजाराम कॉलेजची संमेलनं थाटानं साजरी होत. प्रोफेसर फडक्यांच्या संगीत मंडळातफ, नाट्यमंडळातर्फे गाण्याचे—नाटकाचे कार्यक्रम होत. त्यावेळीं

मी श्री. वाडीकरबुवाकडे दिलरूबा शिकत असे. कॉलेजच्या या नाट्य-गायन-वादनाच्या कार्यक्रमात भाग घ्यावा असं फार फार वाटे मला. माझ्या एका मैत्रीणीनं-गंगु पाटीलनं-गाणं म्हटलं तेव्हा तिच्या पेटीचा सूर धरायला मिळाला तेव्हां केवढी धन्यता वाटली होती मला. माझ्या दिलरूबा वादनाची कुणकुण आप्पासाहेबांना कशी लागली कुणास ठाऊक, त्यांनी मला एकदा बाल्कनीत थांबवून विचारलं, " आमच्या आर्केस्ट्रात दिलरूबा वाजवशील काय ? " ते आग्रह करू लागले तेव्हां मी म्हटलं, " सर, तुम्ही फार आग्रह केलात तर मी होय म्हणेन. म्हणून आग्रह करू नका. " आतांचे प्रसिद्ध दिग्दर्शक पेटकर ' फडकेज प्लेअर्स ' मधले एक प्रमुख नट. नव्या टॅलेंटच्या शोधात असायचे. स्वारी आमच्या काकांकडे धडकून आली असावी. अजूनही ते आमच्या घरी आले की मागच्या आठवणी काढून म्हणतात, " कमलाबाई, तुमच्या काकानी परवानगी दिली असती तर - ! " " महाराष्ट्राला एक नटी मिळाली असती- पण काकानी पुतणी गमावली असती. " मी चेष्टेनं म्हणते. पेटकरांचे डोळे खोडकर उत्तरासाठीं चमकू लागतात. त्यांना म्हणायचं असतं, " शेवटी गमावलीच की ! " पण त्या ऐवजी ते मोठ्यांदा हसतात. कॉलेजात असताना काकानी मुळी बजावूनच ठेवलं होतं आम्हांला- " खालच्या मानेनं कॉलेजला जायचं आणि खालच्या मानेनं घरी यायचं, बास ! " ' खाली मुंडी पाताळ धुंडी ' ही म्हण ते बहुधा विसरले असावेत.

संक्रांतीची थंडी पडू लागली, इतकी कीं अंगावर काटा उठू लागला. आमच्या घरी हलवा सुरू झाला. आक्कानं-म्हणजे इंदिरा संत-आणि मी बेत केला कीं आपल्या प्रोफेसराना काव्यमय हलवा द्यायचा. आजी-माझी सावत्र आई-तसराळ्यात हलवा घोळायची आणि आम्ही दोघी कागदावर शब्द घोळवायचे ! अगदी मध्यरात्रीपर्यंत—

संक्रांतीचे हेची हृद्‌गत
हृदय असावे नितांत प्रेमळ
गोड मधाने भरल मोहोळ
कशी कृति मग वरिल दुजा पथ !

अशा तऱ्हेची चार पांच कडवी तयार झाली. सुंदर नोटपेपर आणि निळी पाकिटं विकत आणून आम्ही " काव्य तिळगूळ " तयार केला.

दुसरे दिवशीं लॉजिकचा तास संपल्यावर मुलींच्या घोळक्याबरोबर मी खाली निघून आले. पण लेडीजरूमकडे वळण्याऐवजी प्रोफेसरांच्या कॉमनरूमकडे वळले. भीतभीत दाराशी जाऊन आत डोकावले तों वाऱ्याची दिशा साधून मांडलेल्या आरामखुर्चीत आप्पासाहेब आराम घेत पडले होते. त्यांच्या उजव्या हातात नुकतीच शिलगविलेली सिगरेट होती. सिगरेट ओढण्याची त्यांची लकब इतरापेक्षा वेगळी आहे. ओठात सिगरेट भिजत न ठेवता, तल्लफ आली कीं जोरात झुरका घ्यायचा आणि तितक्याच जोरात धुराचा फवारा सोडायचा. जणू झालेले श्रम त्या धुराबरोबरच त्यांना फुंकून टाकायचे असतात. मला दाराशी पाहताच ते चटकन उठले. अगदी जवळ येऊन उभे राहिले. दुसऱ्याशी बोलताना अगदी जवळ उभं राह्यचं, तोंडाशी तोंड नेऊन बोलायचं ही देखील त्यांची रीत पुढं माझ्या परिचयाची झाली. परंतु ते जवळ येऊन उभे राहताच माझा गोंधळ उडाला. त्यांच्या हातात पाकीट देतांना जे बोलायचं मी आधीच ठरवून ठेवलं होतं ते मला काहीच आठवेना. मी ते पाकीट त्यांच्या हाती दिलं आणि मागं फिरले.

दुसऱ्या दिवशी कॉलेजचा शिपाई लेडीजरूमच्या दाराशी डोकावून म्हणाला, "कमल दिक्षित हायेती का ? प्रोफसर फडके बलावल्यात त्यास्नी". फडके बोलावताहेत ! अंगावर बर्फाचं पाणी टाकावं तशी मी थिजून गेले. शेवटी मोठा धीर करून मी प्रोफेसरांच्या खोलीकडे गेले तों दाराशीच ते उभे होते. माझ्या हातात एक पाकीट देऊन ते हसून म्हणाले, "गोड भेटीला साधं उत्तर". मी ते पाकीट घेऊन हवेवर तरंगतच लेडीजरूमकडे परतले तों माझ्या मैत्रिणींनी भोवती गराडा घातला. झडप घालून माझ्या हातातलं पाकीट काढून घेतलं. जी कविता केवळ माझ्यासाठीच लिहिली गेली होती तिचं सार्वजनिक वाचन झालं. काही वेळानं मुली आपापल्या तासाला निघून गेल्या. मी तो नीळा नोटपेपर पुन्हा उघडला आणि तिरप्या ठळक अक्षरात लिहिलेली कविता वाचू लागले.

साध्या तिळात मधु आशय साखरेचा
काव्यातला विमल आशय भावनेचा
सेवोनिया परम हर्ष मनास झाला
सांगावयास अपुरी शत शब्द माला

माझ्या अंगी तिळभर नसे काव्य कौशल्य लीला
नाही ठावे चढविती कसे गोड काटे तिळाला
जे वाटावे तुज मधुरसे काय द्यावे कळेना
देतो प्रेमे रूचिर करूनी घेइ आशीर्वचाना

मी राजाराम कॉलेज सोडलं. बेळगावच्या लिंगराज कॉलेजमधे ज्यूनिअर बी. ए. च्या वर्गात नांव घातलं. ठळकवाडीच्या नव्या वसाहतीतल्या आमच्या घरापासून लिंगराज कॉलेज दोन अडीच मैलावर होतं. त्या वर्षी नुकतेच बी. ए. चे वर्ग सुरू झाले होते. श्री. नंदीमठ प्रिन्सिपाल होते. प्रो. रामस्वामी, प्रो. श्रीनिवासन वगैरे "मागविलेली" मंडळी खणखणीत आवाजात इंग्रजीचं पीठ पाडीत. कधी उन्हात तर कधी पावसात ब्रेोन रोडवरून सायकलवरनं कॉलेजच्या खेपा मी करू लागले. ते राजाराम कॉलेज, तिसऱ्या मजल्यावरचे लॉजिकचे तास, तो हास्यविनोद, सारं काही मागं राहिलं. राजाराम कॉलेजमधल्या दीड वर्षाची एकच आठवण मी जपून ठेवली होती. ती म्हणजे 'गोड भेटी' ला मिळविलेलं 'साधं उत्तर'!

लिंगराज कॉलेजात बी. ए. च्या वर्गात आम्ही फक्त सहाजण होतो. सर्वांनी कल्पना काढली की आपण एक वाङ्मय मंडळ स्थापन करावं. नाव ठरलं 'भ्रमर मंडळ.' भ्रमराला पाय सहा असतात. सभासद एका पायावर काम करण्यास तयार असल्यानं पायासकट त्यांची बेरीज देखील सहाच. भ्रमर मंडळाचं उद्घाटन प्रोफसर फडक्यांच्या हस्ते करायचा बेत ठरला. मी त्यांची विद्यार्थिनी म्हणून आमंत्रणाचं पत्रं धाडण्याचं काम माझ्यावर आलं. मी पत्र धाडलं. परंतु ते येतील अशी आशा नव्हती. कारण मंडळाजवळ ना पैसा ना प्रतिष्ठा. आश्चर्य असं की उलट टपालानंच त्यांनी होकार कळवला. पत्राच्या शेवटी त्यांनी दोन ओळी लिहिल्या होत्या: "नेहमी पुढच्या बाकावर बसणारी, जिच्या कपाळाभोवती केस भुरभुरत असत अशी गोड चेहऱ्याची मुलगी मी विसरलो नाही."

त्या दोन ओळीसाठी ते पत्र मी लपवून ठेवलं. मंडळाच्या स्वाधीन केलं नाही. ठरल्या तारखेला आप्पासाहेब आले. मंडळाचं उद्घाटन थाटानं झालं.

सहा डबल पाय असूनहि हे मंडळ पुढें फारसं चाललं नाही ती गोष्ट वेगळी, परंतु माझ्या शब्दाला मान देऊन आप्पासाहेब आले याचंच मला आश्चर्य वाटलं होतं... नंतरच्या दिवसात मला आश्चर्य वाटावं असे अनेक प्रसंग घडणार होते.

आमच्या ठळकवाडीच्या घरासमोर काकानी मोठी बाग केली होती. एकेक गुलाब दोन हातांच्या ओंजळीत मावत नसे. एके दिवशी संध्याकाळच्या सुमाराला मी पांचसहा मोठे गुलाब तोडून घेतले, " शालन चंद्रगिरीकडे जाऊन येते " असं सांगून काका बाहेरून परतण्याच्या आत घराबाहेर सटकले. सुदैवानं शालन घरींच होती. मी तिला म्हटलं, " इथे जोशी इंजिनियरांच्या बंगल्यात प्रोफेसर फडके आलेत. त्यांना भेटायला जायचंय. मला सोबत चल. "

शालननं विचारलं, " फडके आलेत ? " मी नुसती मान हलविली. मी तिला सांगितलं नाही की " मी जोशी इंजिनियरांच्या घरी उतरणार आहे. मला संध्याकाळी येऊन भेट " अशा अर्थाचं मला आप्पासाहेबांचं पत्र आलं होतं. काकाना मी इतकी भीत असे की ते पत्र मी त्यांच्या नजरेला पडू दिलं नव्हतं. शालनकडे जाते असं खोटं सांगूनच मी घराबाहेर पडले होते.

शालन मुकाट्यानं माझ्याबरोबर जोशांच्या बंगल्यावर आली. मी आप्पासाहेबांना फुलं दिली. शालननं त्याना एक गाणंहि म्हणून दाखविलं.

मी जरा उशीराच घरी परतले. परंतु कुणाला काही शंका आली नाही. मला मात्र वाटत होतं भलतच धाडस केलं आपण आता पुन्हा असल्या भानगडीत पडायचं नाही. रात्री जेवणं झाली. आरामखुर्चीत पडल्यावर काका म्हणाले, " ताई, एखादं गाणं वाजव बघू." मी दिलरुबा काढला आणि त्या वेळी हिराबाईचं जे गाणं फार लोकप्रिय झालेलं होतं ते वाजवू लागले. " हासवी नाचवी हृदयाला ! " मी वाजवीत असे जेमतेमच. पण नेहमीचे ते स्वर विशेष गोड वाटू लागले खरे...हेच गाणं आप्पासाहेबांना वाजवून दाखविण्याचा योग लवकरच येणार होता याची मला कल्पनाहि नव्हती.

गोष्टी अकल्पित घडण्यातच खरी मौज असते ! तिसरे दिवशीची सकाळ अगदी प्रसन्न उजाडली.हवेतलं धुकं आणि थंडी पुरती नाहिशी झाली नव्हती तंवर

सूर्यानं जरतारी किरणांचं जाळं शहरावर फेकून दिलं. अशा हवेत घराबाहेर पडलं की वाटतं आपण जरतारी गुलाबी शेलाच पांघरला आहे. मी बागेत जाण्याच्या बेतात होते तोंच अंगणात बूट वाजले. पाहते तो अर्ध्या बाह्याचा पांढरा शर्ट, पॅंट आणि हातात काठी अशा पोषाखात आप्पासाहेब उभे !

माझी एकच धांदल उडाली. मी त्यांना "या सर" म्हटलं केव्हां, सैपाकघरात आईला, "प्रोफेसर फडके आलेत" असं सांगितलं केव्हां, आणि बैठकीच्या खोलीतली खुर्ची झटकून नीट मांडली केव्हां माझं मलाच कळलं नाहीं.

त्यांच्यासमोर खुर्ची घेऊन मी बसले ती अतिशय संकोचानं. पण ते अशा खुबीनं बोलू लागले की हळूहळू माझा संकोच पार नाहीसा झाला, इतका कीं त्यानी दिलरुब्यावर एखादं गाणं वाजविण्याचा मला आग्रह केला तेव्हा मी खुशाल एकच काय दोन गाणी त्यांना वाजवून दाखवावी ना ! आज चोवीस वर्षांनंतरही मला त्या धाडसाची शरम वाटते. संभाषणाच्या ओघात 'तू काही लिहीत का नाहीस ?' असं त्यानी मला विचारताच मला कॉलेज मासिकातल्या माझ्या त्या "डोळ्या"ची आठवण झाली. पण ते कायमचे मिटले होते. उघडायची सोयच नव्हती. म्हणून मी फक्त उत्तर दिलं, "मला कसलं जमणार ?" रंगी-बेरंगी साड्या हौशीनं नेसणाऱ्या स्त्रीला तू हातमागावर कां बसत नाहीस असा प्रश्न विचारण्यापैकीच हा प्रकार. पुस्तकं वाचण्यासाठी असतात एवढंच मला ठाऊक. नाटकं कादंबऱ्या वाचू नयेत अशी वडील माणसांची आम्हाला ताकीद असे. आमच्या आक्कानं नारायणराव संत यांच्याशी प्रेमविवाह केल्यापासून माझ्या-वर कडक सेन्सॉरशिप बसली होती. अर्थात् गाणं शिकायला, पेटी वाजवायला, पोहायला, सायकलवर बसायला आम्हाला स्वातंत्र्य होतं. पण पुस्तकातून प्रेमाच्या भानगडी निर्माण होण्याचा धोका असतो या संशयानं काकानी वाचनावर सेन्सॉरशिप बसवली होती, तिथे लिहिण्याचा उद्योग त्याना कसा पसंत पडणार ?

परंतु आप्पासाहेबांनी आग्रह केला तेव्हां सुरुवातीला एखाद्या चांगल्या इंग्रजी गोष्टीचं भाषांतर करून त्यांच्याकडे धाडण्याचं मी कबूल केलं. ते निरोप घेऊन निघून गेल्यावर लगेच कपाटातला भूत-कथांचा एक संग्रह मी उघडला, आणि त्यातली मला आवडलेली एक थरकाप-कथा काढून तिचं गुपचूप भाषांतर

करण्यास सुरुवात केली. माझा अभ्यास चालू असावा अशा समजुतीनं माझ्या उद्योगात कुणीच व्यत्यय आणला नाही. गोष्ट जवळजवळ पन्नास कागद लिहून झाली. ते बाड मी एका पाकिटात घातलं, कॉलेजजवळच्या पोष्टात टाकून दिलं, आणि उलट उत्तरासाठीं पोष्टमनवर पाळत ठेवली. परंतु एके दिवशी पत्राऐवजी एक भलीं मोठी फळांची करंडीच स्टेशनवरून घरी आली. पार्सल ' कुलू व्हॅली ' हून आलं होतं. मोठमोठी सफरचंदं, पेअर, पीच अशी दुर्मीळ रसरशीत फळं पाहून सगळ्याना आश्चर्य वाटलं. करंडी कुणी धाडली असावी याचे तर्क सुरू झाले. माझा मावसभाऊ चटकन म्हणाला, " एवढं कोण बुवा प्रेमाचं ? " मी चमकून त्याच्याकडे पाहिलं.

काहीं दिवस निघून गेले. फळांची मधुर चव ओठावर अजूनहि रेंगाळलेली होती. रोज कॉलेजला जात होते पण पतंगाला दोरीची ओढ लागावी तशी माझ्या मनाला एक नवीच ओढ अगदी अस्पष्टपणे लागत होती. एका दुपारी कॉलेजच्या वाचनालयातून पुस्तकं घेऊन मी तासासाठी निघाले. वाटेवर ऑफिस होतं. मला कारकुनानं हाक मारून एक खाकी पाकीट माझ्या हातीं दिलं आणि म्हटलं, " तार आलीय तुमची. " तार ! मी भीतभीतच ते पाकीट फोडलं. कागद उघडून त्यावर टाइप केलेली एकच ओळ वाचली मात्र–माझी छाती धडधडू लागली. थंडीची हुडहुडी आणि ताप एकदम अंगात भरावा आणि काय होतं ते कळू नये तशी माझी अवस्था झाली. मला आनंदहि होत होता आणि काय विलक्षण भयहि वाटत होतं. मी त्या कागदाची चटकन् घडी केली आणि जिना कशीबशी चढू लागले.

नेहमीप्रमाणें प्रो. श्रीनिवास तास घेऊ लागले. पण त्यांच्या व्याख्यानातला एक शब्दहि मला ऐकू येत नव्हता.

गॅलरीखाली कॉलेजच्या पोर्चमधून मोटारीचा हॉर्न ऐकू आला. जणूं फक्त मला एकटीलाच ऐकू आला. आणि कांहीं वेळानं कॉलेजचा शिपाई वर्गाच्या दाराशी येऊन घुटमळला. मी चटकन उभी राहिले. आणि पुस्तकं घेऊन वर्गाबाहेर पडले. खाली येऊन पाहते तो एक काळी शेवरोलेट मोटार पोर्चमधे उभी होती. लांबचा पल्ला मारून आल्याप्रमाणे तिच्या मडगार्डवर

धुळीचा थर साचला होता. मला पाहताच ड्रायव्हरनं खाली उतरून दार उघडलं, पण मला मोटारीत बसण्याचा धीर होईना. मी तसंच आत डोकावून आप्पासाहेबांना म्हटलं, " खरंच आलांत की. " " तार मिळाली ना ? " त्यांनी उलट विचारलं आणि सरकून माझ्यासाठीं जागा करून ते म्हणाले, " ये ना— "

मोटार टिळकवाडीच्या रस्त्यानं निघाली, पण इंजिनियर जोशांचा बंगला मागे टाकून खानापूरच्या रस्त्याला लागली तेव्हां मी आप्पासाहेबांना हळूच विचारले, " कुठे जाणार आहो आपण ? " उत्तर देण्याऐवजी ते हसले.

खानापूर रस्त्यावर मोटार उभी राहिली. खाली उतरल्यावर वाटलं आपण पाण्याच्या तळाशी उभे आहो. रस्त्याच्या दोन्ही बाजूनी मोटमोठे वृक्ष ओळीनं उभे होते आणि त्यांच्या फांद्या एकमेकात अशा काही दाटीनं गुंतल्या होत्या की दुपारची उन्हं त्या हिरव्या रंगानं माखूनच खाली उतरली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला माजलेल्या अरण्याचा हिरवा दरवळ उन्हानं अधिकच गडद होऊन हवेत मिसळला होता. झाडाझुडुपाना बाजूला सारून आम्ही थोडे आत गेलो, एका मोठ्या झाडाखाली बसलो. आजूबाजूला फूटभर उंचीचं गवत उगवलं होतं. पाकळ्यापेक्षा केसरांचे बुंदच मोठे अशी चिमुकली फुलं गवतावर डुलत होती. आमच्या पावलांची चाहूल लागल्यामुळे नखाएवढी पिवळी फुलपाखरं एकदम गवतातून उठून भिरभिरू लागली होती. दूर कुठे गाई चरत असाव्यात. मधूनच हवेच्या तरंगावरून आलेला घंटांचा आवाज कानावर पडे. डाव्या बाजूनं माळ उतरणीला लागला होता, आणि त्याच्याकडेनं वळसा घालून एक मालगाडी सुरवंटाच्या गतीनं सरकत होती.

आगगाडी दिसेनाशी झाल्यावर प्रथमच आम्ही एकमेकाकडे पाहिलं. अत्यंत मृदु दृष्टीनं माझ्याकडे पहात, माझा हात आपल्या हातात घेत आप्पासाहेब म्हणाले, " तुला भेटण्यासाठी धावत आलो. "

आज चोवीस वर्षांनंतर जुन्या फोटोचं आल्बम चाळताना एका फोटोवर बोट ठेवून माझ्या मुलांनी विचारलं होतं. " ताई, हा फोटो कुणाचा ग ? " नऊवारी पातळ नेसलेली, खांद्यावरून पुढे घेतलेल्या वेणीशी हातानं चाळा

करणारी, एका मोठ्या वृक्षाच्या खोडाला टेकून उभी राहिलेली, स्वप्नाळू डोळ्यांची ही मुलगी कोण ? " मी–शपथ मी " असं मी सांगितलं तरी मुलांना खरं वाटत नव्हतं. " अय्या–अय्या " असा ओरडा करीत खट्याळ अंजू वडिलांना विचारू लागली, " आप्पा, हा ताईचा फोटो ? " आप्पासाहेबांनी क्षणभर त्या फोटोकडे पाहिलं. मग माझ्याकडे हसून पहात त्यांनी मुलांना मोठ्या अभिमानानं सांगितलं, " हो, हो, हा ताईचा फोटो. किती सुंदर आलाय नाही ? कुणी काढला ठाऊक आहे का ? मी !" जणूं नंतर कधीही माझा तितका चांगला फोटो आलाच नव्हता !

कसा येणार ? आयुष्यात प्रेमाचा क्षण प्रथमच येतो तेव्हां माणसाला तो अंतर्बाह्य उजळून टाकतो. पोहायला येत नसताना पाण्यात उडी मारावी तशी प्रेम म्हणजे काय त्याची कल्पना नसताही मी प्रेमात पडले होते. मी बुडणार आहे की वाचणार आहे याचा विचारही मनात नव्हता. जाणीव होती फक्त त्या हाताच्या स्पर्शाची.

मी कॉलेजात परतले. मोटार कोल्हापूरच्या दिशेनं निघून गेली. माझी दीडदोन तासांची गैरहजेरी कुणाच्या लक्षातही आली नव्हती. मी नेहमीप्रमाणे घरी परतले. परंतु मी नेहमीची नव्हते. मी बदलले होते. एका नव्या अवर्णनीय अशा भावनेनं माझ्या मनात प्रवेश केला होता. मला भारून टाकलं होतं. ज्यांचं बोलणचालणं, रूप मला फार आवडलं होतं, ज्यांच्या बुद्धिमत्तेनं माझे डोळे दिपून गेले होते, संकुचित रुक्ष जगात वाढलेल्या मला ज्यांच्या रसिक वृत्तीचा प्रत्यय अधिक उत्कटतेनं येत होता, अशा थोर विद्वान साहित्यिकाचं मन माझ्यासारख्या सामान्य अडाणी मुलीवर जडावं याचा मला इतका आनंद झाला कीं तो माझ्या अंतःकरणात मावेना. पण घरात पाऊल टाकल्यावर मी उमजले कीं आपलं हे गुपित घरात आई काका या कुणालाच कळता कामा नये......

नंतरच्या सहा वर्षांत माझ्या आयुष्याची नौका परिस्थितीच्या प्रवाहाबरोबर वहात गेली एम्. ए. बी. टी. ची परीक्षा देऊन शिक्षिका होण्याचं ठराविक ध्येय माझ्यापुढें आगंतुक येऊन उभं होतं. परंतु १९३९ सालीं एम्. ए. झाल्यावर शिक्षण व्यवसायात न पडता एका नव्या क्षेत्रांत मी काम करावं असं ठरलं. पुण्याच्या एका विमा कंपनीन स्त्री विभाग सुरू केला होता. त्या विभागात काम

करण्यासाठी मी पुण्यास आले. पुण्याला माडीवाले कॉलनीतल्या, आता श्री. सणसांच्या मालकीतल्या गोपाळकृष्ण बंगल्यात दुसऱ्या मजल्यावर आम्ही बिऱ्हाड थाटलं. आई, काका, काकू यांचे मायापाश माझ्यात गुंतलेले होते, आणि माझ्याबरोबर तीहि माणसं ओढली जात होती. वयाच्या तेविसाव्या वर्षी माझी विद्यार्थीदशा संपली आणि मी नोकरी करू लागले. परंतु खरं सांगायचं तर ही विमा कंपनीतली काय किंवा त्यापूर्वी एक वर्षापुरती केलेली शिक्षिकेची नोकरी काय माझ्या स्वभावधर्माला पटण्यासारखी नव्हती. माझं मन अशा तऱ्हेच्या खर्डेघाशींत कधीच रमलं नाही. या सहा वर्षांच्या कालात माझं जीवन अस्थिर आणि अनिश्चित होतं. परंतु लेखिका म्हणून माझ्या पुढल्या ध्येयाचा मार्ग ठरला आणि स्पष्ट झाला तो याच कालात.

'प्रेम' हा शब्द उच्चारण्याचं स्वातंत्र्य नसलेली दोन माणसं अखेर "शब्दा" वर प्रेम करूं लागली. या सहा वर्षांचा इतिहास पुढें उभा राहिला म्हणजे मला शॉच्या पिगमॅलियन या नाटकाची आठवण येते. शॉच्या प्रोफेसरानं केवळ प्रयोग म्हणून एका अडाणी मुलीला शिकवून विदुषी बनवलं होतं, तर आप्पासाहेबांनीं प्रेमाखातर मला लेखिका करण्याचा जणु निश्चय केला होता. ज्यूनियर बी. ए. च्या वर्गात असतांना एक भूत-कथा मी त्यांना लिहून धाडली होती, तेव्हांपासून माझ्या 'प्रतिभा-साधना' ला सुरुवात झाली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी कादंबऱ्या आणि कथासंग्रह मी किती वाचले त्याला सुमारच नाही. गाल्सवर्दी, हिल्टन, क्रोनीन, बाऊम, पर्लबक, आर्थर कोएसलर, रेमार्क या विख्यात लेखकांच्या सर्व कादंबऱ्या आणि चेकॉव, एच. ई. बेटस, मॉम, मोपांसा यांचे कथासंग्रह मी अगदी छांदिष्टपणें वाचीत असें. इंग्रजी भाषेवर माझं फार प्रेम होतं. अजूनहि आहे. मला आठवतं की मिशनरी शाळेत मला या भाषेची चटक लागली आणि पुढे ही भाषा माझ्या मनात इतकी भिनली की मी मनात विचार करी तो इंग्रजीतच करी. अजूनही पुष्कळदा इंग्रजीत बोलण्याची तल्लफ मला येते. भाव स्कूलमध्यें सहावीत शिकणाऱ्या आमच्या विजयला संशय येतो कीं मी आप्पासाहेबांजवळ त्याची परभाषेत निंदा करीत

आहे. तो माझ्या अंगावर ओरडतो, " इंग्रजीत काय बोलतेस ? मराठीत बोल." इंग्रजी भाषेचा असा नाद माझ्या मनाला लागलेला असल्यानं इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासात त्या काळी माझं मन रमलं. अजूनहि रमतं या वाचनामुळेंच मला लेखनकलेचा पोच आला. मर्म समजलं. कोणतीहि कथा अगर कादंबरी वाचताना तिच्या रचनेत लेखक कुठे वसरला आहे किंवा त्यानं कोणत्या युक्त्या वापरल्यामुळें त्याचं लेखन सरस उतरलं आहे याचा विचार मी करूं लागले. पूर्वी जी मी कधी वापरतच नसे ती माझी कल्पना–शक्ति आता जागृत झाली. माझं मन सदा साहित्याभोवती खेळत राहील अशा संभाषणातून आप्पासाहेबांनी सहज विषय सुचवावा, कल्पना पुढे ठेवावी. परटानं वाळत घातलेल्या कागदांच्या पताकाप्रमाणें फडफडणाऱ्या, दोरीवरच्या कपड्याकडे बोट दाखवून त मला म्हणत, " हा विषय लघुनिबंधासाठीं नाही तुला आवडत ! पाहतेस का लिहून ? " विषय शोधणारी नवी दृष्टी त्यांच्या सहवासामुळे मला लाभली. भाषांतर केल्यामुळे, माझ्या मराठी भाषेत इंग्रजी चटकदारपणा येऊ लागला. ' स्त्री ' मासिकातील बक्षिसाची " निरगाठ " ही गोष्ट, एम्. ए. च्या अभ्यास करीत असतांना अनुवादलेली ' निष्कलंक ' ही हिल्टनची कादंबरी, किंवा पुण्यात आल्यावर ' झंकार ' साप्ताहिकासाठी लिहावा लागणारा नऱ्हनऱ्हेचा मजकूर, या साहित्याच्या रचनेत जी सहजता आली तिच्या पाठीमागे एवढा अभ्यास होता.

माझ्या या व्यासंगाला माझ्या आईनं किंवा काकानी विरोध दाखवू नये याचं मला आश्चर्य वाटतं. एक कारण असं असावं की त्या दोघांचा माझ्यावर फार जीव असावा आणि प्रेमाखातर त्यांनी आपला विरोध गिळुन टाकला असावा. जी माझी इच्छा तीच आपली असं त्यांनी मानलं असावं. पण केवळ मुलीच्या प्रेमाखातर सनातनी विचारसरणीची माणसं इतकी आधुनिक बनतील काय की ज्याना आपल्या मुलीच्या आणि प्रा. फडक्यांच्या मैत्रीत काही वावगं दिसू नये ! मुलीनी डोक्यात फुलं घालणंहि ज्यांना कधी आवडलं नाही त्या काकानी मी केलेल्या जाहीर नृत्य प्रयोगाला कौतुकानं हजर रहावं ! मुलीनी कथा

कादंबऱ्या वाचू नये अशी ज्यांची मतं त्यांना स्वतःच्या मुलीच्या पहिल्यावहिल्या कथासंग्रहावरची अर्पणपत्रिका पाहून आनंद व्हावा? मला वाटतं कीं आंधळ्या प्रेमापेक्षा डोळस विचारामुळेंच माझ्या वडील माणसांनी मला उत्तेजन दिलं असावं. आप्पासाहेबांच्या सहवासामुळं मी जशी बदलत गेले तशीच माझी माणसंहि बदलत गेली असावी मूळच्या रसिक परंतु परिस्थितीमुळे गंजलेल्या त्यांच्या मनावरचा गंज एका रसिकाच्या सहवासामुळे निघून गेला असावा. आप्पासाहेबांच्या विद्वत्तेची, कलासक्त अंतःकरणाची ओळख त्याना पटली असावी. आमच्या लहानशा कुटुंबात आप्पासाहेब सर्वस्व होऊन बसल. ते पाहुणे आल कीं दसरा दिवाळीसारखा आनंद घरात उडू लागला. १९४० साली आप्पासाहेबांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरीचं साहित्य संमेलन झालं. घरच्या मंगल कार्याला जावं त्याप्रमाणे मी, काका, आक्का ( इंदिरा संत ) आणि नाना ( नारायणराव संत ) सर्वजण रत्नागिरीला गेलो. रत्नागिरीच्या संमेलनाहून परतल्यावर घाणेरड्या वैयक्तिक टीकेचा आमच्यावर वर्षाव झाला तरीदेखील माझ्या आईनं नापसंतीचा एक शब्दहि कधी उच्चारला नाही. ती सदैव माझ्या पाठीशी राहिली. अशा श्रद्धेनं की "साहित्याच्या प्रेमाखातर एकत्र आलेली ही माणसं!"

परंतु तिला कल्पना नव्हती कीं साहित्याच्या प्रेमामुळें एकत्र येणारी आम्ही दोघं प्रेमाच्या पाशात पुरतीच अडकलो होतो. काही दुखणी फार फसवी असतात. ती माणसाच्या शरीरात प्रवेश करतात कव्हा, हळूहळू त्याचा कब्जा घेतात केव्हा त त्या माणसालाहि कळत नाही. "तुमची प्रकृति बरी दिसत नाही" असा कुणी उद्गार काढला कीं तो माणूस उलट प्रतिपादतो, "छे! मला काय झालय? मी ठीक आहे की!" जेव्हा ते दुखणं सबंद शरीर ग्रासतं तेव्हा तो माणूस स्वतःची किंवा इतरांची फसवणूक करू शकत नाही. ते दुखणं कितीहि भीषण असलं तरी त्याच्या आहारी माणूस जातो. या अवस्थेत प्रतिकारहि अशक्य ठरतो. प्रेमाची ही "बेमौत बिमारी" तशीच नाही काय? ज्याच्यापासून आम्ही दूर पळत होतो, ज चुकविण्यासाठी म्हणून अनेकदा धडपडलो त्याच्या अदृश्य जाळ्यात आम्ही सर्वस्वी सापडलो. आता हे पाश तोडण म्हणजे एकमेकाला रक्तबंबाळ करणं

होतं! आम्हा दोघांच्या जीवनांत फार मोठी समस्या निर्माण झाली. प्रेमाची ही दुधारी सुरी कशीहि धरली तरी काळीज रक्तबंबाळ करू लागली. हसायची चोरी तशी रडायचीहि चोरी. प्रेम करणं हे ज्या काळात निषिद्ध समजलं जात असे त्या काळांत ज्याना परिस्थितीनं प्रेम करणं अशक्य अशा प्रेमिकांचा निषेध करण्यात समाजानं किंवा इष्टमित्रानी दयामाया का दाखवावी? अनैतिक रीतीनं प्राप्त झालेलं मातृपद पवित्र मानलं जातं, परंतु अस्थानी उगवलेल्या प्रेमाला मात्र अनीतिचा, पापाचा, वासनेचा गोळा अशा तुच्छतेनं कां बघावं? आणि अशा कलुषित दृष्टीला प्रेमाचं पावित्र्य तरी दुर्दैवी प्रेमिकानी कसं पटवून द्यावं? हे प्रेम प्रेम म्हणजे तरी काय आहे बरं?

जीवनाला संगीताची उपमा देणाऱ्यानी न कळता प्रेमाची एक सुंदर व्याख्याच सूचित केली आहे खचित. सूर जुळणं या गोष्टीला संगीतात जितकं महत्व आहे तितकंच मनं जुळणं याला जीवनात महत्व आहे गायन-वादनाच्या मैफलीच्या आरंभी सूर लावण्याचा सोहळा पहा. चित्त एकाग्र करून कलावंत सूर लावीत असतो. जाणते रसिक कानात प्राण आणून वाट पाहतात. सुरांत सूर मिसळला की हवं ते मिळाल्याचा उन्माद कलावंताच्या डोळ्यात चमकतो, हात उंच करून, डोळे मिटून रसिक श्रोते उद्गारतात, "वाहवा!" जणु हा सूर म्हणजे पुढे रंगणाऱ्या मैफलीचं अभिवचनच. सतार तंबोऱ्यासारख्या निर्जीव वस्तू संवादी तारा जुळताच जिवंत, चैतन्यमय संगीताचे झंकार निर्माण करतात. मग ज्या स्त्री-पुरुषांच्या मनाचा सूर अचानक जुळून गेला त्यांच्या हृदयात निर्माण होणाऱ्या जीवन-संगीताची गोडी अपूर्वच. काही वर्षांपूर्वी तर्कशास्त्र शिकवितांना पलिकडल्या झाडीतून कुहू कुहू आवाज उठला. आप्पानी चमकून माझ्याकडं पाहिलं. मीहि वहीतून मान उचलून त्यांच्याकडे पाहिलं. "ऐकलंस? कोकिळा"! "खरंच! कोकिळा!" अशी निःशब्द उत्तरं प्रत्युत्तरं आमच्या अंतःकरणातून एका सुरात उठली. त्याच वेळी 'सूर मिळाल्या'चा ओझरता आनंद मी अनुभवला होता. नंतरच्या सहवासात दोन मनांचं हे संवादित्व वाढतच गेलं होतं. इतकं की साध्या बोलण्यातूनहि अंतःकरणात संगीताचे झंकार उठावे. मात्र आमच्या परस्पराच्या या संवादातून एक मोठा विसंवाद उत्पन्न

झाला. फार मोठी समस्या निर्माण झाली. ही समस्या सोडविण्याचा कोणताहि प्रयत्न म्हणजे दगडी भिंतीला धडक देण्यापैकीच. आपण मांडलेला भावनांचा डाव उधळून देऊन, सर्व पाश तोडून एकमेकापासून दूर जाण्याची वाटहि सोपी नसली तरी मोकळी होती. ही वाट म्हणजे जिचा तळहि दिसत नाही अशी काळ्याकुट्ट अंधारानं भरलेली विहीरच. या विहीरीच्या काठावर बसून उडी मारण्याचा निश्चय मी कितीदा केला असेल पण तो काळोख आणि तो न दिसणारा तळ पाहून माझं पाऊल मागे पडे. पण मनांत वैतागानं मी म्हणे, कुणी मला ढकलून का देत नाही ? म्हणजे ही तळमळ तरी संपेल.

हे दिवस फार वाईट गेले. माझ्या जवळच्या माणसाना माझ्या अंतःकरणातल्या गुप्त झगड्याची कल्पना नव्हती. वृत्तपत्रानी तर आम्हाला बदनाम करण्याचा चंगच बांधला होता. चहूबाजूनी जणु आभाळ भरून आलं होतं. हे दिवस ज्यांच्या स्नेहार्द सहानुभूतीमुळें सुसह्य झाले त्या श्री. बापूराव शाळीग्राम, व्ही. शांताराम, शंकरराव किर्लोस्कर, वि. श्री. मोडक ( झंकारचे संपादक ) यांचा उल्लेख मला कृतज्ञतेनं केलाच पाहिजे. या माझ्या ' वाटेवरल्या सावल्या ' होत्या !

क्रिप्सच्या भेटीची डॉक्यूमेंटरी व्ही. शांताराम यांनी घेतली होती. त्यावर धावती टीका आप्पासाहेबांनी केली होती. ती ऐकण्यासाठीं मी थिएटरवर गेले. आप्पासाहेबांचा आवाज पुन्हा ऐकायला मिळणार नाही म्हणूनच गेले. अंधेरात अश्रू ढाळीत बसले होते. शांतारामबापूनीं माझी मनःस्थिति ओळखली असावी. डॉक्यूमेंटरीचा चित्रपट संपल्यावर स्वतः शांतारामबापू आणि सौ. जयश्री, दोघंही मला पोचविण्याकरता माझ्या घरापर्यंत आली. त्यांच्या समजुतीच्या, धीराच्या बोलण्यामुळ माझं भडकलेलं मन शांत झालं.

असे दिवस चालले होते. एके दिवशी माझी आई अचानक आमच्या शेतीवाडीवरच्या खेड्यातून-लवंदीहुन-पुण्यास आली. रात्री निजानीज झाल्यावर माझ्या उशागती येऊन तिनं मला हाक मारली आणि माझ्या हातात एक पाकीट देऊन म्हणाली, " हे खरं काय ? " मी ते पाकीट उघडलं. कागदावर दोनच ओळी ठळक तिरप्या अक्षरात लिहिलेल्या होत्या.

" प्रिय आई,

मी कमलशी लग्न करण्याचं ठरविलं आहे. तुमचा आशीर्वाद हवा. आप्पा. "

ते वाचून मला एकदम रडू कोसळलं.

दुसरे दिवशी सकाळी उठून पाहते तों घर रिकामं. माझी माणसं मला सोडून गेली होती. मी एकटी उरले होते.

लवकरच कोल्हापूरहून आप्पासाहेब आले आणि माझा एकटेपणा संपला. मुंबईच्या सॅव्हॉय हॉटेलात, जिला मी प्रेमानं आजी म्हणत असे ती माझी अत्यंत प्रेमळ सावत्र आई, आक्काचे पति कै. नारायणराव संत, श्री. पु. वा. भिडे, श्री. मोडक यांच्या उपस्थितीत वैदिक मंत्रानी आम्ही विवाहबद्ध झालो. ती २८ डिसेंबर १९४२ ची सकाळ होती.

थोड्या वेळानं शांतारामबापू भेटायला आले. त्यांच्यासमोर जाण्याचा मला प्रथमच संकोच वाटला. शिकलेल्या बायकांनी प्रेमात पडावं ही शांताराम-बापूना मोठी विसंगती वाटे. त्यांच्या चेष्टेचा तो एक विषय होता. पापण्यांची जलद उघडझाप करीत त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे हसून ते म्हणाले, " काय कमलाबाई ! " पण त्यांची मुद्रा गंभीर होती. जणु त्यांना सुचवायचं होतं, " ज्या मार्गानं हातात हात घालून निघाला आहा तो फार कठीण आहे. "

लग्नाच्या दुसरे दिवशी संध्याकाळीं आम्ही दोघं शांतारामबापूंच्या घरीं जेवायला गेलो. त्यांचा निरोप घेताना मला गहिंवरून आलं. माझ्या लग्नसमा-रंभातला रिकामेपणा, एकाकीपणा त्यानी नाहीसा केला होता. शोभा दिली होती. जाताना " वेडिंग प्रेझेंट " म्हणून एक सुंदर टेबल लॅंप शांतारामबापूनी माझ्या हातात दिला.

आज अठरा वर्षे शांतारामबापूनी दिलेला तो सुंदर टेबल लॅंप माझ्या टेबलावर प्रकाशत आहे. काही वर्षांपूर्वी पन्हाळ्याच्या मुक्कामात शांताराम-बापूंच्या हातीं माझ्या विनोदी कथांचा संग्रह लागला. त्यातली एक गोष्ट त्यांना फार आवडली. इतकी की त्यानी मला पत्र लिहिलं, " शाब्बास कमलाबाई ! "

त्याना कल्पनाहि नसेल कीं माझं बहुतेक लेखन त्यानी दिलेल्या टेबल लॅंपच्या प्रकाशात करते. किंबहुना हा लेखहि मी त्या दिव्यांच्या मंद उजेडातच लिहीत आहे.

आमच्या विवाहाच्या बातमीनं आगीत तेल पडल्याप्रमाणें जिकडे तिकडे निषेधाच्या ज्वाला भडकल्या. आजवर आप्पासाहेबांच्या आयुष्यात अनेक वादळं येऊन गेली होती परंतु या वादळाचा तडाखा भयंकर होता. बहिष्कार, निषेध, अवहेलना यांचा सतत वर्षाव चालू होता. या वर्षावात अधूनमधून गुलाबाची फुलंहि असत. मुंबईहून परतल्यावर आप्पासाहेब प्रथम कॉलेजात गेले तेव्हा कॉलेजच्या व्हरांड्यात, बाल्कनीत विद्यार्थ्यांची विशेष गर्दी उभी होती. कॉमनरूमच्या वाटेवर आप्पासाहेबांची आणि प्रिन्सिपल बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची भेट झाली. आणि एकदम भावनावश होऊन खर्डेकरांनीं आप्पासाहेबांना मिठी मारली. असे काही प्रसंग सोडले तर जिकडे तिकडे, विशेषतः महिलामंडळातून, वृत्तपत्रातून निंदानालस्तीच चालू होती. परंतु या वादळापुढें आप्पासाहेबांचा आत्मविश्वास किंचितहि ढळला नाही. समाजाचा सारा क्रोध त्यांनी आपल्या अंगावर झेलला. त्याची झळ माझ्यापर्यंत पोचू दिली नाही. बाहेरच्या जगात माझी अवहेलना झाली त्याला कदाचित् मर्यादा असेल, परंतु लग्न झाल्या दिवसापासून त्यांनीं माझा आणि माझ्या प्रेमाचा एवढा अमर्याद अभिमान बाळगला आहे की तेवढा आपल्या साहित्याचाहि बाळगला नसेल.

काहीशा प्रतिकूल वातावरणात सुरू झालेला आमचा संसार कोल्हापूरच्या नऊ वर्षांच्या वास्तव्यात एखाद्या आम्रवृक्षासारखा बहरला. सुरुवातीला त्या दिवसात माझ्या सुखात एकच वैगुण्य होतं. कोल्हापूरहून पंचवीस मैलावर तवंदीला माझी आई असूनहि तिनं माझी भेट घेतली नाहीं! बिघडलेल्या आई-वडिलांचा समेट घडवून आणण्यासाठी कथा कादंबऱ्यात अपघात घडवून आणतात. पण वास्तवातहि तसं घडतं. आप्पासाहेबांना सायकलवरून पडल्याचा अपघात झाला आणि आईच्या माझ्यामधलं पंचवीस मैलाचें अंतर एकदम नाहीसं झालं. १९४४ साली रोहिणीराणी जन्मली, आणि चिमुकल्या नातीच्या कौतुकात माझी आई पुरतीच रमली. १९४९ साली अंजली जन्मली. नंतर दोन वर्षांतच विजय जन्मला.

आमचं रविवार पेठेतलं ते तिमजली घर म्हणजे अक्षरशः गोकुळासारखं गजबजलं. आप्पासाहेबांना आणि मुलांना गाईचं धारोष्ण दुध हवं म्हणून आई

खेड्यावरून दुभती गाय अगर म्हैस आळीपाळीनं आणीत असे आणि चक्क पुढच्या सोप्यात बांधीत असे. एका बाजूला जिरग्याच्या तांदुळाचीं पोती आणि दुसऱ्या बाजूला वाट अडवून दाराशी पसरलेली म्हैस असा तो तळमजल्याचा दर्शनी थाट बघून कुणाला खरहि वाटलं नसतं हे कादंबरीकार प्रा. फडक्यांचं घर. आप्पासाहेब कॉलेजमधून परतले, बुटांचा पाय पायरीवर वाजला की म्हैस चटकन उठून बाजूला भिंतीशी उभी राही—एखाद्या सासुरवासणीप्रमाणे! आप्पासाहेब मला अनेकदा म्हणत, या म्हशीला माझ्याविषयी फारच आदर दिसतो. वाटते कळप दिसला की ही हंबरून ओळख देईल की काय अशी भीति वाटते मला!"

त्या दिवसात साहित्यापेक्षा मी संसारातच रमले खरी. पाण्यात डुंबणाऱ्या नादिष्ट मुलाला हाताला ओढून बाहेर काढाव त्याप्रमाणें आप्पासाहेब मला जुलमानं टेबलाशी आणून बसवीत. लिहून झाल्याशिवाय उठू देत नसत. 'लोकसत्ते'त नेहमी बातम्या छापल्या जातात की अमक्या तमक्या बंदरावर समुद्राचं आक्रमण चालू आहे. बंदर धोक्यात आहे. सरकार स्वस्थ का? "अगदी तसंच सतत अठरा वर्षं संसाराचं माझ्या साहित्यावर आक्रमण चालू आहे. मुंबई सरकारप्रमाण आमचे 'सरकार' स्वस्थ बसले असते तर माझ्या साहित्यान संसार सागराचा तळ केव्हाच गाठला असता. परंतु आप्पासाहेबांच्या सावधपणामुळे आज माझं साहित्यच संसारावर कुरघोडी करीत आहे. घरात माझी चाहूल लागेनाशी झाली, पाहुण्याना चहाफराळ मिळेनासा झाला, की खुशाल ओळखावं "ताईला कोंडून घातली आहे." याचा दुसरा अर्थ "ताई कथा लिहीत आहे."

त्यांच्या विशिष्ट स्वभावामुळे त्यांचा मित्रपरिवार मोठा नाही. काही निवडक रसिक समानधर्मीय मंडळीशीच त्यांनी अकृत्रिम स्नेहाचं नातं जोडलेलं आहे. कोल्हापूरच्या वास्तव्यात श्री. बापूराव शाळिग्राम, कै. गोविंदराव टेंबे, कै. बाबूराव पेंटर, डॉ. काटे, हिराबाई बडोदेकर, शंकरराव किर्लोस्कर, केशवराव पाटील, शिल्पकार फडके, वसंत शांताराम देसाई, ही मंडळी त्यांच्या विशेष प्रेमातली. गोविंदराव टेंबे, बाबूराव पेंटर, केशवराव पाटील हे जग सोडून गेले. आणि व्यवसायामुळे, अंतरामुळे इतरांच्या गाठीभेटी पूर्वीइतक्या वारंवार घडत

नाहीत. परंतु त्यांच्या आठवणी निघून आप्पांचा कंठ सद्‌गदित झाला नाही असा दिवसहि जात नाही.

१९५१ साली आम्ही कोल्हापूर सोडून निघालो. श्री. रमेश मंत्री आणि करवीर नगर वाचनालय या संस्थेने एक निरोप समारंभ साजरा केला. त्यावेळी गोविंदराव टेंब्यांनी फार सुंदर भाषण केलं होतं. ते म्हणाले होते, " अंगाला लागलेली माती आपण झटकून टाकतो. पण स्मृतीची सुगंधी फुलं मात्र डायरीच्या पानांत प्रेमानं जपून ठेवतो. आप्पासाहेबांचे माझे मतभेद भांडण मी विसरलो आहे. या क्षणीं मला आठवतो फक्त त्यांच्या सहवासात घालविलेला रम्य काल. "

एकमेकांच्या कलागुणावर लुब्ध होऊन निर्माण झालेली मैत्री अभंग असते ती अशी.

संगीत कलानिधि कृष्णा मास्तरांच्या एकसष्टीचा सोहळा पुण्यात साजरा झाला त्या निमित्तानं देशातले सगळे गायक-वादक जमले होते. कोल्हापूरहून बापूराव शाळिग्राम, पद्मा शाळिग्राम ( सौ. गोखले ) आणि सौ. काकी ( मिसेस बापूराव ) सारी मंडळी आमच्या नव्या बांधलेल्या ' दौलत ' बंगल्यात पाहुणी आली होती. तिकडे मंडपात मोठमोठ्या गायकांच्या मैफली होत होत्या. पण इकडे आमच्या घरात आप्पासाहेब, बापूराव, पद्मताई यांच्या गप्पांच्या मैफली विलक्षण रंगत. कोल्हापूरला असताना बापूरावांचं घर म्हणजे आमचा विरंगुळा. त्यांच्या घरी नेहमी आमची बैठक व्हायचीच.जगदीश, नरेश, रमेश, आणि पद्मताई या त्यांच्या संभाषणचतुर मुलांच्या कोंडाळ्यात बसून बापूराव आणि आप्पासाहेब कलावंतांचे ' किस्से ' सांगू लागले म्हणजे हसता पुरेवाट व्हायची. पुण्यात आलो आणि आम्ही बापूरावांच्या सहवासाला मुकलो. कृष्णामास्तरांच्या एकसष्टीच्या निमित्तानं सातआठ वर्षांचं उट्टं चार आठ दिवसात निघालं.

आप्पासाहेबांचे दुसरे स्नेही कृष्णामास्तर. कृष्णामास्तर म्हणजे " हस्ता " चा पाऊस. लहर फिरली की असा कोसळेल आणि भिजवून चिंब करून निघून जाईल. कृष्णामास्तर गाता गाता बोलतील आणि बोलता बोलता गातील. जादुगाराच्या तोंडातल्या कधी न संपणाऱ्या फितीप्रमाणे त्यांच्या तोंडून निघणाऱ्या विनोदी चुटक्यांची भेंडोळी कधी संपायची नाहीत.

हिराबाई घरी येतील त्या शुक्राच्या चांदणीसारख्या ! पण एखादे वेळी मागे कपिलेश्वरी बुवांचा ' ढग ' असायचा. आपल्या गाण्याइतकंच त्या मधुर बोलतील. कपिलेश्वरी बुवांचे श्रुतिबद्दलचे सिद्धांत आप्पानी ऐकावे असा त्यांचा आग्रह ! आप्पांचं ठराविक उत्तर, " मला गाण्यात काय समजतय ! "

आप्पासाहेबांच्या प्रेमातली आणखी एक व्यक्ति म्हणजे अरविंद मंगरूळकर. प्रोफेसरसाहेब घरी येतील ते आपले मोठमोठे डोळे आप्पासाहेबांवर रोखून त्यांच्याशी जिभेचे चार पट्टे खेळण्याच्या तयारीनं. मग दोघांचं असं शाब्दिक द्वंद माजेल की एखाद्याला वाटेल हे दोघं आतां एकमेकाचं तोंड पहाणार नाहीत. पण लताचं नव रेकॉर्ड आणलं की आप्पासाहेब रोहिणीला म्हणतील " रोहिणी, जा ग मंगरूळकराना बोलावून आण—म्हणावं एक सुंदर रेकॉर्ड ऐकवायचंय तुम्हाला ? "

' एकच प्याला ' नाटकांत प्रवेश करणाऱ्या रामलालप्रमाणे उंच टोपी, शुभ्र धोतर, हातात काठी अशा थाटात, कधीमधी वसंत शांताराम देसाईंची आमच्या घरात ' एंट्री ' होते.मी दिसले तर नमस्कारावरच माझी बोळवण करून आरामात बसतील. खिशातली चांदीची पेटी उघडून आप्पासाहेबापुढे धरतील. डबीतल्या पिवळ्या नाजुक पानाच्या घडीवरूनच वसतरावांची रसीली वृत्ति लक्षात येते. मग ' मखमलीच्या पडद्याआड ' काय गप्पागोष्टी चालतात कुणास ठाऊक ! बहुतेक नाटकाच्याच !

ज्यांच्याकडचं पान आप्पासाहेब विशष प्रेमानं खातात अशी पुण्यात दोन ठिकाणं आहेत. विठ्ठलराव दीक्षिताचं पुस्तकाचं दुकान आणि डॉ. राहतेकरांच्या घरांतला दिवाणखाना. " काय विठ्ठलराव, काही नवीन ? " असं आप्पानी विचारलं, की टेबलावरचा कामाचा ढीग दूर करून, चष्मा काढून विठ्ठलराव मनमोकळं हसून म्हणतील. " यॉं." कारण तोंडात पान ! मग नवीन पुस्तकांच्या नांवाबरोबर गावातल्या चारदोन खुसखुशीत बातम्या विठ्ठलराव आप्पासाहेबांना एकवतील. " पान काढा " असं आप्पासाहेब म्हणाले कीं ओळखावं बैठक लांबणार. मग ते दोघं इतक्या मोठ्या आवाजात एकमेकाशी बोलतील कीं पुस्तकांच्या कपाटा कपाटाआड लपलेल्या विद्वानानी कान टवकारावे.

सौ. मुक्ताबाई दीक्षित जितक्या बुद्धिमान तितक्याच विनोदप्रिय आहेत. अगदी साध्या अनुभवाना त्या आपल्या खुसखुशी भाषेत विदुषकाचा पोषाख चढवतील. दुसऱ्यांचा विनोद ऐकूनहि " मुक्त हास्य " करतील. विद्वत्तेला अशी विनोदाची झालर म्हणजे वाचनालयात भिरभिरणारा पंखा ! त्याखालून उठावसं वाटूच नये.

डॉक्टर राहतेकरांच्या दिवाणखान्यात पेशवाई थाटाच्या बैठकीवर मध्यभागी पानाचा डबा ठेवलेला असतो. या डब्याभोवती जमलेल्या विविध व्यवसायातील मित्रांच्या तोंडात पानापेक्षा गप्पाच अधिक रंगतात. कर्नाटकाचे कवि दत्तोपंत बेंद्रे, नकलाकार भेंडे, केशवराव दाते, विठ्ठलराव दीक्षित, आप्पासाहेब ही सारी मंडळी अनेकदा या दिवाणखान्यात एकत्र येतात.

रविवारी सकाळी आम्ही आप्पासाहेबांच्या भाषेत " देव पुजायला " म्हणजे मित्रमंडळीना भेटायला बाहेर पडतो. गवल्या मारुतीजवळच " प्रभात वाचन मंदिर " हे आमचं पहिलं देऊळ. रस्त्यालगतच्या खुर्चीवर एकाग्रपणें काही लिहित बसलेला " देवमाणूस " म्हणजेच वाचनालय आणि परदेशी हिंदी विद्यालय या दोन भरभराटीला आलेल्या संस्था चालविणारे माणिकलाल परदेशी. आप्पासाहेबांच्या शेकडो कथा आणि अर्ध्या डझन कादंबऱ्या यांनी हिंदीत अनुवादित केल्या आहेत. हिंदी वाचकांना माझ्या विनोदी कथांची गोडी यानीच लावली. १९५१ सालीं आम्ही कोल्हापूर सोडून पुण्यात आलो तेव्हा प्रथम भेटीत " काय ताई ! " असा उद्‌गार माणिकलालनी काढला होता. 'ताई' या उद्‌गारा-पाठीमागचं त्यांचं बंधूप्रेम सतत दहा वर्षं वाढतच गेलं आहे.

१९४० साली आप्पासाहेबांनी ' झंकार ' साप्ताहिक काढलं आणि त्या वेळी लोकप्रियतेच्या कळसावर असलेल्या व्ही. शांताराम आणि बाबी तल्यारखान या दोन कलावंतांचा लेखक म्हणून प्रथमच मराठी वाचकांना परिचय करून दिला.

चित्रपट लेखक आणि दिग्दर्शक या नात्यानं आप्पासाहेब आणि शांताराम-बापू एकत्र येऊ शकले नाहींत. परंतु संपादक आणि लेखक हे नातं मात्र एकदम जुळलं. ' लेखक आणि दिग्दर्शक-मित्र की शत्रू ! ' ही शांतारामबापूंनी लिहिलेली झंकारमधली लेखमाला फार गाजली. झंकार चालू राहिला असता आणि दोघांचेही स्थलांतर न घडतं तर या श्रेष्ठतम दिग्दर्शकाकडून आप्पानी

आणखीहि लेख लिहून घेतले असते. गोविंदराव टेंबे, चिंतामणराव कोल्हटकर ही नाट्यव्यवसायांतली माणसं उत्तम लेखक म्हणून गाजली. शांतारामबापूंच्याहि वैशिष्ट्यपूर्ण सुंदर साहित्याची भर वाङ्मयात पडली असती. परंतु लेखांच्या निमित्तानं त्यांचा आणि आप्पासाहेबांचा जो स्नेह जमला तो फार गोड होता. मेघाला रुपेरी कडा असावी त्याप्रमाणे शांतारामबापूंच्या समर्थ व्यक्तिमत्त्वाला साधेपणाची सुंदर कडा आहे. शांतारामबापूंना आणि आप्पासाहेबांना पुण्याच्या ओल्या भाजलेल्या शेंगा फार आवडत असत. गप्पागोष्टी करता करता प्लेटीतल्या शेंगा खलास होत. एखादी उरे. ती प्रथम कुणी खावी याबद्दलचा गुप्त झगडा दोघांच्याही मनात चालू झाला की पाहणाराला हसू लोटल्याशिवाय राह्यचं नाही. मोठ्या माणसाचा साधेपणा हृदयवेधक असतो तो असा. 'झंकार' बंद पडला. परंतु काही काल शांतारामबापूंचा जो स्नेह जमला त्याच्या स्मृतींचे झंकार काही निमित्तानं आजहि आमच्या अंतःकरणात उमटतात.

"गाडून टाका हे इंडियन क्रिकेट" असा उद्‌गार आप्पासाहेबांच्या तोंडून निघाला होता. पण आइन आपल्या लाडक्या परंतु खोडकर मुलाला, "मर कार्ट्या" म्हणावं एवढाच त्या वैतागाचा अर्थ. क्रिकेटनं त्यांना तरूणपणी झपाटलेलं होतं. आणि अजूनहि क्रिकेटचं त्यांचं वेड कायमच आहे. प्रा. देवधर, सी. के. नायडू, मर्चंट, हजारे, फडकर, मुश्ताक अली या खेळाडूवर त्यांचं प्रेम आहे. क्रिकेटविषयी लिहितांना अगर बोलताना त्याना कधी कंटाळा येत नाही. त्यांची ही हौस लोकसत्तेचे चतुरस्र संपादक श्री. ह. रा. महाजनी यांनी ओळखली. कसोटी सामन्यांची आप्पानी लिहिलेली वर्णनं इतरही दैनिकातून व साप्ताहिकातून आली असतील, परंतु जास्तीत जास्त आली श्री. महाजनींच्या रविवारच्या लोकसत्तेतून. आप्पांच्या लेखनकौशल्याबद्दल महाजनीना आदर आणि संपादक या नात्यानं महाजनींच्या ठिकाणीं जे अनेक दुर्मिळ गुण आहेत त्याबद्दल आप्पाना आदर, असा संयोग झाल्यामुळें गेल्या पांच दहा वर्षांत महाजनींच्या लोकसत्तेत आप्पानी जितकं विविध लेखन केलं तितकं दुसरीकडे कुठेच केलं नाहीं. १९३०–३५ च्या काळात 'किर्लोस्कर'चे शंकरराव किर्लोस्कर आणि आप्पा यांच्या विशेष सहकार्याचा जसा संस्मरणीय कालखंड होऊन गेला तशाच प्रकारचा श्री. महाजनी आणि आप्पा यांच्यातील

परस्पर स्नेहाचा आणि सहकार्याचा कालखंड म्हणावा लागेल. संगीत आणि नाट्य हे दोन विषय दोघानाहि प्रिय. नाट्याबद्दल दोघांची मतं मात्र एकमेकाना पटत नाहीत, आणि मग त्या निमित्तानं दोघांचा जो वाद रंगतो तो ऐकण्यासारखा असतो. नाट्यावरचं महाजनीचं व्याख्यान आणि आप्पाचंहि व्याख्यान अशी " जुगलबंदी " घडवून आणण्याच्या गोष्टी दोघेहि बोलतात.

महाराष्ट्र क्लबच्या ग्राऊंडवर झालेल्या महाराष्ट्र विरुद्ध मुंबई या सामन्याला आप्पा जाऊ शकले नाहींत. परंतु त्यांचे मित्र श्री. देवधर आणि बाळ ज. पंडित यांची धांवती निवेदनं ऐकण्यासाठी वेळातवेळ काढून ते रेडिओपाशी बसत असत. इंग्रजी खेळाचं धावतं निवेदन मराठी भाषेत करायचं म्हणजे जोडवी पायात घालणाऱ्या मराठी स्त्रीला उंच टाचेचे बूट घालून पळविण्याइतकंच कठीण. परंतु ते काम बाळासाहेब पंडित यानी सफाईनं मनोवेधक रीतीनं केलेलं पाहून आप्पासाहेबाना या शालीन तरूण मित्राचा फार अभिमान वाटला. समवयस्क मित्रमंडळीत आप्पा जसे रमतात तसे तरुण पिढीशी देखील चटकन मिसळू शकतात, याचं कारण कुठेहि विशेष गुण दिसला की त्याचं कौतुक करण्याची आप्पांची तत्परता, नित्य नव्या गोष्टीत गोडी घेण्याची त्यांची वृत्ति, तरूण पिढीच्या विचारात व स्वतःच्या विचारात शक्य तो अंतर पडू न देण्याची त्यांची इच्छा. उदाहरणार्थ श्री. शंकरराव किर्लोस्कर याच्या संपादकीय चातुर्याविषयी आप्पाना जेवढा आदर होता तितकंच कौतुक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर याचंहि ते करतात. कवि गिरीश यांच्याशी आप्पांचा स्नेह होता, आणि गिरीशांचे चिरंजीव श्री. वसंत कानेटकर यांच्या साहित्यिक कर्तृत्वाचाहि त्यांना अभिमान वाटतो. राजाराम कॉलेजातील जुने विद्यार्थी आता भेटले तरी आप्पासाहेबाना ते तरुण वाटतात. कारण त्या काळातल्या आठवणीना वृद्धत्व येणं शक्यच नाही. श्री. भाऊसाहेब कांदळगांवकर आप्पांच्या कादंबऱ्याच्या आकर्षणानं कराचीहून मुद्दाम कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात आले. त्यांची आणि आप्पांची जेव्हा जेव्हा भेट होते तेव्हा पंचवीस वर्षांवर पडदा पडतो, आणि त्या काळातल्या आठवणी दोघं काढू लागले की दोघंहि पुन्हा तरुण बनतात. हीच गोष्ट श्री. शिवराम

कोल्हटकर आणि आप्पा यांच्या भेटीची. दोघामधील परस्पर स्नेह इतका अकृत्रिम की श्री. शिवराम कोल्हटकर यांनी अंजली प्रकाशन संस्थेची कल्पना काढल्याबरोबर आप्पानी रुकार दिला एवढंच नव्हे तर सारी व्यावहारिक जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. आणि त्यांच्या कर्तृत्वामुळेच अंजलि प्रकाशन संस्था अल्पकाळात नावारूपाला आली.

इंग्रजीत असं सुभाषित आहे की तुमच्या मित्रांचं वर्णन करा म्हणजे तुम्हीं कोणत्या प्रकारचे गृहस्थ आहा हे निराळं सांगायला नको. जसे आप्पासाहेब तसे त्यांचे मित्र. किंवा असं म्हणू की आप्पासाहेबांच्या आवडीचे विषय जसे विविध त्याचप्रमाणें किंवा त्यामुळेंच !–त्यांची मित्रमंडळीहि विविध क्षेत्रातली. त्यांच्या जीवनातील छंदांचे सूर जसे अनेक तसेच त्यांचे स्नेही अनेक प्रकारांचे. मात्र नाट्य, संगीत, नृत्य, क्रीडा, चित्रकला, शिल्पकला अशा अनेक विषयांत आप्पानी लक्ष घातलेलं असलं तरी या साऱ्यातून उमटणारे स्वर 'पार्श्वसंगीता'सारखेच म्हणावे लागतील. या सगळ्या उद्योगांच्या आणि आवडींच्या कोंदणात शोभत आहे त्यांच्या साहित्याचा उद्योगच. आप्पासाहेबांच्या मतानं खऱ्या जिवंत लेखकाला सारं जीवन "कॉपी" सारखं असतं. तो ज्या ज्या गोष्टीत रस घेतो ती ती त्याच्या लेखनाचा विषय बनते. या अभिप्रायानंच कित्येकदा ते व्याख्यानात सांगतात, "जीवनासाठीं कला नसून सारं जीवन कलेसाठी आहे!" आप्पासाहेब साऱ्या जगाकडे आणि संसारातल्या साऱ्या गोष्टींकडे पाहतात ललित लेखकाच्या दृष्टीनं ! आज पंचवीस वर्षं मी त्याना जवळून पाहते आहे. प्रियकर, पति, पिता अशा अनेक नात्यानी त्यांचे दर्शन मला घडलं आहे, घडत आहे. परंतु या सर्व विविध दर्शनात मला सतत दिसतात ते लेखनात रमलेले फडके. त्यांच्या जीविताचा आद्य हेतु साहित्य निर्मिती हाच आहे. लेखन म्हणजे त्यांचा श्वासोच्छवास आहे. आपल्या कादंबरी-चा विचार ते कधी करतात ते अहर्निश त्यांच्या सान्निध्यात असलेल्या मला देखील कळत नाही. परंतु याचाच अर्थ असा कीं त्यांचं चिंतन गुप्त सरस्वतीच्या ओघाप्रमाणें गुप्त रीतीनं सतत चाललेलं असत. कितीकदा तरी सकाळचा चहा पिताना ते मला सांगतात, " काल रात्री झोपेत मला अमूक अमूक गोष्ट सुचली. "

कित्येकदा तर आपण स्वप्नात अमूक अमूक वाक्य लिहिली असं म्हणून ती सुंदर वाक्यं ते मला ऐकवितात.

त्यांच्या अंतर्मनातील प्रतिभेचा व्यापार सतत चालू असतो. मात्र लेखनाचा जो प्रत्यक्ष उद्योग करायचा त्याचं वेळापत्रक त्यांनी आखून घेतललं आहे. कलावंताचा जो लहरीपणा प्रख्यात आहे तो त्यांच्या ठिकाणी दिसत नाही. त्यानी आपल्या प्रतिभेला शिस्त लावली आहे. कधी कधी कादंबरीच्या ' एखाद्या टप्प्यावर ते अडतात मग ते मला म्हणतात, " घोडं अडलं. " मग ते एकीकडे मनातल्या मनात कल्पनेच्या घोड्याला चुचकारीत असतात, आणि जेवण्यात, खाण्यात, संभाषणातहि त्यांचं लक्ष नसल्यासारखं वागतात. " सुचणं ही एक गूढ रहस्यासारखी गोष्ट आहे. " असं ते म्हणतात. " कां सुचेनासं होतं तेही कळत नाहीं. आणि मग एकदम कां आणि कसं सुचत तेहि समजत नाही " या अर्थानं प्रतिभा ही एक दैवी देणगी आहे असं आप्पा मानतात. ही सुचण्याची गूढ क्रिया झाली. मनातली निरगाठ सुटली, घोडं पुढे चालू लागलं की मग मात्र आप्पांच्या हसण्याखेळण्याला आणि विनोदी संभाषणाला विशेष भर येतो. परंतु कितीहि सुचलेलं असलं तरी तासन्तास ते लिहीत बसत नाहीत. ' देता किती घेशील दो करानी ? ' असं स्वैर वेगानं सुटलेली त्यांची प्रतिभा म्हणाली तरी ते तिला चक्क सांगतात, " आता विजयशी क्रिकेट खेळण्याची माझी वेळ झाली. " किंवा– " मी आणि कमल आता फिरायला जाणार आहो. " राजा आणि राणी अशी आमच्या घरातली दोन त्यांची आवडती कुत्री वाटच पहात असतात. आम्ही कपडे करू लागलो की फिरायला जायचं म्हणून ती ओळखतात, बागडू लागतात. रोज संध्याकाळीं विजयला पन्नास चेंडू टाकायचे ही गोष्ट देखील एखाद्या धार्मिक विधीसारखी आप्पा पाळतात. आपली तिन्ही मुलं मोठी झाली पाहिजेत, रसिक झाली पाहिजेत अशी त्यांची नुसती इच्छाच नाही, तर सक्रीय खटपट आहे. आमची अकरा वर्षांची अंजली भराभरा कविता चांगल्या करते. तिला ते कितीकदा प्रेमानं ' ज्ञानेश्वर ' म्हणून हाक मारतात ते विजयला कधी ब्रॅडमन म्हणतात कधी शेख महंमद म्हणतात. थोरल्या रोहिणीच्या नृत्याचंदखील त्यांना कोण कौतुक.

मी आणि आप्पा मिळून कधीमधी नाटकाला सिनेमाला जातो. परंतु मुलांचे सिनेमाचे प्रोग्रॅम सतत चालू असतात. अमका चित्रपट मुलानी पहावा, अमका पाहू नये, चित्रपटानी मुलं बिघडतात, मासिकं वाचून ती बिघडतात, हे मत आप्पाना फारसं मान्य नाही. ते म्हणतात आजचं जग इतक्या विविध संस्कारानी भरलेलं आहे की त्यापासून मुलाना दूर ठेवणं अशक्य आहे, वेडेपणाचंहि आहे. सारं बरेवाईट संस्कार पचवून मुलं चांगली निघाली तरच ते खरं.

आप्पांच्यावर माझं प्रेम प्रथम जडलं तेव्हाच त्यांच्या विनोदप्रिय स्वभावानं आणि संभाषणानं मला मोह घातला होता. आता तर काय, घरात सारखा विनोद झडत असतो. आप्पांच्या लिहिण्यात आणि व्याख्यानात ठिक-ठिकाणी किती नर्मविनोद भरलेला असतो त्याचा परिचय सर्वांनाच आहे. परंतु त्यांचा कोटीबाजपणा मला हरघडी हसवितो राणी कुत्री मेरलिन मनरोसारखी चालते तिला ते म्हणतील, " ए लुगाई ".राजा कुत्र्याचा दांडगेपणा पाहून ते त्याला पदवी बहाल करतील " उडन खटोला. " विशेष प्रेमातली मित्रमंडळी आली की विनोदाचे ' किस्से ' ते सांगतील आणि त्याना हसवतील. एकदा अंथरूणात पडल्या पडल्या वाचताना ते इतके हसत सुटले की मला कळेना काय झालं. त्यांना हसण्याचा एवढा ' अटॅक ' आला की त्यांना धड काही बोलताहि येईना. एका मासिकातल्या कार्टूनमधे दोन रानटी माणसांनी एका गोऱ्या साहेबाला चूलाण्यावरच्या कढईत घातलं होतं. आणि त्या साहेबाला ते म्हणत होते " मॅचेस प्लीज ". किती वेळ तरी आम्ही दोघं वात झाल्याप्रमाणे हंसत सुटलो. मला स्वतःला, आप्पाना, आणि त्यामुळें आमच्या तिन्ही मुलानाही लोकांच्या नकला करण्याची फार हौस. एकदा बेंद्रे कवींची आप्पानी अशी कांही नक्कल केली की आम्हा सर्वांना हसता हसता पुरेवाट झाली. ही विनोदाची लूट म्हणजे आमच्या संसारातलं एक मोठं सुखाचं स्थान आहे.

माझं आणि आप्पांचं प्रेम जमलं तेव्हां आम्ही दोघं एकमेकाजवळ आलो ते ' मित्र ' म्हणून आणि आज आम्ही एकमेकाशी समरस झालो आहो तेहि मित्र म्हणूनच. साध्या घरगुती गोष्टी-प्रापंचिक विषय आमच्या बोलण्यात कधी निघतच नाहीत. ही माझी बायको आणि हा माझा नवरा अशी सामान्य

जाणीव आम्हाला कधी असते की नाही कुणास ठाऊक? संस्कृत सुभाषितात बायकोला " सखी " म्हटलेलं आहे. माझं आणि आप्पांचं हेच नातं प्रथम जडलं. आज घटकेलाहि तेच कायम आहे. एकत्र घालविलेल्या दीर्घ कालाच्या आठवणी अनंत आहेत. परंतु खरं म्हणजे इतकी वर्षं कशी चुटकीसरशी गेली असं वाटतं. आप्पांचं ' जीवन संगीत ' त्यांच्या विविध आणि विपुल साहित्यात अनंत रूपानीं उमटलेलं आहे, आणि ते हजारो वाचकांनी ऐकलेलं आहे. परंतु माझं विशेष भाग्य हे की त्या जीवन संगीतानं भरलेल्या घरांत मी रहात आहे. परख चित्रपटातलं " ओ सजना " हे लताचं रेकॉर्ड आमच्या रोहिणीनं आणलं. आप्पानी ते ऐकलं, आणि त्या गाण्यावर ते इतके लुब्ध झाले की घरी येणाऱ्या प्रत्येक माणसाला त्या गाण्यातली सौंदर्य-स्थळं आधी सांगून ती रेकॉर्ड ते ऐकवू लागले. कितीदा तरी ते रात्री निजण्यापूर्वी ती रेकॉर्ड लावायला सांगतात, किंवा उठल्याबरोबर चहा घेताना रोहिणीला म्हणतात, लताचं " ओ सजना " लाव ग. ते रेकॉर्ड लागलं आणि आमच्या हॉलमध्यें त्या गाण्याचे स्वर भरले कीं माझ्या मनात येतं, आमचंहि आयुष्य असंच विविध मधुर स्वरानी भरलेलं आहे ! भरलेलं राहणार आहे !



# फडके—व्यक्तित्व व वक्तृत्व

लेखकः—वामन कृष्ण चोरघडे

पंचवीस वर्षांपूर्वींची गोष्ट. त्यावेळीं मी नागपूरला मॉरिस कॉलेजांत बी. ए. च्या पहिल्या वर्षांत होतों. मराठी साहित्याची सेवा करणारे कॉलेजचें शारदामंडळ त्यावेळीं पुष्कळच कार्य करीत होतें. त्या संस्थेचा कार्यवाह म्हणून निवडून आल्यानंतर मंडळाचा दशवार्षिकोत्सव साजरा करण्याचें ठरलें. उत्सवाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. ना. सी. फडके यांना बोलवावयाचें ठरलें. ते येतील अशी कोणालाच अपेक्षा नव्हती. मी त्यांना कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजच्या पत्त्यावर निमंत्रणाचें विनंतीपत्र लिहिलें. माझ्या स्वभावाप्रमाणें मीहि निरपेक्षच होतों. तथापि प्रा. फडके यांचें येतों म्हणून पत्र आलें.

मी त्यावेळीं एक सामान्य विद्यार्थी, वय, अधिकार, विद्वत्ता या बाबतींत अगदीच पोर. फडके आले. त्यांनीं नागपूरला तीन सुंदर व्याख्यानें दिलीं. उत्सवाचें भाषण गर्दीने फुललेल्या नागपूर विश्वविद्यालयाच्या पदवीदान सभागृहांत खूप छान झालें.

त्यावेळीं सन्मान, आदर, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांच्या गळयांत जो मी हार घातला तोच माझा आणि त्यांचा पहिला परिचय.

त्यांचें त्यावेळचें येणें नैमित्तिक होतें. निमित्त संपलें की तात्पुरती झालेली ओळखहि संपून जाते. उत्सवाच्या गडबडींत त्यांची व्यवस्था दुसऱ्यांवर सोंपवून मी माझ्या कामांत व्यग्र होतों. अखेरच्या दिवशीं दुपारी फडके मला म्हणाले, " चोरघडे, तुम्ही मला बोलावलें, तुमच्यासाठी मी आलो, तुम्ही माझ्याशीं कधी बोलणार ? " मी वरमून गेलो. हात जोडून त्यांना विनंती केली कीं आप्पासाहेब, ताप दीड तासांत मोकळा होऊन मी आपल्याकडे येतो, त्या अवधींत माझी मित्रमंडळी मी एकत्र जमविली आणि आप्पासाहेबांना घेऊन तेलंखडीच्या बागेंत एक तास मजेत गप्पागोष्टी आणि मैफलींत वेळ घालविला मित्रांसहित आम्ही एक फोटो काढून घेतला.

हे लिहीत असतांना तो फोटो माझ्यासमोर भिंतीवर आहे. त्यांतील मित्रमंडळी पांगली, आपापल्या उद्योगाला लागली; फडक्यांचा स्नेह मात्र अजून कायम आहे. दिवसामासीं वाढतो आहे. तो स्नेह एकतर्फी आहे. मैत्रीला आदानप्रदान लागतें. माझ्याजवळ आप्पासाहेबांना देतां येईल असें कांही नव्हतें आणि आजहि नाहीं. पण त्यांनीं जें मला दिलें त्याचा स्वीकार करतांना मला संकोचहि वाटत नाहीं हें माझ्या दृष्टीनें आप्पासाहेबांचे विशेष व्यक्तित्व होय. पंचवीस वर्षांपूर्वी त्यांनीं मला ' चोरघडे ' म्हणून जी हांक मारली तिच्यातला नाद, ताल, जिव्हाळा आजहि माझे मन अनुभवूं शकतें. १९३५ पासून त्यांचा माझा पत्रव्यवहार सुरू झाला तो अद्याप कायम आहे, माझी पत्रें आरंभी पोरकट नंतर अपुरीं, अपरिपक्व, भावनाप्रधान, नंतर व्यवहारिक अशी राहिली. फडक्यांची उत्तरें मात्र अनेकदा वाचावींत अनेकदा पहावींत अशीच राहिली. ऐसपैस नोटपेपर, त्यावर व्यवस्थित टाईप केलेली बारीकसारीक गोष्टींचा उल्लेख करणारीं, भावनांचा आढावा घेणारीं विस्तृत पत्रें-पुष्कळदां मला विस्मय वाटे की, हे इतके कसें काय लिहिले जाऊं शकतें? पत्रलेखक फडके म्हणूनच एक स्वतंत्र विषय होऊं शकेल, आणि फडक्यांनी आपल्या सोबत्यांना जीं पत्रें लिहिली त्यांचा संग्रह केला तर तो मोठा मनोरम ग्रंथ होईल याबद्दल मला खात्री आहे.

फडक्यांचा स्नेह मला लाभला तो काळ आम्हां नव्यानेच वाङमय सृष्टींत पाऊल घालणाऱ्यांच्या दृष्टीनें मोठा विचित्र होता. त्या वेळच्या वाङ्मयाच्या आखाड्यांत चार नांवें खूपच गाजली होती. श्री. अनंत हरि गद्रे, श्री. प्रल्हाद केशव अत्रे, श्री. मामा वरेरकर आणि प्रा. फडके. मराठी साप्ताहिकांच्या अंकामध्यें या चौघांत कुठें ना कुठें कसल्यातरी प्रसंगावरून वादंग माजल्याचें दिसून येई. उखाळ्यापाखाळ्या, व्यक्तिगत टीका यांना ऊत आलेला दिसायचा आम्हाला कळेना. ज्यांच्याकडे आदराशिवाय अन्य कोणत्याहि भावनेनें पहाणें म्हणजे आपला धर्म सोडणें होय असे वाटणारा माझ्यासारखा लेखकवर्ग बुचकळ्यांत पडून म्हणे कीं, हीं मोठी माणसें अशीं कां बरे भांडतात? मोठ्यांचे छोटेपण, तें हेंच असेल काय? आणि या

मांडणांतून निष्पन्न ते काय होणार ? जें काय निष्पन्न झालें तें प्रत्यक्षपणें दिसत नसलें तरी अप्रत्यक्षपणें पुढच्या पिढीला तशी संवय लागली आणि व्यक्तिगत टीकेचा एक नवा पायंडा मराठीच्या साहित्यिक वृत्तपत्रीय जगांत सुरू झाला. त्याची झळ मी दूर असल्यामुळे मला लागली नाहीं आणि हे वाद पुण्यामुंबईकडे गाजत असल्यामुळे आमच्या दूरस्थ मंडळींच्या कानठाळ्याहि बसल्या नाहींत. येवढेंच नव्हे तर वरेरकर, अत्रे, फडके ज्या ज्या वेळीं इकडे आमच्या बाजूला आले, त्यावेळीं येथील मराठी भाषाप्रेमी मंडळींनी त्यांना आदराचें अभिवादन केलें आणि त्यांनीहि आमच्या आनंदाच्या दुधांत आपल्या सद्भावनांची साखर घातली. यामुळेच प्रा. फडके यांच्या स्नेहांत अंतराय आला नाहीं.

१९३५ नंतर दोन वर्षांनी मी वर्धेला गेलों. सार्वभाषिक वर्गकोश म्हणून भारताच्या सोळा प्रमुख भाषांचा संगम साधणारा एक मोठा कोश करावयाचें ठरलें. आचार्य काकासाहेब कालेलकर हे मला मुद्दाम पुण्याला ज्ञानकोश आणि शब्दकोश तयार करणाऱ्या संस्थेमध्यें आरंभीचें शिक्षण घेण्यासाठी म्हणून घेऊन गेले. पुण्यास जातांना मी प्रा. फडक्यांना कोल्हापूरला पत्र लिहून कळविलें. आशा ही कीं, ते जर क्रिकेट मॅच किंवा संगीताची मैफल अशासारख्या एखाद्या निमित्ताने पुण्यास आले तर त्यांची माझी भेट व्हावी. भेट होईल असा संभव नव्हता. पण भेट होण्याच्या आशेंत आनंद मात्र होता. पुण्याला पोंचत नाही तोंच फडक्यांचें मला पत्र आलें. मी काय वाटेल तें झालें तरी कोल्हापूरला यावें असें त्यांत होतें. उत्तराची उसंत न देतां लागोपाठ तीन दिवसात तीन पत्रें त्यांचीं आलीं. आचार्य कालेलकरांनाहि त्यांनी लिहिलें कीं, मला कोल्हापूरला त्यांनी पाठवावें. शेवटीं त्यांचें जें पत्र आलें त्यांत त्यांनी असेंहि लिहिलें कीं जगातल्या सगळ्या भाषा मला येतात, तेव्हां पुण्यापेक्षां इथे माझ्याजवळच तुम्हांला अधिक शिकतां येईल. वाक्य गमतीचें होतें पण त्यांतली मजबद्दलची आपुलकी शिगेस पोंचली होती. त्यांच्या निरपेक्ष स्नेहाचा हा दुसरा सर्ग मला तेथें अनुभवावयास मिळाला. या स्नेहाच्या भरंवशावरच पुढें मी वऱ्हाडकडे इतर संस्थाच्या निमित्ताने फडके आले त्यांत माझ्या विनंतीचा वांटा बराच होता. माझ्यासाठीं ते वर्धेला आले.

तीन दिवस आम्ही एकत्र होतों. गेल्या पांच वर्षांत ते नागपूरला अनेकदां आले. मागील वर्षी व्याख्यानाचा दौरा त्यांनीं काढला तेव्हां पुसदच्या मुक्कामांत त्यांच्याबरोबर तीन दिवस राहण्याचा सुयोग मला लाभला.

हे सगळें विस्तारानें फडक्यांच्या व्यक्तित्वापेक्षां माझ्याबद्दलच अधिक लिहिलें जात आहे. यांत उद्देश एवढाच कीं, स्नेही म्हटल्यानंतर प्रयोजन नसतांहि फडके मित्रभावना कशी कटाक्षानें सांभाळतात, स्नेहाचें रोपटें सिंचवून त्याला बहराला आणण्यांत केवढी जागरुकता दाखवितात हें दिसावें ! यांतला मीं महत्वाचा नाही. महत्वाचें आहे तें आप्पासाहेबांचें स्नेहशील हृदय जें परीपद्धति न पाहतां आपुलकीनें परिपूर्ण आहे.

त्यांना मराठींत फार मोठा वाचक समुदाय मिळाला त्यांत बरींच मंडळी माझ्यासारखी होतीं असें मला वाटतें. आम्ही फडक्यांनी लिहिलेला प्रत्येक शब्द वाचत असूं. दौलत, जादूगार, कलंकशोभा, प्रवासी अशा एकामागून एक अति सुंदर कादंबऱ्या फडक्यांनीं लिहिल्या. आम्हां मंडळींचा लेखकाचें तंत्र शिकण्याचा तो काळ होता. आमच्या अगोदरच्या पिढ्या चिपळूणकर, केळकर यांचे ऋण मानणाऱ्या. चिपळूणकरांचे आमच्यावर संस्कार नव्हते. आमची पिढी फडके, खांडेकर यांच्या लेखणीने शिकली. त्यांतल्यात्यांत लेखनकला, लेखनांतला संयम, टापटीप, नेटकेपणा हें सगळें फडक्यांपासून आम्हाला शिकतां आलें. त्यांचा लेखनविलास म्हणजे संयम, प्रमाणबद्धता, सहजपणा, चटकदारपणा ! काय लिहावयाचें आहे, याची स्पष्ट आंखणी ! कसें लिहावयाचें आहे, याची स्पष्ट आंखणी ! कसें लिहावयाचें आहे याचें स्पष्ट चित्र योजल्यानंतरच फडक्यांनीं लेखन केलें असें मला वाटतें. त्यांच्या या लेखनकलेमध्येंहि त्यांच्या व्यक्तित्वाचा दुसरा पैलू प्रतीत होतो. लेखनासाठीं जी साधना करावी लागते त्या साधनेंत यत्किंचित कसूर न करणारे आणि काडीचीहि कसर न ठेवणारे प्रा. फडक्यांसारखे लेखक मराठींत तरी, जपून शब्द वापरावयाचा तर विरळाच ! हें मी कोणत्या अनुषंगानें म्हणतों याच उदाहरण देतों. फडक्यांप्रमाणेच मराठी वाङ्मयाच्या आघाडीवर त्या वेळीं कांहीं कथालेखक आणि कादंबरीकार होते. पण त्यांच्या लेखनांतून त्यांनी काय वाचलें, त्यांतले त्यांना किती पचलें याचा

आढावा सहज घेतां येत होता. त्यांची कथा सुरू व्हायची ती म्हणजे, 'मी सहज पॅपीनी ( इटालियन लेखक ) वाचत पडलों होतों.' पुढच्या कथाविषयांमध्यें याचा कधीहि, कुठहि संबंध येत नसे. म्हणजे हा 'मी' पॅपीनीऐवजी अंकलिपी वाचत पडलों असतो तरी कथाविषयाला धक्का लागण्याचा संभव नव्हता आणि भरहि पडणार नव्हती. आम्ही त्या वेळीं चटकन् ओळखत असूं कीं, मुंबईच्या बाजारांत पॅपीनीचें पुस्तक आलें असलें पाहिजे आणि हे मशारनिल्हे लेखक आपल्या प्रगाढ पांडित्यानें वाचकांना दिपविण्याचा प्रयत्न करीत असले पाहिजेत. फडक्यांच्या कथा कादंबऱ्यांत ग्रंथवाचक फडके कुठहि दिसणार नाहीत. त्यांच्या आवडीच्या विषयांचा उल्लेख अशा दृष्टीने केलेला कुठेहि आढळायचा नाही. राजकीय बाजारांत कोणे एके काळीं केलेल्या त्यागाचें भांडवलच योग्यतेऐवजी पुढे करून कांहीं तथाकथित पुढाऱ्यांसारखे फडक्यांनी आपल्या विद्वत्तेच्या भांडवलानें आपला कथाविषय कधीहि डागळूं दिला नाही. हें साधायला फार मोठा संयम लागतो आणि कलाविलासाची योग्यताहि लागते. हितोपदेशांत, पंचतंत्रांत, इसापनीतींत, कोल्हे, लांडगे, पारवे दिसतील पण त्यांत चाणक्य, इसाप जसे दिसत नाहीत आणि दिसत नाही म्हणूनच ते अमर झाले आहेत, याची पक्की खूण आपल्या गांठी बांधूनच फडक्यांनी लेखणी उचलली, हें मी लेखनक्षेत्रांतील त्यांचें आगळें विलोभनीय व्यक्तित्व समजतों. स्नेही लेखक आणि माणूस या तिन्हीहि दृष्टीनें फडक्यांचें ठळकपण अनेकांना अनुभवावयास मिळालें आहे माणूस म्हणून एक आठवण सांगण्याची परवानगी घेतों.

पंचवीस वर्षांपूर्वी फडके नागपूरला आले ते मीं सांगितलेंच. शारदामंडळाची आर्थिक स्थिती मुळीच चांगली नव्हती. कोल्हापूर ते नागपूर तिसऱ्या वर्गाचें भाडेंच फक्त आम्ही त्यांना देऊं शकत होतों. फडके आले ते दुसऱ्या वर्गांतून आणि गेले तेहि दुसऱ्या वर्गांतून. मी अतिशय संकोचानें एका पाकिटांत तीस रुपये घालून त्यांच्या हाती ठेवले पण बाह्य परिस्थितीपेक्षां आपल्याला काय केले पाहिजे याची जाणीव फडक्यांमध्ये जशी त्यावेळीं मला आढळली तशीच आजतागायत आढळत आली. पहिल्या वर्गाचें भाडें मिळत

असतांना ते खिशांत टाकून तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्यांची वाण नाही. वाण आहे ती पदरमोड करून स्वतःची प्रतिष्ठा स्वतः सांभाळणाऱ्यांची ! अंतर्बाह्य स्पष्टपणा, सहजपणा हा त्यांच्यांत जो दिसून येतो तो असल्याच प्रसंगी ! प्रसंगविशेषीं वागण्याची एक रीत असते त्या रीतीचें पालन फडके जितकें तंतोतंत करतात तितके फारच थोड्यांना वागतां येत असेल. आपल्याला जेथे जावयाचें तिथली सगळी चौकशी ते करतील. जिथे बोलावयाचें असेल तिथल्या वातावरणाची जाणीव करून घेतील ! घर सोडून मुक्कामाला पोंचल्याबरोबर घरीं ताबडतोब सुखरुप पोंचल्याची तार करतील, मुक्काम गांठतांच आपण प्रवासानें थकलों असा भासहि होऊं न देतां मजेंत प्रवास झाला असें सांगून एकाद दुसऱ्या वाक्यानें आजुबाजुचे वातावरण प्रसन्न करतील ! आपल्याकडे पाहून कोणी उदास, दुर्मुख होणार नाही याची जणुं काय कटाक्षानें ते काळजी घेतात. या वयांत देखील फडक्यांचें कपड्यांतील नेटकेपणा, प्रसाधनांतील जागरुकपणा, सेंट, अत्तर, यांचा शौक हें सगळें त्यांच्यासाठीं कितपत आहे मला माहीत नाही, पण इतरांची " सूरत वैसीहि " न ठेवण्यांकडे मात्र त्याचा खास उपयोग होतो, हा अनुभव मी घेतलेला आहे.

प्रा. फडके यांचे राहणें, वागणें जसे टिपेचें तसेच त्यांचें वक्तृत्वहि ! त्यांच्या वक्तृत्वाबद्दल लिहीण्याची फारशी योग्यता माझ्यात नाही. अनेक प्रसंगीं बोलण्याची आपत्ति माझ्यावर आल्यामुळे वक्त्याची मानसिक घडामोड मला माहीत असली तरी वक्तृत्वाची कला आत्मसात ज्यांनी केली त्यांचें मूल्यमापन करण्याइतका मी तज्ञ नाही. फडक्यांचीं कित्येक व्याख्यानें मी ऐकलीं. त्यांचीं तीन व्याख्यानें अतिशय काळजीपूर्वक माझ्या लक्षांत मी ठेवलीं. शारदामंडळाच्या उत्सवाचें पहिलें भाषण, पुसदच्या साहित्य संमेलनाच्या वेळचें दुसरें भाषण–आणि वर्धेच्या कॉमर्स कॉलेजांत स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी इंग्रजींत केलेलें तिसरें भाषण ! या तिन्ही भाषणांचा प्रभावीपणा कशांत आहे, हें जेव्हा जेव्हा मी माझ्या मनाशीं जोखतों तेव्हा मला असें वाटतें की, ती सर्व भाषणें सुबद्ध, योजनापूर्वक परिणामाची

कल्पना करूनच फडक्यांनी दिलेली होती. कलेसाठी कला, हा त्यांचा आवडता विषय आणि आधुनिकता हा त्यांचा आवडता धर्म ! हेच विषय त्यांनी वरील तीन भाषणांत मांडले. ते विषयच असे कीं, त्यांचें भाषण ऐकून श्रोत्यांना आकस, आवेश चढण्याचें कारण नाही. तुम्ही जर दुराग्रही नसाल तर माझें म्हणणें मी तुम्हाला पटवून देईनच देईन असा त्यांचा आत्मविश्वास ! फडक्यांच्या भाषणाची परी एका दृष्टातानें अजमाविण्याचा प्रयत्न करूं या. एक बालिका आहे. तिला बरें नाही. ती औषध घेत नाही. तिला सांगून समजावून एकदाचें औषध प्यायला लावायचें, अशा प्रकारची समजावणी फडक्यांची नाही. बालिका कांहींशी जागत्या, कांहीशी अजाण अवस्थेंत आहे. अमूक एक केल्यानें, आपल्या शारीरिक आणि मानसिक सौंदर्यांत वाढ होते, याची तिला कल्पना नाही, अशा वेळीं तिला त्याची जाणीव करून ती आहे त्याहून अधिक सुंदर दिसेल असें तिच्याकडून हौसेने, खुषीने करवून घेण्यांत जें कसब लागतें, तें फडक्यांच्या वक्तृत्वांत आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी रसिकांसमोर तिकिट लावून आपलीं भाषणें यशस्वी करणोर, एवढेंच नव्हे तर तिकिटघरापाशीं तिकिट विकत घेणाऱ्यांची गर्दी करून सोडणोर फक्त ना. सी. फडकेच ! इतरांच्या वेळीं झालेले प्रयत्न मुळीच यशस्वी झाले नाहीत. नागपूरच्या विदर्भ साहित्य संघाने जेव्हा जेव्हा फडक्यांना बोलाविलें तेव्हा त्यांचा खर्च व व्याख्यानाचें मानद्रव्य देऊनहि संघाला आठशें ते हजार रुपयांपर्यंत फायदाच झाला. व्याख्यानासाठीं मानद्रव्य घेण्याची प्रथाहि मला वाटतें फडक्यांनीच सुरू केली. कित्येकांना असें द्रव्य घेण्यांत कमीपणा वाटतो. आपले ज्ञान आणि योग्यता विकणें बरें नाही असें त्यांना वाटतें. असे वाटणाऱ्यांपैकीं बऱ्याच मंडळींना वक्तृत्व हा शब्दहि शुद्ध लिहितां येत नाही, कांहींना भाषण देण्यासाठीं परिश्रम करावे लागतात याची जाणीव नाही. आणि कांहींना जाणीव असली तरी त्यांना कोणी बोलावीत नाहीं. लेखनाच्या किंवा वक्तृत्वाच्या क्षेत्रांत ज एक दुष्ट वर्तुळ निर्माण झालें, त्यामध्यें लेखक किंवा वक्ता याला साधना, परिश्रम, योग्यता लागते हें तत्त्वच मुळीं मोक्यांत सांपडलें ! सर्व गुण कांचनाच्या जोरावर प्राप्त करून घेता येतात, असें एक संस्कृत सुभाषित

आहे, त्यांत कांचनाबरोबर आणखी कांहीं अवांतर प्रतिष्ठा जोडल्या की, आजच्या बऱ्याच लेखक आणि वक्त्यांची प्रसिद्धी का आणि कशी आहे, याची कल्पना येते.

फडक्यांच्या वक्तृत्वाच्या निमित्तानें मराठीच्या वक्तृत्व क्षेत्रांतील परिस्थितीचाच उल्लेख होऊन गेला. मला वाटते तो अपरिहार्यहि आहे. फडक्यांचें वक्तृत्व म्हणजे कलेचा विलास! त्यांनी कलेची व्याख्या केली कीं, जी दिसायला सोपी पण साधायला कठीण ती कला! या व्याख्येंत त्यांचें वक्तृत्व बसतें. आमच्या नागपूरचे कंकया नायडू आपल्या बॅटीने षट्काराचा टोला हाणीत पण तो इतका सहजपणें की, तो चेंडू बाजुच्या गड्यापर्यंत पोचेल किंवा नाही अशीसुद्धां पाहणाऱ्याला शंका यायची. पण तो चेंडू जेव्हां सर्वांच्या डोक्यावरून लीलेने हंसत हंसत पल्याड टप्पा साधायचा तेव्हां 'वाहवा' अशा उद्गारांनीं प्रेक्षक फुलून जात असे. पण हा टोला ज्या हातांनीं मारला ते हात वर्षानुवर्षें क्रिकेटची बॅट घुमवीत राबवीत, यशापयशाची आरोह अवरोहणें सहन करीत होते याची कल्पना वाहवा करणाऱ्यांपैकी नव्वद टक्के लोकांना मुळींच नसायची. आपल्याला काय बोलायचे आहे आणि कसें बोलायचें आहे या संबंधीची काटेकोर काळजी फडके जितकी घेतात तितकी फार थोडे वक्ते घेत असतील. आमच्या अर्थशास्त्रांत – औद्योगिक उपक्रम करणारा– म्हणजे, साहसी कोण, याचें उत्तर असें दिलें जातें की, ज्याला उत्पादन कशाचें करावयाचें, कोठें करावयाचें आणि कसें करावयाचें हें कळतें तो साहसी. साहसीची ही परिभाषा फडक्यांच्या वक्तृत्वाला तंतोतंत लागू पडते. माझे व्याख्यान ऐकल्यानंतर श्रोता मान डोलवीत घरीं गेला पाहिजे ही जणु त्यांची प्रतिज्ञा! माझा प्रत्येक शब्द त्याने ऐकला पाहिजे ही जणू त्यांची शपथ! शब्दाशब्दाचा उच्चार, ठसठशीतपणा फडके इतक्या कसोशींने पाळतात की, श्रोता प्रसन्न होऊन जातो. माझ्याजवळ पुष्कळ शब्द आहेत त्यांतील एक शब्द निवडून हा पहा तुमच्याकडे फेकतों, अशी एक सुप्त जाणीव त्यांच्या मनांत सतत असते. भाषा, वाचन, मनन, श्रवण, निदिध्यास ही सगळी साधना वक्तृत्वासाठी फडक्यांनी केली आहे. एवढेंच नव्हे तर त्यासाठी आवश्यक असणारा आवाज देखील

त्यांनी कमाविला आहे. बोलतांना आवाजांत नाद असूं शकतो, स्वरांत संगति असूं शकते याची कल्पना फडक्यांच्या व्याख्यानावरून जितकी येते तितकी इतर वक्त्यांच्या व्याख्यानावरून येत नाही. जें सांगावयाचें तें कितिहि महत्त्वाचें असलें तरी त्याची पुनरुक्ति फडके कधी करावयाचें नाहीत. मी सांगतो हें जरूर लक्षांत ठेवा, नाहीतर तुमचें नुकसान होईल, अशी धमकीहि कधी ते श्रोत्यांना देत नाहीत. एवढेंच नव्हे तर ते असें म्हणतील की, मला असं वाटतं, पटलं तर घ्या! आणि श्रोत्यांना तें पटतं. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वक्तृत्वाचा परिणाम म्हणजे आवेश! शिवरामपंतांच्या भाषणाचा परिणाम म्हणजे आकस, चीड! टिळकांचें उद्बोधन! असा फडक्यांच्या भाषणानें कोणता एकमेव परिणाम श्रोत्यांच्या मनावर होत असेल तर तो म्हणजे प्रसन्नता! ते कधी खद्खदून हंसविणार नाहीत, कधी हाय हाय! अरे अरे! असे उद्गार तुमच्या तोंडून निघूं देणार नाहीत; संथ जलाशयांत हंस आपल्या गतीनें सरसर पाण्याशीं खेळत पुढे सरावा आणि त्याची स्थितीगती विलोभनीय वाटावी, तसेंच कांहींसे फडक्यांचे वक्तृत्व ऐकलें की, प्रेक्षक आणि श्रोता यांना वाटत असते. “Life is a gift of nature, beautiful living is a gift of wisdom.” हें वाक्य जणूं ‘लेखक फडके’ आणि ‘वक्ते फडके’ यांनी आपल्या मनावर कोरून ठेवलें आहे–आणि ते लक्ष्य निमिषभर देखील आपल्या दृष्टीच्या टप्याबाहेर न जाऊं देतां सौंदर्य फुलविण्यासाठीं जणूं त्याचा शब्द आहे, मग तो लिहिलेला असो की बोललेला!

याहून अधिक चांगल्या रितीनें त्यांच्या वक्तृत्वाचें मूल्यमापन करण्याची अवकात माझ्यांत नाही.

# प्रा. फडके यांच्या साहित्यसेवेचे वैशिष्ट्य

लेखकः-श्री. ग. त्र्य. माडखोलकर

प्रा. ना. सी. फडके यांचा एकसष्ठावा वाढदिवस साजरा करण्याचा संधि जरी त्यांच्या स्वतःच्या नकारामुळे महाराष्ट्राला मिळाली नाही, तरी त्यांच्या पन्नासाव्या कादंबरीच्या प्रकाशनाच्या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्याचा सुयोग महाराष्ट्राला अखेर लाभला ही गोष्ट मी अभिनंदनीय समजतो. कारण, या निमित्ताने सामान्यतः १९२० पासून १९६० पर्यंत त्यांचें जे विविध आणि विपुल असे सरस साहित्य गेल्या चाळीस वर्षांत निर्माण झालेले आहे, त्या साहित्याविषयींची आपली कृतज्ञतायुक्त भावना व्यक्त करण्याची संधि त्यांच्या गेल्या दोन पिढ्यांतील वाचकांना, टीकाकारांना आणि समव्यवसायी लेखकांना मिळणार आहे.

कै. हरी नारायण आपटे यांच्यानंतर प्रा. फडके यांच्याइतका ललित साहित्याच्या सर्व शाखा समृद्ध करणारा दुसरा ललितलेखक महाराष्ट्रांत झालेला नाही, असे म्हणावयाला मला यत्किंचित्‌हि शंका वाटत नाही. कै. हरिभाऊंनी १८८२ पासून १९१९ पर्यंत कविता, गोष्टी, लघुनिबंध, नाटकें, कादंबऱ्या इत्यादि नाना प्रकारचें विदग्ध वाङ्मय निर्माण करून सतत तीन तपें मराठी वाचकांची उत्कृष्ट करमणूक केली व आजहि त्यांच्या अनेक कादंबऱ्या उत्सुकतेने वाचल्या जात आहेत हें आपण पहातच आहोंत. त्यांच्यानंतरच्या पिढीत जे अनेक ललितलेखक आणि मुख्यतः कादंबरीकार उदयाला आले, त्या सर्वांत विविध-तेच्या, शैलीच्या, सौष्ठवाच्या आणि रंजनक्षमतेच्या दृष्टीनें प्रा. फडके यांची बरो-बरी एकहि लेखक करूं शकेल, असे वाटत नाही. केवळ विपुलतेच्या आणि चटकदारपणाच्या दृष्टीने नाथमाधव किंवा हडप, केवळ कल्पकतेच्या आणि सात्विकतेच्या दृष्टीने खांडेकर, केवळ चिंतनशीलतेच्या आणि चर्चेच्या दृष्टीने

प्रा. वा. म. जोशी, केवळ निरीक्षणाच्या आणि भेदकतेच्या दृष्टीने मामासाहेब वरेरकर, केवळ समाजविश्लेषणाच्या आणि विक्षिप्तपणाच्या दृष्टीने डॉ. केतकर, केवळ कल्पनाविलासाच्या आणि ध्येयवादित्वाच्या दृष्टीने श्री. पु. य. देशपांडे इत्यादि गेल्या दोन पिढ्यांतील कादंबरीकार हे आपापल्या परीने मोठेच म्हणावे लागतील. पण ललित लेखनाचे विविधत्व, रुचिरत्व आणि सातत्य हे जर तीन गुण घेतले व त्याबरोबरच कादंबरी लेखनांतील वैचित्र्य आणि विशालता हे आणखी दोन गुण जर जमेस धरले, तर कै. आपटे यांची अनेक बाबतींत बरोबरी करणारा आणि कांहीं बाबतींत त्यांच्यापेक्षा वरचढ ठरणारा ललितलेखक आणि कादंबरीकार म्हणून प्रा. फडके यांनाच अग्रपूजेचा मान द्यावा लागेल.

प्रा. फडके यांच्यासंबंधीं ही निखालस स्तुतिपर विधानें करतांना गेल्या चाळीस वर्षांत टीकाकारांनी त्यांच्या सर्वच वाङ्मयावर आणि विशेषतः कादंबऱ्यावर जे आक्षेप घेतलेले आहेत, ते सर्व माझ्या डोळ्यांपुढें आहेत. त्याबरोबरच मला स्वतःलाहि त्यांच्या ललित वाङ्मयांतील जी वैगुण्यें जाणवत आलेली आहेत, त्यांचाहि विसर मला पडलेला नाही, शृंगारिकता, कामुकता, अश्लीलता आणि अनैतिकता हे जे आरोप त्यांच्या सर्वच कथालेखनावर टीकाकारांनी केलेले आहेत, ते माझ्या मताने भ्रान्त आणि अवास्तवहि आहेत. पाश्चात्य वाङ्मय आपण घटकाभर बाजूला ठेऊं. पण, आपले पौराणिक किंवा अभिजात संस्कृत वाङ्मय जर घेतले, तर ते या सर्व दोषांनी परिपूर्ण असल्याचे प्रामाणिक माणसाला तरी कबूल करावे लागेल. प्रा. फडके हे कलावादी असल्यामुळे कलेच्या काटेकोर दृष्टीचे बंधन त्यांच्या लेखनाला साहजिकच पडलेले आहे. पण असे कोणतेंच बंधन आमच्या पौराणिक कवींना नव्हते. कारण, ते आपल्या कल्पनेनुसार गतकालाचा इतिहास सांगावयाला उद्युक्त झालेले होते; व त्यामुळे कोणत्याहि प्रकारचा आडपडदा न ठेवतां त्यांनी मानवी जीवनांतील सर्व प्रकारच्या घटना यथास्थित वर्णन केलेल्या आहेत. अभिजात कवींवर अर्थात्च साहित्यशास्त्राची बंधने होतीं. पण साहित्यशास्त्रांचा भर नीतिपेक्षां कलेवर, आणि बोधापेक्षा रंजनावर असल्यामुळे व त्याहिपेक्षा

शृंगार हा त्या शास्त्राने रसराज मानल्यामुळे, अभिजात संस्कृत साहित्यांत त्या एकाच रसाची लयलूट सर्वत्र आढळून येते. प्रा. फडके हे शृंगारिक आणि कामुक वर्णने करण्यांत कितीहि तरबेज आहेत असे मानले, तरी संस्कृतांतील पौराणिक किंवा अभिजात कवींच्या पासंगालासुद्धा ते या बाबतींत येणार नाहीत. शिवाय आपली मराठी भाषा ही ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्यासाठी आणि हरिगुणगानासाठीच मुख्यतः प्रारंभापासून वापरण्यांत आलेली असल्यामुळे, तिच्या जात्याच वैराग्यशील अस्मितेला शृंगार सुचला तरी तो देववाणीइतका अमर्याद सुचणे शक्य नाही. त्यामुळे प्रा. फडके यांच्या कादंबऱ्यांत जरी शृंगार असला तरी शृंगाराच्या आश्रयाने कामविकार जितका परिपुष्ट झालेला असेल, त्याहिपेक्षा करुण आणि उदात्त हे दोन भाव अधिक परिपुष्ट झालेले आढळतील.

प्रा. फडके यांचे दुसरे वैशिष्ट्य हें की, कै. हरिभाऊ आपटे यांनी ज्याप्रमाणे १८७५ ते १९१० या कालखंडांतील महाराष्ट्रांतल्या उच्च मध्यम वर्गाचे जीवन जिव्हाळ्याने आणि समरसतेने चित्रित केले, त्याप्रमाणे प्रा. फडके यांनी त्यानंतरच्या काळांतील उच्च मध्यम वर्गाचे जीवन मार्मिकतेने आणि चातुर्याने चित्रित केले आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांत समाजजीवनाविषयीं जो एक विलक्षण जिव्हाळा आणि त्यांतून उत्पन्न झालेली समाज–सुधारणेची तळमळ आहे, ती प्रा. फडके यांच्या कादंबऱ्यांत बहुतेक नाहीच. कारण, उच्च मध्यम वर्गाच्या जीवनांत, सुखदुःखांत आणि आशा–आकांक्षांत कलादृष्टीने जे जे कांहीं त्यांना आकर्षक वाटले, तेवढेच फक्त आत्मसात् करून त्यांनी ते कलात्मक शैलीने वर्णन केले, हरिभाऊंच्या आणि त्यांच्या दृष्टीतील आणि शैलीतील हा महत्वाचा मूलभूत फरक आहे, हरिभाऊंचे मन हे सामाजिक, तर प्रा. फडके यांचे मन हे कलासक्त आहे; व हरिभाऊंची प्रतिभा ही समाजनिष्ठ, तर प्रा. फडके यांची प्रतिभा ही कलानिष्ठ आहे. या मूलभूत फरकामुळे या दोघांहि लेखकांनी जरी महाराष्ट्रांतील निरनिराळ्या कालखंडांतल्या उच्च मध्यम वर्गाचे जीवन आपल्या कादबंऱ्यांतून रेखाटलेले असले, तरी त्यांच्या कादंबऱ्यांत शैली आणि आशय या दोन्ही बाबतींत विलक्षण फरक पडलेला आहे. मात्र प्रा. फडके यांची कलासक्ति हे मी त्यांचे वैगुण्य समजत नाही; व त्या

कलासक्तीमुळे महाराष्ट्रांतील उच्च मध्यम वर्गाच्या जीवनाचा हरिभाऊंच्या कादं-बऱ्यांपेक्षा जो बव्हंशीं भिन्न पण कांहीं बाबतींत अधिक मनोज्ञ चित्रपट त्यांनी निर्माण केलेला आहे, तोहि मी कमी दर्जाचा मानावयाला तयार नाही, उलट मी असे म्हणेन की हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांत डॉ. केतकर यांच्या निंदाव्यंजक शब्दांत सांगावयाचे म्हणजे केवळ सदाशिवपेठी जीवन प्रतिबिंबित झालेले आहे, तर प्रा. फडके यांच्या कादंबऱ्यांत अन्य प्रांतांतील आणि अन्य देशांतील लोकजीवनाचे वैचित्र्य आणि रुचिरता ही दोन्ही प्रतिबिंबित झालेली असल्यामुळे त्या कादंबऱ्या अधिक व्यापक आणि आकर्षक वाटतात. हरिभाऊं-च्या कादंबऱ्या या शंभर टक्के ब्राम्हणी आणि पुणेरी आहेत. हा कोतेपणा प्रा. फडके यांच्या कादंबऱ्यांत मुळीच नाही.

प्रा. फडके यांच्या कादंबऱ्यांत जे दोष उत्पन्न झालेले आहेत, ते मुख्यतः त्यांच्या बेसुमार कलासक्तीमुळे! त्यांची शृंगारिकता, कामुकता किंवा अनैतिकता ही सुद्धा त्या कलासक्तीचीच त्यांच्या एकंदर कथालेखनावरील प्रतिक्रिया आहे. त्यांच्या नायिका सदैव सुदर असतात, नायक सौंदर्यलोलुप आणि प्रणयविवश असतात. कथानकें सामान्यतः सुखपर्य-वसायी असतात व मानवी जीवनांतील फक्त तारुण्यदशाच तेवढी त्यांच्या कादंबऱ्यांतून बहुधा चित्रित केलेली असते, इत्यादि जे आक्षेप टीकाकारांनी त्यांच्यावर घेतलेले आहेत, ते सर्व या कलासक्तीच्या पोटीं पैदा झालेले आहेत, प्रा. फडके हे जर हरिभाऊंप्रमाणें सामाजिक मनाचे किंवा प्रा. वा. म. जोशी यांच्याप्रमाणें चिंतनशील प्रवृत्तीचे असते, तर त्यांच्या कादंबऱ्यांना ध्येयवादाची म्हणा किंवा तत्वज्ञानाची म्हणा झिलई चढल्यासारखी दिसली असती. पण केवळ कलैकप्रधान अशीच त्यांची जीवनाकडे पहाण्याची दृष्टी असल्यामुळें राजकीय संघर्ष वर्णन करतांनासुद्धा त्यांतून प्रणयसंगीताचे कोमल सूर वाचकांच्या कानांवर पडतील, अशी योजना केल्याशिवाय त्यांच्याने रहावत नाहीं. वादाच्या जोषांत त्यांनी स्वतःला 'भोगवादी' म्हणवून घेतलेले आहे. पण मला ते कोणत्याच अर्थाने 'भोगवादी' आहेत असें वाटत नाही. ते फक्त कलासक्त आणि कलावादी आहेत एवढेच. कारण भोगवादांतून अनिवार्यतेने उत्पन्न होणारी व

रसहानि आणि सौंदर्यहानि करणारी जुगुप्साजनक स्थळें जशी इंग्रजी, फ्रेंच आणि रशियन कादंबऱ्यांत आढळतात, तशी त्यांच्या कादंबऱ्यांत सापडणार नाहीत.

प्रा. फडके यांचें मराठी साहित्यांतील अद्वितीय वैशिष्ट्य जर कोणते असेल तर ते हें आहे की, ते महाराष्ट्रांतील पहिले यशस्वी कलावादी लेखक आहेत. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी 'कलेसाठीं कला' या तत्वाचा शास्त्रोक्त पुरस्कार साहित्याच्या व्यासपीठावरून पद्धतशीर रीतीने केला व मुख्यतः आपली नाटकेंहि कलेच्या दृष्टीने सुयोग्य ठरावीत अशा आकांक्षेने लिहिली पण त्यांनी वैचित्र्य हा कलेचा आत्मा आणि चमत्कृति निर्माण करणे हे तिचे प्रयोजन मानल्यामुळे त्यांच्या ललित साहित्याला कृत्रिमता आली; व भाषाशैलीपासून तो नाटक कादंबऱ्यांच्या कथानकापर्यंत त्यांनी उत्पन्न केलेल्या कलाकृतींच्या अंगोपांगांत बोजडपणाचा दोष उदभवला. उलट प्रा. फडके यांनी सौंदर्यसाधना हाच कलेचा आत्मा आणि प्रयोजनहि मानल्यामुळे, त्यांच्या कलाकृतींच्या शैलीपासून तो कथानकापर्यंत सर्वच अंगोपांगांत सुश्लिष्टता आणि लालित्य हे गुण प्रकर्षानें परिपुष्ट झाले. महाराष्ट्रांतील उच्च मध्यम वर्गाच्या जीवनांत जे जे कांही त्यांना कोमल, सुंदर, मनोज्ञ किंवा उदात्त म्हणून आढळले, ते ते सर्व त्यांनी कलादृष्टीने चित्रित करून मराठी वाचक वर्गापुढें गेली चाळीस वर्षें मोठ्या मार्मिकतेने ठेवले. मराठी साहित्यालाच केवळ नव्हे, तर जीवनालाहि ही त्यांची श्रेष्ठ देणगी आहे असें मी समजतो.

# गृहस्थाश्रमी आप्पा.

लेखकः- **पां. तु. कांदळगांवकर**, एम्. ए.

'हे सजणाऽ...'ची परखमधील रेकॉर्ड लागली होती. आप्पा आपल्या लेखनाच्या खोलींत आपल्या टंक-लेखिकेला संथपणे मजकूर सांगत होते. आणि मी दौलतच्या दारावरील कर्कश घंटी वाजविली.

'आप्पा, कांदळगांवकर आले!' कमलनें आप्पांना सांगितलें. तेवढ्यांत मी आंत आलों.

'सॉरी टु डिस्टर्ब यु.' माझ्या सिंधी-इंग्रजी थाटांत बोललों.

माझी चवकशी केली आणि मग म्हणाले, '— लेखन हा माझा व्यवसाय आहे. प्रतिभा संचारली कीं मी लिहितों असं कांहीं नाहीं! अंजलिच्या दिवाळी अंकासाठीं कादंबरी लिहितोय कु हु : कु हु : ही माझी ५० सावी कादंबरी.' रीजन्ट सिगारेटचा डबा पुढं केला आणि मोठ्या अभिमानाने म्हणाले, मग लेखनाबद्दल विषय तसाच राहिला. मी काय करतों, कुठं रहातो, मुलं-बाळं किती वगैरे चवकशी केली. 'अधूनमधून ऐकतों तुमचं नांव.' ते म्हणाले ...... १९३४ नंतर गेल्या जून महिन्यांतील ती तिसरी भेट. एकदां गिरगांवात वाटेंत गांठ पडली होती नंतर सौ. मुक्ताबाईच्या 'संसार' नाटकाच्या वेळीं पुण्यांतील अनाथ विद्यार्थीगृहाच्या नाट्यगृहांत आणि ही त्यांच्या पर्वतीचें सतत दर्शन घेणाऱ्या दौलतींत तिसरी! पण या तिसऱ्या गाठींत आमचा स्नेह आणि आपुलकी यांचा झालला संगम अपूर्व आहे. त्यानंतर सत्काराच्या निमित्तानं मी परत तिनदां भेटलों आणि गुरु-शिष्यांचा नव्हे तर वयांत १७ वर्षें फरक असलेल्या मित्रांचा दररोजचा पत्रव्यवहार सुरू झाला.

—गर्दीच्या जनता एक्सप्रेसमध्यें मला खिडकीची जागा मिळाली होती. हातांत आप्पांनीं स्वाक्षरी करून दिलेलं 'लिव्ज इन् ध ऑगस्ट वुईन्ड' पुस्तक होतं. सकाळच्या प्रहरीं गतीनं भुपाळी म्हणत गाडी चालली होती. माझ्या मनांत काहूर माजलं होतं.

प्रा. ना सी. फडके यांच्या कादंबरी वाचनानें मला एवढी मोहिनी घातली कीं १९३४ सालीं कराचीहून मी कॉलेजच्या शिक्षणासाठीं मुंबईला न थांबता तडक कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत गेलो. त्या वेळीं त्यांच्या जादुगार, अटकेपार, दौलत या कादंबऱ्या फार गाजल्या होत्या.

प्रा. आप्पासाहेब फडके आम्हाला ' तत्वज्ञान ' शिकवित. मी इन्टरच्या वर्गांत होतो. एकदां ' सीलॉलीझम ' शिकवितांना एका मुलानें प्रश्न केला,

' Sir, My long lost wife had a dimple on her right cheek You have a dimple on your right cheek ...'

' Yes, yes ! Therefore, you are my long lost wife ! '

प्रा. आप्पांनीं असे म्हणताच स्टँपिंगनें सारे कॉलेज दणाणलें. हंसत खेळत शिकविण्यांत त्यांचा हातखंडा होता. कै. प्रि. बाळकृष्ण यांची त्यांच्यावर फार मोठी मर्जी होती.

कोल्हापूरांत त्यांचे घर एका छोट्या तलावासमोर होतें. त्यांत उगवणारीं कमळें सुंदर दिसत. त्यांचे घर पण सुंदर सजविलेलें असे. आतां प्रा. आप्पासाहेब विजयनगर कॉलनींत सानगुरुजी रस्त्यावर बांधलेल्या स्वतःच्या बंगलेवजा घरांत रहातात. घराचें नांव आहे ' दौलत '. दर्शनी व मागें बाग आहे. त्यांत टपोरे गुलाब व डेलीयासारखीं सुंदर फुलें उमलतात. प्रा. आप्पांचा आवडीचा झोपाळा आहे त्यांवर ते अधूनमधून झोके घेतात. रस्त्याच्या कडेस त्यांची लिहीण्याची खोली आहे. टेबलासमोर रविशंकरचा सतार वाजवितांना तल्लीन झालेला फोटो आहे. तेथील गोल फुलदाणींत ताजीं टवटवीत फुलं असतात. आप्पांच्या पुस्तकांचें इथेच एक लहान कपाट आहे. तेथ सौ. कमलचा फोटो आहे. आणि भिंतीवर स्वतःचा पण ! या खोलीमागील खोली अंजली प्रकाशनाच्या पुस्तकांचे गठ्ठ व पत्रव्यवहार ठेवण्यासाठीं राखून ठेवलेली आहे. पलीकडे दिवाणखाना आहे. सौ. कमलताईनीं तो साध्याच पण काव्यात्मक सजावटीनें प्रफुल्लीत केला आहे. या दिवाणखान्यांत पर्वतीचा एक पावसाळी देखावा आहे. कोल्हापूरचे महाराज श्री छत्रपती शहाजी महाराज यांनीं नजर कलेला फोटोहि आहे. या दिवाणखान्यांत राजु व राणी ही त्यांचीं आवडतीं कुत्रीं-रोहिणी, अंजली व विजय या त्यांच्या मुलांबरोबर खेळतात. अंजली आप्पांकडे आलेल्या पाहुण्या मंडळींची ' नकला ' करून करमणूक येथेच करते !

दिवाणखान्यासमोर अरुंद पण लांब भाग आहे तेथे हंसतखेळत पाहुण्यांचे चहापान होते व जेवणपण. येथून पर्वतीचा देखावा फार सुंदर दिसतो. पुण्यांतील ' लक्झरी बस ' प्रवाशांना घेऊन जेव्हां पुणे हिंडते, तेव्हां आप्पांची ' दौलत ' पुण्यांतील एक अभिनव ठिकाण म्हणून टुरिस्टांना दाखविण्यांत येते. या टुरिस्टांना आप्पा झोपाळ्यावर दिसलें कीं कोण आनंद वाटतो. याच वाटेनें सदाशिव पेठेंतील पेन्शनर दररोज पर्वतीला जातात. आप्पा-कमल सनातनी नाहींत याचा त्यांना मोठा राग येतो.

आप्पांना दुरवर फिरायला जाण्याचा फार शोक ! कोल्हापूरला मैलच्या मैल फिरायला जायचे. पुण्यांत त्यांना वयोमानामुळें ती हौस लुटता येत नाहीं. अधुन-मधुन मात्र ते जातात. सौ. कमलताईंना सिनेमा पहाण्याचा फार षोक ! त्या कधींमधीं आप्पांना आग्रह करून नेतात आणि मुलें पण त्यांच्या मागें लागतात. मग आप्पा आपल्या मित्राला लिहीतील, " मला तो सिनेमा शून्य आवडला, कमलला ५० टक्के आवडला व मुलांना १०० टक्के आवडला. "

आप्पा गृहस्थाश्रमी आहेत. सौ. कमलच्या हातचें जेवण त्यांना हवें. आप्पांकडे पाहुणे थोडे पण त्यांची बडदास्त एवढी कीं आप्पांचे घर सोडून जाणं जीवावर येते त्यांच्या.

' अजीर्ण झालं तरी वाढा ' म्हणावेसे वाटतें पाहुण्यांना ।

मुलांना मोकळी वागणूक पण शिस्त पण तशीच दांडगी ।

पाहुण्यांची उठबस रोहीणी व अंजली छान ठेवतात. विजु पतंग उडविण्यांत नाहींतर क्रिकेट खेळण्यांत दंग असतो व जेवायच्या वेळेला हजर रहातो. आप्पा एखाद्या गरजु गरिब माणसाला मदत पण गुपचुप करतात !

आप्पा संभाषणाच्या ओघांत स्वतःच्या वाङ्मयाबद्दल क्वचितच बोलतील. इतरांचें वाङ्मय मात्र आस्थापूर्वक वाचतील. आणि टीका करायची झाल्यास निर्भीडपणें करतील. आप्पांचा व आचार्य अत्र्यांचा केवढा वाद ! त्याची झळ सौ. कमलला पण लागली ! पण आचार्य अत्र्यांच्या नाटकातला कांहीं भाग

किती सुंदर म्हणतील आणि आनंद व्यक्त करतील. मला वाटतें कै. वामन मल्हार जोशी यांनीं ' फडके–अत्रे ' यांना आवरलें. आप्पांनीं हा संयम अजुनहि पाळला आहे. पण अत्रे मात्र मधूनमधून कोपरखळी मारतातच !

प्रतिभा संचारली कीं आप्पा लिहीतात असें नाहीं. सकाळी आठ वाजतां आंघोळ–चहा आटोपतील. नऊ वाजतां लिहावयास बसतील. बारा वाजेपर्यंत मजकूर सांगतील, अंजली प्रकाशनाचा पत्रव्यवहार पाहतील. दुपारीं जेवणानंतर थोडीशी झोप काढतील. परत चार वाजतां चहा घेऊन लिहायला बसतील ते सहापर्यंत. मध्येच न लिहीण्याची लहर आली तर झोपाळ्यावर जाऊन बसतील.

सारीं कामें वेळेवर झालीं पाहिजेत यावर त्यांचा मोठा कटाक्ष । साधें पार्सल पण सुबक बांधलें गेलें पाहिजे नाहींतर रागावतील. त्यांना आळस माहीत नाहीं हें मात्र खरें. मुले रेडिओ लावोत किंवा दंगामस्ती करूं देत, रस्त्यांवर मुलें ओरडत जावोत, आप्पांच्या कामाला त्यामुळें कसलाच बाध येत नाहीं.

आप्पा मजकूर संथपणें सांगतात. त्यामुळें नवशिक्या टंकलेखकाला तो लिहून घेणें सोपे जाते. आप्पा व्याख्यान देताना पण ' मित्रहो ' पासून सुरुवात करतात. आणि सखल मैदानांतून झुळझुळ वाहणाऱ्या निर्झराप्रमाणें संथपणें रसाळ वाणींत बोलतात. ते राणाभीमदेवी थाटाचीं भाषणें करीत नाहींत, अक्षरशः संभाषण करतात. त्यांची ' गाजलेलीं भाषणें ' वाचा किंवा रेडिओवरील भाषणें ऐका. आप्पा समोर आहेत व आपण ते काय म्हणतात तें ऐकतों आहोंत–असा आभास निर्माण होतो !

आप्पा उचीनें कमी, शरिरानें किरकोळ, पण छाती पुढें वाढून ' कोंडाणा ' जिंकायला चाललेंत या थाटानें चालतील. आप्पांपेक्षां सौ. कमल संभाषणांत जास्त भाग घेतील. आप्पांना ऐकायला कमी येते तेव्हां वाद घालण्याच्या भानगडींत ते पडत नाहीत. पण एकदां रंगांत आले कीं मात्र मनसोक्त बोलतील. किती प्रेमळ आहेत आप्पा ! स्वाभिमानी पण तसेच ! स्वतःहून कुठें मान मागायला जाणार नाहींत पण जातील तेथून मान घेऊन येतील.

अशा आप्पांनीं ५० कादंबऱ्या लिहील्या ! ' अल्ला हो अकबर ' पासून

'कुहु-कुहु' चे महाराष्ट्रभर निनाद उमटले. त्यांचे तरुण वाचक आज साठींत उतरलें तरी आप्पांच्या कादंबऱ्यावर त्यांच्या उड्या! तरुण वाचकवर्ग तर त्यांना नेहमीं मिळतो. पण अश्लील-अश्लील म्हणून ओरड करणारे 'मराठे' पण मिटक्या मारीत त्यांच्या कथा-कादंबऱ्या वाचतात. आतां एका शिळ्या कढीला सौ. मालतीबाई बेडेकरांनीं ऊत आणला आहे.

"आप्पांच्या कादंबऱ्या वाचून तरुणांचा वैचारिक अधःपात झाला आहे' अशी या भावनाप्रधान बाईनें ओरड केली आहे. आप्पानीं एक लाखाची पैज मारली! ललितवाङ्मय प्रचारासाठीं नाहीं. माणूस सौंदर्याचा भोक्ता आहे व भूक ललित लेखकांनीं कौशल्यपूर्णतेनें शमविली पाहिजे असे त्यांचे म्हणणें आहे. श्री काका गाडगीळांनीं पण याला साथ दिली आहे.

आप्पांनीं एकतर आपल्या कादंबऱ्यांत अखिल भारताचे दर्शन घडवून आणलें आहे. तीच तीच पार्श्वभूमी व वर्णनें त्यांनीं कुठें कोंबलीं नाहीं. निसर्गाची व वेगवेगळ्या स्थळांची वर्णनें इतकी सुंदर व सुबक आहेत कीं तीं प्रत्यक्ष पाहिल्याचा आस्वाद मिळतो. अनेक ठिकाणीं आप्पांनीं तर निसर्गावर पण मात केली आहे.

आप्पांनीं कादंबरीत जे प्रसंग निवडले आहेत त्यावरून वेगवेगळ्या मनोवृत्तींच्या माणसांची तर पारख होतेच पण मनुष्याच्या मनाचं क्षितिज केवढे मोठे आहे याची कल्पना येते. केवळ श्रीमंत आणि उच्च–मध्यम समाजच आप्पांनीं आपल्या कादंबरींत हाताळले नाहीं त्यांच्या कादंबऱ्यांत कामगारांच संप आहेत, भांडवलदार व कामगारांचे लढे आहेत. स्वातंत्र्य संग्रामाचीं–नेताजी सुभाषसारख्या भारताच्या शिरोमणींची देशाभिमान प्रेरित होऊन केलेलीं धाडसाचीं अभंग चित्रें आहेत.

काश्मिरचा लढाहि आहे. मग त्यांच्या कादंबऱ्या वैषयिक आहेत, त्या केवळ प्रणयरसप्रधान आहेत. त्या अश्लील आहेत आणि तरुण तरुणींचा अधःपात करणाऱ्या आहेत हे कुणीहि उठल्यासुटल्या म्हणावं याचा अर्थ काय? कांहीं प्रेम प्रकरणें आप्पांनीं उजेडांत आणलीं म्हणून तर हा रोष नाहीं ना?

आज त्यांच्या कथाकादंबऱ्या सारें जग वाचत आहे. ते केवळ मराठी लेखक नाहींत! भारतीय लेखक आहेत! आंतरराष्ट्रीय दर्जाचे लेखक आहेत. त्यांच्या कथा युरोपिअन भाषांत पण प्रसिद्ध झाल्या आहेत. अशा कला व जीवन यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या सौंदर्य – भोक्त्याचा गौरव केवळ महाराष्ट्रानेंच नव्हे तर भारतानें घडवून आणला पाहिजे. मुंबई, पुणें व नागपूर सारख्या मराठीची सेवा करणाऱ्या विद्यापीठांनीं त्यांना मानाच्या पदव्या दिल्या पाहिजेत. भारत सरकारनेंहि त्यांचा बहूमान केला पाहिजे

आज त्यांची असलेली ' दौलत ' पुण्याची नव्हे. ती महाराष्ट्राची शोभा आहे. ती राष्ट्रीय ठेव म्हणून नेहमीं प्रज्वलित राहिली पाहिजे. ' राष्ट्रीय-जिवन्त-स्मारक ' म्हणून त्याच्याकडे पाहिले पाहिजे.

प्रा. आप्पासाहेब क्रिकेटर आहेत, खिलाडू आहेत. त्यांनीं आयुष्याच्या अवघ्या ६७ धांवा काढल्या आहेत. कदाचित् माझा ' बोर्ड ' चुकीचा असेल. त्यांना " Go Ahead! Hit a Century " म्हणण्याचा मोह झाल्यास नवल काय?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 70662
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0010872